THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192583
UNIVERSAL LIBRARY

OUP--391--29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M 9 3 Accession No.

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

कादंबरीमय आंग्लशाही : १

# भारतमाते, ऊठ !

विठ्ठल वामन हडप

आदर्श वाङ्मय प्रकाशन
कोल्हापूर

गांधीयुगाच्या आरंभापासून गांधीजींचा ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं वध झाला, त्या वधाबाबतच्या जगप्रसिद्ध खटल्याच्या निकाला-पावेतोंच्या या अगदीं आजकालच्या ऐतिहासिक कालखंडावरील सहा कादंबऱ्यांची ही 'कादंबरीमय आंग्लशाही' माला कादंबरीकार हडप हे गुंफीत आहेत. या मालेंतील कादंबऱ्या दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें नियमित प्रसिद्ध होतील. मालेची पुढील दुसरी कादंबरी

## भारतमातेची हांक

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

प्रथमावृत्ति : मार्च १९४८

×

**किंमत तीन रुपये**

×

चित्रकार : दीनानाथ डी. दलाल.

मुद्रकः कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

प्रकाशक : यशवंत विठ्ठल हडप,
आदर्श वाङ्मय प्रकाशन,
खासबाग, कोल्हापूर.

# भारतमाते, ऊठ !—

● आपले परमपूज्य राष्ट्रपिते महात्माजी भारतवर्षाला इंग्रजी भांडवली साम्राज्यशाहीच्या गुलामगिरींतून सोडवून याच देहीं याच डोळां स्वतंत्र भारताचा मंगल सोहळा साजरा झालेला पाहून गेले !—गेले कसले ! इतकीं वर्षे धर्मकलंकित जातीयतेच्या खातेऱ्यांत चोरट्या अंगानें डावपेचांनीं दबा धरून बसलेल्या सरंजामशाही—भांडवलशाहीधार्जिण्या प्रतिगामी फासिझमनें महात्माजींचा बळी घेतला ! भारतमातेला राष्ट्रीय क्रांतीच्या टप्प्यापावेतों आपल्याला प्रिय राष्ट्रपित्यानें स्वातंत्र्याचा आस्वाद घेण्यासाठीं आणून सोडलें. पण पुराणकालीं देव—दानवांनीं केलेल्या समुद्र-मंथनाचीच पुनरावृत्ति आज होत आहे. महात्माजींनीं विराट प्रयत्नांनीं खऱ्याखऱ्या पूर्ण स्वातंत्र्याच्या अमृतसिद्धीसाठीं राष्ट्रीय क्रांतीचें समुद्र-मंथन यशस्वितेनें पूर्ण केलें; पण त्या मंथनांतून निर्माण झालेलें अमृत भारताच्या मुखीं लावतां लावतां त्या समुद्रमंथनांतून अमृताबरोबरच निर्माण झालेल्या सरंजामशाही—भांडवलशाहीधार्जिण्या दुष्ट साम्राज्यशाहीला फितूर असलेल्या धर्मकलंकित जातीयतेचें महाभयंकर हलाहल भडकत्या ज्वालांनीं उफाळून स्वतंत्र भारताला जाळीत सुटलें. त्या जाळांत भारताला स्वतंत्र करणाऱ्या भारतमातेच्या विश्ववंद्य सुपुत्राचा पहिला बळी पडला ! आतां इथवर राष्ट्रीय क्रांतीच्या योगानें भारतानें गांठलेल्या स्वातंत्र्याच्या पहिल्या अर्ध्या टप्प्यानंतरचा लोकक्रांतीचा पूर्ण टप्पा भारताला गांठायचा आहे. महात्माजींच्या नंतर हें राष्ट्राचें नेतेपण महात्माजी ज्या दरिद्रीनारायणाचे अवतार म्हणून ओळखले जात त्या दरिद्रीनारायणरूपी भारताच्या कोट-माप कामगार—शेतकरी जनतेकडे आलें आहे. महात्माजींच्या या कोटमाप कामगार—शेतकरीरूपी दरिद्री नारायणाला लोकक्रांतीचा शुभाशीर्वाद देण्यासाठीं—भारतमाते, ऊठ !

"कॉंग्रेसच्या हातीं सत्ता आली तर ती आज उपासमारींत तडफडणाऱ्या प्रत्येक किसानाला अशा वरच्या पायरीला आणून सोडील कीं जिथें त्याला धनकुबेर लक्षाधीशांच्याही बरोबरीनें सुखासमाधानानें जगतां येईल. आणि किसानाला जेव्हां या आपल्या दुर्दशेची जाणीव होईल, आपल्या ह्या दुर्दशेला कारण आपलें 'दैव' नसून सध्यांची राजवट कारण आहे हें जेव्हां त्याला कळूं लागेल, तेव्हां हा किसान कोणाच्या मदतीसाठीं खोळंबून न बसतां उतावळेपणानें सनदशीर आणि बेसनदशीर यांतील साऱ्या मर्यादा अहिंसेच्या वा हिंसेच्याही साधनांनीं पार नष्ट करीत पुढें चालूं लागेल. यासाठींच कॉंग्रेस किसानांना योग्य मार्गदर्शन करण्याची अपेक्षा करते.

—महात्मा गांधी."

डॉ. पट्टाभिसीतारामय्या कृत
'दि हिस्टरी ऑफ दि कॉंग्रेस'
खंड पहिला, पृ. ३६५.

# भूमिका

बावीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानचा इतिहास कादंबरीरूपानें कथन करण्याचा संकल्प मी केला व 'कादंबरीमय पेशवाई'ला प्रारंभ केला. तेव्हां हा कादंबरीमय इतिहास 'कादंबरीमय पेशवाई', 'कादबरीमय शिवशाही' व 'कादंबरीमय आंग्लशाही' अशा तीन खंडात पूर्ण करण्याचा माझा विचार होता. पैकीं 'कादंबरीमय आंग्लशाही'चा कालखंड ५७ च्या बंडानंतर सुरू होतो असें गृहीत धरून मी 'कादंबरीमय आंग्लशाही' गुंफणार होतों. परंतु ह्या कादंबरी मालेचा संकल्प जाहीर केल्यापासून हिंदुस्थानच्या इतिहासांत महान् क्रांतिकारक स्थित्यंतरें घडून आलीं व येत आहेत. आंग्लशाहीचा हिंदुस्थानवरील अंमल देखील ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं संपुष्टांत आला आहे. अर्थात् पूर्वसंकल्पित कथात्मक इतिहासकथनाच्या दृष्टीनें ता. १५ ऑगस्टलाच आंग्लशाहीची अखेर होते. म्हणूनच मी ५७ च्या बंडापासून तों गांधी युगाच्या आरंभापावेतोंचा इतिहास अध्याहृत धरून गांधी युगापासून प्रस्तुत कादंबरी मालेला सुरुवात करीत आहें.

ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थान आंग्लशाहीच्या साम्राज्यशाही जाचांतून मुक्त झाला—म्हणजे तो सर्वथा मुक्त झाला किंवा कसें? त्याचप्रमाणें हिंदुस्थान यथार्थानें स्वतंत्र झाला किंवा कसें? हिंद आणि पाकिस्तान या आजच्या दोन राष्ट्रांतील मिळून सुमारें चाळीस कोटी जनता १५ ऑगस्टच्या क्रांतिकारक घटनेनें खऱ्या अर्थानें स्वतंत्र झाली किंवा काय? त्याचप्रमाणें अखंड हिंदुस्थानचा द्विखंड हिंदुस्थान झाला या घटनेची सर्वांगीण इष्टानिष्टता काय? असे महान् वादग्रस्त प्रश्न आपणासमोर उभे आहेत. 'कादंबरीमय आंग्लशाही' मालेंतील कादंबऱ्यांतून यथाक्रम तो इतिहासाचा निर्णय घेतला जाणारच आहे.

'कादंबरीमय आंग्लशाही'ला मी गांधी युगापासून आरंभ करीत आहें तोहि विचारपूर्वक करीत आहें. गांधीजी आणि त्यांचें ऐतिहासिक कार्य याविषयीं पूर्वी तीव्र मतभेद होते व आजहि आहेतच. गांधीजींच्या निर्वाणानंतर आतां तर ते मतभेद तीव्रतर होत जाणार आहेत. हें खरें असलें तरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची जातिधर्मभेदातीत राष्ट्रव्यापी चळवळ कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून जनसमाजाच्या सर्व थरांपावेतों प्रभावी करणारे महात्मा गांधी हेच एकमेव महापुरुष होत हें कोणालाहि कबूल करावें लागेल. सभोंवारची जागतिक परिस्थिति व देशांतील जाग्या झालेल्या जनतेचीं आंदोलनें यांचा गांधीजींच्या चळवळीच्या राष्ट्रीय विशालतेंत मोठा वांटा आहे हें ध्यानीं घेऊनहि आपणाला निर्धारानें हें कबूल करणें भाग आहे कीं, ता. १५ आगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थान आंग्लशाहीच्या साम्राज्यसत्तेचें अवजड जोखड मानेवरून झुगारून देऊन जो स्वतंत्र झाला तो मुख्यतः एकमेव गांधीजींच्या प्रभावानेंच होय.

सन १९१४–१८ च्या पहिल्या महायुद्धाच्या यज्ञवेदींतून सन १९१७ सालीं जगाचा सहावा भाग व्यापून बसलेल्या रशियांत मार्क्स–लेनिन तत्त्वज्ञानाच्या पुरस्कर्त्या कामगार–शेतकरी जनतेनें लोकक्रांति घडवून आणली. त्या मागोमाग महात्माजींच्या सत्य–अहिंसा धर्माचा भारतवर्षाच्या क्षितिजावर उदय होऊन तो सारा भारतवर्ष प्रकाशमान करूं लागला. देशानें व देशाच्या नेत्या कॉंग्रेसनें पूर्णांशानें, केवळ अंतिम ध्येय म्हणून नसला तरीही स्वातंत्र्यप्राप्तीचें साधन म्हणून तरी महात्माजींच्या नेतृत्वाखालीं सत्य–अहिंसा धर्माचा पुरस्कार करून स्वातंत्र्याचा लढा नेटानें व एकजुटीनें चालविला व यशस्वीपणें तडीला नेला.

सन १९१८–२२ या कालखंडांतील अर्थात् गांधीयुगाच्या प्रथम चरणांतील असहकारिता व कायदेभंग या चळवळीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत कादंबरीच्या कथानकाची उभारणी करण्यांत आली आहे. या कथानकाची ऐतिहासिक भूमिका डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांचा कॉंग्रेसचा इतिहास

( खंड १ ला ), व पं. जवाहरलाल नेहरू यांचें आत्मचरित्र या दोन प्रमाणभूत ग्रंथांवरून पडताळे पाहून दक्षतापूर्वक निश्चित केली आहे. दिल्ली येथील ता. ३० मार्च १९१९ चा गोळीबार, ता. १३ एप्रिल १९१९ ची जालियनवालाबाग कत्तल, नानकना गुरुद्वारांतील शीखांची मार्च १९२१ मध्यें झालेली कत्तल, हे प्रमुख उल्लेख कॉंग्रेसच्या इतिहासावरून पडताळून घेतले आहेत. मार्च १९२१ च्या सुमारें रायबरेली एथें किसान मोर्चावर पं. नेहरूंच्या उपस्थितींत झालेला गोळीबार, जून १९२१ च्या सुमारें फैजाबाद जिल्ह्यांत एका जमीनदारानें आपसांतील वैमनस्यापायीं आपल्या किसानांना लूटमार करा अशी महात्मा गांधींची आज्ञा असल्याचें खोटेंच सांगून त्यांच्याकडून आपल्या विरोधी जमीनदाराची दौलत लुटविली तो शेवटच्या प्रकरणांतील प्रसंग, यांची सत्यता पं. नेहरूंच्या आत्मचरित्रावरून पटेल.

हिंदुस्थानांतील किसान चळवळ मुळांतच कॉंग्रेसच्या प्रेरणेखेरीज अगदीं स्वतंत्रपणें उगम पावून वाढत होती, व बाबा रामचंद्र हा फिजी बेटांतून मुदतबंदीच्या मजूरदारींतून सुटून आलेला एक महाराष्ट्रीय किसान या कादंबरींत निरूपिल्याप्रमाणें अयोध्या प्रांतांतील किसान चळवळीचा एक प्रभावी नेता होता. तरीही गांधीजींनी घोषित केलेल्या सन १९१९ च्या राष्ट्रव्यापी हरताळांत किसानांनीं उत्साहानें भाग घेतला व गांधीजींच्या नांवाची पुढें पुढें तर खेड्यांतील किसानांवर मोहिनी पडूं लागली होती. —असें पं. नेहरू आपल्या आत्मचरित्रांत सांगतात. कालचे स्वातंत्र्यवीर आज बारंगळून देशाच्या खऱ्या स्वातंत्र्याचे वैरी व्हावे तसा हा बाबा रामचंद्रहि पुढें बारंगळून अधःपतित झाला असें इतिहास सांगतो. पण नेते बारंगळले तरी किसान काय अथवा कामगार काय, कधीं खुळ्या भोळ्या मेंढ्यांसारख्या बारंगळला नाहीं. नेता दगलबाज अथवा अपुरा ठरला तरी जाग्रत जनता कधीं असल्या नेत्यासाठीं खोळंबून हातपाय गाळून बसत नाहीं. ती आपल्यांतूनच लायक व विश्वासार्ह असे नवे पुढारी निर्माण करून क्रांतीचा ध्वज फडकवीत क्रांतिपथ आक्रमीत पुढें जाते. भारतवर्षाच्या किसान-कामगारवर्गीय गरीब श्रमजीवि जनतेचा

गांधी युगांतील इतिहासहि असाच उज्ज्वल आहे. तो गांधी युगांतील भारतीय जनतेचा उज्ज्वल इतिहास 'आंग्लशाही'मधील पांच कादंबऱ्यांतून आविष्कृत होणार आहे.

गद्दर पक्षाच्या व इतर दहशतवादी भारतीय क्रांतिकारकांचा ओझरता स्थूल उल्लेख या कादंबरींत आला आहे तोहि वास्तवतेला धरूनच आहे. गांधीजींनीं असहकारितेची चळवळ (प्रस्तुत कादंबरीच्या कथापूर्तिकालानंतर लौकरच थोड्याच दिवसांत घडलेल्या) चौरीचौरा (अयोध्या प्रांत) येथील दंग्यामुळें मागें घेतली, व लगेच सरकारनें त्यांना पकडून तुरुंगांत डांबून टाकलें. त्यामुळें साऱ्या राष्ट्रांत जें संतापजनक दारुण नैराश्य पसरलें, त्या अंधारंतच भारतीय क्रांतिकारक चळवळ वाटेनें व आडवाटेनेंही वाढीला लागली असें इतिहास सांगतो.

खासबाग, कोल्हापूर,
ता. १२ फेब्रुवारी, १९४८

विठ्ठल वामन हडप

# भारतमाते, ऊठ !

## लढाईवरून परत

पहिलें महायुद्ध ता. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं संपलें. परंतु रणक्षेत्रावरील आवराआवर होऊन आशिया मायनर व थ्रेसमधील हिंदी सैन्याला मायदेशाकडे यायला साहजिकपणेंच तीनचार महिने लागले.

हरकिसनला घेऊन येणारी बोट कराची बंदराला लागली तेव्हां वास्तविक तिथूनच अयोध्या प्रांतांतील आपल्या मायभूमीकडे, अथवा त्याचे वडील वगैरे कुटुंब सध्यां अमृतसरला राहात होतें तिकडे जायला त्याला सोय होती. परंतु एक तर त्याला आपल्या आवडत्या चुलत्याची मुंबईत भेट घ्यायची होती. आणि शिवाय त्याच बोटीनें जे कांहीं महाराष्ट्रीय सैनिक रणक्षेत्रावरून आले होते त्यांत त्याचे कांहीं जिव्हाळ्याचे मित्र होते; त्या मित्रांचा ‘ तूं मुंबईला आलें पाहिजे ’ असा आग्रह पडला.

केवळ त्या आग्रहामुळेंही नव्हे, तर—बाबा रामचंद्र हा महाराष्ट्रीय कार्यकर्ता हरकिसन लढाईला जाण्यापूर्वी थोड्या दिवसांपासून लखनौ, अयोध्या वगैरे टापूंतील किसानांत त्यांच्या दास्यविमोचनाची चळवळ करूं लागला होता. हरकिसनच्या साऱ्याच घराण्यावर बाबा रामचंद्राचा फार लोभ.

तशांत हरकिसन तर थोड्याच दिवसांच्या सहवासांत बाबा रामचंद्राचा अगदीं जीव कीं प्राण बनून गेला होता. पुण्यापासून जवळच्याच एका खेड्यांत बाबा रामचंद्राचें जन्मस्थान असल्याचें हरकिसनला ऐकून माहीत होतें. रामचंद्र हा फिजी बेटांत मुदतबंदीचा मजूर म्हणून बऱ्याच वर्षांपूर्वी राबायला गेल्यापासून मागें त्याच्या घरादाराची अगदीं वाताहात झाली होती. त्याच्या घराण्याशीं जमीनदारी कुऱ्यांनें वागणाऱ्या दौलतराव कुलकर्णी या खानदानी जमीनदाराच्या भाषेंत बोलायचें तर त्याच्या घरादारावरून गाढवाचा नांगर फिरला होता. अशी घरादाराची दैना झाल्यावर बिचारा बाबा रामचद्र फिजी बेटांतून मुदतबंदी मजूर पद्धतीच्या गुलामगिरींतून मुक्त होऊन हिंदुस्थानांत आला तरी महाराष्ट्रांत कशाला येईल ? ओळखीच्या कांहीं उत्तर हिंदुस्थानी मजुरांबरोबर तो आला तो थेट लखनौ–अयोध्या टापूंत आपल्या किसान मित्रांच्या आसऱ्यानें राहायला गेला. तेव्हांपासून लखनौ–अयोध्या टापूंत विशेषतः अयोध्या, फैजाबाद, रायबरेली, प्रतापगड, गोरखपूर, चौरीचौरा हा टापूच त्याचें कार्यक्षेत्र बनला होता. किसान-संघटनेचें कार्य त्यानें त्या भागांत नेटानें व निग्रहानें सुरू केलें होतें.

अशा या आपणां किसानांच्या उद्धारकर्त्याचें जन्मस्थान सहज पाहायला मिळालें तर पाहावें हा हरकिसनचा कराचीहून मुंबईला बोटींतून येतांना एक हेतु होताच. पण त्याखेरीज महत्त्वाचा हेतु आपल्या पितृस्थानीं पूज्य असलेल्या माखनजी काकांना भेटावें हा होता.

पंजाब–संयुक्त प्रांतांकडे जाणारे त्याचे रायबरेलीचा शेख रहमान वगैरे लष्करी सांगाती कराचीहूनच तिकडे निघून गेले. तसाच गुजरणवाला येथील तारासिंग व अमृतसरजवळच्या एका खेड्यातला मीर कासीम हे दोघेही अशाच कोणत्या ना कोणत्या ओढीमुळें हरकिसनबरोबर मुंबईला आले. या टापूंत दोन चार दिवस हिंडून लगेच आपल्या मायभूमीकडे जाण्याचा त्यांचा मानस होता.

ता. १ एप्रिल रोजीं हरकिसनला कराचीहून घेऊन येणारी बोट मुंबई बंदराला लागली. पुन्हा आज सायंकाळीं आपण एकत्र जमून मुंबापुरीची मौज पाहायला व मौज लुटायला जायचें असा संकेत ठरून सारेजण आपापल्या मकाणाला गेले.

" मी गांवदेवीवरच्या गोकुळ–निवासांत उतरेन म्हणतों. तुम्ही सायंकाळीं चार वाजायच्या सुमाराला तिथें या. तिथून मग आपण शहरांत हिंडायला जाऊं. " हरकिसन गोकुळ–निवासाकडे जाण्यासाठीं व्हिक्टोरियांत बसतां बसतां आपल्या मित्रांना म्हणाला, व त्यांचा निरोप घेऊन निघाला. गोकुळ–निवासांत आल्यावर स्नान, जेवणखाण वगैरे आटोपल्यावर त्याला प्रथम आपल्या वडिलांना पत्र लिहावेंसें वाटलें.

आठवणीनें त्यानें प्रथम वडिलांनाच पत्र लिहायला घेतलें याचें त्याच्या मनांत दडून बसलेलें एक मनकवडें कारण होतें. आपल्या मुलानें लढाईवर मुळींच जाऊं नये असा तेव्हां त्याच्या वडिलांचा आग्रह, आणि त्यांना पाठिंबा आजोबांचा. वडील आणि आजोबा हे बापलेक या बाबतींत अगदीं एका विचाराचे. अयोध्यानाथजी सत्तावन सालच्या बंडांत सर्वस्वी पोळून निघालेला म्हातारा होता. अशा स्थितींत पुन्हा त्या इंग्रजांना युद्धांत जय मिळवून देण्यासाठीं आपल्या मुलांबाळांनीं लढाईवर जाऊन आपले बळी द्यावेत असें त्याला कसें वाटेल ?

केदारनाथ देखील बापाच्याच वळणाचा मुलगा. अयोध्यानाथांप्रमाणेंच त्याचेंही मत हरकिसननें–आपल्या मुलानें–लष्करांत भरती होऊं नये असें होतें. सत्तावन सालच्या बंडाचे प्राणघातक चटके अयोध्यानाथांप्रमाणें त्याला सोसावे लागले नव्हते. कारण तेव्हां तो जन्मालाही आला नव्हता. पण अयोध्यानाथ व त्याच्या वयाचे आणखी म्हातारे सत्तावन सालच्या बंडांत जे होरपळून निघाले होते, त्यांच्या तोंडून ऐकलेल्या बंडाविषयींच्या व आपमतलबानें बंड चेतवणाऱ्या लखनौ–अयोध्या प्रांतांतील जमीनदार तालुकदारांच्या कारवाया, त्याच्या जोडीला दिल्लीच्या बहादूरशहा बादशहाचा लाजिरवाणा दुबळेपणा, बंडाच्या अनेक नेत्यांचा धूर्त संधिसाधूपणा, आणि त्या सर्वांवर ताण इंग्रजांच्या कुटिल नीतीची–या सर्व अशुभ गोष्टी ऐकून एरव्हीं वाघाप्रमाणें शूर असलेल्या ह्या कणखर किसानाच्या मनांत सगळ्याच गोष्टींविषयीं व सभोंवारच्या परिस्थितीविषयीं एक प्रकारचा सुन्न तिरस्कारमय तिटकारा निर्माण झाला होता. कशावरच विश्वास नाहीं, कशाविषयींच आपलेपणा नाहीं, कसलाच उत्साह नाहीं; जिवंत

आहों तोंपर्यंत जगायचें आणि मरण आलें कीं मरून जायचें, असली कुंद विचारसरणी त्याच्या जीवनाची पक्कड घेऊन बसली होती.

हरकिसन लष्करांत भरती होणार असें ऐकतांच त्यानें त्याला कितीतरी शिव्या दिल्या. आणि निक्षून सांगितलें कीं, लष्करांत गेलास तर तूं माझा मुलगा नव्हेस आणि मी तुझा बाप नव्हे.

अयोध्यानाथजींनीं नातवाविरुद्ध त्रागा केला तो तर यापेक्षांही भयंकर. तूं मला मेलास आणि मी तुला मेलों असें नातवाला सांगून तो दुर्वासाचा अवतार संतापाच्या भरांत नातवाच्या नांवानें थंड पाण्यानें आंघोळ करूनही मोकळा झाला होता.

त्यावेळीं चुलत्याचा जर हरकिसनला महात्मा गांधींच्या आज्ञेनुसार सैन्यांत भरती होऊन लढाईवर जाण्याला मनमोकळा पाठिंबा नसता, तर हरकिसनला महात्माजींवरची आपली श्रद्धा कृतींत उतरवून दाखविण्यासाठीं सैन्यांत भरती होणें फार अवघड गेले असतें. त्या एका मुद्यावर माखनलालजींचें आपल्या भावाशीं आणि वडिलांशीं केवढें कडाक्याचें भांडण झालें होतें ! माखनलालजी हे बोलून चालून साऱ्या कुटुंबांत गांधीवेडे ठरले होते. महात्माजींनीं निळीच्या शेतांतील गुलामी किसानांच्या वतीनें चंपारण्यांत जो लढा लढविला त्या लढ्यांत माखनलाल हे एक स्वयंस्फूर्त स्वयंसेवक म्हणून गेले होते. महात्माजींची दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाची चळवळ त्यांनीं श्रद्धेनें आत्मसात केली होती. महात्माजी हे एक युगावतार आहेत असें मानण्याइतकी माखलालजींची श्रद्धा दृढ होती. आणि त्यांचाच शिष्य त्यांचा पुतण्या हरकिसन. हरकिसनची आई कौसल्यादेवी देखील वडिलांच्या ठायीं पूज्य असलेल्या दिराचें गांधीप्रेम पाहूनच प्रथम त्याच्याबरोबर चंपारण्यांत गांधीजींची स्वयंसेविका म्हणून कार्य करण्यासाठीं गेली होती. आपल्या जन्मदात्रीचें हें लोकसेवेचें व्रत पाहूनच हरकिसनच्या मनांत गांधीजींच्या लोकसेवेविषयींचा पहिला जिव्हाळा उत्पन्न झाला होता.

हरकिसननें लष्करभरतींत नांव दिलें व तें आपल्या चुलत्याच्या प्रोत्साहनानें, या एकाच कारणामुळें अयोध्यानाथजींनीं माखनलालजींना

त्या क्षणीं घराबाहेर चालते व्हायला सांगितलें व घराबाहेर घालविलेंही. माखनलालजी तेव्हां कांहीं दिवसांच्या सवडीनेंच घरीं आले होते. त्यांचा उद्योगधंदा पुण्यामुंबईकडे होता. नाहींतरी ते थोड्या दिवसांनीं आपल्या उद्योगधंद्यासाठीं माघारे जाणारच होते. ते आठ पंधरा दिवस अगोदर चालते झाले इतकेंच. आणि तेव्हांपासून आजापवेतों भावांभावांनीं अथवा बापलेकांनीं एकमेकांचें मुखावलोकनही केलें नव्हतें हेंही तितकेंच खरें.

हरकिसन आज तीन वर्षें तुर्कस्थानांतील रणभूमीवर मृत्यूशीं झुंज खेळत होता तरी आपल्या घरांत आपल्यामुळें निर्माण झालेला विषाद-कारक संघर्ष तो मुळींच विसरला नव्हता. त्याला पूर्ण आशा होती कीं, आजोबा काय, वडील काय, चुलता काय आतां एकोप्यानें खास वागूं लागतील. महायुद्धाच्या निमित्तानें त्याच्या कौटुंबिक जीवनाचें जें आकाश फाटलें होतें त्याला जरूर तिथें ठिगळें देऊन दुरुस्त करण्याचे विचार कराची बंदरांत उतरल्यापासूनच त्याच्या डोक्यांत घोळत होते.

वडिलांना तो आज पत्र लिहीत होता तें तरी एक त्या फाटलेल्या आकाशाला बेमालूम बसवितां येण्याजोगें ठिगळ म्हणूनच.

वडिलांना पत्र लिहून पुरें होतांच हरकिसननें तें एकवार फिरून वाचून पाहिलें :

प्रिय पिताजींना सादर प्रणाम !

आपणां सर्व वडील मंडळींच्या आशीर्वादानें आमचे पाय सुखरूपपणें आमच्या मायभूमीला लागले. काकाजींना येतांना भेटून यावें म्हणून मी कराचीहून थेट इकडे मुंबईला आलों. कांहीं मित्रांचाही आग्रह पडला. आणि आमच्या रामचंद्र बाबांचें जन्मगांवही एकवार पाहून पवित्र व्हावें असें वाटलें. मी तीन चार दिवसांत माझ्या मित्रांबरोबर तिकडे येईन.

हें पत्र लिहितांना पिताजी, मला तीन वर्षांपूर्वीं आपणांला आणि माझ्या मायदेशाला सोडून रणांगणावर जातांनाचा तो गंभीर प्रसंग आठवून उचंबळून येत आहे. अगदीं खरें सांगूं पिताजी, मी लढाईवर जातों आहें तो आपल्या मंडळींत पुन्हा

जिवंत माघारा येऊं शकेन असें माझें मलाही तेव्हां वाटलें नव्हतें. आपलें आणि आजोबांचें मन मोडून मी हट्टानें लष्करांत भरती झालों याचा आपणा दोघांना तेव्हां किती तीव्र सात्त्विक संताप आला होता याची मला पूर्ण जाणीव आहे. तो राग गिळून आपण मला दुःखी अंतःकरणानें निरोप देतांना आपल्या विशाल हृदयाशीं घट्ट कवटाळून धरलें आणि आपल्या मायेच्या अश्रूंनीं मला न्हाऊं घातलें, तो प्रसंग मला आठवला नाहीं असा एक दिवसही आजवर गेला नाहीं. तेव्हांपासून आपले अश्रू मला केवळ मायेचे अश्रू असे वाटले नाहींत. त्यांत आपल्या खोल अंतःकरणांतील अपत्यप्रेमामुळें ओसंडून आलेलें दुःख तेव्हां मला जाणवलें. पण पिताजी, तेव्हां ते आपले अश्रू दुःखाश्रू आहेत असें म्हणण्याचें धाडस करण्याचें मी माझ्या मनाशीं बळेंच नाकारलें. यशानें प्रकाशमान असलेला भविष्यकाल तेव्हां मला अज्ञात होता. पण आतां तीन वर्षे रणांगणावर प्राणपणानें झगडून यशस्वी होऊन परत आल्यावर मात्र मी आपल्या त्या अश्रूंना दुःखाश्रू म्हणून त्यांची किंमत कमी करायला तयार नाहीं.

पिताजी, आज मी आपल्या पायांपाशीं रणांगणावरून नुसता जिवंतच आलों नाहीं तर विजयी होऊन आलों आहें. माझ्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांकडून रणांगणावरील माझ्या प्राणपणाच्या मर्दुमकीबद्दल डिस्पॅचमधून गौरवपूर्ण उल्लेखही झाला होता. आमच्या मुख्य सेनापतीनें एकदां थ्रेसच्या रणांगणावर सर्व लष्करी शिपायांसमोर माझ्याशीं आदरपूर्वक हस्तांदोलनही केलें होतें. माझी इच्छा असली आणि आतां तरी आपली व आजोबांची आशीर्वादपूर्वक परवानगी मिळाली तर मला आतां हिंदी लष्करांत कायमची चांगली नोकरीही मिळेल. आतां मला सांगा पिताजी, आपलें मन मोडून मी लष्करांत भरती झालों ही मी चांगली गोष्ट केली नाहीं का?

मात्र पिताजी, आतां प्रसंग पार पडला म्हणून मोकळेपणानें बोलतों. तेव्हां युद्धावरून मी जिवंत माघारा येऊं शकेन अशी

जरी मला फारशी आशा नव्हती तरी तेव्हां मला मरणाचें भय अथवा दु:ख लवलेशही वाटलें नाहीं.

त्या वेळचा तो प्रसंग मला आतां आठवतो. महात्मा गांधींच्या आज्ञेनुसार लष्करांत भरती होण्याचा माझा निर्धार मी आपणाला सांगितला, तेव्हां आपण त्रासून त्राग्यानें मला विचारलें होतें, 'पित्याच्या शब्दापेक्षां गांधींचा शब्द तुला अधिक मोलाचा वाटतो काय?' त्यावर मी निर्भयपणानें चिडून उत्तर दिलेलेंही मला आठवतें. 'हो! माझ्या मायदेशाचें मंगल व्हावें असें मला मनापासून वाटतें. तें मंगल आम्हांला गांधीजींनीं दाखवून दिलेल्या मार्गानें निष्ठावंत अनुयायांप्रमाणें जाऊनच साधतां येईल असा गांधीजींवर माझा अढळ विश्वास आहे. त्यांच्या एका शब्दावरून—त्यांच्या आदेशाकरून मी आई, बाप, बहीण, भाऊ, बायको, घरदार, धनदौलत या सर्वस्वाची ओवाळणी करीन......'

तो वाचायचा थांबला. आपली कातडी बॅग उघडून त्यानें अर्ध्या वितीच्या उंचीचा महात्मा गांधींचा एक ओबड घोबड अर्धपुतळा बाहेर काढला व तो टेबलावर टेवून त्यापुढें आदरभावानें मस्तक नमविलें.

युद्धक्षेत्रावरील त्याचा साथी सरदार मंगलसिंग हा देखील त्याच्या-सारखाच गांधीवेडा होऊन रणांगणावर गेलेला सैनिक होता. अग्निकीटक पेटत्या होमकुंडाच्या ज्वाळांतूनही सहल करतो म्हणतात, तशी मंगल-सिंगानें रणांगणावर मरतां मरतां सवड काढून तो गांधीजींचा अर्धपुतळा मातीचा ओबडधोबड करतां आला तसा तयार केला होता. पुतळा प्रमाणशीर नव्हता व त्याला विशेष वाखाणण्याजोगें रंगरूपही नव्हतें. परंतु हरकिसननें गांधीजींवरील अलोट श्रद्धेमुळें तें त्यांचें आदरणीय सुंदर प्रतीक म्हणून मान्य केलें व मंगलसिंग नाहीं नाहीं म्हणत असतां त्याच्या-कडून तो पुतळा त्यानें आग्रहानें मागून घेतला होता. तेव्हांपासून रोज नित्य नियमानें त्या पुतळ्याला तो देवाप्रमाणें भजत असे. रोज त्यासमोर

उदबत्ती लावून नमस्कार केल्याखेरीज तो अन्नग्रहण करीत नसे. फार काय, लढाईच्या धनचक्करींत खंदकासारख्या गैरसोईच्या जागीं वस्ती करावी लागली तरी गांधीजींचा पुतळा त्याच्यापाशीं असायचाच. वरिष्ठ सेनानींच्या आज्ञेनुसार कूच करतांना अथवा गोळीबार करतांना तो मनोमन प्रथम महात्मा गांधींना नमस्कार करायला विसरत नसे. आणि तेवढ्यापुरती महात्माजींवर त्याची इतकी अढळ श्रद्धा असे कीं रणक्षेत्रावर शत्रुपक्षाच्या नरडीला झोंबतांना आपल्या अंगीं अवश्य असलेलें धैर्य, शौर्य, निग्रह व लष्करी क्रौर्यही ह्या गुरुदेवतेच्या कृपाप्रसादानें आपल्याला प्राप्त होतें अशी त्याची भावना होती. बरें, महात्माजींच्या अहिंसेवर त्याची अमोघ श्रद्धा असल्यामुळें आपण रणांगणावर जी आत्यंतिक हिंसा करतों तीही अहिंसाधर्माच्या प्रतिपालनासाठींच होय याविषयीं त्याला लवमात्र शंका नव्हती.

तो पत्र पुढें वाचूं लागला :

> ...मंगलसिंग माझ्यापूर्वी हिंदुस्थानांत यायला निघाला होता. तो एव्हांशीं अमृतसरला आपल्या घरीं येऊन आठ दिवसांचा जुनापुराणाही झाला असेल. त्यानें आपणाला आम्हां सर्वांची खुशाली सांगितली असेलच. कीं अमृतसरला येण्यापूर्वी गुजरणवालाला गेला सासुरवाडीला राजकुंवर आणि छोटा नानक यांना भेटायला ? त्याला बायको–मुलाचें ‘बाईलवेडा’ म्हणण्याइतकें जबर वेड आहे म्हणून विचारतों. तो जर तिथें असला तर त्याला आमची खुशाली सांगा......

तोंच टेबलासमोरील खिडकीला असलेल्या झिरझिरीत सरक पडद्यांतून टेबलावर व त्या पत्रावर ओझरती सांवली पडल्याचा भास त्याला झाला.

त्याची ती कल्पना खरी होती. त्याला अवघे दोन अडीच तास त्या निवासस्थानीं येऊन झाले होते खरे. पण तेवढ्यांत त्याला त्या कुणा लावण्यवती तरुणीची आभाळी चाहूल या ना त्या निमित्तानें तीनचार वेळां मिळाली होती.

पहिल्या वेळीं त्यानें तिकडे दुर्लक्षच केलें. रोज इतके उतारू ह्या गोकुळनिवासांत वसतीला येत असतील, त्यांतलीच ही एक असेल असें त्याला वाटलें.

दुसऱ्या वेळीं तिची चाहूल लागतांच तो कडवट अनुरागाच्या भरांत आपल्या मनाशीं म्हणाला, "लढाईवरून आलेले सैनिक या लोकांना राणीच्या बागेंतील प्राणिसंग्रहालयांतले अजब प्राणी वाटतात कीं काय...?"

आणि त्याबरोबरच त्याच्या मनांत अहंकार अंकुरूं लागला. निरनिराळ्या कथाकांदबऱ्यांतून त्यानें वाचलें होतें कीं स्त्री ही पराक्रमी, धाडसी शूर वीरावर प्रेम करते. पुरुषांच्या सद्गुणापेक्षां त्याच्या शौर्यावर व मर्दानी बाण्यावरच ती जास्त आकर्षित होते, हा स्त्री स्वभावाचा निष्कर्ष जो त्यानें आपल्या मगदुराप्रमाणें सैनिकी ढंगांत आपल्या मनाशीं निश्चित केला होता, त्याची मनोमन उजळणी करून तो आपल्याशीं म्हणाला, "ही सुंदर स्त्री तरी त्या नियमाला अपवाद कशी असूं शकेल?"

कुठची कोण–ती तरुणी! तिला आपल्या शौर्याधैर्याविषयीं कांहींच माहिती नाहीं हें हरकिसन ओळखून होता. पण आपल्या लष्करी पेहरावावरून व थोड्या वेळापूर्वी खोलींत येऊन गेलेल्या मित्र सैनिकांशीं चाललेल्या आशिया मायनर, थ्रेस येथील रणांगणावरील सैनिकी प्रणयलीलांच्या रसाळ गप्पा गोष्टी ऐकून तिनें आपणाला एक शूर रंगेल सैनिक म्हणून ओळखलें असावें असें त्याला तिच्या दुसऱ्या वेळच्या ओझरत्या दर्शनावरून वाटूं लागलें होतें.

जेव्हां तो मित्रमंडळींना निरोप देण्यासाठीं खोलीसमोरील सज्जाच्या उजवीकडचा जिना उतरून तळ मजल्यापावेतों जाऊन आला, तेव्हां जातांना त्यानें मुद्दाम डौलदार वृत्तीनें डावीकडे आपल्या खोलीला लागून असलेल्या चारही खोल्यांत धांवत्या दरोडेखोरी नजरेनें डोकावून पाहिलें. पण आरंभींच्या दोन खोल्या बंदच होत्या. तिसरी खोली बंद नसली तरी दार लोटून घेतलेलें होतें. तिथेंही त्याला कोणी स्त्री आढळली नाहीं. आणि शेवटच्या खोलीच्या दरवाजांत एक स्त्री आढळली तीही पाठमोरी. तिनें डोकीवरून पदर घेतला होता. पण त्या पदराआडून सुगंधाप्रमाणें वाहणारा तिच्या लावण्याचा मधुर आस्वाद त्याला चाखायला मिळाला.

तिच्याकडे पाहण्याची ही त्याची चौथी वेळ.

आणि आतां वडिलांना लिहिलेलें पत्र वाचतांना झालेली छायाभेट ही पांचवी.

त्यानें विजयी प्रसन्न वृत्तीनें टेबलावरून मुद्दाम वांकून झिरझिरीत पड-द्याला नजर लाऊन बाहेर रोखून पाहिलें. ती सुंदर स्त्री खिडकीबाहेर जरा डावीकडे सज्जाच्या कठड्याला धरून किंचित् तिरप्या फसव्या नजरेनें हरकिसनच्या खिडकीकडे पाहत उभी होती. पण तिची पाठीला डोळस-पणा आल्यासारखी सावध नागमोडी नजर आपली चाहूल लागूं न देतां खिडकीवरील पडद्यामागील हालचालींचा मागोवा घेत होती. आंतील माणूस मुद्दाम आपल्याकडे नजर रोखून पाहत आहे हें ध्यानीं येतांच तिला काय वाटलें कोण जाणे, ती त्याच पावलीं डावीकडे निघून गेली.

रसरशीत पेटत्या निखाऱ्यावर पाणी पडलें कीं जळजळीत वाफा निघून जवळ जाणाराच्या गालांना व डोळ्यांना झोंबतात तसा तो हिरमोड हरकिसनच्या मनाला झोंबला. त्यानें थोड्या वेळापूर्वी मर्दानी अहंकारानें तरारलेल्या आपल्या डौलदार मिशांना पीळ न भरतांच टेबलावरील आरशाकडे पाहिलें.

पाहतां पाहतां तो स्वतःलाही कळूं नये इतक्या हळूवारपणानें मनाला विचारीत होता, “ तरुण सुंदर स्त्रियांचीं मनें आकर्षित करून घेण्याइतकी आपल्या ठायींची रुबाबदार मोहकता रणक्षेत्र सोडल्यापासून ओसरूं लागली काय ? ”

तो विचार त्याच्या मनांत आला तसा क्षणांत विरला. मनाला त्याचा डाग मात्र लागलेला त्याला जाणवला. खजूरीच्या बनांत आणि द्राक्षांच्या मांडवांत आपण दांडगेशाही पाटलाग करून धाकानें वश केलेल्या तुर्की तरुणी आपणाशीं तेव्हां हंसल्या खिदळल्या म्हणजे ती कांहीं त्यांची खरी प्रसन्नता नव्हे, इतका सारासार विचार उत्तान वृत्तीच्या अंमलाखेरीज इतर संथ वेळीं सुचण्याइतका सोज्वळ वृत्तीचा तो खास होता.

त्याच्या अपराधी मनाची ती कुचंबणा लगेच थांबली. त्यानें वडि-लांना लिहिलेलें पत्र जिथवर वाचून झालें होतें तिथपासून पुढें वाचा-यला सुरवात केली :

...मी मंगलसिंगपाशीं बोललों आहें व त्यानेंही आपणापाशीं सांगितलें असेलच. आपणाला आणि आजोबांना जर आतां अमृतसरला राहणें आवडत असेल तर आपण तिथेंच तेज-सिंगजींकडून थोडीफार शेतवाडी विकत घेऊन सारी मंडळी आनंदानें तिथें राहूं. मंगलसिंगला हें मान्य आहे; व आपल्या वडिलांची संमती मिळवून देण्याचें त्यानें कबूल केलें आहे. आपली चौरीचौरा येथील कुछरोटी कुछलंगोटी शेतवाडी विकून पंजाबांत सरदारजींच्या आश्रयानें राहतां आलें तर कांहीं वाईट नाहीं. चौरीचौरालाच काय सोनें लागलें आहे? मला विचाराल तर त्या आमच्या खाष्ट जमीनदाराचें तोंड देखील पाहायची माझी इच्छा नाहीं. कैलासनाथ हें नांव नुसतें मनांत येतांच त्याचीं सर्व पापें डोळ्यांसमोर उभीं रहातात आणि मन विटाळलेंसें वाटूं लागतें.........

खिडकीवरील पडदा हातानें जरा बाजूला सरकवून हरकिसन त्या तिरस्काराच्या आवेगासरसा खिडकीच्या गजापाशीं तोंड नेऊन बाहेर थुंकला. हातरुमालानें तोंड पुशीत व रायसाहेब कैलासनाथ पालीवाल याला ओटांतल्या ओटांत शिव्या मोजीत तो पत्र पुढें वाचूं लागला :

...मी तिकडे आलों कीं या सर्व गोष्टींचा एकत्र बसून विचार करूं. आपल्या मास्टर रामसिंगजीलाही हा विचार पटेल अशी माझी खात्री आहे. तो अभ्यास नीट करतो ना? त्याला म्हणावें आम्हां जैसवालांच्या पिढीजाद नांगरगट्या किसान घराण्यांत मॅट्रिकचा उंबरठा ओलांडून सरस्वतीदेवीच्या विद्यामहामंदिरांत प्रवेश करणारा पहिला भाग्यवान् कुलदीपक तूंच आहेस. मॅट्रिक झाल्यावर उच्च शिक्षण घेण्याचें मनांत असूनही आजोबांच्या दुराग्रहामुळें तें मला शक्यच झालें नाहीं. ती माझी सारी अपुरी हौस मी माझ्या धाकट्या भावाकडून फेडून घेणार. त्याला उपजतच शेतकीची आवड आहे. पण या गेल्या तीन वर्षांत तो आतां जाणता झाला आहे. त्याला हिंदी किसान जीवनाच्या कष्टाळू लाचार

भीषणतेची आतां चांगली कल्पना आली असेल. त्याच्या कॉलेजला आतां सुट्टी पडली असेल. कदाचित् तो गोरखपूरला गोमती मावशीकडे चैनींत सुट्टी घालविण्यासाठीं गेला असेल. पण मी आल्याचें कळतांच तो ताबडतोब माघारा यायला चुकायचा नाहीं. तो गोरखपूरला गेला असला आणि आपण त्याला मी येण्यापूर्वी पत्र लिहिलें तर त्याच्या घरीं गोपीची खुशाली कळवा. त्याची सैन्य तुकडी बहुधा आमच्या मागोमाग येत असेल. कदाचित् मी घरीं येऊन पोहोंचण्यापूर्वी तो घरीं येऊन पोंचेलही......

पत्रांत पुढें हराकिसननें हरिनाथशास्त्रींची धाकटी विधवा मुलगी शारदा हिला नमस्कार लिहिले होते. पण ती एक विधवा तरुणी व आपण एक विवाहित तरुण—आपण तिची आठवण युद्धक्षेत्रावर मृत्यूशीं झुंजत असतांना देखील करतों हें ऐकून वडिलांना वाईट वाटेल व तिलाही दुःखावर डागण्या दिल्यासारखें वाटेल हा विचार त्याच्या मनांत आला. त्यासरसा तो मजकूर त्यानें फौंटनपेननें अगदीं माग-मूसही दिसून न येईल इतका खोडून खरडून टाकला.

लिहिलेलें पत्र वाचून झालें. त्यानें अखेरचे दोन शब्द लिहून तें पुरें मात्र केलें नव्हतें. त्याच्या मनांत आलें, इतक्या दिवसांनीं—जवळ जवळ तीन महिन्यांनीं आपण घरीं पत्र पाठवीत आहों त्यांत सर्वांची आठवण केली आणि आपल्या आवडत्या प्रभावतीची आठवण मात्र केली नाहीं तर यांत प्रभावतीला आपला अपमान झाला असें वाटणार नाहीं काय?—पण एवढें मनांत येऊन देखील त्यानें वडील काय म्हण-तील या संकोचानें पत्रांत तिची आठवण केली नाहीं. पत्रावर तारीख लिहायची तेवढी राहिली होती. ती तारीख १ एप्रिल १९१९ लिहितां लिहितां ' १ एप्रिल ' हा शब्द मनांत घोळवतां घोळवतां तो गालांतल्या गालांत हंसला व आरशांत पाहून आपले केस डाव्या तळहातानें नीट-नेटके मागें सारीत त्या सुंदर तरुणीला अनुलक्षून मनांत म्हणाला, “ या पोरीनें मला आज एप्रिल फूल बनवायचा विचार केला आहे काय?”

अंमळशानें त्यानें आपली बॅग उघडून एक लखोटा बाहेर काढला. त्यांतील पोस्टाचीं तिकिटें घेऊन तीं लिफाफ्यावर चिकटविलीं व त्या लिफाफ्यावर वडिलांचा पत्ता लिहून पत्र पुरें केलें व बाकीचीं पोस्टाचीं तिकिटें बॅगेंत ठेवण्यासाठीं त्यानें बॅगेच्या वरच्या कप्यांत हात घातला. तिकिटें ठेवण्याचें कागदाचें पाकीट नीट ठेवतां ठेवतां एक सुंदर तरुणीचा लहानसा सुबक फोटो बाहेर पडला.

" प्रभावती ! " अशी हांक मारीत त्यानें तिचा तो फोटो आतुरतेनें डोळाभर पाहिला आणि आपल्या मनाशीं उद्गार काढले, " जानेवारी एकोणीसशें सोळापासून सतरा, अठरा, एकोणीस तीन वर्षे कशीं हां हां म्हणतां निघून गेलीं. मी लढाईवर गेलों तेव्हां प्रभावतीचा सोळावा वाढदिवस नुकताच दोन दिवसांपूर्वी आम्हीं साजरा केला होता... "

त्या आठवणीसरसा त्यानें प्रसन्न पण ओशाळ्या वृत्तीनें एक कोमलसा उसासा सोडला आणि फोटोंतील प्रभावतीच्या ओठाला आतुरतेनें आपले ओठ भिडविले. प्रभावतीच्या त्या सोळाव्या वाढदिवशीं तिला छानशी भेट देऊन ओवाळतांना हरकिसनच्या आईनें तोंडभर वात्सल्यपूर्ण आशीर्वाद दिला होता, ' पुढच्या वाढदिवसापूर्वी पुत्रवती हो ! '

हरकिसनला तो मंगल प्रसंग आज मूर्तिमंत आठवला. तेव्हां तीं नवराबायको म्हातारीची नजर चुकवून एकमेकांकडे चोरून पाहात गालां-तल्या गालांत हंसलीं होतीं. दोन दिवसांनीं हरकिसन लढाईवर जाण्या-साठीं निघणार होता. लढाई केव्हां संपेल आणि रणांगणावरील सैनिक केव्हां घरीं परततील याचा कांहीं नेम नव्हता. रणक्षेत्र म्हणजे साक्षात् मृत्यूची मांडी. किती शेंकडों हजारों सैनिक रणक्षेत्रावर जाणार, लढणार, त्यांतले कितीतरी मरणार. त्यांतून आपण तरी हमखास जिवंत माघारे येऊं असा भरंवसा हरकिसनला कसा वाटणार !

हा विचार त्या क्षणीं आपल्या मनांत आला तसा प्रभावतीच्याही मनांत आला असला पाहिजे याची साक्ष हरकिसनच्या मनाला तिच्या हंसतां हंसतां रडकुंडीला आलेल्या तरल ओलसर दृष्टीवरून तेव्हांच पटली होती. त्याच्याही मनांत तेव्हां तोच विचार प्रभावानें घोळत होता.

त्यासरशीं त्याची चर्या गंभीर झाली. पण मनाला वाईट मात्र वाटलें नाहीं; अथवा डोळ्यांना पाणी आलें नाहीं. आपण कांहीं अमरपट्टा घेऊन जन्माला आलेलों नाहीं; जन्माला आलेल्या प्रत्येक प्राण्याप्रमाणें आपल्यालाही केव्हां तरी मरायचेंच आहे. हें तोही पण जाणून होता. पण तो तेव्हां आपलें अत्यंत पवित्र कर्तव्य म्हणून गांधीजींच्या आज्ञेनुसार लढाईवर जात होता. आणि तो लढतां लढतां मेला असता तरी आपल्या मायदेशाच्या मंगलासाठीं मरणार होता. गांधीजी या पूज्य महापुरुषाच्या महान् पुण्यकार्यानें आपली भारतमाता इंग्रज अरेरावांच्या दास्यांतून लौकरच मुक्त होणार असा त्याला दृढ भरंवसा वाटत होता. एवढें उदात्त ध्येय मनश्चक्षूंसमोर प्रभावी तेजानें तळपत असतांना त्याला रणांगणावरील जगण्यामरण्याची क्षिति कशाला वाटेल !

पण जीवनाच्या मावळतीला वळलेल्या हरकिसनच्या जन्मदात्या कौसल्याआईला बिचारीला इतका दूरवरचा विचार कसा सुचणार ? आपल्या मुलाचा भविष्यकाल मरणाच्या मोलानें मोजाव्या लागणाऱ्या सुखदुःखांनीं भरलेला आहे हें ती जाणत होती. पण ईश्वरावर तिची अढळ श्रद्धा होती. आपण उभ्या आयुष्यांत कधीं कुणाचें वाईट चिंतिलें नाहीं आणि ईश्वरही आपणाला या उतारवयांत दुःखाच्या खाईत लोटणार नाहीं इतका तिचा ईश्वरावरचा भरंवसा अढळ होता. गांधीजी ही तिच्या ईश्वराची साक्षात् सगुण मूर्ति होती. गांधीजींच्या चंपारण्याच्या सत्याग्रही लढ्यांत तिनें स्वयंसेविका म्हणून माखनलालजींच्या बरोबरीनें कार्य केलेलें होतें.

कौसल्यादेवीला श्रद्धापूर्वक वाटे, कीं, ‘ गांधीजींवर निष्ठा ठेवून रणांगणाच्या पेटत्या खाईत उडी घेणाऱ्या सैनिकाच्या केसालाही धक्का लावण्याची कळिकाळाची तरी काय छाती आहे ! आपला मुलगा इंग्रजांचा सैनिक झालेला नाहीं; पूज्य महात्माजींचा सैनिक झालेला आहे. महात्माजींच्या सैनिकाकडे मृत्यु विषारी नजरेनें पाहील तर त्याचे डोळे फुटतील ! ’

तिनें आपला लेक आणि आपली सून यांचीं मनें आपला आशीर्वाद ऐकून हेलकावे खाऊं लागल्याचें तेव्हांच ओळखलें आणि धीरोदात्त

वृत्तीनें आत्मविश्वासपूर्वक त्यांना पुन्हा सांगितलें, "त्या महापुरुषाच्या कृपेनें माझा आशीर्वाद फळाला येतो कीं नाहीं पाहा तरी !"

तीन वर्षांपूर्वीची ही मंगल घटना हरकिसनला अंतःकरणांत सुवासिक पुष्प फुलल्यासारखी आठवली.

प्रभावती वर्षांत पुत्रवती होण्याची आईची ती भविष्यवाणी सार्थ झाली किंवा झाली नाहीं असली चिकित्सा त्याच्या मनाला आज शिवली देखील नाहीं. त्याला तिचा आशीर्वाद सफल झालासाच वाटला. आपण लढाईवरून सुखरूप परत आलों यांत त्याला आपल्या आईच्या श्रद्धामय वाणींत आकाशवाणीचें अमोघ सामर्थ्य सामावल्याचें प्रचीतीला आलें होतें. गांधींजींसारख्या थोर विभूतींची प्रसादवाणी सकलांचें सर्व मंगल करणारी असते हे स्वानुभवाचे बोल तो अलिकडे अधिकारवाणीनें ज्याला त्याला बोलून दाखवूं लागला होता.

त्यानें अंतःकरणाच्या ओढीनें प्रभावतीच्या फोटोकडे पाहात डाव्या हाताचीं बोटें घालून आपल्या मनाशीं आपलें वय गणून पाहिलें "एकवीस–बावीस–तेवीस–चोवीस..."

त्यानें आरशांत आपलें रूप पाहून आपल्या मर्दानी तेजस्वीपणाचें व प्रमाणबद्ध आकर्षक काळ्याभोर मिरुडीचें कौतुक करीत स्वतःशीं म्हटलें "एकविसाव्या वर्षी एका मुलाचा बाप झालों असतों तरी कांहीं मला आणि प्रभावतीलाही तें विशोभित दिसलें नसतें. लढाईवर गेलों नसतों तर एव्हांना एक अथवा दोन देखील मुलांचा बाप मी शोभलों असतों. पण त्याऐवजीं आयुष्याचीं तीन वर्षें अशीं सत्कारणीं लागलीं तें तरी आयुष्याचें सोनेंच झालें. आज एकोणीस वर्षांची माझी प्रभावती उफाळत्या लावण्यानें किती रसरशीत, तेजस्वी व लावण्यवती दिसत असेल...आणि नाहीं तरी स्त्रियांना पंधरा सोळा वर्षें इतक्या कोंवळ्या वयात मातृपद प्राप्त होऊंच नये. मूल झालें कीं स्त्री म्हणजे वेजीं उतरलेलें मोती..." अशी आपल्या मनाची समजूत घालीत त्यानें समोर पडलेल्या कोऱ्या कागदावर फौंटनपेननें हिरव्या अक्षरांत अक्षर-माला गुंफली :

प्र भा व ती.

त्या अक्षरांच्या वेलबुट्टीला जरादेखील धक्का लागूं नये इतक्या सावधगिरीनें तो दर एक अक्षरांत वेलीच्या पानाफुलांची अगदीं कोरून प्रमाणबद्ध गुंफवा करीत होता.

इतक्यांत तारवाला शिपाई जिना चढून वर आला.

# २

"गिरिधरलाल बँकर." तारवाल्यानें हरकिसनच्या खोलीच्या दरवाजांत उभा राहून विचारलें. हरकिसन परदेशांतून आजच बोटींतून उतरलेला. त्याला त्या निवासांत आणखी कोणकोण लोक राहतात काय माहीत! तो प्रभावतीच्या नांवाची वेलबुट्टी गिरवण्याचें क्षणभर थांबवून बसल्या खुर्चीवरून दरवाजाकडे पाहूं लागला.

"गिरिधरलाल बँकर कोण आहे?" तारेच्या शिपायानें त्या मजल्या-वरच्या एकंदर पांच खोल्यापैकीं बंद असलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या खोलीकडे ओझरती नजर टाकीत हरकिसनच्या पहिल्या नंबरच्या खोलींत डोकावून पाहात विचारलें.

"गिरिधरलाल बँकर इधर कोई नही है, भैय्या! क्या ॲड्रेस लिखा है तारके ऊपर?" हरकिसननें खुर्चीवरून उठून दरवाजाकडे जातां जातां विचारलें.

"गिरिधरलाल बँकर. गोकुळनिवास—गांवदेवी..." पोस्टाच्या नांवा-सह मुंबईचा उच्चार करण्यांपूर्वीच तारवाला पांच नंबरच्या खोलींतील त्या तरुण स्त्रीनें "ए तारवाला" अशी हांक मारलेली ऐकून तिकडे वळला.

"एकूण ही सुंदर स्त्री कांहीं मी समजत होतों तशी बेवारशी मोकळी नाहीं. संसाराच्या साजानें सजलेली गौर आहे." असें आपल्या मनाशीं म्हणत व इतका वेळ आपणच आपल्याला उल्लूपणानें एप्रिल फूल बन-विलें अशी आपणच आपली मनोमन फजीती करीत तो खोलीच्या

दरवाजाकडे जाऊन सज्जाकडे पाहत उभा राहिला. तो मुद्दाम पांच नंबरच्या खोलीकडे नजर लावून जरी उभा नव्हता, सहज उभा राहिल्या-सारखें दाखवीत होता, तरी त्याची नजर मधून मधून कांहीं क्षणांची उसंत खात तिथवर गरुडभराऱ्या मारून येत होती.

तारेच्या कागदावर त्या स्त्रीची तार पोंचल्याची सही घेऊन तारवाला त्या बाजूच्या जिन्यानें खालीं निघून गेला.

त्या स्त्रीनें तार उघडली व वाचून पाहिली. वाचतां वाचतां तिची चर्या अधिकाधिक गंभीर झाली. डोळे अश्रूंनीं भरून आले. ती एक उसासा सोडून आपल्या मनाशीं म्हणाली, "आज ही कोण नवी अभागी भोळी भाबडी हरिणी या राक्षसांच्या जाळ्यांत सापडली ?"

पाय गळल्यासारखी ती मटकन् खुर्चीवर बसली. कांहीं वेळ कपाळाला हात लावून ती तशीच विचार करीत बसली होती. पण अशा प्रकारचे आघात सोसण्याची तिला आजकाल संवय झाली होती. चार आठ दिवसांनीं अशीच तार यावी व अशीच कोणीतरी अभागी भोळीभाबडी हरिणी पारध्याच्या जाळ्यांत सांपडलेली तिला दिसावी. असले प्रसंग मुकाटपणे सहन करण्याइतके तिचे मन आतां निढावलें होतें.

अंतःकरणावर त्या तारेमुळें झालेल्या आघाताच्या वेदना ओसरल्यावर तिची एक नंबरच्या खोलींत उतरलेल्या नव्या मुशाफराला जाणण्याची जिज्ञासा पुन्हा जागी झाली. तारेचें तिला चांगले निमित्त सांपडलें. तार हातीं घेऊन ती हरकिसनच्या खोलीकडे येऊं लागली.

हरकिसन वाढत्या जिज्ञासेनें, ती स्त्री दोन नंबरच्या खोलीपावेतो येई-पर्यंत आपल्या खोलीच्या दरवाजांतच उभा होता. मग मात्र जणूं काय आपण त्या गांवचेच नाहीं असें भासविण्यासाठीं तो माघारा वळला व टेबलापाशीं येऊन प्रभावतीच्या फोटोशीं अर्थशून्य चाळवाचाळव करीत राहिला.

"बाबूजी ! कृपा करून या तारेंत काय लिहिलें आहे तेवढें मला सांगाल काय ?" त्या स्त्रीनें हरकिसनच्या खोलींत येऊन तारेचा कागद पुढें करीत जणूं कांहीं आपणाला इंग्रजी येत नाहीं अशा आविर्भावानें विचारलें.

हरकिसननें तार वाचून पाहिली व त्या स्त्रीला तारेचा अर्थ सांगितला, "माल खरेदी केला आहे. भूपालसिंग पंजाब मेलनें येतो आहे. बोरीबंदरवर उतरून घ्या...पूरणचंद."

"हं!" त्या तरुण स्त्रीनें तारेंतील मजकूर ऐकून मरत्या पक्षाच्या पंखाच्या फडफडीसारखा एक क्षीण उसासा सोडला. कांहीं क्षण ती कांहींच बोलली नाहीं. लांब कुठच्या तरी घोर अरण्यांत आपणाला एकटी-लाच कोणींतरी अपरात्रीं नेऊन सोडून दिलें आहे अशा भीषण शून्य भावनेनें ती आपल्याच अंतःकरणाच्या अंधारांत कातर वृत्तीनें चांचपडत होती. अर्धवट मूठ आवळलेल्या आपल्या डाव्या हाताच्या आंगठ्याजवळील बोटाच्या आधारावर कपाळ टेकून अंतर्मनाच्या अथांग वाळवंटांत ती सैरावैरा भटकत होती.

हरकिसन तीव्र पण गूढ जिज्ञासेनें तिच्या चर्येकडे न्याहाळून पाहत होता. प्रभावतीचा फोटो तिनें हातीं घेऊन न्याहाळला तेव्हां तिची चर्या एकदम कांहींतरी खूणगांठ पटल्यासारखी पालटल्याचें त्याच्या लक्षांत आलें. पण तेव्हां त्याला त्याचा फारसा अचंबा मात्र वाटला नाहीं. गुलाबाच्या उमलूं घातलेल्या सुंदर मुग्ध कळीची एक पाकळी उकलतांना पाहिल्यासारखा गूढ आनंद त्याला झाला.

त्या स्त्रीनें तेवढ्यांत टेबलावरचा कागद उजव्या हातानें सरकवीत त्यावरील नांव वाचलें, 'प्रभावती.'

गुलाबाच्या कळीच्या आणखी पाकळ्या उमलल्यासारखी हंसतमुखानें ती हरकिसनकडे वळून म्हणाली "कुठून आला बाबूजी तुम्ही?"

"लढाईवरून. तुर्कस्थानांतून. आमचें हिंदी सैन्य तुर्की सैन्याशीं लढत होतें. लढाई थांबली म्हणून तर आमचे पाय मायदेशाला लागले. लढाई संपून चार महिने होऊन गेले तरी इतके दिवस आम्ही युद्धभूमी-वरच ताटकळत होतों. घर, दार, देश, सगेसोयरे, इष्टमित्र सगळे सोडून इतक्या दूर बारांच्या बंदरीं मृत्यूशीं झुंज खेळत राहणें, खाटिक बकरीं कापतो तसे लोकांचे गळे कापणें आणि वेळ पडली कीं आपले गळे कापूं देणें, हा माणसानें माणुसकीवर चालविलेला केवढा भयंकर अत्याचार आहे!— म्हणतात ना जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे."

आपण दैनंदिन मानवी व्यवहाराची सामान्य पातळी सोडून उच्च तात्त्विक चर्चेच्या उत्तुंग आकाशांत भराऱ्या मारीत आहों, याचा अर्थ आकलन करण्याइतकी बौद्धिक पात्रता व प्रगल्भता त्या मुलीच्या ठायीं नसेल अशी हरकिसनची कल्पना होती. पण त्याला तरी आपल्या मुखानें होणाऱ्या तात्त्विक विवेचनाची सुसंगत बैठक कुठें कळत होती? उलट तो आजकाल बोलतां बोलतां रणक्षेत्रावरील हिंसेतून गांधीजींच्या अहिंसेकडे स्वतःला नकळत वाहत चालला होता. केव्हांतरी, कुठेंतरी, कांहींतरी गांधीजी आणि त्यांची अहिंसा याविषयीं वाचलें अथवा ऐकलें, त्यांतलें जें कांहीं अर्धेकच्चें आकलन करतां आलें, अथवा तसें करतां आलें असा समज झाला, त्याचा ओबडधोबड वारेमाप संक्षेप त्याच्या वाक्पटुत्वांत होत होता.

पण हरकिसन तेव्हां जें बोलला तें मुद्दामच बोलला. एकतर त्याला सर्वसाधारण मनुष्यस्वभावानुसार त्या प्रथमच ओळख होत असलेल्या आकर्षक तरुण स्त्रीच्या अंतःकरणांत आपल्याविषयीं सद्भावना व शक्य तर आकर्षणही निर्माण करायचें होतें. तें आकर्षण आपल्या प्रतिपादन-शैलीनें निर्माण होवो अगर न होवो; पण निदान ती आपण होऊन खोलींत चालत आली तें अनायासें लाभलेलें त्या अठरा वर्षांच्या सुंदर स्त्रीचें दर्शनसौख्य त्याला शक्य तितकें अधिक अनुभवायचें होतें.

"कोण देश तुमचा बाबूजी? लखनौ–अयोध्येकडचे का तुम्ही?" त्या स्त्रीनें प्रभावतीचा फोटो आस्थापूर्वक हाताळीत सहेतुक विचारलें.

"होय." ती आपल्या प्रभावतीच्या फोटोकडे आस्थेवाईकपणानें वारंवार न्याहाळून पाहत आहे हें ध्यानीं घेऊन हरकिसन म्हणाला, "तो फोटो तुम्हाला बराच आवडलेला दिसतोय एकूण?"

"होय आवडला." गालांतल्या गालांत अगदीं ओझरतें हंसत ती म्हणाली.

"मग तुम्ही त्या मुलीला ओळखीत असाल?" हरकिसननें प्रभावती आपली बायको आहे हें सत्य लपवून ठेवून आपण प्रभावतीच्या एका ओळखीच्या मुलीची कशी गोड फजीती आरंभली आहे असा मनांतल्या मनांत आनंद मानीत म्हटलें.

"होय. ओळखतें मी तिला." हें सांगतांना त्या तरुणीनें किंचित् मान वेळावून असा कांहीं आविर्भाव केला कीं हरकिसनला वाटलें, प्रभावतीच्या जीवनाची रेषान् रेषा हिला अवगत असली पाहिजे.

त्यामुळें त्याला तिच्याविषयीं नवी आदरयुक्त आपुलकी वाटूं लागली. प्रभावतीच्या ती ओळखीची आहे असें कळतांच त्याची सुप्त आसक्ति व अभिलाषवृत्ति अंधार प्रकाश-किरणांना पाहून भिऊन नाहींसा होतो तशी लोपली होती. त्यामुळें त्या आसक्तीनें सांवटलेली व अभिलाषानें डागळलेली तिच्याविषयींची त्याच्या ठायींची आपुलकी पैलूदार स्फटिका-सारखी पावित्र्यानें प्रकाशमान होऊं लागली होती.

इतका वेळ ती तरुण स्त्री टेबलापाशीं उभी राहूनच हरकिसनशीं बोलत होती. हरकिसनच्या तें ध्यानीं आलें. तो खुर्चीकडे बोट दाखवून तिला म्हणाला "बसा कीं."

ती खुर्चीवर बसली व प्रभावतीचा फोटो न्याहाळीत त्याला म्हणाली, "मी एक विचारूं तुम्हाला बाबूजी? प्रभावती अगदीं माझी जिव्हा-ळ्याची मैत्रीण होती म्हणून विचारतें, रागावणार नसाल तर. तिचा किंवा तुमचा उणेपणा उजेडांत आणावा असा माझा मुळींच हेतु नाहीं..."

त्या तरुणीच्या तोंडचें शेवटचें वाक्य ऐकून हरकिसनला एकदम अंगावर कोळी पडल्यासारखें चमत्कारिक वाटलें. कोणता उणेपणा आमचा? आणि तो उजेडांत आल्यानें आमच्या काय केळी तुटणार आहेत?—असें त्यानें किंचित् रागाच्या आविर्भावांत मनोमन त्या तरुण स्त्रीला व सभोंवारच्या साऱ्या समाजाला दरडावून विचारलें. पण या त्याच्या आत्मविश्वासाला त्याच्या आणि प्रभावतीच्या तीन वर्षांच्या तातातुटींत कांहीं वळचणी निर्माण झाल्या होत्या. त्या वळचणींची दाद त्यालाही नसेल आणि प्रभावतीलाही नसेल. पण असें कांहींतरी असणेंही शक्य आहे, ही शंका त्या क्षणीं त्याच्या मनांत पालीसारखी क्षणभर चुक-चुकून गेली. आपल्या आत्मविश्वासावरचा तो ओरखडा त्यानें पाहिला न पाहिलासा केला व मनांतल्या मनांत तेवढ्यावरच तो विषय सोडून दिला.

"आज मी इथें आल्या घटकेपासून तुम्ही कितीतरी जिज्ञासेनें आणि उत्सुकतेनें माझ्याकडे अधूनमधून एकसारखें पाहत होतां." तो म्हणाला.

" होय, पाहत होत्यें खरी. कां तें सांगूं ? "

" सांगा कीं. "

" मला किनी तुमचा तोंडवळा थेट प्रभावतीच्या नवऱ्याच्या तोंडवळ्यासारखा वाटला. खरोखर तिचा नवरा लढाईवर ठार झाल्याचें मला जर नक्की माहीत नसतें तर तुम्हीच ते असें छातीला हात लावून म्हणण्याइतकी मी फसलें असत्यें. "

" अस्सें— " हरकिसन संथ वृत्तीनें मान डोलावीत म्हणाला, " किती वर्षांपूर्वी भेटलां होतां तुम्ही तिला ? "

वर्मी घाव पडावा तसा तो प्रश्न त्या तरुणीच्या हृदयाला झोंबला. पण मनांत देखील हाय न म्हणतां त्या वेदना कृष्णाकुमारीनें केलेल्या विषप्राशनासारख्या सहन करीत ती उत्तरली, " दोन वर्षांपूर्वी भेटलों होतों आम्ही. "

" आणि या दोन वर्षांत गेलांच नाहीं वाटतें तिकडच्या प्रांतीं ? "

तिनें ओशाळून किंचित् मान खालीं घालून उत्तर दिलें, " नाहीं गेल्यें. "

यावर ' कां ? ' हा प्रश्न हरकिसनच्या अगदीं ओठावर आला होता, पण त्यानें तो आवरला. गिरिधरलाल बँकरचें नांव अजून त्याच्या मनांत चोरपावलांनीं वावरत होतें. तो मनांत म्हणाला, " गिरिधरलाल हें नांव गुजराथी. आणि ही मुलगी तर अयोध्या, रायबरेली, चौरीचौरा या टापूंतील दिसते. या दोघांचा संबंध कसा आला ? दोन वर्षांत त्या प्रांतीं गेलांच नाहीं का असें सरळ भावानें विचारतांच ती इतकी कष्टी कां झाली ? कीं, मिश्र प्रेमविवाहाच्या जाळ्यांत फसून आतां पश्चात्ताप करण्याची पाळी हिच्यावर आली आहे ?... "

तेवढ्यावरच त्याची ती विचारकंथा थांबली. तो त्यांत गुरफटून गेला नाहीं. दुसऱ्याच्या जीवनगुह्यांत अकारण आडवाटेनें घुसून चोंबडेपणा करण्याची त्याची वृत्ति नव्हती. त्यानें चटकन विषय बदलून त्या तरुणीला म्हटलें, " आपली ओळख झाली खरी, पण तुम्ही मला नांव नाहीं सांगितलें ? "

" माझें नांव—" ती तरुणी मनाची ओढाताण करीत कांहींशा कंपित स्वरांत उत्तरली, " माझें नांव रामप्यारी. तुमचें काय नांव ? "

कांहीं क्षण ती हरकिसनकडे अत्यंत शोधक नजरेनें टक लावून पाहत होती. आपल्या नांवाचा त्याच्या मनावर काय परिणाम झाला असेल असें तिचें बावरलेलें मन तिला विचारीत होतें. पण असा कोणताच परिणाम त्याच्या मनावर झाला नाहीं हें पाहून तिला हायसें वाटलें.

" हरकिसनलाल जैसवाल. " तो मिस्किलपणें गालांतल्या गालांत उत्तरला व रामप्यारीच्या चर्येकडे टक लावून पाहूं लागला. आपलें नांव ऐकून तिच्या मनांत विस्मयाचीं व चमत्कृतीचीं कशीं वादळें उठतात आणि त्या वादळांतील लाटांवर तिची विचारनौका कशी जोराचे हेल-कावे खाऊं लागते ही मौज त्याला पाहायची होती.

रामप्यारी ते शब्द ऐकून कांहीं न बोलतां स्थिरपणें त्याच्या नजरेला नजर भिडवून स्तब्ध राहिली.

" कां ? " हरकिसननें तिच्या गोंधळलेल्या मनांत अधिकच गोंधळ उडवून देण्याच्या निष्पाप खवचटपणानें गालांतल्या गालांत हंसत भुंवया किंचित् वर चढवीत विचारलें.

" माझी तुम्ही थट्टा करतां बाबूजी ? " रामप्यारीनें वाढत्या गंभीर वृत्तीनें त्याला विचारलें. " स्त्रियांविषयीं अशी कुचेष्टा करणें तुम्हां सैनि-कांना शोभतें का ? कीं अमृताच्या शिंपण्यानें विषवेलीच फोंफावाव्या अशी तुम्हाला गांधीजींची शिकवण आहे ? "

हरकिसन रामप्यारीचे ते स्वाभिमानपूर्ण उद्गार ऐकून जरा चपापला. वास्तविक त्याचा त्यांत कांहींच अपराध नव्हता. पण हरकिसन मागेंच रणांगणावर मरण पावला आहे हा विचार रामप्यारीच्या डोक्यांत दृढमूल होऊन बसल्यामुळें तिला मात्र त्याचा संताप आला. येऊं नये त्या भीषण कल्पना तिच्या मनांत विंचविणीच्या पिलांसारख्या सैरावैरा धांवूं लागल्या.

" समजा, अशीच थट्टा तुमच्या बायकोची लढाईवरून आलेल्या कुणा सैनिकानें केलेली तुम्हाला खपेल का ? बायका म्हणजे तुम्ही काय समजतां ? माळावरची माती ? " तिनें रागावल्यासारखें करून विचारलें,

" बायका फसतात त्या आपल्या चुकीनें फसत नाहींत. तुम्ही पुरुष त्यांना फसवतां.–प्रभावती फसली असेल, मी नाहीं म्हणत, फसली नसेलसें. पण लढाईवर गेलेल्या सैनिकांच्या तरुण बायकांना मागें किती प्रकारच्या जाचाच्या खाईत पिचत खडतर आयुष्य कंठावें लागतें याची तुम्हाला काय कल्पना असणार? तुम्हाला बायका ह्या घटकेसाठीं पलंगावरच्या खेळणींशीं वाटतात. मघांशीं तुमचे दोस्त जमले होते. ते बोलताना मी ऐकलें होतें. मला वाईट वाटलें तें ऐकून. आम्ही अजाण मुली चुकून फसून पापाच्या गर्तेत पडलों असलों तर तुम्ही आम्हांला हात देऊन वर काढायचें, कीं तींत अधिकाधिक लोटायचें ? जगांतल्या पुरुष-जातीकडे आम्ही दीन–दुबळ्या स्त्रियांनीं कोणत्या दृष्टीनें पाहावें, बाबूजी ? घटकेचें विलासखेळणें म्हणून ? कीं चार रुपड्या आमच्या अंगावर फेंकून आमची अब्रू विकत घेऊन आमच्या उपाशी पोटाला आग लावणारे गिन्हाईक म्हणून ?—"

हरकिसनला ते वाग्बाण अगदीं वर्मी झोंबले. तो मान खालीं घालून ऐकत होता. त्याला राहवेना. चटकन खाटेवरून उठून त्यानें रामप्यारीच्या पायांना हात लावून नमस्कार करीत म्हटलें, " माफ करा बेहेन! मघांशीं माझी चूक झाली खरी. त्याबद्दल माफ करा..." तेव्हांच प्रभावतीच्या नवऱ्याच्या मृत्यूविषयींचा तिचा गैरसमज अधिक खुलासेवार बोलून दूर करावा असें त्याला वाटलें. पण तसें करण्याला त्याचें मन धजलें नाहीं. रामप्यारीच्या मोघम पण सूचक उद्गारांवरून प्रभावतीविषयीं अनेक भयंकर विचारांचा हलकल्लोळ त्याच्या मनांत माजून राहिला होता. भयंकर वाद-ळांत सांपडलेली बोट अंधाऱ्या अपरात्रीं फुटून तिच्यांतील प्रवासी खवळलेल्या सागराच्या लाटांवर बेगुमान फेंकले जावे व कुणाचा कुणाला पत्ता नसावा तसल्या भयानक अरिष्टांत आपली प्रभावती गेल्या तीन वर्षांच्या काळांत सांपडली असेल कदाचित् !—पुढें त्याच्याच्यानें तोही विचार करवेना. अरिष्टांत सांपडलेला पुरुष आणि अरिष्टांत सांपडलेली स्त्री, त्यांतही प्रभावतीसारखी तरुण सुंदर स्त्री यांत समाजजीवनाच्या दृष्टीनें जमीन–अस्मानाचें अंतर असलेलें त्याला ढळढळीत आढळत होतें. त्यानें क्षणभर डोळे मिटून घेतले. प्रभावती कोणत्या पापमय अरिष्टांत

सांपडली असेल हें पाहण्याचें आपल्या नशिबीं येईल कीं काय या भयानें त्याचें अंतःकरण थरथर कांपत होतें. पण आपल्या मनांतील ह्या विस्मयकारक खळबळीचा मागमूसही आपल्यासमोर बसलेल्या प्रभावतीच्या मैत्रिणीला लागूं नये अशी त्याची इच्छा होती.

" माफी मागण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं, बाबूजी! पण समजा, लढाईत मरण पावलेल्या प्रभावतीच्या पतीचा आत्मा अंतराळांतून जर तुमचे उद्गार ऐकत असला तर काय वाटेल त्याला? एका सैनिकानें धारातीर्थी देह ठेवलेल्या दुसऱ्या सैनिक मित्राच्या बायकोची थट्टामस्करी करतांना तिचा तोतया पती म्हणून मिरवण्याचें देखील धाडस करावें? रणमर्दाचें धाडस आंबून सडलें म्हणजे त्याची अशीच घाणेरडी दारू होते का हो?"

रामप्यारी बोलते आहे ती आपण प्रभावतीचा खरा पति नव्हे या भावनेनें बोलते आहे हें हरकिसन चांगलें जाणत होता. म्हणूनच त्याला तिचा संताप आला नाहीं. एकदां त्याला वाटलें तिला आपली आपणच खरी ओळख पटवून देण्याचा प्रयत्न करावा. पण पुन्हा वाटलें नको. न जाणो आपली ओळख तिला पटली तर तिच्या तोंडून प्रभावतीविषयीं काय शुभ किंवा अशुभ वार्ता ऐकण्याचें आपल्या कपाळीं येईल याचा काय नेम?

" बरें, तुमचें खरें नांव काय बाबूजी? सहज विचारतें. सांगायचें नसलें तर नका सांगूं."

" माझें खरें नांव मोहनसिंग." हरकिसन ही आणखी आतां आपल्या ठावठिकाणाची अधिक चौकशी करून आपणाला घोटाळ्यांत तर पाडणार नाहीं ना, असें आपल्या मनांत भावीत उद्गारला.

सुदैवानें रामप्यारीच्या मनांत तसा कांहींच विकल्प आला नाहीं.

" तुमचें गांव कोणतें?" हरकिसननें विचारलें.

रामप्यारीला तो प्रश्न ऐकून अंतःकरणांत खोल खोल रुतलेल्या तीक्ष्ण शल्याची चाळवाचाळव झाल्यासारख्या वेदना झाल्या. अगदीं लहानसा एक सुस्कारा सोडीत ती उत्तरली, " माझें गांव हेंच." तिनें तो अप्रिय

विषय टाळण्याच्या हेतूनें त्याला अगदीं निराळाच प्रश्न विचारला, "आतां केव्हां जाणार तुम्ही मुंबई सोडून ?"

"जाऊं बहुधा एकदोन दिवसांत. कां ? कांहीं निरोपबिरोप सांगायचा आहे कां तिकडे कुणाला ? असला तर सांगा."

"निरोप नशिबाखेरीज दुसऱ्या कुणाला सांगायचा बाबूजी ? नशिबाला माझा निरोप केव्हांच कळला आहे. आतां मला कांहीं कुणाला सांगायचें नाहीं. मी सांगायला बसल्यें तरी ऐकायला कोण बसणार आहे माझें ?" ती ओठ चावीत तिटकाऱ्यानें कपाळाला आठ्या घालीत आपणावरच चिडल्यासारखी बोलूं लागली. "हां, निरोप एकाला मात्र सांगायचा आहे......" ती टेबलावरील महात्मा गांधींच्या पुतळ्याकडे नजर टाकीत पुन्हा हरकिसनकडे वळून म्हणाली, "या तुमच्या महात्म्याला निरोप सांगायचा आहे. त्यांना म्हणावें—" ती आपल्या भालप्रदेशाला हात लावून कळवळून म्हणाली, "ह्या ललाटींचें कुंकू तुमच्या हातांनीं पुसलें गेलें आहे. तुमच्या आज्ञेनें लढाईवर गेलेल्या अशा आणखी कैक तरुण तेजस्वी सैनिकांच्या अर्धांगींचीं ललाटें अशींच तुमच्या कारणें पांढरीं फटफटीत झालीं आहेत. तुमच्या अहिंसेच्या इतिहासाचीं थोडीं पानें अशीं आमच्या कुंकवानें लिहिलीं गेलीं आणि त्यापायीं आमच्या कपाळींचें कुंकू पुसलें गेलें तेवढें पुरें झालें. आम्ही नरकांत पडलों त्या पडलों. रणांगणावर मरण पावलेल्या शूर हिंदी सैनिकांच्या साऱ्याच बायका कांहीं माझ्यासारख्या नरकांत नसतील पडल्या. त्या भाग्यवान् आहेत. मी अभागी आहें......"

तिला बोलतां बोलतां एवढा जोराचा हुंदका आला कीं, त्या आवेगांत तिच्या तोंडून पुढें शब्दच उमटेना. डोळ्यांवाटे दुःखाश्रूंच्या गंगायमुना झरझर वाहूं लागल्या. दुःखाचे कढावर कढ सारखे तिला येत होते. दांतांवर दांत जोरानें दाबून तें दुःख आंतल्याआंत गिळण्याची ती पराकाष्ठा करीत होती. तिचें सौंदर्यसंपन्न मुखमंडल दुःखावेगानें मार्दवशून्य गंभीर दिसूं लागलें होतें.

हरकिसनही तिची ती गूढ करुण कथा ऐकून अस्वस्थ झाला. त्यालादेखील कांहीं बोलवेना. महात्माजींवर तिनें अशी कळवळ्यानें आवे-

ह्याच्या भरांत जी टीकेची आग पाखडली त्या आगीच्या ज्वाळांनीं त्याचें अंतःकरण अगदीं होरपळून निघालें होतें. ती स्वतःच त्या आगींत भस्मसात् होऊन गेलेली आहे— जन्मांतून उठली आहे, ही भीषण वास्तवता तिच्या करुणवाणींतून त्याच्या मनाला पुरेपूर पटली होती. म्हणून त्यानें ती टीका निमूटपणें सहन केली. आपणासारखाच रामप्यारीचा नवराही महात्माजींचा निष्ठावंत पाईक होता एवढें त्यावरून त्याला कळून आलें. त्याला तें ऐकून वाटलें, "बिचाऱ्या रामप्यारीवर वैधव्याची आकाशाची कुऱ्हाड कोसळली हें तर खरेंच, पण मायभूमीला दास्यमुक्त करायला चालून जातांना मार्गांतले अनुल्लंघ्य खंदक त्या मायभूमीच्या आम्ही संतानांनीं आमच्या देहाच्या दगडधोंड्यांनीं भरून काढलेच पाहिजेत. एरवीं ते कसे भरुन निघतील ? खऱ्या भारत–सुपुत्राच्या जीवनाचें सार्थकसुद्धां यांतच आहे."

अशा एका थोर हुतात्म्याची धर्मपत्नी होण्याचें भाग्य तुम्हाला लाभलें हें काय थोडें झालें ?–असेंही रामप्यारीला विचारावेसें त्याला वाटलें. पण तिच्या दुःखावर डागण्या दिल्यासारखें होईल म्हणून त्यानें तें विचारलें नाहीं.

तोंच एकदम मनांत कांहीं कल्पना आल्यासरसें त्यानें रामप्यारीला विचारलें, "बेहेन ! तुमच्या शूर शिपायाचें नांव मला सांगाल का ? म्हणजे त्याला मला आदरानें वंदन करतां येईल."

रामप्यारीला तें ऐकून दुःखाचा अनावर हुंदका आला. त्यासरसा तिचा ऊर धडधडूं लागला. इतक्या जोरानें कीं, या धडधडीनें तिचें सर्वांग हादरूं लागलेलें हरकिसनला आढळलें. त्यानें मग तिला नवऱ्याचें नांव सांगण्याचा आग्रह केला नाहीं.

तीं दोघेंही तशींच बधिर चित्तानें एकमेकांसमोर बसलीं होतीं. इतक्यांत रामप्यारीच्या खोलीकडच्या बाजूच्या जिन्यावर कुणाचींशीं पावलें वाजूं लागलीं. ती पाऊलाची चाहूल लागतांच रामप्यारी एकदम दचकून सर्वांग शहारल्यासारखें करून कान टवकारून उठली.

"मी जात्यें बाबूजी ! माफ करा हं त्रास दिल्याबद्दल." असा घाईघाईनें निरोप घेत ती खोलीबाहेर पडली. क्षणापूर्वीचें त्रिभुवनदाही दुःख

तिनें एका क्षणांत गिळलें होतें. आणि आपल्या चर्येवर खऱ्या फुलांना लाजविणाऱ्या कागदी फुलांसारखी रंगदार टवटवी आणली होती.

## ३

जातां जातां तिनें डोळ्यांतले अश्रू पुसण्यासाठीं उजव्या हातावरील पदर डाव्या हातानें वर उचलला. तिचें कोमल उघडें मनगट हरकिसनला सहज पाहायला मिळालें. क्षणभरच ती सामोरी टेबलाच्या टोंकाला उजव्या हाताचा टेकू देऊन उभी होती. पण तेवढ्यांत तिच्या मनगटावर गोंदलेलें गोपीनाथ हें नांव हरकिसनला वाचतां आलें. त्यासरसा तो डोळ्यापुढें वीज पडल्यासारखा चमकला, व कावऱ्याबावऱ्या विस्मयपूर्ण नजरेनें तिच्याकडे पाहूं लागला.

"काय दैवाची विचित्र लीला आहे ही! गोपीनाथ रणक्षेत्रावर अडीच वर्षांपूर्वी एकदां मरण पावल्याची बातमी हिंदुस्थानांत त्याच्या नातलगांकडे चुकून आली होती. त्या दुष्ट बातमीचा रामप्यारी हा बळी! गोपीनाथ लौकरच हिंदुस्थानांत सुखरूप येणार आहे ही वार्ता हिला सांगावी का? बिचारा बायकोचा किती कट्टा कैवारी आहे! दाशरथी रामाचें एकपत्नीव्रत दाशरथी रामानें स्वतः जितक्या कसोशीनें रामराज्याच्या काळीं पाळलें नसेल तितक्या कसोशीनें यानें तें सर्व प्रकारच्या उच्छृंखलतेनें बुजबुजलेल्या फ्रेंचमधील खजुरीच्या बनांतही पाळलें. केवढ्या मोठ्या आशेनें तो आपल्या अर्धांगीच्या नांवाचा जप करीत हिंदुस्थानांत येत असेल. पण रायबरेलीला आपल्या घरीं जातांच तो काय पाहील! आवडत्या पत्नीविणें साऱ्या घरांत अंधारीअंधार मुसमुसलेला दिसेल त्याला! घराचें वैराण स्मशान झालेलें पाहून तो कर्माला हात लावून म्हणेल, "मी जिवंत माघारा आलोंच कशाला? संसाराची ही पेटून विझलेली चिता पाहण्याचें नशीबीं होतें म्हणून? त्यापेक्षां अडीच वर्षांपूर्वीच शत्रूंकडील गोळी लागून मरतां मरतां वांचलों तो तेव्हांच मेलों असतों तर किती चांगलें झालें असतें!..."–असें स्वतःला शापीत बिचारा वणवण हिंडेल!

अशा दारुण विचारांच्या चक्रव्यूहांत हरकिसन गुरफटून गेला असतांना डोळ्यांपुढून रामप्यारी केव्हां निघून गेली याचेंही त्याला भान राहिलें नाहीं. त्याच्या डोक्यांत तेंच विचारचक्र एकसारखें गरगर फिरत होतें.

त्या विप्लवी मनःस्थितींत तो पुरा बुडून गेला असतांना तळमजल्यावर जिन्याच्या तोंडाशीं मीर कासीम, तारासिंग व आणखी कांहीं मित्रमंडळी यांचे परिचित शब्द त्याच्या कानीं आले. ती मंडळी जिना चढून खोलींत येण्यापूर्वीच त्यानें आपल्या टेबलावरील पसारा घाईघाईनें आवरून टेबल नीटनेटकें केलें.

मित्रमंडळींच्या संभाषणांतील ओझरते शब्द रणक्षेत्रावरील बंदुकीच्या गोळ्यांसारखे हरकिसनच्या हृदयांत घुसत होते. त्या अस्वस्थतेंत त्याला पूर्वीच्या साऱ्या मानसिक दुःखांचा क्षणभर विसर पडला. आपण मोठ्या आशेनें रणक्षेत्रावर मर्दुमकी गाजवून हिंदुस्थानांत आलों ते आगींतून उठून फोंफाट्यांत उडी घेण्यासाठींच कीं काय ? असें स्वतःच्या मनाला चिमटा घेऊन विचारीत मित्रमंडळीच्या स्वागतासाठीं तो दरवाजांत येऊन जिन्याकडे पाहत उभा राहिला. खिस्ती प्रार्थना मंदिरांतील मृत्युघंटेच्या घणघणाटासारखी त्या मित्रांच्या संभाषणांतून त्याला ओझरती ऐकूं आलेली वार्ता अजून त्याच्या कर्णरंध्रांत घुमत होती.

" सरकारच्या जुलमी रौलॅट कायद्याच्या निषेधासाठीं महात्माजीनीं आदेशलेल्या हरताळांवर व निदर्शनांवर सरकारच आग पाखडूं लागलें काय ? महात्माजीनीं आपली पुण्याई खर्च करून ह्या नीच इंग्रजांना महायुद्धांत जिवंत ठेवण्यासाठीं उदार मनानें आम्हां तरुण हिंदी सैनिकांचे लष्करांत भरती करून बळी दिले. आम्ही आमचें रक्त रणांगणावर सांडलें तें आमची गुलामगिरी टाळण्यासाठीं आणि आमच्या पूज्य भारतभूमीला इंग्रज अरेरावांच्या दास्यांतून मुक्त करण्यासाठीं ! महात्मा गांधीनीं सारा देश अप्रसन्न असतांना त्या वेळीं लष्करभरतीसाठीं इंग्रजांची बाजू घेतली नसती तर कुठचे सैनिक मिळाले असते यांना ? मग इंग्रजी साम्राज्याचा रणांगणावर शूर जर्मनांच्या हातून केव्हांच मुडदा पडला असता. एवढें जीवदान

देणाऱ्या महात्मा गांधींची ह्या इंग्रजांनीं वास्तविक आपल्या मंदिरा-मंदिरांतून येशू ख्रिस्ताच्या जोडीनें तीन त्रिकाळ पूजा करायला हवी होती. त्याऐवजीं हें हरामखोर सरकार आज महात्माजींशीं दगलबाजीनें नवी लढाई जुंपवायच्या तयारींत आहे काय?" असे विचार तो खोलीच्या दरवाजांत उभा असतांना त्याच्या मस्तकांत झंझावातासारखे उसळत होते.

तेवढ्यांत पांच नंबरच्या खोलींतून पुढें एक पंजाबी पेहराव केलेला माणूस, त्याच्या पाठोपाठ साधा हिंदुस्थानी पेहराव केलेला पण पोलिशी डौलाचा एक तरुण, व त्या तरुणामागोमाग नवे झकपक कपडे केलेली रामप्यारी बाहेर पडली व जिना उतरूं लागली.

तळमजल्यावर जिन्याच्या तोंडाशीं एक काळ्या रंगाची प्रशस्त टॅक्सी उभी होती. ती तीनही मंडळी जिना उतरून खालीं जातांच टॅक्सी-वाल्यानें टॅक्सीचा दरवाजा उघडून दिला. पंजाबी पेहरावाच्या गृहस्थानें आदरपूर्वक त्या पोलिशी ढबीच्या हिंदुस्थानी पेहरावाच्या तरुणाला आंत बसायला हातानें संकेत केला. तो तरुण टॅक्सींत जाऊन बसल्यावर त्याच्या मागोमाग रामप्यारीही त्याच्या शेजारीं जाऊन बसली. पंजाबी पेहराव केलेला गृहस्थ टॅक्सीवाल्याशेजारच्या पुढच्या बैठकीवर बसला.

हरकिसन सज्जांतून तो सारा देखावा पाहत होता. पण अगदीं शून्य दृष्टीनें. त्या पंजाबी पेहराव करणाऱ्या गृहस्थानेंही खोलीबाहेर पडून जिना उतरूं लागतांना त्याच्याकडे तिरस्काराच्या व हेटाळणीच्या दृष्टीनें पाहिलें होतें. त्याच्या मागोमाग जाणाऱ्या त्या हिंदुस्थानी पेहराव केलेल्या पोलिशी ढबीच्या तरुणाचीही त्याच्याशीं नजरानजर झाली होती. त्या नजरानजरीनें तो तरुण मनांतल्या मनांत कांहींसा शरमिंदाही झाला होता. त्याला शरम वाटली ती अशाची कीं, हा आपला गांवबंधू हरकिसन, तशांत आपला बाळपणापासूनचा प्रतिस्पर्धी, लढाई-वरून आजच नेमका आपले रंगढंग पहायला बरा इथें आला! पण लगेच त्यानें हेटाळणीनें मानेला हिसका देत मनाची समजूत केली, "पाहिना कां! पाहून माझें काय करणार आहे? हा पोलीस सब् इन्स्पेक्टर माताप्रसाद अशा कैक हरकिसनांचे चणेकुरमुरे चावीत आला

तसे पुढेंही चावील. माझ्या वाटेला गेला तर मग तो आहे आणि मी आहें."

आणि ही सारी आगपाखड नुसत्या मनाच्या संशयावरूनच. हरकिसननें त्याला पाहिलें होतें, पण ओळखलेंदेखील नव्हतें. रामप्यारीही खोलीबाहेर पडतांना हरकिसनला सज्जांत उभा असलेला पाहून पाण्यांत पडलेल्या मातीच्या ढेंकळासारखी अगदीं विरघळून गेली होती. आपलें हें नरकवासांतलें जीवन निदान त्याच्या तरी नजरेला येऊं नये अशी तिची इच्छा होती. पण ती स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागायला स्वतंत्र थोडीच होती! कसायाच्या मागाहून चालणाऱ्या दीनदुबळ्या शेळीसारखी त्या तरुणामागोमाग मोटारींत जाऊन बसतांना ती मनांतल्या मनांत स्फुंदली असेल, रडली असेल, तिनें टाहो फोडून आक्रोशही केला असेल. पण तें सारें मनांतल्या मनांत. तिच्या मनाला वाचा नव्हती. अगतिक दुबळ्या जीवांचीं मनें मुकीं असतात.

हरकिसनचें तिच्याकडेही मुळींच लक्ष गेलें नाहीं. अवघ्या कांहीं क्षणांतला हा कारभार. ती तीन मंडळी मोटारींत जाऊन बसली व मोटार भरवेगानें हँगिंग गार्डनच्या बाजूला निघून गेली.

"चला, बाहेर फिरायला यायचें आहे ना?" असें जिन्याच्या तोंडाशीं चढून येत येत तारासिंगानें हांक मारून विचारलें, तेव्हां हरकिसन भानावर आला.

"मी नाहीं येत फिरायला." तो उत्तरला. त्याला वाटलें, दुपारीं ठरलेल्या संकेताप्रमाणें ऐषआरामाच्या सहलीसाठीं आपणाला बोलवायला ही मित्रमंडळी आली आहेत.

"नाहीं यायचें? बाबूजी! खजुरीच्या बनांत बहकत भटकण्यासाठीं आपणाला फिरायला जायचें नाहीं आहे आज. दुपारचा संकेत पाळण्यासाठीं मी आलेला नाहीं. आपल्या हौसेमौजेच्या साऱ्या आशा आभाळाच्या सांवलीसारख्या फोल आहेत व आपणांला आतां फिरून रणक्षेत्रावरच्या भयाण वाळवंटापेक्षांही भयाण अशा रखरखत्या वाळवंटांत नव्या लढाईसाठीं प्रवेश करायचा आहे. तेंच तुला सांगायला आलों आहें."

बोलतां बोलतां तारासिंग हरकिसनच्या खोलीच्या दरवाजापावेतों आला. त्याच्या मागोमाग मीर कासीमही होता. मीर कासीमच्या मागोमाग वीस एकवीस वर्षांच्या वयाचा पुरती मिस्रूडदेखील न फुटलेला पंजाबी फेटा घातलेला एक पंजाबी तरुण होता. आणि त्याच्या मागोमाग सुमारें पंचविशीच्या उमरीचा एक गोरापान तरुण होता. त्याच्या चर्येवरून तो पंजाबी आहे, कां सिंधी आहे, कां पुरभय्या आहे याची ओळख सहज पटण्याजोगी नव्हती. त्यानें नखशिखांत खादी धारण केली होती. खादीचें धोतर नेसला होता, व डोकीलाही टोपी खादीचीच होती.

मीर कासीम जरी तारासिंगामागोमाग त्या सर्वांच्या पुढें होता तरी त्याचें मन जिना चढून वर येतां येतां समोरून निघून गेलेल्या त्या मोटारींतील मंडळींकडे वेधून राहिलें होतें.

“ साला बदमाष ! अयोध्या प्रांत असले छिनाल धंदे करायला अपुरा पडला म्हणून मुंबईला आला काय ? ” त्यानें मोटार डोळ्यांपुढून निघून जातांना पाहून आपल्या मनाशीं म्हटलें.

“ कुठें जायचें आपल्याला आतां ? ” हरकिसननें कपडे चढवतां चढवतां विचारलें.

“ बाहेर तर पड. मग पाहूं कुठें जायचें तें. ” तारासिंग म्हणाला.

आरशांत पाहून केसांवरून फणी फिरवीत हरकिसननें विचारलें, “ कसली हरताळाची आणि गोळीबाराची वार्ता बोलत होतां आतां तुम्ही ? हरताळ कसला पडला आणि गोळीबार कुठें झाला ? ”

“ दिल्लीला. हरताळानिमित्त निघालेल्या मिरवणुकीवर दिल्ली स्टेशनच्या आवारांत गोळ्या झाडण्यांत आल्या. कांहीं लोक मेले. पुष्कळसे जखमी झाले. तुझ्या महात्माजींच्या नव्या सत्याग्रही लढाईला सुरुवात झाली. ”

“ लढाईला सुरुवात ? ”

“ होय. ”

“ आणि कशाबद्दल ही लढाई ? ”

" तुम्हां आम्हां सर्वांच्या मानेसभोंवार आवळण्यासाठीं सरकारनें अतीशय जुलमी अशा रौलॅट कायद्याचा नवा फांस तयार केला आहे; त्याच्या निषेधासाठीं ही लढाई. "

" बरें, आतां आपणाला कुठें जायचें आहे ? " हरकिसननें जवळ बसलेल्या नव्या अपरिचित खादीधारी पाहुण्याकडे पाहात पुन्हा विचारलें.

तो खादीधारी गृहस्थ प्रथमच बोलता झाला, " बाबूजी ! मी तुम्हाला आमच्या सत्याग्रही नवयुवक मंडळांत न्यायला आलों आहें. सत्याग्रहाच्या नव्या लढाईसाठीं स्वयंसेवकांची नोंद सुरू आहे. आपणाला फार दूर जायचें नाहीं. जवळच पलीकडे सारस्वत वसाहतींत आमच्या मंडळाची कचेरी आहे. लढाईवरून आलेले जे सैनिक आम्हांला भेटतात त्यांचा मंडळाच्या वतीनें सत्कार केला जातो. त्यांना जीवनयात्रा सुखाची करण्या-साठीं हिंदुस्थानांत आल्यावर शक्य त्या प्रकारें सहाय्यही केलें जातें."

त्या खादीधारी गृहस्थाजवळच बसलेला तो पंजाबी तरुण शांत, सावध चित्तानें हें सारें ऐकत होता.

" चल, आटप लौकर. " तारासिंग उतावळेपणानें म्हणाला. " नवी लढाई जुंपूं घातली आहे खरी. आम्ही ही लढाईही जिंकूं. "

" आणि पुन्हां महात्मा गांधी इंग्रजांच्या सहाय्याला धावून जायला सांगतील तेव्हां नव्या उमेदीनें धावून जाण्यासाठीं ताजेतवाने होऊं. " तो पंजाबी तरुण मध्येंच किंचित् ओंठ चावीत भुवया चढवून तारासिंगकडे पहात म्हणाला.

तारासिंगला त्या पंजाबी तरुणाच्या भाषणांतला आशय अगदीं सरळ वाटला. तो वृत्तीनेंही तसाच रोखठोक, सरळ, साधा शिपाईगडी होता. त्याच्या शूर पंजाबी अंतःकरणाला कानेकोपरे नव्हते. पण हरकिसन तसाच शूर असला तरी किंचित् निराळ्या वृत्तीचा. त्या पंजाबी तरुणाचे बोल हरकिसनला कांहीं तारासिंगइतके केवळ सरळ व सोज्वल वाटले नाहींत. सर्पाच्या सोनेरी कांतीसारखे ते सुंदर वाटले. पण त्या सोनेरी सौंदर्याच्या पोटीं प्राणदाहक जहर सळसळत असल्याचाही भास त्याला

झाला. त्यानें एकवार जागरुक नजरेनें त्या पंजाबी तरुणाकडे पाहिलें. पण कांहीं बोलला मात्र नाहीं.

त्या मंडळीबरोबर हरकिसन आपल्या खोलीचें दार बंद करून बाहेर निघाला.

मंडळांतून हरकिसन जो बाहेर पडला तो अनेक नव्या खळबळकारक विचारांचें ओझें अंतःकरणावर घेऊन. तारासिंगही त्याच्याबरोबर होताच.

बऱ्याच दूरवर चालत येईतों ते दोघे एकमेकांशीं कांहीं देखील बोलले नाहींत. वणव्यांतून वाट कापीत चालल्यासारखे स्वतःच्याच विचार-तंद्रींत गुंग होऊन ते चालले होते. तरी पण हरकिसनला बोलल्याशिवाय राहवेना.

"मी म्हणतों, महात्माजींनीं राष्ट्राच्या उद्धाराची धुरा वाहण्याची जबाबदारी पत्करली असतांना या लोकांनीं गद्दर पक्षाचा सवतासुभा मांडून दुफळी कशाला माजवावी?" हरकिसननें तारासिंगकडे वळून विचारलें.

"महात्माजींच्या मार्गाहून या नवजवान मंडळीचा मार्ग अगदीं भिन्न आहे. आणि मला वाटतें, कहानसिंग म्हणाला त्यांत पुष्कळ तथ्य आहे. माझा देखील महात्माजींच्या अहिंसेवर पूर्वीसारखा विश्वास आतां उरलेला नाहीं. आम्हाला शेंकडों वर्षे गुलामगिरींत डांबून ठेवणाऱ्या इंग्रजांच्या साम्राज्यसत्तेचा नायनाट सशस्त्र बंडाखेरीज करतां येणार नाहीं. सशस्त्र शत्रूशीं निःशस्त्रपणें लढणें म्हणजे एक प्रकारें शत्रूला फितूर होणेंच होय."

"कोणाविषयीं तूं बोलतोस हें?"

"शत्रूचें पोषण व्हायला जे समजून किंवा न समजून साधन होतात त्यांना उद्देशून मी बोलतों. महात्माजींपेक्षां आमचे लाला लजपतरायच मला अधिक अचूक मार्गदर्शन करणारे पुढारी वाटतात. गद्दर पक्षाचे लोक त्यांना मानतात. आजकालच्या हिंदी तरुणांचे लो. टिळकांसारखेच लालाजी हे एक महान् स्फूर्तिस्थान आहेत."

"मग तुला काय वाटतें मी वाट चुकलों?" हरकिसननें विचारलें.

"होय."

इतक्यांत त्यांना सोडून मागें राहिलेला मीर कासीम झपझप पावलें टाकीत मागोमाग येत असलेला तारासिंगला आढळला. हरकिसनचा प्रश्न त्यानेंही ओझरता ऐकला.

"होय. तूं चुकलास, हरकिसन! प्रत्येक मनुष्य आजचा शाहणा आणि कालचा मूर्ख असतो. मीही कालपावेतों गांधीवाला होतों. पण आज तसा नाहीं.—"

"मला तो अप्रिय वाद इथें पुन्हा उकरून काढायचा नाहीं, मीर कासीम! मला वाटतें आपण या विषयावर कांहींच बोलूं नये हें चांगलें." हरकिसन अंतःकरणाच्या जखमेला धक्का लागून वेदना व्हाव्या तसा कळवळल्यासारखा त्रासून म्हणाला.

मीर कासीमची वृत्ति अलीकडे इंग्रजांचें खिलाफतीच्या बाबतींत विरोधी धोरण पाहून बिथरूं लागली होती. ते तिघेही तीन वर्षांपूर्वी लष्करांत भरती होतांना एक दिलाचे होते खरे. पण ह्या तीन वर्षांत तें एकोप्याचें रोपटें जुनें होऊन त्याला फुटलेल्या तीन फांद्या तीन दिशांनीं वाढूं लागल्या होत्या. हरकिसनची गांधीजींवरील श्रद्धा अढळ होती. तारासिंगची तितकी अढळ नव्हती. तो मूळचा पंजाबांतील 'गद्दर' क्रांतिकारक पक्षाचा स्नातक होता. लाहोर कटाच्या खटल्यांतील फांशीं गेलेला प्रमुख क्रांतिकारक सरदार करतारसिंग हा त्याचा गुरु होता. करतारसिंग फांशीं गेल्यानंतर त्याच्या अल्पवयी क्रांतिकारक अनुयायांत बरीच पांगापांग झाली, व तशा विस्कळलेल्या मनःस्थितींत तारासिंगवर महात्माजींच्या लष्करभरतीची मोहिनी पडली. परंतु आज दिल्लीच्या गोळीबाराची भीषण वार्ता ऐकून त्याचें पित्त खवळलें होतें. आजच्या सत्कार सभेंत सरदार कहानसिंगनें गांधीजींच्या सत्याग्रहावर केलेली जळजळीत टीका त्याला त्या खळबळीच्या मनःस्थितींत बरीचशी पटली होती.

मीर कासीम तर मूळपासूनच कधीं महात्माजींचा अनुयायी नव्हता. तो महात्माजींच्या उपदेशामुळें नव्हे तर इतर हजारों हिंदी सैनिकांप्रमाणें केवळ पोटासाठीं लष्करांत भरती झाला होता. त्याला इस्लामच्या मुल्ला, मौलवी, मौलानांच्या धर्मवेड्या जातीय शिकवणीमुळें इस्लामचा जाज्वल्य

अभिमान अलीकडे वाटूं लागला होता. पण तोही पैगंबरांच्या शिकवणुकीचें मर्म आकलन होण्यापूर्वींच ! इंग्रजांनीं खिलाफतीवर हल्ला करून इस्लामचा मोठा अपमान केला आहे ही एकच गोष्ट अलीकडे डोकींत खिळा ठोकल्यासारखी त्याच्या अंत:करणांत खिळून बसली होती. आजच्या सत्कार सभेंत सरदार कहानसिंग 'गद्दर' पक्षाच्या वतीनें गांधीजींच्या सत्याग्रहाविरुद्ध खरमरीत बोलला तें त्यालाही बरेंचसें पटलें होतें.

गोकुळनिवासापाशीं जाईतों ते तिघेही एकमेकांशीं अधिक कांहींच बोलले नाहींत.

"बरें मग ? पुढचा बेत काय ?" तारासिंगनें हरकिसन जिन्याची पायरी चढूं लागतांच त्याला विचारलें.

"तूं आजच गांवीं जाणार म्हणतोस ना ? तर तूं जा. मी कांहीं आज येत नाहीं. माखनजीकाका दिल्लीला गेले आहेत हें तूं ऐकलेंसच. ते आल्यावर त्यांना भेटून मग मी येईन."

"मी आज प्रथम दिल्लीला जाणार. तिथें काय काय अनर्थ ओढवला आहे माहीत नाहीं. पूज्य श्रद्धानंदजी लोकांच्या मिरवणुकीचे पुढारी होते. लष्करी शिपायांनीं गोळीबार करण्यासाठीं बंदुका रोखल्या तेव्हां ते छाती उघडी करून आवेशानें पुढें झाल्याचें कळतें. त्यांना गोळी लागली असेल का ? आणखी कुणाकुणाचें त्या गोळीबारांत रक्त सांडलें असेल ? कांहीं कल्पना करवत नाहीं ! माझी खात्री आहे—माझे पिताजी श्रद्धानंदजींचा उजवा हात आहेत, ते या अरिष्टाच्या वेळीं खास मागें राहिले नसतील. आणखी काय काय—" तारासिंगला पुढें बोलवेना. मनांत कल्पनेनें चित्रित केलेल्या त्या अत्याचाराच्या कृत्याखालीं आपल्या कुणाकुणा आप्तेष्टांच्या आहुती पडल्या असतील हें त्याला नुसत्या कल्पनेच्या डोळ्यांनींही पाहवेना. तो एक दीर्घ उसासा सोडून मार्गाला लागतां लागतां म्हणाला, "मी जातों. तूं ये मागाहून."

मीर कासीम तर हरकिसनवर रागावलेलाच होता. तो कांहींही न बोलतां तारासिंगमागोमाग चालूं लागला.

हरकिसन एकटाच जड पावलांनीं जिना चढून वर गेला. त्याच्या मस्तकांत नुसता वणवा भडकला होता. काय करूं आणि काय करूं नको

असें त्याला होऊन गेलें होतें. खोलीचें दार न उघडतां सज्जाच्या कठड्याला धरून तो चित्त बधिर झाल्यासारखा उभा होता. काय करावें ? आजच्या आज असेंच अमृतसरला जावें काय ? पण काकाजींना न भेटतांच ? ... "

तोंच वृत्तपत्रें विकणाऱ्या मुलाची ललकारी त्याला ऐकूं आली: " गुरुद्वार जादा अंक. दिल्लीला कडकडीत हरताळ. . . स्वामी श्रद्धानंदांच्या नेतेपणाखालीं नागरिकांची प्रचंड मिरवणूक ... लष्करानें मिरवणुकीवर गोळीबार केला ... सरदार माखनलालजी गोळीबारांत ठार ... जादा गुरुद्वार ... किंमत एक आणा. "

हिमालयाएवढी उल्का एकदम आकाशांतून मस्तकावर कोसळून पडावी तसें ती वार्ता ऐकून हरकिसनला वाटलें. त्यानें जिन्यावरून धांवत जाऊन एक अंक विकत घेतला व आधाशी नजरेनें दिल्लीच्या गोळीबाराचा वृत्तांत वाचला. गोळीबाराला बळी पडलेल्या सरदार माखनलालजींचें भव्य छायाचित्र त्या वार्तेच्या मध्यभागीं छापलेलें होतें. त्या छायाचित्रांतील काकाजींच्या तेजस्वी नजरेला नजर भिडवीत हरकिसन कळवळून किंचाळला, " काकाजी ! ... "

त्याच्या डोळ्यांवाटे घळघळ वाहणाऱ्या अश्रूंचा काकाजींच्या छायाचित्रावर अभिषेक होत होता.

तडक खोलींत जाऊन त्यानें घाईघाईनें आपलें सामान आवरलें. टेबलावरील महात्माजींच्या पुतळ्याला श्रद्धापूर्वक वंदन करून तोही नीट बॅगेंत ठेवून दिला; आणि सामान घेऊन तसाच घाईघाईनें पण भ्रमल्यासारखा जिना उतरून रस्त्यावर आला. समोरून एक व्हिक्टोरिया जात होती. तिला थांबवून त्यानें आपलें सामान आंत टाकलें.

तोंच त्या निवासाचा रखवालदार हें गिऱ्हाईक निवासाचे पैसे बुडवून चाललें असें पाहून घाईघाईनें व्हिक्टोरियापाशीं आला व हरकिसनला म्हणाला, " बाबूजी ! मॅनेजरसाहेब तुम्हाला बोलावत आहेत. "

तेव्हां कुठें आपली चूक हरकिसनच्या ध्यानीं आली. तो व्हिक्टोरियाच्या पुढच्या बैठकीच्या कठड्याला हात टेकून उभा राहात त्या रखवाल-

दाराला म्हणाला, "जा. मॅनेजरकडून लौकर बिल घेऊन ये. मला आतांच्या आतां मिळेल त्या गाडीनें दिल्लीला जायचें आहे."

रखवालदार माघारा गेला व बिल घेऊन आला. हरकिसननें त्या बिलाकडे ढुंकूनही न पाहतां तसेंच बिल खिशांत कोंबलें व खिशांतून मनीबॅग काढून तिच्यांतली हातीं आली ती दहा रुपयांची नोट त्या रखवालदाराच्या हातीं दिली आणि व्हिक्टोरियावाल्याला इषारा दिला, "बोरीबंदर स्टेशन."

"बाबूजी!" अशी हांक मारीत रखवालदार हरकिसनकडे विस्मयचकित दृष्टीनें पण हंसतमुखानें पाहूं लागला. तो अशासाठीं बुचकळ्यांत पडला होता कीं निवासाचें एक दिवसाचें बिल चार रुपये व कांहीं आणे एवढेंच असतांना हे बाबूजी दहा रुपायांची नोट फेकून जातात याचा अर्थ काय?—तोंच हरकिसन आपल्याकडे मुळींच लक्ष न देतां गेलेला पाहून रखवालदारानें समाधानपूर्वक ती नोट न्याहाळीत खिशांत घातली. बाकीचे पैसे बाबूजींनीं आपणाला बक्षीस दिले असें मात्र त्याला वाटलें नाहीं. स्वारी चांगलीच अंमलांत आहे असा त्याचा अर्थ त्यानें ध्यानीं घेतला; व निवासाचें बिल योग्य तेवढेंच देऊन बाकीचे पैसे बिनबोभाट पचवतां यावे या विचारानें दहा रुपयांच्या नोटेची मोड घेण्यासाठीं शेजारच्या दुकानाकडे वळला.

हरकिसन बोरीबंदरवर जातांनाही भानावर नव्हता. काकाजींच्या मृत्युवार्तेनें त्याचें हृदय शतधा विदीर्ण झालें होतें. तीन वर्षांपूर्वी तो अमृतसर सोडून लढाईवर निघाला तेव्हां माखनलालजींनीं त्याला आणि मंगलसिंगला आपणाबरोबर जालीयनवाला बागेच्या एकांतस्थलीं नेऊन जो उपदेश केला होता तो त्याला आठवला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं आपल्या भारतभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं आपण आपलें सारें जीवन भारतमातेच्या चरणीं वाहिलें आहे अशी शपथ आपण आणि मंगलसिंग या दोघांनीं माखनलालजींच्या सांगण्यावरून त्यांच्या चरणांना स्पर्श करून घेतल्याचें त्याला आठवलें.

आणि तेच माखनलालजी आज भारतमातेच्या मंगलासाठीं महात्मा गांधींच्या आदेशानुसार मरणाला कवटाळून अमर झाले होते.

हातरुमालानें आपले दुःखाश्रू पुशीत व हुंदके आवरीत हरकिसननें कळवळ्यानें हांक मारली, " काकाजी ! ... "

तोंच व्हिक्टोरिया स्टेशनच्या आवारांत येऊन पोहोंचली. सामान घेण्यासाठीं हमाल पुढें आला. त्यानें हांक मारून हरकिसनला विचारलें, " बाबूजी ! कोणत्या गाडीला जायचें ? "

तेव्हां कुठें हरकिसन भानावर आला आणि खालीं उतरला.

# जालियनवाला बाग

जनरल डायरनें अमृतसरला जालियनवाला बागेंत भयंकर नरमेध पेटविला; त्याच्या दुसऱ्या दिवशीं पहांटेला बागेंत गोळीबारानें मरून पडलेल्या व जखमी होऊन पडलेल्या हजारों अभागी नागरिकांवर कडक लष्करी पहारा होता. मरून पडलेल्यांचीं प्रेतें तिथेंच गारठत सडत पडलीं होतीं. मृत्यूच्या दाराशीं तिष्ठत उभे असलेल्या मरणोन्मुखांच्या क्षीण करुण किंचाळ्यांनीं तें वातावरण अगदीं भीषण होऊन गेलें होतें. ज्या जखमी लोकांना अगदींच प्राणघातक जखमा झाल्या नव्हत्या, त्यांच्या किंचाळ्या असली अमानुष हत्या करणाऱ्या राज्ययंत्राचा जणूं तीव्र स्वरानें निषेध करीत बागेंत घुमत होत्या. मृत्यूचें दार अशा जखमी लोकांना अजून चार हात दूर होतें. त्या दारांतून मागें फिरण्यासाठीं ते बिचारे जिवाच्या आकांतानें तडफडत होते. जखमांच्या असह्य वेदनांनीं असल्या जिण्यापेक्षां मरण बरें असें त्यांना क्षणोक्षणीं वाटे, व मृत्यु येण्यासाठीं ते अधूनमधून कळवळून देवाचा धांवाही करीत होते. त्यांतले कोणी जे धड पायाचे होते ते आपल्या पायांनीं धडपडत बागेबाहेर पडूं लागावे. तों बागेसभोंवार गराडा घालून बसलेल्या लष्करी शिपायांच्या खांद्यावरील संगिनींच्या बागनेटांनीं नागिणीप्रमाणें जिभल्या चाटीत त्यांच्याकडे उपहासपूर्वक पाहिलें कीं, ते जागच्याजागींच भीतीनें अर्धमेले होऊन मटकन् खालीं बसावे अथवा कोलमडून पडावे.

पहांट झाली. दिशा फांकल्या. बागेसभोंवार खडा पहारा करणाऱ्या लष्करी शिपायांपैकीं एक मध्यम वयाचा शीख शिपाई हातांत कंदील घेऊन बागेंतील त्या जिवंत स्मशानभूमींत मंदमंद पावलें टाकीत जाऊं लागला. कंदिलाच्या प्रकाशांत त्याला बागेंतील प्रेतांचीं व अर्धमेल्या नागरिकांचीं अश्रू, रक्त आणि धुरळा यांनीं माखलेलीं बापुडवाणीं भकास तोंडें आढळत. इकडे तिकडे तो क्षणभर लक्षपूर्वक पाही व ‘ हा नव्हे, हा नव्हे ’ असें मनाला सांगत पुढचें पाऊल टाकी. मधूनच

तो दचकून कंदील वर करून मागें वळून पाही. कुणाची चाहूल लागतांच त्याच्या पोटांत भीतीचा गोळा उठे कीं, आपला कोणी वरिष्ठ अधिकारी तर पाहणीसाठीं आला नाहीं ना ? कोणी आला तर आपलीं पुरीं शंभर वर्षें भरलींच म्हणायचीं !

तो लष्करी शिपाई असा पांचदहा मिनिटेंपावेतों त्या प्रेतांच्या खचांतून अडखळत ठेंचाळत कंदिलाच्या प्रकाशांत मृतांचे आणि अर्ध-मृतांचे मलीन म्लान चेहरे लक्षपूर्वक न्याहाळीत चालला होता. कितीतरी ओळखीचे चेहरे तिथें त्याला रडतांना, किंचाळतांना व अश्रु ढाळतांना दिसले. कितीतरी ओळखीचीं प्रेतेंही दिसलीं. अमृतसरचाच तो सैनिक, तिथेंच लहानाचा मोठा झालेला. त्या प्रेतांच्या आणि अर्धमेल्यांच्या ढिगाऱ्यांत त्याचे शाळासोबती होते, शेजारीपाजारी होते, परिचित होते व जवळचे आणि दूरचे सगेसोयरेही होते. जनरल डायरच्या हुकुमानें पूर्व-दिवशीं त्या जालियनवाला बागेंत रौलॅट कायद्याच्या व डॉ. किश्लू, डॉ. सत्यपाल या थोर काँग्रेस पुढाऱ्यांच्या धरपकडीच्या निषेधार्थ भर-लेल्या वीस हजार निःशस्त्र नागरिकांच्या सभेवर अमानुष गोळीबार करणाऱ्या हिंदी लष्करी तुकडींतील तो एक लष्करी शिपाई होता. त्याच्या बंदुकीच्या गोळ्यांना त्यांतले अनेक नागरिक बळी पडले असतील याची त्यालाही जाणीव होती. पण काल असे अमानुषपणें नरबली घेणारा तो राक्षसी सामर्थ्यवान सैनिक आज त्याच मृतांसाठीं व जखमी लोकांसाठीं सहानुभूति दाखवायलाही असमर्थ होता. त्याच्या डोळ्यांवाटे टिबकणारे दुःखाश्रू त्याच्या असमर्थतेची साक्ष देत होते. कांहीं कांहीं जखमी लोकांना तर त्याचे ते अश्रू पाहून इतकें वाईट वाटे कीं, त्या वेदनांच्या भरांत ते क्षणभर स्वतःचें दुःख विसरत.

“ सरदारजी ! नोकरीपेशा हा असा कठिण आहे नाहीं ? नोकरी-पेशाच्या पालनासाठीं बापाला पोटच्या मुलावर गोळी झाडून त्याचा जीव घ्यावा लागतो. केवढी उज्ज्वल तपश्चर्या ही ! ” तो लष्करी शिपाई कंदिलाच्या प्रकाशांत चेहरे न्याहाळीत पुढें चालला असतां दोन्ही पाय गोळ्या लागून जायबंदी झाल्यामुळें कालपासून त्या स्मशानभूमींत ताटकळत पडलेल्या एका शीख तरुणानें क्षीण घोगऱ्या स्वरांत विचारलें.

त्या शिपायानें क्षणभर—फक्त क्षणभरच त्या तरुणाकडे कंदिलाच्या प्रकाशांत न्याहाळून पाहिलें आणि मान वळवीत 'कहानसिंग हा बोलतो आहे' असें म्हणत आपल्या डगल्याच्या डाव्या बाहीनें आपले अश्रू पुसले.

खिन्न वृत्तीनें तो सैनिक तोंड चुकवून बाजूला वळलेला पाहतांच कहानसिंग पुन्हा विव्हळत उद्‌गारला "हिंदी लोकांनाच हिंदी लोकांवर गोळ्या झाडायला लावून बापाला मुलाचा, भावाला भावाचा, केवळ वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठीं खून करायला लावणाऱ्या, सत्तेच्या आणि हुकुमतीच्या जोरावर अरेरावीनें राज्य करणाऱ्या इंग्रजांनो, तुमची धन्य आहे! इंग्रज आमचे शत्रू नाहींत; आम्ही आमचे शत्रू आहोंत. कुऱ्हाडीचे दांडे गोताला काळ आमचे आम्ही आहोंत. समजलांत तेजसिंगजी? आम्ही आमच्या हातांतील बंदुकीनें आमच्या बायकामुलांचे, आईबापांचे आणि वेळीं आमचेही बळी देण्याइतके धीर, वीर, शूर हिंदी देशभक्त आहों..."

तिरस्कारानें तो किंचित् बाजूला मान वळवून थुंकला व स्तब्ध राहिला. दोन्ही पायांच्या जखमांतून चौदा पंधरा तास भयंकर रक्तस्राव झाल्यामुळें आधींच त्याला फार अशक्तपणा आला होता. त्याला त्या थोड्याशा बोलण्याचे श्रमही फार जाणवूं लागले.

कहानसिंगचे ते मर्मभेदक उद्‌गार विषारी पाणी पाजलेल्या तीक्ष्ण भाल्यासारखे त्या लष्करी सैनिकाच्या अंतःकरणांत खोल घुसले. दोन तीन अनावर उसासे सोडीत त्यानें आपल्या हुंदक्यांच्या वेगवान ओघाला शक्य तेवढा रुंद टाळा पसरून वाव करून दिला. दुःख त्याला आवरत नव्हतें. पूर्व दिवशीं गोळीबार झाल्या क्षणापासून सर्पदंशासारख्या दुःखाच्या वेदना त्याचें अंतःकरण जाळीत होत्या. पण तो ड्यूटीवरील लष्करी सैनिक पडला. रडेल, अश्रू ढाळील कोणत्या तोंडानें?

तोंच जवळच्या प्रेताच्या खचांतून कण्हण्याचा क्षीण स्वर त्या सैनिकाच्या कानीं आला, "पिताजी!..."

तो स्वर ऐकतांच त्या सैनिकानें एकदम कान टवकारून हातांतील कंदील उंचावून तिकडे पाहिलें. रक्तानें माखलेल्या त्या निसर्गतः सुंदर

पण आतां भीषण दिसणाऱ्या मुखमंडलावरील तीं कोमेजून करपलेलीं दोन नेत्रकमलें आपणाकडे बापुडवाणेपणानें पाहत आहेत असें आढळतांच तो सैनिक पायाखालीं प्रेतें व जखमी अर्धमेले लोक तुडवले जात आहेत याचा क्षणभर देखील विचार न करतां त्या मानवी देहांच्या पायघडीवरून बुटांनीं भारावलेलीं जड पावलें झपझप टाकीत पुढें गेला. तो गुडघे टेंकून खालीं वांकत त्या विव्हळून हांक मारणाऱ्या जिवाचें मस्तक उचलून आपल्या हृदयाशीं कवटाळीत गहिंवरलेल्या कांपऱ्या स्वरांत उद्गारला, " मंगल ! मंगल !—" त्यानें रक्तानें माखलेल्या मंगलसिंगच्या भालप्रदेशावर आपले ओंठ टेकवून आपल्या अश्रूंनीं त्याला न्हाऊं घातलें.

पितापुत्रांची नजरेला नजर भिडली व अश्रूंच्या मूक भाषेंत एकमेकांशीं जिव्हाळ्याचे बोल बोलली. त्या बोलांना ध्वनि नव्हता. पण त्यांत उदात्त, गंभीर मानवी हृदयाच्या कळवळ्याच्या भावनांचीं ब्रह्मांडें भरलेलीं होतीं.

तेजसिंगनें हातांतील कंदील जरा बाजूला ठेवला आणि दोन्ही हातांनीं मंगलसिंगचें मस्तक सांवरीत ओंठाला लागलेलें रक्त डगल्याच्या बाहीनें पुशीत त्याला विचारलें, " उभें राहतां येईल तुला ? "

" नाहीं " म्हणण्याइतकें देखील त्राण मंगलसिंगच्या वाणींत अथवा मानेंतसुद्धां नव्हतें. त्यानें आपली दुबळी नजर हळू हळू गरगर फिरवीत त्या ओंढीसरशी निर्जीव मानेची जी हालचाल केली त्यावरून तेजसिंग ओळखून चुकला. त्यानें बंदूक खालीं टाकली आणि मंगलसिंगला दोन्ही हातांनीं पाठुंगळीला नीट सांभाळून धरून त्या प्रेतांच्या खचांतून सावधपणें पावलें टाकीत तो बागेबाहेर पडण्याच्या वाटेला लागला.

तो बागेच्या तोंडाशीं जातो न जातो तों दुरून त्याचा वरिष्ठ गोरा लष्करी अधिकारी त्याच्याकडे बहिरी ससाण्याच्या नजरेनें पाहत होता. पण तिकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं तो तसाच लष्करी शिस्तींत बेशिस्तीविषयींच्या बेदरकारपणानें समोर थोड्या अंतरावर असलेल्या आपल्या घराच्या रोखानें झपझप पावलें टाकीत चालूं लागला. त्या

गोऱ्या लष्करी अधिकाऱ्यानें आपल्या हाताखालच्या कॅ. पूरणसिंग या शीख लष्करी अधिकाऱ्याला करड्या मोजक्या शब्दांत कांहींसा लष्करी हुकूम केला. त्यांतला 'कोर्ट मार्शल' हा शब्द तेवढा तेजसिंगच्या कानीं पडला. तो उपहासानें तिकडे पाहून हेटाळणीनें मान उडवीत स्वतःशीं धिक्कारून उद्गारला, "कोर्ट मार्शल !–मेलें मेंढरूं आगीला थोडेंच भितें ?"

आपणच वाघासारख्या शूर आपणाला मेंढरूं म्हटल्याबद्दल तो आपणावरच रागावला. पण पुन्हा आपणच आपला राग चुकीचा ठरविला. "मेंढरूं नाहीं तर काय ? वाघ कसले आम्ही ? शुद्ध मेंढरें आहोंत ! मेंढरांपेक्षांही भ्याड दुबळीं मेंढरें बनलों आहोंत आम्ही." रात्रभर पोटचा गोळा आपल्याच हातून बंदुकीच्या गोळीनें जखमी होऊन त्या बागेच्या स्मशानांत आयुष्याची घटकापळें मोजीत तळमळत पडला आहे हें माहीत असूनही शिस्तभंगाच्या भीतीमुळें आपण रात्रीचा पहारा सोडून त्याच्या समाचाराला येऊं शकलों नाहीं हा भ्याडपणा त्याच्या मनाला लागून राहिला होता.

घरीं पोहोंचेपावेतों दोघां लष्करी शिपायांनीं त्याला हटकलें. पण त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

एकानें तर त्याला तुझी बंदूक कुठें टाकलीस म्हणूनही विचारलें. तेव्हां त्याला आपण बंदूक बागेंतल्या प्रेतांच्या खचांत टाकून आल्याची आठवण झाली. ती भयंकर चूक त्याच्या मनाला जाणवली, पण त्याचें त्याला विशेष कांहींच वाटलें नाहीं. त्याला माहीत होतें कीं आपण आपली लष्करी कामगिरी सोडून हा मोठा अपराध केला आहे. त्या अपराधाचें प्रायश्चित्त आपणाला भोगावें लागणार हें तो पुरेपूर ओळखून होता.

तो घरीं जाऊन पोहोंचला तेव्हां दरवाजा बंद होता. त्यानें आजूबाजूला पाहत दरवाजा ठोठावला.

रात्रभर आलोचन जाग्रण करीत भीतीनें व दुःखानें दसदसां रडत बसलेल्या शामकुंवरच्या छातींत तो दरवाजा ठोठावल्याचा आवाज ऐकून एकदम धस्स झालें. दरवाजा उघडण्यासाठीं ओसरीवरून पुढें

येण्याचें सोडून ती पंख मोडून जायबंदी झालेल्या भयभीत पक्षिणीसारखी आंत जाऊन देवघरांत देवाला हात जोडून आळवीत बसली.

"अजून दार कां उघडत नाहीं ही?" असें चिडून मनाला विचारीत तेजसिंगनें पुन्हा पूर्वीपेक्षां जोरानें दरवाजा ठोठावला.

वरवंटा घेऊन कोणीतरी निर्दयपणें आपली छाती ठेंचीत आहे असें शामकुंवरला दरवाजावरचा दुसरा धक्का ऐकून वाटलें. रात्रींत यापूर्वी तीनवेळां तिनें असाच प्रसंग अनुभवला होता. एक पोलीस अधिकारी रात्रीं अपरात्रीं व पुन्हा थोड्या वेळापूर्वी पहांटेला असाच दरवाजा ठोठावून व तिला सक्तीनें दार उघडायला लावून मंगलसिंगची व त्याच्या आणखी कांहीं लष्करी मित्रांची कसून चौकशी करून गेला होता. पण तिला जर कसलीच कांहीं खबर नाहीं तर ती तरी काय सांगणार? मंगलसिंग जो पूर्व दिवशीं गुढीपाडव्याचा सण न म्हणतां अयोध्यानाथजींवर चिडून, वैतागून घराबाहेर निघून गेला होता, तो पुन्हा घरीं आलाच नव्हता. शहरांत हरताळ, निदर्शनें, धरपकड असा हलकल्लोळ सर्वत्र चाललेला ती ऐकत होती. पण आपला मंगल त्या वणव्यांत सांपडला नसेल अशी तिची कल्पना होती. तो घरांतून रागावून बाहेर पडला तो गुजराणवालाला आपल्या सासुरवाडीला गेला असेल असा तिचा तर्क होता. नुकतेंच राजकुंवरचें आपण किंचित् आजारी असल्याबद्दलचें पत्र आलें होतें. त्या टापूंत महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या चळवळीपायीं लोक खवळून बेबंद होऊन सभा, मिरवणुका, सरकारी कचेऱ्यांची जाळपोळ असले प्रकार करीत असल्याचें त्या पत्रांत तिनें त्याला कळविलें होतें. त्याखेरीज ताराचंदचा तांतडीचा निरोप घेऊन आलेल्या एका ओळखीच्या माणसानें तर राजकुंवरच्या वडिलांना अटक झाल्याची वार्ता आणली होती. ह्या साऱ्या वार्ता अशुभ व दुःखकारक तर खऱ्याच. परंतु काल सायंकाळीं जालियनवाला बागेंत झालेल्या अमानुष कत्तलीनंतर शामकुंवरला गुजराणवालाकडील कानीं आलेल्या सरदार सुवर्णसिंगजींच्या धरपकडीच्या व राजकुंवरच्या आजारीपणाच्या बातमींतही एक प्रकारचा

विरंगुळा वाटला. मंगलसिंगला राजकुंवरची आणि लहानग्या नानकची किती गाढ ओढ आहे हें शामकुंवर चांगलें जाणत होती. त्या ओढीमुळें मंगल आपणां सर्वांवर रागावून गुजराणवालाला गेला म्हणून वांचला अशी तिनें आपल्या मनाची समजूत चालविली होती. तिकडे त्याच्या मागें लष्करी यमदूतांचा ससेमिरा लागू नये म्हणून तिनें मंगलसिंगच्या गुजराणवाला येथील ठावठिकाणाची गंधवार्ताही त्या लष्करी शिपायांना मिळूं दिली नव्हती.

फार काय, त्या दिवशीं दोन प्रहरीं तेजसिंगनें आपल्या कामगिरीवर जातांना घरीं येऊन मुद्दाम मंगलसिंगची चौकशी केली तेव्हां त्याच्यापाशींही तिनें ती गोष्ट बोलून दाखविली नव्हती. त्याचा काय नेम? तेजसिंग सहज कुठें बोलला तरी सरकारी गुप्त हेरांचे तीक्ष्ण कान तें ऐकायला चुकायचे नाहींत. आणि मग अनर्थ टळायचा नाहीं—या भीतीनें शामकुंवरनें या घटकेपावेतों तोंडांत मिठाचा खडा धरला होता.

थोड्या वेळापूर्वी दरवाजा ठोठावून मंगलसिंगचा शोध करून गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यानें चिडून रागाच्या भरांत शामकुंवरला धमकीही दिली होती. "तूं लबाड आहेस. तुला सारें माहीत आहे. तूं तुझ्या गांधी–बंडखोर फितूर मुलाला लपवून ठेवत आहेस. पण याद राखून ठेव, चोवीस तासांच्या आंत जर मंगलसिंगला आमच्या हवालीं केलें नाहींस तर सरदारजींना नोकरीला मुकून तुरुंगांत जाऊन बसावें लागेल, आणि त्यांच्याबरोबर तुलाही. तुमच्या घरांदारांवरून आम्हीं गाढवाचा नांगर फिरवूं...... तूं बायको माणूस आहेस. सुंदर आहेस. सारा धोका ध्यानीं आणून शहाणपणानें वाग."

आणि त्यानंतर हा पुन्हा दरवाजा ठोठावला गेला! 'तूं बायको माणूस आहेस. सुंदर आहेस—' हे त्या पोलीस अधिकाऱ्याचे मर्मभेदक शब्द तीक्ष्ण भाल्यांच्या भालेराईसारखे सर्व बाजूंनीं तिच्या अंतःकरणांत भोंसकले जाऊं लागले. हुंदक्यासरसें भीतीनें शहारणारें सर्वांग पाठीवरच्या पदरानें गुंडाळून घेत ती त्या संभाव्य अरिष्टापासून स्वतःच्या बचावाची तयारी करूं लागली.—कोसळणारें आकाश आपल्या दुबळ्या पायांवर सावरूं पाहणाऱ्या खुळ्या वेड्या टिटवीसारखी!

अजूनही दरवाजा उघडत नाहीं असें पाहून आधींच सर्वतोपरी त्रस्त झालेल्या तेजसिंगाचा संताप अनावर झाला. त्यानें दोन्ही हातांनीं पाठीवरील मंगलसिंगचें जिवंत ओझें सांवरीत दरवाज्यावर जोरानें लाथ मारीत मोठ्यानें हांक मारली, "शामा! जिवंत आहेस कीं नाहींस? दरवाजावर इतके धक्के दिले तरी अजून जाग नाहीं येत?"

मंगलसिंगनें कळवळून क्षीण स्वरांत बापाला सांगितलें, "नका! नका! माझ्या दुःखी आईच्या अंतःकरणावर अशी आपल्या रागाची आग पाखडूं नका."

तेजसिंग तें ऐकून अंतःकरणांतल्या अंतःकरणांत कळवळला.

हांक कानीं पडतांच शामकुंवर हायसा उसासा सोडीत देवघरांतून बाहेर आली. तिनें दरवाजा उघडला. त्यावेळीं तिचें मन पतीला विश्वासानें विचारायला आतुर झालें होतें कीं, मंगल पकडला गेला नाहीं ना?

# २

"बिछाना घातलेला आहे?" तेजसिंगनें अगदीं हलक्या हातानें फूल झेलावें तसें मंगलसिंगला सांवरून पाठीवरून खालीं उतरीत विचारलें.

पोटच्या मुलाची ध्यानींमनींही नसलेली ती केविलवाणी अवस्था पाहून त्या माऊलीच्या हृदयावर आकाशची कुऱ्हाड कोसळली. दुःखाचा एक दीर्घ उसासा सोडून सुन्न झालेलें मस्तक दोन्ही हातांनीं घट्ट दाबून धरीत ती मटकन् खालीं बसली व स्फुंदूं लागली.

भाजलेल्या जखमेवर आधण पाणी सांडावें तसें तेजसिंगाचें आधींच जखमी झालेलें दुःखी मन त्या माऊलीच्या विलापाच्या धगींत जास्तच होरपळूं लागलें. तो त्या अनावर दुःखांत पत्नीवर व स्वतःवरही चिडून कठोर घोगऱ्या आवाजांत खेंकसला, "रडायला वेळ आहे अजून. अजून मंगल मेला नाहीं आणि मीही मेलों नाहीं. ऊठ अगोदर. बिछाना तयार करून दे मंगलसाठीं."

सतीनें अग्निकाष्ठें भक्षण करावींत, तसे आपल्या दुःखाचे आवंढे गिळीत शामकुंवर पदरानें डोळे पुशीत तशीच उठली आणि भिंतीला

धरून आंत मंगलसाठीं बिछाना तयार करण्याकरितां गेली. रात्रभरच्या व त्यांत भर म्हणून आतांच्या दुःखानें तिचें मन आणि शरीरही इतकें पांगळें झालें होतें कीं, घरांत चार पावलें चालत जातां जातां आपण पडूं कीं काय असें भय तिला वाटलें.

" मंगल ! " पित्यानें पुत्राला अश्रुपूर्ण दृष्टीनें व्याकुळीत हांक मारीत त्याच्या रक्ताळलेल्या भीषण चर्येवरून आपली नजर फिरविली. पुढें त्याच्या तोंडून कांहीं क्षणपावेतों शब्द उमटला नाहीं. अंतःकरण दुःखाच्या आवेगानें दुथडी भरून वहूं लागलें होतें. आणि त्या दुःखाच्या गंगायमुनांचे महापूर त्याच्या नेत्रांवाटे गालांवरून घळघळ वाहत होते. त्याच्यानें बोलवेना याचें कारण कालचा जालियनवाला बागेंतील गोळीबाराचा भीषण देखावा त्याच्या अंतःश्चक्षूंसमोर स्मशानांतील पिशाच्चसेनेसारखा भीषण तांडवनृत्य करूं लागला होता.

" मी माझ्या मुलाला मारलें. " तो सर्वांग थरारून आल्यासारखा आपणाशींच मनांत बोलूं लागला, " बापाच्या गोळीनें मुलगा मृत्यूच्या दारीं घायाळ होऊन पडला... "

तोंच त्यानें आंत येतांना लावून घेतलेला दरवाजा हलकेच उघडला गेला. बाहेर आतां बरेंच चांगलें दिसूं लागलें होतें. दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकतांच एकदम धक्का बसल्यासारखा सावध होऊन ती दरवाजाकडे पाहत म्हणाला, " कोण आहे ? "

विचारतां विचारतां संशयाच्या भरांत त्यानें येऊं घातलेल्या संभाव्य प्रसंगाला तोंड देण्यासाठीं आपल्या पवित्र कृपाणाला हात घातला. कोणीतरी आपल्या पाळतीवर आलें असेल, कदाचित् आपणाला लष्करी घरणेंही आलें असेल अशी अमंगल शंका त्याच्या मनांत आली. पण तो भ्याला नाहीं. मरणाच्या मोलानें येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या तयारीनें खंबीर मनानें दरवाजाकडे पाहत उभा राहिला.

पण तेजसिंगची ती भीति अस्थानीं ठरली. म्हातारे अयोध्यानाथजी व त्यांच्या मागोमाग त्यांची सून कौसल्यादेवी हीं दोघें आंत आलेलीं पाहून त्यानें हायसा एक उसासा सोडला व मान शरमेनें किंचित् बाजूला

वळविली. पोटच्या मुलावर गोळी झाडणारा मी बाप कसायाहूनही कसाई ह्या अनुतापमय विचाराचे घणाचे घाव त्याच्या अंतःकरणावर पूर्वीपेक्षां जास्त जोरानें पडूं लागले. मंगलसिंग लढाईवरून परत आला तेव्हांपासून कालपावेतों एकही दिवस असा गेला नव्हता कीं ज्या दिवशीं अयोध्यानाथजींनीं महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या सुरू झालेल्या चळवळीबद्दल त्या बापलेकांवर उपरोधाची आग पाखडली नाहीं. ते तीन वर्षांपूर्वीपासूनच मंगलसिंग, हरकिसन ह्या मुलांवर इंग्रजांच्या बाजूनें लढण्यासाठीं महात्मा गांधींच्या नादानें लष्करांत भरती झाल्याबद्दल कमालीचे चिडलेले होते.

तेजसिंगही जरी हिंदी लष्करांतील जुना शिपाई होता; तरी तोदेखील तेव्हांपासून महात्मा गांधींच्या सत्याग्रही धर्मानें भारला गेला होता. तो सरकारी लष्करांतील शिपाई खरा. पण शरीरानें व मनानें तो स्वतःला अभिमानपूर्वक महात्मा गांधींचा सैनिक म्हणवून घेत असे. म्हणूनच अयोध्यानाथजींचे त्याच्याशीं वारंवार खटके उडत. मांजरीचे दांत मांजरीच्या पिलांना लागत नाहींत तसा अयोध्यानाथजींचा तीव्र संताप सभोंवारच्या सर्व गांधीवेड्या मंडळींना कांहींसा सुखकारकच वाटे. अयोध्यानाथजी किती जरी संतापले, आपलें मन मोडून लढाईवर गेलेला हरकिसन आपणाला मेला आणि आपण त्याला मेलों असें जरी ते त्रागयानें ज्याच्यात्याच्यापाशीं म्हणत, आणि याच कारणावरून त्यांनीं माखनलालशीं बाहेर दिसायला जरी हाडवैराला शोभणाऱ्या तिरस्काराची जोपासना चालविली होती, तरी म्हाताऱ्याचें खरें अंतःकरण त्याहून अगदीं निराळें गंगाजलाप्रमाणें निर्मळ, महासागराप्रमाणें विशाल व सोज्वल होतें. रोज म्हातारा देवघरांत बसून लढाईवर गेलेल्या आपल्या ह्या पोरांचें आणि माखनलालचेंही हात जोडून अभीष्ट चिंतिल्याखेरीज अन्नग्रहण करीत नसे.

परंतु हीं पोरें लढाईवरून देवाच्या दयेनें सुखरूप माघारीं येतात न येतात तोंच त्यांच्यासाठीं महात्मा गांधींनीं आपल्या सत्याग्रहाच्या चळवळीचें सतीचें वाण वाढून ठेवावें ह्या विचित्र घटनेनें म्हातारा अलीकडे फारच बिथरला होता.

तशांत बारा तेरा दिवसांपूर्वी ह्या चळवळीनिमित्त दिल्लीला झालेल्या गोळीबारांत माखनलालचा बळी पडला हें ऐकल्यापासून म्हाताऱ्याचें मस्तक चहूं बाजूंनीं पेटलेल्या खांडववनासारखें अगदीं भडकून गेलें होतें. हरकिसन दिल्लीच्या गोळीबाराची ती वार्ता वर्तमानपत्रांत वाचून त्याच दिवशीं मुंबईहून पहिल्या गाडीनें दिल्लीला निघून गेला होता. पितृस्थानाहून पूज्य असलेल्या माखनलालजींचें और्ध्वदेहिक धर्मपुत्राच्या नात्यानें यथासांग आटोपून त्यांच्या अस्थींचें गंगेंत विसर्जन करण्यासाठीं प्रयागला जाऊन तसाच तिकडे येतों असें त्याचें पत्र पांच सहा दिवसांपूर्वींच अयोध्यानाथजींना मिळालें होतें. तें पत्र वाचून त्यांनीं खडक फोडून झुळुझुळु वाहणाऱ्या झऱ्याच्या जलासारखी आपल्या वात्सल्यपूर्ण अश्रूंची प्रेमांजलि आपल्या दिवंगत पुत्राला आदरपूर्वक अर्पणही केली होती. पण हा आदर, ही वत्सलता, ही कोमलता सारी मनांत. जनांत त्यांनीं माखनलालविषयींच्या संतापाचा दुर्दमनीय दुराग्रह वाढत्या निग्रहानें चालविला होता. पुत्रनिधनाची वार्ता ऐकून म्हाताऱ्यानें जनाला दिसतील असे दोन दुःखाश्रूही गाळले नाहींत अथवा पुत्राच्या नांवानें गंगास्नानही केलें नाहीं. इतकेंच काय पण केदारनाथलाही वडील बंधूची धर्मविहित उत्तरक्रिया म्हणून त्यानें कांहींदेखील करूं दिलें नाहीं.

"माखनलाल केव्हांच गांधींच्या नांवानें मेला आहे. आणि तेव्हांच मीही त्याला मेलों आहें. त्याच्या नांवानें तेव्हांच स्नान करून मोकळा झालों आहें. पूर्वींच मेलेल्याची उत्तरक्रिया आज पुन्हा कसली करायची?" अशा निष्ठुरतेच्या शब्दांनीं म्हाताऱ्यानें स्वतःला पुत्रशोकाचा विसर पाडण्याचा लटका देखावा तेव्हां केला होता.

"मंगल जिवंत आहे कीं मेला?" म्हाताऱ्यानें आंत येतांच दरवाजा हातानें लोटून घेत विचारलें.

तेजसिंग कांहीं बोलला नाहीं. त्यानें खिन्नतापूर्वक खालीं मान घातली.

म्हाताऱ्याचा शब्द कानीं पडतांच मंगलसिंगनें किंचित् वर मान करून तिकडे पाहत क्षीण स्वरांत हांक मारली, "नानाजी!..."

" अजून जिवंत आहेस तूं ? मेला नाहींस अजून ? मग खरा पुण्यात्मा नव्हेस तूं ! खरा पुण्यात्मा माझा माखनलाल. गांधीसाठीं जगला; गांधीसाठीं मेला. एवढी मृत्यूची कुऱ्हाड मानेवर कोसळूनही तुम्ही मरत नाहीं; कसले पापी चांडाळ तुम्ही ! " असा भडकत म्हातारा मंगलसिंगपाशीं येऊन बसला.

इतक्यांत शामकुंवरनें बाहेर येऊन सुचविलें, " मंगलला आंत झोंपवणार ना ? "

" नानाजी, आपण याला आंत नेऊन झोंपवूंया. " असें म्हणत तेजसिंगनें मंगलसिंगच्या मानेखालीं हात दिला. म्हाताराही त्याला आपल्या हाताचा आधार देण्यासाठीं पुढें सरसावला.

" थांबा. " मंगलसिंग त्या दोघांनाही हातानें खूण करून थांबवीत हळू हळू उठून बसतां बसतां म्हणाला, " मला चालत आंत जातां येईल. आतां मला जरा बरें वाटतें. "

" बरा हो. बाबा ! लौकर बरा हो. गांधीचें नांव घेऊन मरायला लौकर बरा हो. " म्हातारा त्याला आपल्या हाताचा आधार देऊन वर उठायला मदत करीत उद्गारला.

" जाशील तूं चालत आंत ? कीं... " असें म्हणत तेजसिंग त्याला आधार देण्यासाठीं उभा राहिला.

मंगलसिंगनें मानेनें ' हो ' म्हटलें. पण त्याच्या जोरदार मनाइतका जोर त्याच्या शरीरांत नव्हता. शामकुंवर व कौसल्यादेवी या दोघींनीं त्याला धरून हळुवारपणानें आंत नेलें.

" डॉक्टर येईल आतां म्हणावें शामकुंवरला. " म्हातारा कौसल्या-देवीला सुचवून तेजसिंगकडे वळून म्हणाला, " गांधीभक्ताचा बळी गांधीच्या नांवानें पडायला हवा ना ! त्यासाठीं मंगल लौकर बरा व्हायला हवा. गांधीच्या सांगण्यावरून तुर्कस्थानांत इंग्रजांच्या बाजूनें लढून माघारा आला. यशाचा हार इंग्रजांच्या गळ्यांत पडला आणि आतां फांस याच्या गळीं पडतो आहे. आधीं सापाला दूध पाजायचें आणि मग

तो डसला म्हणजे त्याला मारायला धांवायचें. गांधीबाबाचा असला गारुड्याचा खेळ साजरा व्हायला असलीं मूर्ख मुकीं मेंढरें त्याला पाहिजेतच–"

तेवढ्यांत शामकुंवरनें माघारीं येऊन दरवाजाआडून तेजसिंगला सुचविलें, "असें कांहीं बोलूं नका म्हणावें, मंगलला राग येतो."

तेजसिंगनें त्यावरून काय उमजायचें तें उमजून नम्रपणानें म्हाताऱ्याला सुचविलें, "नानाजी! आज या वेळीं राहूं द्यात ना त्या गोष्टी. मंगलच्या मनाला उगीच त्रास होईल. गांधीजी जें सांगतात तें आपमतलबानें थोडेंच सांगतात? आपणां कोटमाप हिंदी रयतेच्या कळवळ्यानें ते कांहीं झालें तरी करतात."

"खरें आहे. मरणापूर्वी तर नाहींच पण मरतांनाच काय, मेल्यावर देखील आमचे डोळे उघडायचे नाहींत. नरकांतले किडे आम्ही नरकांतच बुडून मरायचे. इंग्रज सैतानांचा ऐन मरणघडीच्या वेळीं कैवार घेऊन गांधीनें तुमचें आमचें हित साधलें तें हेंच ना? बाबारे! इंग्रजाला गांधी ओळखीत नाहींत पण मी चांगला ओळखतों. सत्तावन सालच्या बंडापासून मी त्याला ओळखतों. सारें लष्कर इंग्रजांविरुद्ध एकजात बिथरलें असतांना राजनिष्ठेच्या कळवळ्यानें माझ्या भारतमातेच्या दास्यविमोचनाविरुद्ध इंग्रजाला विजयी करण्यासाठीं माझ्या देशबांधवांशीं तळहातावर शीर घेऊन लढणारा, विशीच्या उमरीचा कोंवळा तडफदार सैनिक मीही तेव्हां गांधीच होतों. बंडाच्या वणव्यांतून आम्ही इंग्रजांना वांचविलें—अभिमानाची गोष्ट म्हणून सांगत नाहीं मी तेजजी! तेव्हांच्या तुम्हा पंजाबांतील शीख देशद्रोही शिपायांइतकीच माझ्यासारख्या तेव्हांच्या इंग्रजधार्जिण्या हिंदुस्थानी सैनिकांना शरमेनें खालीं मान घालायला लावणारी गोष्ट म्हणून सांगतों मी. तेव्हां हा इंग्रज आम्ही राजनिष्ठेच्या खोट्या मृगजळामागें धांव घेऊन वांचविला म्हणून तो आज आमच्या निरपराधी बायकांपोरांची अशी लांडग्यांनाही लाजविणारी लांडगेतोड करूं धजला." तो आवेशानें दांतओंठ खात क्षणभर थांबून म्हणाला, "एकटाच गांधी जालियनवाला बागेंतल्या हजारों निरपराध्यांच्या हत्येला जबाबदार नाहीं. माझ्यासारख्या सत्तावनच्या बंडांत होरपळून निघालेल्या व पश्चात्तापानें

भस्मसात् झालेल्या कालच्या मूर्खांचा आणि आजच्या शहाण्यांचा त्यांत पहिला मोठा वांटा आहे. गांधीला कोणत्या तोंडानें मी तरी नांवें ठेवूं?" तो फाडफाड आपल्या थोबाडींत मारून घेत पांढऱ्या दाढीचे केंस हिसडीत तळतळून उद्गारला, "आज इंग्रज हिंदुस्थानांत जिवंत दिसतो आहे ह्या घोर पापाचा गांधीच्याही पूर्वींचा मोठा वांटेकरी मी आहें.— जाऊं द्या. तें काय बोलून करायचें आतां? पण तेजजी! ह्या आमच्या पापांची परवड थांबणार तरी कुठें रे? कीं थांबणारच नाहीं? हा गांधी-वणवा काल बागेंत बळी पडलेल्या हजारों निरपराधी भारत संतानांची आहुती घेऊन तरी शांत होणार नाहीं का रे?"

म्हाताऱ्याला संतापातिशयामुळें कमालीची ग्लानी आली. मूर्च्छा येऊन तो मान टाकून धाडकन् जमिनीवर आडवा झाला. इंग्रजांचा आणि गांधींचा विषय निघाला कीं म्हाताऱ्याची तळपायाची आग मस्तकाला जाऊन झोंबते आणि त्या संतापाच्या भरांत स्वतःवरच मनस्वी चिडून तो उन्माद चढल्यासारखा बेभान होऊन बोलूं लागतो, हा प्रकार इतक्या वर्षांच्या परिचयानें जवळच्या सर्व मंडळींना माहीत झाला होता.

यावेळीं म्हाताऱ्याला जरा शांत पडूं द्यावें असें म्हणून तेजसिंग तिथून हलकेच पाय काढून मंगलच्या समाचारासाठीं आंत गेला.

"गांधीजींची निंदा या घरांत होणार असेल, तर पिताजी! ती ऐकण्यापेक्षां मी असाच मरून जाईन." मंगलसिंगनें पित्याला पाहतांच आपलें सत्त्वशील गांधीनिष्ठ अंतःकरण त्याला सताड फाडून दाखविलें.

इतक्यांत बाहेर मोटार आल्याचा आवाज ऐकूं आला. 'धरणें तर आलें नाहीं ना?' ही शंका तेजसिंगच्या मनाचे चावे घेत असतांना तो त्या तिडकीसरसा उठून बाहेर गेला.

पण तें धरणें बिरणें कांहींही नव्हतें. डॉ. यशपाल वैद्यकीय उपचाराच्या साहित्यानें भरलेली कातडी बॅग घेऊन आंत आले.

"कुठें आहे मंगल सरदारजी?" डॉ. यशपाल तेजसिंगला विचारीत पुढें आले.

आंत जाऊन त्यांनीं मंगलची प्रकृति पाहिली. त्याच्या छातींत बंदुकीच्या दोन गोळ्या खोल घुसल्याचें त्यांना आढळून आलें.

" याच्यावर शस्त्रक्रिया केली पाहिजे सरदारजी ! मी माणूस पाठवून अँब्यूलन्स कार आणवतों आणि याला माझ्या इस्पितळांत घेऊन जातों." शामकुंवर तें ऐकून डोळ्यांना पदर लावून हुंदके देऊं लागली. डॉ. यशपालनीं तिच्याकडे वळून तिचें सांत्वन केलें, " माईजी, वेड्यासारख्या रडतां काय ? त्यांत एवढें भिण्यासारखें काय आहे ? आठ दिवसांत मंगल बरा होईल. कांहीं काळजी करूं नका. हा प्रसंग कांहीं आज तुम्हां एकट्यावरच कोसळला आहे असें नाहीं. आज या अमृतसर-मधल्या घरोघरच्या माता तुमच्या समदुःखी आहेत. मुळींच वाईट वाटून घेऊं नका तुम्ही." बाहेर डोकावून पाहत त्यांनीं मोठ्यानें हांक मारली, " याकूब!—"

मोटार ड्रायव्हर याकूब आंत आला.

" जा आणि डॉ. सत्यवतींना सांगून तावडतोब आपली अँब्यूलन्स कार घेऊन ये.—आणि हें पाहा, कुणासाठीं गाडी बोलाविली आहे वगैरे कुठें कांहीं बोभाटा करायचा नाहीं." याकूब बाहेर गेल्यावर डॉक्टर तेजसिंगकडे वळून म्हणाले, " गेल्या चार पांच दिवसांपासून मंगल, आमच्या याकूबचा भाऊ मीर कासीम अशी ही तरुण मंडळी सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत सलूं लागली आहेत. वास्तविक मंगल यापूर्वीच पकडला जायचा—"

" पकडला गेला असता तर बिचारा वांचला तरी असता.—गाडींतून मी जाऊं डॉक्टर ! अँब्यूलन्स कार आणायला ?" तेजसिंगनें विचारलें.

" नका. तुम्ही मुळींच जाऊं नका सरदारजी !..."

बोलतां बोलतां डॉक्टरनीं आपली जीभ चावली. संकट कृष्णछायेसारखें तेजसिंगच्या पाठीवर चालून येत आहे ही खबर त्यांना नुकतीच थोड्या वेळापूर्वी कळली होती. इकडे यायला निघतांना त्यांचा असा विचार होता कीं इथें येतांच तेजसिंगला प्रथम आपल्या मोटारींतून शहराबाहेर जवळच्या सुलतानपुरा खेड्यांत शेतवाडीवर पोंचतें करावें. म्हणजे तरी

तो धरपकडीच्या फांसांतून मोकळा सुटेल. पण इथें येतांच मंगलची काळजी करण्यासारखी गंभीर अवस्था पाहून ते जरा थांबले. आतां अँब्यूलन्स कार येऊन मंगल इस्पितळाकडे पाठविला गेला कीं आपल्या गाडींतून तेजसिंग व शामकुंवर या दोघांनाही तातडतोब जवळच्या सुलतानपुरा खेड्यांत पाठवून देण्याचें त्यांनीं योजिलें होतें.

परंतु त्यांचे ते सर्व मनोरथ पाण्यांत पडलेल्या सूर्यकिरणांसारखे विफल झाले. जें संकट टाळण्याची ते धडपड करीत होते तें चोराच्याच पावलांनीं नव्हे तर दरोडेखोराच्या पावलांनीं त्या घरांत घुसलें. शहरचा पोलीस सब् इन्स्पेक्टर सरदार बलभीमसिंग बरोबर शीख लष्करी अधिकारी कॅ. पूरणसिंग याला घेऊन सशस्त्र पोलिसांच्या तुकडीसह तिथें येऊन थडकला. पोलिसांनीं त्या घराला चोहों बाजूंनीं वेढलें. बलभीम-सिंगनें घरांत घुसून अधिकारवाणीनें हांक मारली, “ सरदारजी !— ”

ती हांक एकट्या तेजसिंगलाच नव्हे तर मंगलसिंग, कौसल्यादेवी, शामकुंवर यांना व डॉ. यशपालनाही यमदूताच्या कठोर हांकेसारखी भयंकर वाटली.

शहर कोतवालींतील एक अत्यंत नीच, उरफाट्या काळजाचा पोलीस अधिकारी अशी बलभीमसिंगच्या दुष्कीर्तीची नौबत साऱ्या अमृतसर शहरांत आजकाल झडत होती. गेल्या चार पांच दिवसांपासून वास्तविक शहरांत लष्करी अंमलाचा सैतानी नंगा नाच सुरू होता. शहरचा कारभार अजून रीतसर जरी लष्कराच्या ताब्यांत देण्यांत आला नसला तरी चार पांच दिवसांपासून डॉ. किश्लू व डॉ. सत्यपाल यांना एका मोठ्या पहांटेला जिल्हा मॅजिस्ट्रेटनें बेसावधपणें अचानक पकडून अज्ञात ठिकाणीं नेऊन डांबून ठेवल्यापासून लोकक्षोभाचें होमकुंड धडाडून पेटूं लागलें होतें. त्या पहिल्याच दिवशींच्या जनतेच्या मोर्चावर प्रतिकारासाठीं गोळ्या झाडून दोन निरपराधी नागरिकांचे बळी घेणारा बलभीमसिंग जनतेच्या आठवणींतून कसा बाजूला राहील ?

शहरांतील पोलीस बंदोबस्त शहरांत शांतता व सुव्यवस्था राखायला अगदीं अपुरा पडूं लागला व खवळलेली जनता अमृतसर शहरांत राज-

सत्तेचें लंकादहन करायला कमी करणार नाहीं इतकी धास्ती सर्व सरकारी अधिकाऱ्यांना वाटूं लागली; म्हणून त्यांनीं तात्रडतोब त्याच दिवशीं शहरचा कारभार प्रत्यक्ष लेखानें नाहीं तरी कृतीनें लष्कराच्या स्वाधीन केला होता. पण लष्करी जुलूमजबरदस्तीच्या दाढेखालीं सांपडलेल्या जनतेवरून बलभीमसिंगसारख्या अत्याचारी पोलीस अधिकाऱ्यांच्या पाशवी जुलूमजबरदस्तीचा वरवंटा फिरायचा कांहीं थांबला नव्हता. तो उलट वाफेच्या रुळाच्या वेगानें जनतेला दडपीत, भरडीत, चेंगरीत पुढें चालला होता.

गेल्या आठ दिवसांपासून बहिरी ससाण्याच्या राक्षसी झडपेनें हरकिसन आणि रामसिंग यांची शिकार साधण्यासाठीं आपल्या घरासभोंवार घिरट्या घालणारा बलभीमसिंग आला आहे, हें कौसल्यादेवीनें त्याच्या कठोर दरडावणीच्या हांकेवरूनच ओळखलें, आणि अगतिकतेनें—चोराची माय मनांत रडते म्हणतात तसा आंतल्या आंत हृदयाच्या सतपाताळांत मुका टाहो फोडीत धरणीवर घालून घेतलें.

आठ दिवसांपूर्वी बलभीमसिंगानें खवळलेल्या जनतेच्या मोर्चावर गोळ्या झाडून जे दोन बळी घेतले त्यांच्या प्रेतांची मिरवणूक काढण्यांत मंगलसिंगनें जिवावर उदार होऊन हिरीरीनें पुढाकार घेतला होता. त्या वेळीं मंगलसिंगवर गोळी झाडण्यासाठीं रिव्हॉल्व्हर घेऊन उगारलेला बलभीमसिंगाचा हात मंगलसिंगनें आपल्या पोलादी मनगटाच्या एका तडाख्यासरसा निखळून दुखूं लागण्याइतका उखडून दूर लोटला होता. डिंवचलेल्या मधमाशांच्या पोहळ्याप्रमाणें खवळलेल्या त्या जनसमूहापुढें बलभीमसिंगला आपल्या सशस्त्र पोलीस तुकडीसह माघार घ्यावी लागली. त्या दिवसापासून हा विषारी काळा नाग मंगलसिंगला डसण्यासाठीं चोरट्या अंगानें दबा धरून बसला आहे हें मंगलसिंगच्या सांगण्यावरून शामकुंवरला माहीत झालें होतें.

आणि गेल्या रात्रीं अनेक वेळां व पहांटेलाही शामकुंवरला उन्मत्तपणें दरडावून जाणाराही हाच बलभीमसिंग.—

साप दावा साधायला आला ह्या जाणिवेच्या धक्क्यानें शामकुंवरला नजरेसमोर सारा अंधारीअंधार दिसूं लागला.

"काय पाहिजे तुम्हाला?" तेजसिंगनें आपलें कृपाण हाताळीत पुढें होऊन बलभीमसिंगला विचारलें.

"तुम्हीच पाहिजे आम्हाला." बलभीमसिंग आढ्यतापूर्वक त्याच्याकडे पाहत उत्तरला.

इतका वेळ ग्लानी येऊन निश्चेष्ट पडलेले अयोध्यानाथजी बलभीमसिंगाचा आवाज ऐकून एकदम खडबडून जागे झाले आणि वर मान करून पाहत आवेशानें उद्गारले, "साप आला रे साप आला. ठेंचा याला अगोदर—"

जवळच डॉ. यशपाल उभे होते. पर्वतप्राय कौटुंबिक आपत्तींनीं वेडापिसा होऊन गेलेल्या त्या म्हाताऱ्याच्या कटु वाणीनें आगींत तेल ओतल्यासारखें होईल आणि आजच्या आणीबाणीच्या स्फोटक परिस्थितींत सर्वांनाच त्या आगींत होरपळून मरण्याची पाळी येईल, हा दुष्परिणाम ध्यानीं घेऊन डॉक्टरांनी म्हाताऱ्याला हातानें गप्प केलें व मंगलसिंग तुम्हांला हांक मारतो आहे असें खोटेंच सांगून त्यांना आपुलकीच्या बळजबरीनें आंत ओढीत नेलें.

"यांना सांभाळा कौसल्यादेवी!" कौसल्यादेवीच्या कानापाशीं तोंड नेऊन त्यांनीं तिला अगदीं मोजक्या शब्दांत सभोंवार उफाळत असलेल्या संकटाची जाणीव करून दिली. कौसल्यादेवी सर्व कांहीं जाणत होती. ती म्हाताऱ्याला कसेंही करून आंत बोलण्यांत गुंतवून ठेवायचाच अशा बेतानें नम्र वृत्तीनें त्याला रुचेल अशा भाषेत कांहीं तरी बोलूं लागली. ती कांहींतरीच बोलत होती. आपण काय बोलत आहों याचें तिचें तिलाच भान नव्हतें.

सुदैवानें अयोध्यानाथजीही शांतपणें बोलण्याइतके अथवा सुनेचें बोलणें शांतपणें ऐकून घेण्याइतके भानावर नव्हते. ऱ्याऐंशीं वर्षांचा म्हातारा, दुःसाध्य हृदयविकारानें गांजलेला. थोडासा शीण झाला तरी बेशुद्ध पडण्यापर्यंत त्याची मजल जाई. तो अर्धवट बेशुद्धींतच कौसल्यादेवी काय बोलते तें न ऐकूं येतां ऐकत होता व त्याचा अर्थ न उमजतां मधून मधून हुंकार देत होता.

अहि–नकुलासारखे तेजसिंग आणि बलभीमसिंग हे एकमेकांसमोर पविञ्यांत उभे राहून एकमेकांवर ज्वालाग्राही शब्दांच्या ठिणग्या पाडीत होते. मंगलसिंगला पकडण्यासाठीं आपण आलों आहों असें बलभीमसिंगनें सांगतांच तेजसिंग ताडकन् उत्तरला, "मंगलला मी तुम्हांला पकडूं देणार नाहीं. सुखानें मरण्याइतका देखील विसांवा तुम्ही त्याला मिळूं देणार नाहीं काय ?"

"माझ्या सरकारी कामांत असली ढवळाढवळ मला खपणार नाहीं, सरदारजी !" आपल्या कमरपट्ट्यांतील रिव्हॉल्व्हरकडे हात नेत बलभीमसिंग उद्गारला.

तेजसिंगनें मृत्यूचा उपहास करीत कृपाण म्यानांतून सरकन् बाहेर काढलें. पण तो हात बलभीमसिंगच्या रोखानें झेंपावण्यापूर्वींच जवळ उभा असलेल्या कॅप्टन पूरणसिंगनें वरच्यावर घट्ट पकडून विचारलें, "सरदारजी ! शुद्धीवर आहां तुम्ही ?"

तेवढ्यांत वेळ साधून बलभीससिंगनें तेजसिंगचा दुसरा हात घट्ट पकडला आणि डाव्या हातानें कमरपट्ट्यांतील शिटी काढून इषाऱ्यादाखल फुंकली.

शिकारी कुत्र्यांसारखे दरवाजाबाहेर उभे असलेले चार हत्यारी पोलीस आंत आले. त्यांनीं कॅप्टन पूरणसिंगच्या हुकुमानुसार तेजसिंगला तिथल्या तिथें कैद केलें. नरडी दाबून धरलेल्या नागासारखा तेजसिंग अगतिकतेमुळें क्रोधानें हिरवा पिवळा होऊन आंतल्या आंत तडफडत होता.

इतक्यांत याकूब बरोबर इस्पितळाची ॲम्ब्यूलन्स कार घेऊन आला.

"त्या गाडींतून ह्या कैद्याला हेडक्वार्टर्सकडे घेऊन जा." कॅप्टन पूरणसिंगनें शिपायांना हुकूम केला.

घरांतून खिडकीच्या झरोक्यांतून चार नेत्रांतून चार करुणज्योती प्रदीप्त झालेल्या तेजसिंगला मागें वळून पाहतांच आढळल्या. त्या ज्योती दाहक होत्या खऱ्या; पण तो दाह त्यांचा त्यांना जाळीत होता. शामकुंवर आणि कौसल्यादेवी यांच्या सर्वथा अगतिकतेची साक्ष तेजसिंगकडे वेधून राहिलेल्या त्यांच्या दुःखाश्रुमय करुण दृष्टीवरून पुरेपूर पटत होती.

" मंगल ! " असे उद्गारत तेजसिंगनें हत्यारी शिपायांबरोबर बाहेर जातां जातां कळवळून हांक मारून क्षणभर मागें वळून पाहिलें. चार हातांच्या अंतरावर असलेल्या मरणोन्मुख पुत्राचें अखेरचें दर्शनही आपणाला घेतां येत नाहीं हा दैवदुर्विलास पाहून तो मनांत उपहासानें स्वतःच हंसला. चार अश्रुबिंदू त्याच्या नेत्रांतून मंगलसिंगच्या आठवणीसरसे त्याच्या गालांवरून ओघळत खालीं जमिनीवर पडले.

समुद्रमंथनांतून निर्माण झालेलें त्रिभुवनदाही हलाहल श्रीशंकर जितक्या धैर्यानें प्याले असतील तितकें धैर्य आपल्या अंगीं होतें नव्हतें तेवढें कंठीं एकवटून त्यानें दुःखाचा कढ गिळला; आणि कोर्ट मार्शलच्या वेदीवर आपल्या पंचप्राणांचा बळी देण्याच्या तयारीनें तो हत्यारी शिपायांच्या पहाऱ्यांत बाहेर पडला.

तोंच डॉ. यशपाल पुढें येऊन रागानें म्हणाले, " ती आमच्या इस्पितळाची खाजगी अँब्यूलन्स कार आहे कॅप्टन ! रोग्याला इस्पितळांत नेण्यासाठीं मीं ती आणविली आहे. तुम्हांला ती अशी दंडेलीनें उपयोगांत आणतां येणार नाहीं. "

पण कॅप्टन पूरणसिंगनें हेटाळणीनें तिकडे पूर्ण दुर्लक्ष केलें.

" मी काय सांगितलें तें ऐकूं आलें नाहीं तुम्हाला कॅप्टन ? " डॉक्टरनीं चिडून विचारलें.

" तुम्हालाही कैद करण्यांत आलें आहे, डॉक्टर ! " बलभीमसिंग उजव्या हातानें डॉक्टरांचें मनगट घट्ट पकडीत म्हणाला.

" कां म्हणून ? " डॉक्टरनीं गर्जून विचारलें. त्यांना तो अपमान असह्य झाला. ते अमृतसरचे एक नामांकित व सधन व्यापारी असून प्रख्यात डॉक्टर होते. पण त्या नगराचा सारा नागरी मोठेपणा लष्करी अंमलाच्या राक्षसी पायाखालीं सर्रास तुडविला जात होता.

" आमच्या सरकारी कामांत तुम्ही अडथळा केला म्हणून. " बलभीमसिंगनें त्यांना कःपदार्थ लेखीत कुत्सित दृष्टीनें त्यांच्याकडे पाहात सांगितलें. आणि त्यांच्याच मोटारींतून त्यांना कॅप्टन पूरणसिंगनें कैद करून नेलें.

" शामकुंवर ! " बलभीमसिंगनें कठोर स्वरांत हांक मारली.

पण त्याला ओ मिळाली नाहीं.

" शामकुंवर ! " अशी पुन्हा वाढत्या कठोर स्वरांत हांक मारीत तो थेट आंत गेला.

" अखेर मंगलसिंग तर सांपडला— "

अयोध्यानाथजी एकदम पिसाटासारखें ' साप आला साप. ठेंचा याला ! ' असें कळवळून म्हणत त्याच्यावर वेगानें धांवून गेले. पण पतंगानें दिव्यावर झडप घालावी तशी त्यांची ती झेंप आत्मघातकी ठरली. बलभीमसिंगनें जोरानें एक ठोसा त्यांच्या छातीवर हाणला. त्यासरसे ते बेशुद्ध होऊन कोलमडून पडले.

" शिपाई ! " बलभीमसिंगनें हांक मारली. दोन हत्यारबंद शिपाई पुढें आले. त्यांना त्यानें म्हाताऱ्याला पकडून नेण्यासाठीं नुसत्या नजरेनें खुणावलें. आणि लगेच कौसल्यादेवीकडे त्याची विषारी नजर वळली.

" केदारनाथ कुठें आहे ? तुमचे दोन्ही मुलगे कुठें आहेत ? बऱ्या बोलानें त्यांचा ठावठिकाणा तुम्ही सांगाल तर जिवानिशीं बचावाल. " तो कौसल्यादेवीला म्हणाला.

" आजकालच्या या रौरव नरकांत जिवाची आशा कोण बाळगील ? " कौसल्यादेवीनें दुःखाचा कढ गिळीत धीरोदात्तपणें विचारलें.

" जिवाची नाहीं पण अब्रूची तरी आशा आहे ना ? " बलभीमसिंगनें तिच्याकडे आपली खुनशी नजर रोंखीत विचारलें.

" मात्रागमनी निमकहराम ! — " जगण्यामरण्याच्या सरहद्दीवर तिष्ठत पडलेल्या मंगलसिंगनें त्रिभुवन पेटूं लागेल इतक्या तीव्र संतापदाही दृष्टीनें त्याच्याकडे पाहत दोन्ही हाताच्या मुठी आंवळीत आवेशानें उद्‌गार काढले. त्याच्या छातीवरील जखमांतून रक्तस्रावाला त्या संतापाच्या आवेगासरशी जोराची भरती आली.

बलभीमसिंगचा हात त्याच्या कमरपट्टयांतील रिव्हॉल्व्हरकडे वळलेला पाहतांच कौसल्यादेवी चवताळलेल्या जखमी वाघिणीसारखी त्याच्यावर तुटून पडली. तिनें त्याचें मनगट पकडून त्याला कडकडून चावा घेण्या-

साठीं मान खालीं केली. पण तेवढ्यांत बलभीमसिंगनें तिला एक जोराची लाथ हाणली. त्यासरशीं ती मंगलसिंगच्या मरणोन्मुख देहावर कोलमडून पडली.

" शामकुंवर! तुलाही असला माथेफिरूपणा करायचा आहे काय ? " बलभीमसिंगनें रक्ताला चटावलेल्या लांडग्याच्या वृत्तीनें विचारलें.

शामकुंवरनें उसासे सोडीत डोळ्यांना पदर लावून मान बाजूला वळविली.

बलभीमसिंगच्या हुकमतीखालीं त्या दोघीही पोलिसांच्या हातीं बंदिवान झाल्या. पण बलभीमसिंगला त्यांत तितकेसें महत्त्व वाटलें नाहीं. त्याला खरी शिकार मंगलसिंगची साधायची होती व ती त्याला साधलीही होती.

पण !—बिचाऱ्याच्या यश पदरीं पडलें तें प्रेत पदरीं पडलें. लष्करी इस्पितळांत ओढून नेण्यासाठीं त्यानें मंगलसिंगचा देह गाडींत नेऊन टाकण्याकरितां पोलिसांकरवीं उचलविला, त्यापूर्वीच मंगलसिंगचे पंचप्राण तो देह सोडून गेले होते.

# ३

साऱ्या अमृतसर शहरभर जालियनवाला बागेंतील त्या कत्तलीपासून आज पांच दिवस क्रूर पशूंनाही लाजवितील असे लष्करी अंमलाचे भीषण अत्याचार रात्रंदिवस सुरू होते. त्या पेटत्या खाईंतून वाट काढीत हरकिसन बागेजवळच्या मंगलसिंगच्या घरापाशीं येऊन बावरल्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागला. त्याला पाहून त्या घरांतून एक लष्करी शिपाई बाहेर आला. तो त्याला दरडावून विचारूं लागला, " काय पाहिजे आहे तुला ? परवानगीखेरीज इथें तूं कां आलास ? "

स्मशानांत भुतें नाचावींत तसे लष्करी शिपाई चार दिवसांपासून मंगलसिंग आणि अयोध्यानाथ या दोघांच्याही घरांत जबरदस्तीनें ठाण मांडून बसले होते. तेथलीं आणखी अशींच सुखवस्तू नागरिकांचीं अनेक घरें, मोटारी, गाडीघोडे देखील अशींच लष्करी मगरानें गिळलीं होतीं. त्या घरांतले नागरीक कोणी तुरुंगांत डांबले गेले होते. कोणी आपले

जे आप्तेष्ट अजून घरादारांना नागवले गेले नव्हते त्यांच्या आसऱ्याला गेले होते; कांहीं जणू डोक्यावर आकाश फाटलें आहे आणि पायाखालीं धरणी दुभंगली आहे अशा दारुण आवर्तात सांपडून वाट फुटेल तिकडे परागंदा झाले होते. कांहीं तेवढेंही त्राण अंगीं नसल्यामुळें बेवारशी अनाथ कुत्र्यांसारखे अमृतसरच्या रस्त्यांतून अथवा गल्लीबोळाच्या वळचणींतून तोंड लपवून लाजिरवाणें जिणें कंठीत होते. साऱ्या अमृतसर शहराला अशी भीषण अवकळा आली होती.

हरकिसन आज अमृतसरला आला तोच मस्तकांत धगधगती पेटती आग घेऊन आला. सर्व बाजूंनीं कोसळलेल्या दुःखांत जिवाचा विरंगुळा व्हावा या आशेनें तो प्रयागहून काकाजींच्या अस्थींचें गंगेंत विसर्जन करून अमृतसरला आई, वडील व आजोबा यांना भेटायला येतांना प्रथम प्रभावतीच्या ओढीनें रायबरेलीला गेला. पण तिथें आपल्या संसाराचा उजाड मांडव झाल्याचें त्याला आढळून आलें. प्रभावती त्याला सासुरवाडीच्या घरांत भेटली नाहीं. तिचा कांहींच थांगपत्ता त्याला मिळाला नाहीं. त्याचा सासरा व्यापाराच्या कामासाठीं बाहेरगांवीं गेला होता. सासुरवाडच्या मंडळीनें त्याला ओळखलेंही नाहीं. उलट त्यांना वाटलें कीं, हा कोणीतरी हरकिसनचा तोतया प्रभावतीवर पापी दृष्टी ठेवून डाव साधण्यासाठीं आला आहे. प्रभावती दोन वर्षांपूर्वींच माहेर व सासर या उभय कुळांच्या तोंडाला काळें फासून बेपत्ता झाली होती म्हणून, अथवा तिचा पत्ता माहीत असला तरी तो ध्यानीं घेणें घराण्याच्या बेअब्रूला कारण होण्याजोगें होतें म्हणून, त्या मंडळीनें अधिक बोभाटा व्हायचा टाळला इतकेंच. एरव्हीं त्या मंडळीनें त्या 'तोतया' हरकिसनला पोलिसांच्या स्वाधीन करून तुरुंगांत पाठवायलाही कमी केलें नसतें. त्यांनीं त्याच्या तोंडावर तसा संशय घेतलाही. आपल्या मृत्यूची चुकीची वार्ता सव्वादोन वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत येऊन थडकली त्यामुळें उत्पन्न झालेला गैरसमज किती भयंकर आहे हें त्याला प्रथम मुंबईंत आल्यावेळीं रामप्यारीच्या उद्गारांवरून जाणवलें नाहीं, तितकें सासुरवाडीच्या मंडळींत जाणवलें.

आशा वेडी असते. 'हरकिसन लढाईवर मेला' या प्रामाणिक समजुतीनें प्रभावतीच्या माहेरची मंडळी आपणाला तिचा थांगपत्ताही लागूं देत

नाहींत असें त्याला वाटलें. त्यानें आपल्याजवळचा प्रभावतीचा फोटो दाखवून आपणच हरकिसन अशी त्या मंडळीची परोपरीनें खात्री पटवून दिली. तेव्हां त्यांची खात्री पटली कीं हरकिसन जिवंत आहे; पण तरी देखील कोणी तशी खात्री पटल्याचें दर्शविलें नाहीं. कारण मग प्रभावतीच्या बाबतींत आपल्या घराण्याची बेअब्रू आपणच चव्हाट्यावर मांडल्यासारखें होईल असें भय त्या मंडळीला ओघानेंच वाटलें.

ती आग मस्तकांत भडकलेली घेऊन हरकिसन आईवडिलांच्या ओढीनें अमृतसरला यायला निघाला, तों आपलें दुर्दैव आपला अधिक छळ करायला आपल्यापुढें धांवत असल्याचें त्याच्या अनुभवाला आलें. ऋणानुबंधानें त्याच्या हृदयांत सन्मानाचें पवित्र प्रीतिस्थान मंडित करणारी गोपीनाथची—त्याच्या जिवलग मित्राची तरुण विधवा बहीण शारदा त्या चार दोन दिवसांत गोरखपूरहून नाहींशी झाल्याचें त्याला कळलें. आणि वारेमाप वाहणारी लोकवार्ता त्याला ऐकूं आली ती अशी कीं, शारदा हरकिसनचा हात धरून घरांतून पळून गेली.

लज्जा, भीति, अपमान असले हे सहस्र सर्पदंश जिवाच्या आकांताला सहन करीत तो आपल्या आईवडिलांच्या मायेच्या पांखरछायेचा आसरा मिळविण्यासाठीं म्हणून अमृतसरला आला. पण तिथें येतांच प्रथम आपल्या घरीं जाण्याचें धैर्य मात्र त्याला झालें नाहीं. प्रभावती आणि शारदा या दोघींकारणें रहस्यमय गैरसमजाचा चक्रव्यूह त्याच्या सभोंवार उभारला गेला होता. या चक्रव्यूहांतून बाहेर पडायचा मार्ग त्याला सांपडत नव्हता. तो मार्ग शोधीत तो प्रथम मंगलसिंगच्या घराकडे म्हणून आला. पण युद्धकालांतील आर्थिक भरभराटींत त्या घराचा इतका वैभवशाली कायापालट झालेला त्याला माहीत नव्हता.

लढाईपूर्वी ज्यांनीं तें कवीश्वरांचें घर पाहिलें होतें त्यांना लढाईनंतर त्या घराचें टुमदार टोलेजंग हवेलींत रूपांतर झालेलें पाहून भांबावल्यासारखें होणें साहजिकच होतें. लढाईच्या पर्वकाळीं ज्या अनेक व्यापाऱ्यांचें व धंदेवाइकांचें भाग्य उदयाला आलें त्यापैकीं तेजसिंग कवीश्वर हा एक होता. लष्कराला हरतऱ्हेचा माल पुरविण्याचे मक्ते आपल्या नात-

लगाच्या नांवावर घेऊन तेजसिंगानें तीनचार वर्षांत खोऱ्यानें नफा उपसला होता, आणि आपल्या त्या जुन्या झोपडीवजा घराची आमूलाग्र डागडुजी करून त्याचा सुंदर टुमदार बंगला बनविला होता. शिवाय जवळच्या मुलतानपुरा खेड्यांत सोन्याच्या तुकड्यासारखी दहा बारा एकर सकस शेतवाडीही त्यानें खरेदी केली होती.

गेल्या चार वर्षांत कवीश्वरांच्या वैभवाची ही भरभराट झालेली पाहून कोणाही नवख्या माणसाला घटोत्कचाचा मायाबाजार पाहिल्यासारखें नवल वाटलें असतें.

हरकिसनही लष्करी शिपायाचा दरडावणीचा प्रश्न ऐकून अधिकच गोंधळल्यासारखा झाला. त्याला कांहींच बोलायला सुचेना.

हा कांहींच उत्तर देत नाहीं असें पाहून त्या लष्करी शिपायाचा संशय दुणावला. त्यानें एकदम आपल्या बंदुकीला हात घातला.

तेवढ्यांत जवळच्या गल्लींतून दोन्ही पायांना पट्टया बांधलेला एक शीख तरुण काठी टेंकीत पण घाईनें पावलें उचलीत पुढें आला आणि त्या लष्करी शिपायाला हात आवरण्याची खूण करीत म्हणाला, "मोटासिंग! हात आवर! लष्करांत गेलेल्या माणसानें माणुसकी सोडलीच पाहिजे असें नाहीं. आज आठ दिवस नगरभर तुमच्या अत्याचारांची आग भडकली आहे. ह्या आगींत होरपळून निघालेलीं अंतःकरणेंही तुम्हांला ओळखतां येत नाहींत काय? लष्करी कायदा झाला म्हणून भोळ्या भाबड्या, वेड्या पिश्या झालेल्या, भांबावलेल्या, अनोळखी वाटसरांचेही तुम्ही बळी घेत सुटणार?"

तो लष्करी सैनिक अमृतसरचाच रहिवासी होता. आपल्या एका मित्रानें केलेली ती कानउघाडणी ऐकून तो मनांतल्या मनांत ओशाळला.

"चला बाबूजी! चला माझ्याबरोबर. मला सांगा तुम्हाला काय पाहिजे तें. अनोळखी दिसतां तुम्ही. चला माझ्याबरोबर." त्या तरुणानें त्या भांबावलेल्या अनोळखी तरुणाचा हात आपल्या हातीं घेऊन पुढें जातां जातां म्हटलें.

गल्लींतून एक वळण घेऊन टोंकाच्या घरांत ते दोघे शिरले. आंत जातांच त्या तरुणानें बाहेरच्या दरवाजाला आंतून कडी लावून घेतली; आणि तो आपल्या सोबत्याला घेऊन घराचीं दोन दालनें ओलांडून समोरच्या जिन्यानें दुसऱ्या मजल्यावरील एका नीटनेटक्या खोलींत गेला.

" बसा. " जवळच्या एका खुर्चीकडे अंगुलीनिर्देश करीत तो तरुण आपल्या सोबत्याला म्हणाला. " हरकिसनबाबू ! तुम्ही मला ओळखलें नाहीं ? नुकतेंच गेल्या तारीख एक एप्रिल रोजीं आपण मुंबईत मंडळाच्या कचेरींत भेटलों होतों. आतां तरी पटली ओळख ? तुमच्यावर पोलिसांचा वहीम आहे, म्हणून मघाशीं मी तुम्हाला मुद्दाम ओळख दिली नाहीं. "

हरकिसननें कांहींही उत्तर न देतां मानेनें तीव्र नापसंती दर्शविली.

" तुमच्याबरोबरच माझेंही रक्त जालियनवाला बागेंत सांडलें आहे बाबूजी ! गांधीजींच्या नांवानें मीही माझ्या रक्ताचें अर्घ्य दिलें आहे. आतां प्रश्न एवढाच आहे कीं आम्ही ह्या रक्ताच्या शिंपण्यानें कोणतें शेत पिकवणार आहोंत ? कीं गांधीजींनीं सत्य–अहिंसेनें नांगरलेल्या या भारतभूमींत तुमच्या आमच्या रक्तावर विषवेलींचे मळेच बहरणार आहेत ? तुम्ही याचा विचार आतां तरी करणार नाहीं काय ? हरकिसनजी ! तुमचा सेनापति ऐन रणांगणावर तुम्हाला शत्रूच्या दाढेंत लोटून रणांगण सोडून निघून गेला आहे. " कहानसिंग उद्गारला व आपल्या उद्गाराचा हरकिसनच्या मनावर काय परिणाम होतो हें त्याच्या चेहऱ्यावर लक्षपूर्वक न्याहाळून पाहूं लागला.

जखमेवर मिठाचें पाणी शिंपडावें तशा प्रकारच्या त्या मर्मभेदक उद्गारांतील जालीम अर्थ तेव्हांच हरकिसनच्या ध्यानीं आला. महात्मा गांधींनीं दोन आठवड्यांपूर्वी घोषित केलेली सत्याग्रहाची चळवळ त्या चळवळीपायीं साऱ्या पंजाबांत आणि त्यांच्या आवडत्या गुजराथेंतही लोकक्षोभ अनावर भडकून दंगेधोपे व अत्याचार यांना ऊत आल्यामुळें ह्या हिंसावृत्तीवर उतारा म्हणून अकस्मात् तहकूब केली होती. त्याला अनुलक्षून कहानसिंगचे वाग्बाण सुटत होते. स्वतः हरकिसनलाही

महात्माजींच्या नेतृत्वांतील ह्या संगती–विसंगतीचा उलगडा झाला नव्हता. महात्माजीनीं जनतेचा ऐन वेळीं असा तेजोभंग करायला नको होता, असें त्यालाही वाटत होतें; परंतु महात्माजींच्या ठायींची त्याची अढळ श्रद्धा त्याला तसल्या प्रकारच्या मनांतील विकल्पापासून सावधपणें दूर ठेवीत होती.

त्याला कहानसिंगचे बोल रुचले नाहींत.

" हरकिसनजी ! तुम्हांला अजून मी सांगतों तें पटत नाहीं ना ? महात्माजींच्या आज्ञेवरून तुम्ही–त्यांच्या निष्ठावंत अनुयायांनीं प्राण पणाला लावून रणांगणावर तीन वर्षें जी खडतर तपश्चर्या केली त्या तपश्चर्येचीं हीं विषारी फळें चाखल्यावरदेखील तुमचे डोळे उघडत नाहींत काय ? आज तुमच्या आणि तुमच्या मित्राच्या–नव्हे ह्या अभागी अमृतसर नगरांतील हजारों नागरिकांच्या घरादाराची, धन-दौलतीची, मुलाबाळांची, साऱ्या कौटुंबिक जीवनाची होळी पेटलेली पाहून देखील तुमच्या डोक्यांत प्रकाश पडत नाहीं ना ?—"

मनांतली कालवाकालव असह्य होऊन हरकिसननें हृदय हादरल्या-सारखें मध्येंच विचारलें, " कुठें गेली आमची सारी मंडळी ? तुम्हाला माहीत आहे ? "

" तुमची मंडळी कांहीं यमवासाला गेली, कांहीं वनवासाला गेली आणि कांहीं बंदिवासांत दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडली. तुमच्या एकट्या-च्याच कुटुंबाची ही दैना नव्हे, तर त्या राक्षसाच्या—क्रूरकर्म्या जनरल डायरच्या अमानुष लष्करी जुलूम–जबरदस्तीपायीं या शूर लोकांच्या पंजाबांतील अनेक ठिकाणची जनता अगदीं त्राही भगवान होऊन गेली आहे. ह्या साऱ्या अनर्थाला जबाबदार कोण ? ऐन वादळांत खवळलेल्या समुद्रांत 'मी करीन ती पूर्व' अशा अत्याग्रहानें कर्णधारानें नौका हांकारली. वादळांत ती शीड फाटून भरकटत जाऊं लागली. आतां ती आवरतां आली नाहीं तर खडकावर आपटून फुटणार आणि तिच्यांतील प्रवाशांना जलसमाधि मिळणार हें भीषण भवितव्य डोळ्यापुढें उघड दिसतें आहे. अशा वेळीं कर्णधार त्या बुडत्या नौकेचें कर्णधारत्व सावध-

पणें करायचें सोडून नौका सोडून आपण किनाऱ्याला निघून गेला. काय म्हणावें या कर्णधाराला आपण ? कोणत्या सत्याचा आग्रह आमच्या प्रचीतीला यावा यांत ?..."

हरकिसनला त्या खोलींत आतां अगदीं श्वास कोंडल्यासारखें वाटूं लागलें. अंतःकरणांत खोल रुतलेलें शल्य जणूं हा गांधीनिंदक कहानसिंग आपल्या एकेका कठोर शब्दाच्या आघातानें चाळवून आपली हृदयव्यथा वाढवतो आहे असें त्याला वाटलें. त्यानें तिरस्कारपूर्वक निक्षून उत्तर दिलें, "गांधीजींच्या निंदेचा एक शब्ददेखील ऐकून घ्यायला मी तयार नाहीं. मी अहिंसेचा सत्याग्रही उपासक नसतों तर तुमच्यासारख्या बेफाट वृत्तीच्या माणसाला जगांत जिवंत राहूं दिलें नसतें." असें म्हणून त्यानें कहानसिंगचें अप्रिय मुखावलोकन टाळण्यासाठीं तिट्काऱ्यासरशीं मान बाजूला वळवली, व आपली बॅग उचलून बाहेर जाण्यासाठीं तो दरवाजाकडे वळला.

"कुठें चाललांत ?" कहानसिंगनें पुढें जाऊन कनवाळूपणानें हरकिसनचा हात हातीं घेत सौम्य स्वरांत त्याला विचारलें, "वाट चुकलेल्या भोळ्या तरुणा! कुठें जाणार तूं आतां ? सभोंवार पेटलेल्या खाईची तुला कल्पना आहे ? —"

"त्या खाईत सांपडून होरपळणाऱ्या माझ्या आईवडिलांना, आमच्या वृद्ध नानाजींना आधार देण्यासाठीं मी मृत्यूचे दांत मोजीत झालें तरी पुढें जाईन." असें सांगून तो कहानसिंगचा हात झिडकारीत खोलीचा दरवाजा उघडून तडक बाहेर पडला.

"माझें ऐका हरकिसनजी! पेटत्या दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगासारखा वेडेपणा करूं नका. तुम्हाला पकडून लष्करी कायद्याच्या वरवंट्याखालीं ठेंचून काढण्यासाठीं गुप्त पोलीस यमदूतासारखे टपून बसले आहेत. माझें ऐका.—"

हरकिसन तिकडे मुळींच लक्ष न देतां झपझप पावलें उचलीत जिना उतरून निघून गेला. समोर, सभोंवार, दाही दिशांना त्याला निबिड काळोख मुसमुसून राहिलेला भासत होता. कुठें जावें, काय करावें हें

कांहींच त्याला सुचत नव्हतें. शीड फाटलेली नौका झंझावात वाहून नेईल तिकडे वेगानें भरकटत चालली होती.

तो त्या शून्यवत् मनःस्थितींत त्या गल्लींतून मोठ्या रस्त्यावर येतो न येतो तोंच समोरून हत्यारबंद लष्करी शिपायांच्या पहाऱ्यांत प्रतिष्ठित नागरिकांची धिंड निघालेली त्याला आढळली. डॉ. यशपाल व आणखी अनेक प्रतिष्ठित सन्मान्य नागरिकांना कसायानें गुरें दावणीला बांधून कसाईखान्याकडे चालवावीं तसें त्या लष्करी शिपायांनीं त्या एकमेकांचे हात बेड्यांनीं अडकवून चालविलें होतें. केदारनाथही त्या अभागी कैद्यांच्या मालिकेंतून चालला होता. हरकिसननें त्याला पाहिलें. पण त्यानें हरकिसनला पाहिलें नाहीं.

" कुठें ? कुठें नेत आहेत हे राक्षस या मंडळींना ? " हरकिसननें मनोमन टाहो फोडीत स्वतःला विचारलें.

समोर रस्त्याच्या चौकांत जाहीरपणें नागरिकांना फटके मारण्याचा खांब उभारलेला त्याला दिसला. त्यावरून त्यानें काय ओळखायचें तें ओळखलें.

गल्लीच्या तोंडाशीं तीन चार लोक भयभीत चित्तानें तो देखावा पाहत भीतीनें थरथर कांपत उभे होते. ते आपसांत हळहळत होते, " बिचाऱ्यांना या नरपशूंनीं शेरवुड गल्लींतून बळजबरीनें पोटावर सरपटत चालायला लावून शेरवुडबाईच्या अपमानाचा सूड उगविला, तेवढ्यावर त्यांचें समाधान झालें नाहीं. आतां हे या साऱ्या सज्जनांना फटके मारून छळणार ! ..."

हरकिसनला तें ऐकून वाटलें, धरणीमाता दुभंग होऊन आपणाला पोटांत घेईल तर बरें.

तोंच मागाहून त्याला हांक ऐकूं आली.

" एऽ ! "

आपल्या मित्राची ती ओळखीची हांक ऐकून हरकिसननें अंकुरत्या आशेनें मागें वळून पाहत म्हटलें, " कोण ? "

मीर कासीमनें त्याला बोलूं नकोस असें हातानें खुणावीत मुकाट्यानें आपल्या मागोमाग यायला सुचविलें. हरकिसन चार पावलें पुढें येतांच त्यानें त्याच्या अगदीं जवळ जाऊन कानाशीं तोंड नेऊन एकवार गरुडासारखी आपली शोधक नजर सभोंवार फेंकीत हळूंच सांगितलें, " तूं मला माझें नांव घेऊन हांक मारायची नाहीं आणि मीही तुला तुझ्या नांवानें हांक मारणार नाहीं. मी पुढें जातों. रस्त्याच्या वळणावर मी वळलों कीं तूं माझ्या मागोमाग नीट नजर ठेवून ये. पोलिसांची गिधाडी नजर चुकवून आपणाला शहरापार व्हायचें आहे. "

" पण कुठें जायचें आपल्याला ? " हरकिसननें विचारलें. त्याला क्षणभर गोंधळल्यासारखें झालें.

" कांहीं विचारायचें नाहीं; कांहीं बोलायचें नाहीं. मुकाटपणें मी सांगितलें तसें करायचें. काय समजलास ? " असें आपलेपणानें त्याला दटावीत मीर कासीम पुढें चालूं लागला.

# ४

उजाडतें न उजाडतें तोंच त्या खेड्यांतले किसान खेडूत घेऊन याकूब काल सांगितल्याप्रमाणें अयोध्यानाथजींच्या झोंपडीपुढें येऊन हजर झाला.

म्हातारा झोंपडीच्या अंगणांत चारपायीवर एकटाच बसून विचार करीत होता. त्यानें त्या शेतकऱ्यांना घेऊन याकूब पुढें आलेला पाहतांच त्याला विचारलें, " जोहाराची तयारी करून मरणाला कवटाळायला आला आहां कां रे तुम्ही ? "

याकूबनें स्मितहास्यपूर्वक म्हाताऱ्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें व सांगितलें, " नानाजी ! सायंकाळच्या आंत आपला सारा गहूं कापून होईल. सारी उस्तवार आटोपून हा आपला अन्ननारायण आपल्या झोंपडींत सुरक्षितपणें शिगेला लागला कीं नंतर आम्ही डॉक्टरांच्या शेताकडे वळूं. त्यानंतर आम्ही आमच्या शेताची कापणी करूं. — " तो मागें वळून किसानांच्या जमावाला म्हणाला, " हं ! भाईनो ! चला. घ्या

देवाचें नांव. घ्या महात्मा गांधींचें नांव आणि किसान अन्नदाता ही तुमची बिरुदावली सार्थ करा. आपण अगोदर नानाजींच्या शेतचा गहूं झोंपडींत आणून सांठवायचा आणि मग बाकीच्या गोष्टी."

"अरे मूर्खांनो! नानाजीच्या मदतीला तुम्ही किसानांनीं धांवून येणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या मानेसभोंवार मृत्यूचा फांस आंवळणें आहे हें देखील तुम्हाला कसें रे कळत नाहीं! नानाजीला जो जो कोणी किसान मदत करील त्याला गोळी घालून ठार करण्यांत येईल अशी दवंडी तो बलभीमसिंग काल इथें तीनवार जाहीर करून गेला ती तुम्ही विसरलां काय?..."

याकूबनें तिकडे लक्ष न देतां शेतकऱ्यांना 'जा आपल्या कामाला लागा' असें डोळ्यानें खुणावलें. एकेक किसान पुढें येऊन म्हाताऱ्याला नमस्कार करून त्या अंगणांतून चिमुटभर धूळ आपल्या कपाळाला अबीर बुक्क्यासारखी फांसून शेताकडे वळला. म्हातारा तोल सुटल्यासारखा अद्वातद्वा बोलत होता. त्या किसानांवर जळफळत होता, त्यांना शिव्याशाप देत होता. पण ती सारी जळफळ, ते सारे शिव्याशाप देवाच्या पवित्र निर्माल्याप्रमाणें आदरानें मस्तकीं धारण करून किसान आपल्या कामाला लागत होते.

सारे किसान शेतांत जाऊन कामाला लागले. म्हाताऱ्याची कळवळ्याची बडबड सुरूच होती. साऱ्या किसानांच्या वतीनें एकटा याकूब काय तो आतां त्याच्या समोर उभा होता. त्याला म्हाताऱ्याचा आकतांळा स्वभाव माहीत होता. त्याच्याविषयीं त्याला अथवा त्याच्या शेतवाडींतील किंवा त्या खेड्यांतील इतर किसानांना फारसा आदर वाटेल अशांतली गोष्ट नव्हती. त्या खेड्यांत सोन्याचें पीक देणारी शेतवाडी जी अयोध्यानाथजींनीं व त्यांच्या मुलानें गेल्या तीन वर्षांत लढाईच्या काळांत संपादन केली होती, तिची कहाणी आयत्या वारुळांत साप घुसल्यासारखी कांहींशी उद्वेगजनकच होती. सरदार तेजसिंगच्या ओळखीनें तीन वर्षांपूर्वी अयोध्यानाथजींचें कुटुंब अमृतसर शहरांत आसऱ्याला आलें तेव्हां त्यांचें आजचें वैभव नव्हतें. गांठीला काय

हजार दोन हजार रुपायांची रोकड माया होती त्या पुंजीवर युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांनीं व्यापार, मक्तेदारी अशा नाना उचापती करून ती पंचवीस तीस हजार रुपये किंमतीची सोन्याचें पीक देणारी कसदार शेतवाडी तिथल्या किसानांपासून लागेल तसा कमीजास्त पैसा देऊन युक्तिप्रयुक्तीनें संपादन केली होती. तीन वर्षांपूर्वी संयुक्त प्रांतांतील चौरीचौरा गांवाहून परागंदा झाल्यासारख्या स्थितींत अमृतसरला आलेला साधा, सुखवस्तु, कष्टाळू किसान, लढाईच्या काळांत श्रीमंत होऊन आज त्या खेड्यांत एक साधारणसा तालेवार जमीनदार होऊन बसला होता.

याकूब म्हाताऱ्याची ती बडबड ऐकून कांहींशा खंवचटपणानें खरें तें बोलला, " नानाजी ! तुमच्यासाठीं हें करीत नाहीं; आमच्या कौसल्या माईसाठीं आणि आमच्यासाठीं मरायला तयार झालेल्या तुमच्या नातवां-साठीं करतों आहोंत. "

पूर्व दिवशींच लष्करी शिपायांच्या हातून अपमान व विटंबना सोसून जीव बचावून आलेल्या कौसल्यादेवीला अयोध्यानाथजींनीं अधिक विटंबना टाळण्यासाठीं गोरखपूरला पाठविलें, तेव्हां त्या माउलीनें डोळ्यांत अश्रू आणून याकूबला आणि मीर कासीमला सांगितलें होतें कीं, " माझा हरकिसन, माझा रामसिंग हे तुमचे पाठचे भाऊ आहेत. तुमच्यासाठीं ते मरणाच्या मोलानें आज धडपडत आहेत. आजची ही संकटाची वावटळ उद्यां थांबेल. त्यांचा वनवास संपेल. मग ते जेव्हां इथें तुम-च्यांत परत येतील, त्या वेळीं त्यांना डोकें टेकायला ही झोंपडी शाबूत राहूं दे. त्यांच्या शेतांतला अन्नाचा घांस त्यांच्या मुखीं लागूं दे. "

कौसल्यादेवीचे ते बोल याकूबच्या अंतःकरणावर वज्राक्षरांनीं कोरून राहिले होते. कौसल्यादेवी खरोखरच उदार मनाची, परोपकारी माऊली होती. तेथल्या साऱ्या किसानांना ती आपलीच आईशी वाटे. याकूब तर तिला आपली जन्मदाती आईच मानी. त्याला जन्म देणारी आई वर्षा-पूर्वी हा लोक सोडून गेली तेव्हां अखेरचा श्वास सोडतांना तिनें आपल्या याकूबचा हात कौसल्यादेवीच्या हातीं देऊन आई म्हणून त्याचा प्रतिपाळ करायला विनविलें होतें. कौसल्यादेवीनेंही तिला तसें वचन दिलें होतें.

त्या कौसल्यादेवीसाठीं—त्या आपल्या आईसाठीं याकूब आपल्या पंच-प्राणांची कुरवंडी करायलाही कमी करता ना. म्हाताऱ्याशीं बोलतां बोलतां तें कालचें चित्र त्याच्या अंतश्चक्षूंपुढें उभें राहिलें. त्या आठवणीसरसें त्यानें काल त्या अंगणांत ज्या जागीं उभी राहून कौसल्यादेवीनें त्यांचा निरोप घेतला होता तिथें जाऊन तिथली त्या माऊलीची पवित्र चरणधूळ आपल्या मस्तकाला लावली.

"राम लक्ष्मण वनवासाला गेले आहेत नानाजी ! त्यांच्या जागीं मी कौसल्यादेवीचा पुत्र भरत आज सेवेसाठीं उभा आहे. हा भरत राम-लक्ष्मण या बंधूंच्या सेवेसाठीं जगतो आहे." तो कौसल्यादेवीला स्मरून दोन्ही हातांनीं नमस्कार करीत उद्‌गारला.

"अरे मग तूं एवढा रामाचा कैवारी भरत जर आहेस तर रामाची सीता रावण लंकेंत पळवून घेऊन गेला तिला कां नाहीं सोडवून आणलीस ?" म्हाताऱ्यानें उत्तेजित स्वरांत विचारलें.

म्हातारा तोल सोडून बोलतो आहे असें मनांत म्हणून याकूबनें तें ऐकलें न ऐकलेंसें केलें. दोन वर्षांपूर्वीपासून प्रभावतीचा पत्ता नव्हता. चौरीचौरा येथील रायसाहेब कैलासनाथ पालीवाल या त्यांच्या जमीन-दारानें आपल्या हस्तकांमार्फत तिला पळवून नेलें होतें. पण तो काय करणार त्याला ? ती वार्ता कानीं आल्यापासून गेल्या दोन वर्षांत त्या मंडळीनें तिचें नांवच टाकलें होतें. गांधीजींना कळकळीनें देशभक्तीच्या भरांत लष्करभरतीच्या कामीं मनापासून सहाय्य करणारा अयोध्या प्रांतांतील पहिला जमीनदार हाच रायसाहेब कैलासनाथ पालीवाल. गांधीजींच्या चंपारण्याच्या लढ्यांत माखनलालजी आणि कौसल्यादेवी यांना उत्साहानें भाग घेण्याचें ठरविलें त्याला देखील रायसाहेबांची पूर्ण सहानुभूती होती. इतकेंच काय पण माखनलालजी आणि कौसल्यादेवी यांनीं चंपारण्याच्या आघाडीवर जाण्यासाठीं निरोप देतांना रायसाहेबांनीं चौरीचौरा गांवीं टोले-जंग सत्कार समारंभ घडवून आणला होता व स्वतः आपल्या हातांनीं त्या दोघांनाही पुष्पहार घातले होते. हरकिसनचाही लढाईवर जातांना इतर आपल्या जमीनदारींतील लष्करांत भरती होणाऱ्या शिपायांबरोबरच

चौरीचौरा गांवीं रायसाहेबांच्याच प्रोत्साहनानें सत्कारसमारंभ घडवून आणण्यांत आला होता. तो त्या लढाईवर जाणाऱ्या सैनिकांचा गौरव म्हणजे महात्माजींच्या लष्करभरतीच्या प्रचाराचा गौरव आहे कीं संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरला आपल्या राजनिष्ठेच्या प्रदर्शनानें प्रसन्न करून रायसाहेबांनीं त्याला हा पुढें मागें रायबहादूर ही पदवी मिळविण्यासाठीं विसार दिला आहे, याविषयीं हरकिसनला मात्र तेव्हां जबर शंका आली होती. नुसती तशी शंकाच आली, तशी पूर्ण खात्री मात्र वाटली नाहीं, याचें कारण महात्मा गांधींच्या जयजयकारांत महात्माजींचे निष्ठावंत अनुयायी या नात्यानें रायसाहेबांनीं भारतमातेच्या उद्धारासाठीं हें पवित्र व्रत पत्करलें होतें. महात्माजींच्या अशा अनुयायांच्या हेतूविषयीं शंका घेणें हें हरकिसनला तेव्हां आणि आतांही महत्पाप वाटे. तरीही हरकिसन देखील रायसाहेबांच्या जमीनदारी अंमलांत पोळून निघालेला किसान तरुण होता. तो त्या जमीनदाराच्या अंमलाला अगदीं विटला होता. इतका कीं लढाईवर जातांना व लढाईवरून आल्यानंतरही त्या जमीनदाराचें मुखावलोकन करणें नको या भावनेनें तो पंजाबांत कायमचें घर आणि शेतवाडी करण्याच्या विचारांत होता.

अयोध्यानाथजींचें मन मात्र त्या जमीनदाराच्या बाबतींत तरवारीच्या धारेपेक्षां तिखट व काळ्या पाषाणाहून कठीण बनलें होतें. सत्तावन सालच्या बंडांतील कटु अनुभवाच्या दुःखाची जखम अयोध्यानाथजींच्या मनांत तेव्हांपासून सतत काळपुळीसारखी व्यथा देत होती. अयोध्यानाथजी त्या वेळीं इंग्रजांच्या बाजूनें लढले ते तरी तेव्हांचा त्यांचा जमीनदार रायसाहेब कैलासनाथचा आजोबा भोलानाथ पालीवाल यानें आंतून इंग्रजांना फितूर होऊन आपल्या किसान सैनिकांना इंग्रजांच्या दाढेशीं दिलें म्हणून.

अयोध्यानाथजींना अशा या आपल्या जमीनदाराकडून आपल्या नातसुनेचें अपहरण झालें यांत कांहीं नवल वाटलें नाहीं. त्यांनीं त्या बाबतींत आपल्या सनातनी मतांना अनुसरून प्रभावतीलाच अपराधी ठरविलें होतें; आणि म्हणूनच हरकिसन लढाईवर मरण पावल्याची कानीं

आलेली वार्ता लगेच थोड्या दिवसांनीं खोटी ठरली तरीदेखील प्रभावती एकदां वाटेच्या आडवाटेला गेली तेव्हांच आपणाला मेली या भावनेनें त्यांनीं तिचें नांव सोडलें होतें. त्यांनीं आतां तिचा विषय काढला तो तिचा कैवार घेण्यासाठीं म्हणून नव्हे, तर याकूब आपल्या हरकिसन-सारखाच तेव्हांचा गांधीवेडा तरुण म्हणून त्याचीं बोटें त्याच्या डोळ्यांत घालण्यासाठीं त्यांनीं त्याला मुद्दाम डिंवचलें.

याकूबला तें आवडलें नाहीं. पण म्हाताऱ्याचा मान राखण्यासाठीं तो उलटून कांहीं बोलला नाहीं. त्याला टाळण्यासाठीं तो मुकाट्यानें किसान नुकतीच कापणी करूं लागलेल्या गव्हाच्या शेताकडे वळला.

पण तो दहा पांच पावलें पुढें जातो न जातो तोंच मीर कासीम समोरून येतांना त्याला भेटला. त्याला पाहून तो जागच्या जागीं थबकला.

" पोलिसांची धाड आपल्या खेड्यावर येते आहे." मीर कासीम त्याच्याजवळ येऊन म्हणाला.

" कशासाठीं म्हणून?" याकूबनें भुंवया चढवून कपाळाला आंठ्या घालीत कांहींशा चिंताक्रांत स्वरांत विचारलें.

" आपल्या गांवच्या शेतकऱ्यांवर त्यांचा दांत आहे. वहिमी लोकांना आपल्या खेड्यांत आसरा मिळतो असें त्यांना कुणी सांगितलें आहे."

" असल्या खोडसाळ बातम्या त्या नीच चांडाळ बलभीमसिंगखेरीज दुसरा कोण उठवणार?" संतापून आकाशाकडे पाहत याकूब उद्गारला, " असल्या देशद्रोही बदमाषांना या जगांतून प्रथम नाहींसें केलें पाहिजे. तें कांहीं नाहीं. मी फांशीं गेलों तरी बेहत्तर, पण ह्या एका सैतानाचा बळी एवढें तरी माझ्या मरणाचें मोल मी मिळवीन."

हा भीषण निर्धार ताबडतोब अंमलांत आणण्यासाठींच आपण केला आहे असें त्यानें न सांगतांच कुणीही तेव्हांचा त्याचा तो रुद्रावतार पाहून ओळखलें असतें.

मीर कासीम याकूबला जरा आडोशाला एका झाडाखालीं बोलावून नेत म्हणाला, " म्हाताऱ्याचें डोकें अजून ठिकाणावर आहे?"

" आहे तेंच आहे. " याकूब मागें वळून अयोध्यानाथजींच्या झोपडीकडे पाहत उत्तरला.

" नगरांतील कालची वार्ता त्याला कळली ? "

" आणखी कोणती नवी वार्ता कळायची आहे ? "

" केदारनाथजींच्या छळाची बातमी त्यांच्या कानीं आली नाहीं ना ? "

" नाहीं. कां ? काय झालें ? " याकूबनें विस्मयचकित होऊन विचारलें, " केदारनाथजी कौसल्यादेवींना घेऊन अयोध्याप्रांतीं गेले ना ? "

" नाहीं. जातां जातां ते आफतींत सांपडले. कौसल्यादेवी कशाबशा त्या लष्करी लांडग्याच्या तावडींतून बचावल्या. पण केदारनाथजी बचावूं शकले नाहींत. "

" कां ? काय झालें ? "

" नगरांतील मानवंत प्रतिष्ठित नागरिकांच्या नशीबीं आजकाल रोज जी विटंबना येते आहे ती त्यांच्या नशीबीं आली. सुक्याबरोबर ओलेंही जळलें. शेरवुड गल्लींतून इतर अनेक डॉक्टर, वकील, व्यापारी, सावकार अशा प्रतिष्ठित नागरिकांबरोबर काल त्यांनाही पोटावर सरपटत चालण्याची कठोर शिक्षा भोगावी लागली. "

" बदमाष ! उपकारकर्ता कोण आणि अपराधी कोण हेंही ह्या गोऱ्या कातडीच्या पिसाळलेल्या माकडांना कळूं नये काय ? केदारनाथजींनीं जीव धोक्यांत घालून त्या गल्लींत त्या दिवशीं शेरवुडबाईवर खवळून तुटून पडलेल्या जमावांत घुसून त्याची पांगापांग केली नसती तर बाईच्या अब्रूची खिरापत तिच्या शरीराच्या खांडोळ्यांबरोबर त्या गल्लीभर खवळलेल्या लोकांच्या पायदळीं तुडवली गेली असती. केदारनाथजी होते म्हणून बाई जिवानिशीं बचावली तरी. त्या उपकारांचें हें फळ काय ? "

" तेवढ्यावर देखील निभावलें नाहीं. त्यांनीं आपली खरी बाजू सांगतांना या लष्करी अत्याचाराचा निषेध केला, त्या अपराधाबद्दल त्यांना रस्त्यावरच्या भर चौकांत पन्नास फटक्यांची अमानुष शिक्षाही भोगावी लागली—"

" गोऱ्या कातडीच्या राक्षसांना बचावण्याच्या पातकाबद्दल एवढें घोर प्रायश्चित्त भोगावें लागतें हें आम्हांला आज कळलें. भविष्यकाळ ह्या जुलुमाचा सूड उगवण्यासाठीं वाट चालतो आहे. बरें, केदारनाथजींची पुढें काय गत झाली? ते आपल्या देशीं तर गेले नाहींत म्हणतोस. आणि कालपासून इकडेही माघारा आलेले आढळले नाहींत. त्यांचा पत्ता—"

" परलोकीं. " मीर कासीम विषण्ण चित्तानें उसासा सोडीत उद्गारला, " पाठीवर फटक्याचे मरणघावासारखे तडाखे बसत असतांनाही ते जुलमी इंग्रजी राजवटीचा एकसारखा तारस्वरानें निषेध करीत होते. त्या अपराधाबद्दल त्यांना तिथल्या तिथें गोळी घालून ठार करण्यांत आलें."

" कुणाला गोळी घालून ठार करण्यांत आलें? माझ्या केदारला?" म्हाताऱ्यानें मागाहून येतां येतां विचारलें. त्या दोघा भावांचें संभाषण त्यानें झोंपडीकडून इकडे येतांना ओझरतें ऐकलें होतें.

दोघेही म्हाताऱ्याचा तो प्रश्न ऐकून चपापल्यासारखे एकमेकांच्या तोंडाकडे टकटक पाहूं लागले.

" केदारलाच गोळी घालून ठार मारलें ना? आतां बोला–महात्मा गांधी की जय!" म्हातारा भकास नजरेनें आकाशाकडे पाहत आव्हान-पूर्वक दोन्ही हात वर करून फुटलेल्या नौबतीसारख्या भकास घोगऱ्या स्वरांत ओरडला, " हरकिसन! कपाळकरंट्या पोरा! तूं जर अजून पृथ्वीच्या पाठीवर जिवंत असलास तर तुझ्या जन्मदात्या बापाचा, तुझ्या चुलत्यासारखाच गांधीच्या नांवानें बळी पडला हें ध्यानीं आण; आणि—बोलो महात्मा गांधी की जय! महात्मा गांधी की जय! महात्मा गांधी की जय!—माझ्या भारतमातेच्या भाग्याला चूड ज्यानें लावली—बोलो महात्मा गांधी की जय! ......"

म्हातारा थाड थाड कपाळावर हात मारून घेत लोहाराचा भाता फुंकल्यासारखे दीर्घ उसासे सोडीत मटकन् खालीं बसला.

" कुठें आहे हरकिसन? गांधीच्या नांवानें पिसाळून माणसांतून उठलेला तो दळभद्रा कार्टा कुठें आहे? बापाबरोबर तोही गांधीचें नांव घेत मेला नाहीं अजून? जिवंत आहे?"

जो विषय म्हाताऱ्यापासून लपवून ठेवण्याचें मीर कासीमनें मनांत योजिलें होतें, तोच प्रश्न नेमका म्हाताऱ्यानें विचारला. पण मीर कासीमनें पुन्हा बळेंच तोंडाला कुलूप घातलें. हरकिसन त्याच्या त्या साता जन्मांच्या दावेदारांच्या हातीं अचानक पकडला जावा आणि तो केवळ खोट्यानाट्या लाजिरवाण्या बनावट गुन्ह्याबद्दल याचें त्याला पराकाष्ठेचें दुःख होत होतें. इतर कोणी बिनमाहितगार कांहींही म्हणो पण मीर कासीमला चक्षुर्वै सत्यं माहीत होतें कीं, त्यानें मुळींच मित्रद्रोह केलेला नाहीं. एका ताटांत जेवणारे व एका देहानें श्वासोच्छ्वास करणारे जिव्हाळ्याचे मित्र ते. असें असतां गोपीनाथलाही आपल्या मित्रानें आपल्या पत्नीशीं अनीतिकारक संबंध ठेवल्याचा संशय यावा हा किती विचित्र दैवदुर्विलास ! पोलिसांकडे गोपीनाथनें रामप्यारीला कुमार्गाला लावल्याबद्दल फिर्याद करावी आणि पो. स. इ. माताप्रसादसारख्या सैतानानें ती फिर्याद खरी असल्याच्या चोराच्या उलट्या बोंबा माराव्यात हा प्रकार पाहून मीर कासीमच्या तळ-पायाची आग मस्तकाला जाऊन झोंबली होती. माताप्रसादला रामप्यारी-सह मोटारींतून त्या दिवशीं सहलीला जातांना त्यानें स्वतः हरकिसनच्या खोलीकडे जिना चढून जातेवेळीं पाहिलें होतें व पोलिसी अधिकाराच्या जोरा-वर मुंबईसारख्या दूरच्या शहरांत येऊन असले बेशरमपणाचे चाळे चाल-विल्याबद्दल मनांत त्याला शिव्याही हांसडल्या होत्या. मुंबईपासून पेशावर—कलकत्तापावेतोंच्या टापूंत सुंदर उपवर तरुणींना फसवून त्यांचा असा अनीतिमय व्यापार करणाऱ्या समाजकंटकांची एक टोळी असून माता-प्रसाद व बलभीमसिंग हे त्या टोळीचे साथीदार आहेत हें अमंगल सत्य लढाईवरून परत आल्यापासून गेल्या पंधरा वीस दिवसांत सूर्यचंद्रांइतक्या स्पष्टपणानें त्याच्या निदर्शनाला आलें होतें.

आणि हें त्रिवार सत्य असतांना तोच माताप्रसाद त्या गुन्ह्यापायीं हरकिसनला पोलीस अधिकारी म्हणून पकडायला येतो, व बलभीमसिंग अमृतसरचा पोलीस अधिकारी या नात्यानें त्या गुन्हेगारीचा शोध लावण्यासाठीं निरपराधी हरकिसनला गुन्हेगार म्हणून पकडून त्याच्या स्वाधीन करतो !

जगाचा हा उरफाटा न्याय पाहून मीर कासीमचें डोकें कालपासून अगदीं भणाणून गेलें होतें. पण तो विषय आतां इथें काढून आधींच परमावधीच्या दुःखानें वेडापिसा झालेल्या त्या म्हाताऱ्याच्या मनस्तापाच्या आगींत तेल ओतणें शहाणपणाचें नाहीं म्हणून तो गप्प राहिला.

## ५

"काय रे ? हरकिसन आला नाहीं अजून ? कीं दिल्लीच्या गोळीबारांत चुलत्याबरोबरच गांधीच्या नांवानें गोळी खाऊन मेला ?" म्हाताऱ्यानें एकदम भानावर आल्यासारखें करून विचारलें.

"हरकिसन अजून आला नाहीं नानाजी !" पेटती आग अधिक भडकूं नये म्हणून मीर कासीमनें तिच्यावर माती टाकण्याची चतुराई केली.

"आणि कौसल्या ? ती तरी जिवंत आहे का ?" म्हाताऱ्यानें वेड्यासारखे डोळे गरगर फिरवीत विचारलें.

"कौसल्यादेवींना नानकनाला सुखरूप पाठविण्याची व्यवस्था कालच झाली आहे." मीर कासीम उत्तरला.

लढाईवरून परत आल्याच्या पहिल्याच दिवशीं मुंबईत ओळख झालेल्या 'गदर' पक्षाच्या दोघां शीख तरुणांपैकीं पूरणसिंगची आणि त्याची काल अमृतसरच्या सुवर्णमंदिरांत अचानक गांठ पडली. नानकनाचा महंत हा पूरणसिंगाचा गुरु. तो महंत कांहीं दिवसांपूर्वी तिथल्या सुवर्णमंदिरांत येऊन राहिला होता. सारें अमृतसर नगर लष्करी कायद्याच्या जुलमाखालीं भरडलें जात असतां या महंताला तेवढी त्या कशाचीही भीति नव्हती. कोणताही सरकारी अधिकारी, पोलीस किंवा लष्करदेखील त्याच्या वाटेला जात नव्हतें. मीर कासीमनें कौसल्या-देवी आणि शामकुंवर यांना सुरक्षितपणें अमृतसरबाहेर काढून देण्याची कामगिरी पूरणसिंगला सांगितली. तेव्हां पूरणसिंगनें ती आपल्या गुरूच्या आधारावरच निःशंकपणें पत्करली.

त्या महंतानेंही आपल्या शिष्याच्या शब्दाला मान देऊन आनंदानें त्या दोन स्त्रियांना आसरा देण्याचें कबूल केलें. आणि पूरणसिंगबरोबरच

त्याच दिवशीं त्या दोघींना नानकानाला पाठविलें. लष्करी शिपाई वहिमानें त्या दोघींना पकडण्यासाठीं सुवर्णमंदिरांत यायला चुकले नव्हते. पण महंतानें जेव्हां हीं माझीं माणसें आहेत असें निर्भयपणें सांगितलें तेव्हां ते निमूटपणें माघारीं गेले होते.

आपला गुरु जितका लोकमान्य तितकाच राजमान्यही आहे हा पूरण-सिंगचा त्या महंतावरील विश्वास या निमित्तानें अधिक दृढ झाला होता.

"कौसल्या झाली तरी गांधीजीचीच भक्त! पण ती अजून बळी पडली नाहीं याचा अर्थ ती भक्तीच्या कसोटीला उतरायच्या योग्यतेची अजून झाली नाहीं. पण आज ना उद्यां होईल. ही आग आज ना उद्यां साऱ्या देशभर भडकेल. त्यांत गांधीवेडा देश जळून खाक होईल तेव्हां तीही जळून खाक होईल." बोलण्याचें अंगीं त्राण नव्हतें तरी तेल संपलेल्या समईतील कोरडी वात सारून पेटत ठेवावी तसे अंगीं होतें नव्हतें तेवढें त्राण बळेंच जिव्हेंत ओढून आणीत म्हातारा ओढत्या स्वरांत अडखळत उद्गारला व तसाच जमिनीवर अंग टाकून धांपा टाकूं लागला.

मीर कासीम इतकें बोलत होता तरी त्याचा जीव पोलीस तुकडी त्या खेड्यावर चालून येणार आणि खेड्यांतील वहिमी किसानांचा छळ मांडणार ह्या काळजीनें टांगणीला लागलेला होता. प्रतिकारक्षमता कोणत्याही प्रकारें आपल्या खेडुतांच्या ठायीं नाहीं, व पोलिसांची टोळधाड खेड्यावर तुटून पडली कीं, ते उभ्या खेड्याची वाताहात करणार, हें अगदीं नजीकचें मरण त्याला डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत होतें. असें असतांही उघड्या डोळ्यांनीं मरण येत नाहीं म्हणतात तसा तो सभय कातर दृष्टीनें मिनिटामिनिटाला ते यमदूत आले का या भीतीनें दचकून तिकडे वळून पाहत होता. तोंच त्याला दुरून तें मूर्तिमंत संकट चालून येतांना आढळलें.

" पोलीस आले. आतां तरणोपाय नाहीं. आतां कसायाच्या सुरीखालीं मुकाट्यानें मान द्यायची. दुसरें काय करायचें ? " मीर कासीम याकूबच्या कानाशीं तोंड नेत हळूच म्हणाला.

पण म्हाताऱ्याची श्रवणशक्ति भर ज्वानींतल्यासारखी अजून तीक्ष्ण होती. ते शब्द ऐकून तो सर्पाच्या शेंपटीवर पाय पडल्यासारखा ताडकन् उठून उभा राहत विचारूं लागला, "पोलीस आले ! कशाला आले पोलीस ? मला मारायला ? कीं तुम्हाला मारायला ? कशाला आले हे लांडगे आम्हां मेंढरांच्या कळपांत ?" तो कांहींशा अंतर्मुख दृष्टीनें आत्म-संशोधन करीत असल्यासारखा स्तब्ध होता. अंमळशानें तो वर मान करून समोरून येणाऱ्या पोलिसांच्या तुकडीकडे पाहत खदखदां हंसला.

याकूबला तो विचित्र प्रकार पाहून विस्मयाचा धक्का बसला. गोंध-ळलेल्या वृत्तीनें त्यानें म्हाताऱ्याकडे पाहिलें.

"पोलीस आले ! कशाला आले पोलीस ? शेंदाड शिपायांसारखे मेलेल्यांना मारायला ? आम्ही आधींच मेलों आहोंत. गांधीच्या सत्य-अहिंसेच्या शस्त्रांपेक्षां अधिक तीक्ष्ण, अधिक विषारी, अधिक भयानक अशीं शस्त्रास्त्रें म्हणावें मूर्खांनो तुमच्यापाशीं आहेत का ?" तो पुन्हा खदखदां हंसत सभोंवार गरगर नजर फिरवून पाहत म्हणाला, "पोलीस आले. कशाला आले पोलीस ?"

तेवढ्यांत पोलिस तुकडी म्हाताऱ्याच्या झोंपडीपाशीं येऊन पोहोंचली. बलभीमसिंग काडतुसें भरलेलें रिव्हॉल्व्हर घेऊन वखवखलेल्या चित्त्या-सारखा कावेबाज क्रूर नजरेनें सभोंवार पाहूं लागला. त्याला पूर्वी दोन वेळां हरकिसनच्या पाठलागावर तिथें आल्यावेळीं ती झोंपडी, ती शेतवाडी आणि तिथले शेतकरी खेडूत यांची पूर्ण ओळख झाली होती. अयोध्यानाथजींच्या शेताची शेतकऱ्यांनीं कापणी चालविल्याचें तिथून स्पष्ट दिसत होतें. तो त्या रोखानें तीरासारखा पुढें चालून गेला. हत्यार-बंद पोलीस त्याच्या मागोमाग शिस्तींत चालले होते.

"आतां यांतून आपला तरणोपाय नाहीं." मीर कासीम याकूबकडे पाहून हळहळत उद्गारला.

"तरणोपाय नाहीं !" असें निर्दयपणानें आपलें अंतःकरण आपणच आवेशानें पिरगळीत ओंठावर ओंठ दाबीत उद्गारत याकूब तीरासारखा बलभीमसिंगच्या रोखानें वेगानें चालला.

पेटत्या होमकुंडांत उडी घालून अजाणपणें स्वतःला जाळून घेणाऱ्या पतंगासारखा अविचार आपला आततायी भाऊ करतो आहे हें पाहून मीर कासीमच्या हृदयाला वज्राघातासारखे हादरे बसूं लागले. त्यानें उजवा हात वर करून याकूबला मागें फिरण्यासाठीं खुणावीत हांक मारली, " याकूब ! मागें फीर. अगोदर मागें फीर. "

पण याकूब तिकडे मुळींच लक्ष न देतां तसाच तीरासारखा सूं सूं करीत पुढें चालला.

मीर कासीमनें धांवत जाऊन त्याला गाठीत पुन्हा मोठ्यानें हांक मारून सांगितलें, " याकूब! मागें फीर. अगोदर मागें फीर. "

तरीही याकूब मागें फिरेना. पण मीर कासीमनें तेवढ्यांत त्याला गांठलें आणि त्याचे दोन्ही हात घट्ट पकडून त्याला डांबून धरलें.

" शेतांतून एकदम सारे बाहेर पडा. नाहींपेक्षां तुम्हाला गोळ्या घालून ठार करण्यांत येईल. " असें बलभीमसिंगनें शेताची कापणी करणाऱ्या किसानांना निर्वाणीच्या शब्दांत दरडावून सांगितलें व आपल्या शिपायांना गोळीबारासाठीं सज्ज राहण्याचा हुकूम दिला.

ते शब्द कानीं पडतांच याकूब सहस्र नागार्जुनांचें बळ बाहूंत संचरल्या-सारखा जोराचा हिसडा देऊन मीर कासीमला मागें लोटून एकदम पुढें झाला. त्या धक्क्यासरसा मीर कासीम बेसावधपणानें दगडधोंड्यांत कोलमडून पडायचा, पण तेवढयांत अयोध्यानाथजी पूर्वीसारखेच उन्मत्ताप्रमाणें बडबडत पुढें आले. त्यांनीं त्याला सांवरलें. त्यामुळें तो बचावला.

" अरे वेड्यांनो ! भावाभावांनीं पोलिसांशीं लढायचें कीं भावानें भावाशीं लढायचें ? गांधीनें तुम्हाला हीच यादवी शिकवली वाटतें ?... "

तोंच शेतांतून मेघगर्जनेसारखा जयघोष वातावरणांत दुमदुमला, " महात्मा गांधी की जय ! "

बलभीमसिंगचा हुकूम होतांक्षणीं गोळ्या झाडण्यासाठीं पोलिसांनीं बंदुका रोखल्या. तेव्हां छातीवर त्या गोळ्या झेलण्यासाठीं निर्भयपणें समोर ताठ उभे ठाकलेल्या किसानांपैकीं गोळीबाराच्या पहिल्या फैरीसरसे बरेच

किसान जखमी होऊन शेतांत कोसळून पडले. बाकीचे जीव बचावण्यासाठीं सैरावैरा पळत सुटले. बलभीमसिंग त्या प्राणभयानें पळणाऱ्या किसानांचीही शिकार करायला हपापलेला होता. पण तेवढ्यांत याकूबनें मागाहून त्याच्यावर चित्त्यासारखी झडप घालून त्याला खालीं पाडलें आणि त्याच्या हातांतील रिव्हॉल्व्हर हिसकून घेऊन त्याच्या नरडीवर नेम धरून एक, दोन, तीन गोळ्या झाडल्या. डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या वेळांत एक नरबली घेऊन तो त्याच्या छाताडावर पाय देऊन रिव्हॉल्व्हर रोखीत पोलिसांना गर्जून म्हणाला, " खबरदार ! तुमच्याच रक्तामांसाचे हे किसान तुमचे भाईबंद आहेत. तुम्ही शूर वीर असाल, नुसते खाटिकखान्यांतले कसाई नसाल, तर मुकाट्यानें मागें फिरा आणि आपल्या वाटेला लागा. नाहींपेक्षां तुमचे मुडदे—" त्याच्या तोंडचा अखेरचा शब्द हवेंत उमटण्यापूर्वीच एका पोलिसाच्या बंदुकींतून सुटलेल्या गोळीनें त्याला जखमी करून खालीं लोळविलें.

मीर कासीम कळवळून भावाच्या रक्षणासाठीं धांवून आला. तोही गोळीबारांत जखमी होऊन खालीं कोसळला.

म्हातारे अयोध्यानाथजी डोक्यांत उसळलेल्या वावटळीच्या वेगासरसे ' पोलीस आले ! महात्मा गांधी की जय !... ' असें तोंडाला आलें तें असंबद्धपणें बडबडत आपल्या झोंपडीकडे पळत गेले, म्हणून पोलिसांच्या नजरेंतून सुटले. पोलीसही पळत सुटलेल्या भयभीत किसानांना पकडण्यासाठीं त्यांच्या मागोमाग शेतांतून सैरावैरा पळत सुटले.

म्हातारा हंसत, खिदळत, ओरडत पळत पळत आला तो एकदम झोंपडींत शिरला. चार दोन मिनिटांच्या अवकाशांत झोंपडींतून ' महात्मा गांधी की जय ! ' अशी त्याची मेघगर्जना बाहेर ऐकूं आली. आणि ती झोंपडी आगीनें धडधड पेटूं लागली.

महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार करीत म्हातारा एक पेटती चूड हातीं घेऊन पतीच्या सरणाकडे धांवणाऱ्या सतीसारखा झोंपडींतून धांवत बाहेर आला तो थेट आपल्या शेताकडे गेला. महात्मा गांधींच्या

जयजयकारांत त्यानें हातांतील पेटत्या चुडीनें शेताला आग लावली. ती आग साऱ्या शेतांत पुरी भडकेपावेतों तो तिथें उभा होता. आग पुरी भडकली असें पाहून तो आसुरी विजयाच्या समाधानानें पुन्हा एकवार महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार करून खदखदां हंसत आपल्या झोंपडीकडे धांवत गेला.

झोंपडी आतां चोहों बाजूंनीं पेटली होती. त्या आगीच्या लाल ज्वाळा आकाशांत उंच पावेतों भडकलेल्या पाहून म्हाताऱ्यानें खदखदां हंसत 'महात्मा गांधी की जय!' असें ललकारत सतीसारखा त्या पेटत्या झोंपडींत उत्साहानें प्रवेश केला आणि झोंपडीचें दार आंतून बंद करून घेतलें.

अवघ्या कांहीं पळांत झोंपडीचें दारही पेटूं लागलें व त्या ज्वाळा आकाशांत भडकल्या.

बऱ्याच वेळानें याकूब आणि मीर कासीम शुद्धीवर आले. त्यांनीं सभोंवार नजर फेंकून पाहिलें तों अयोध्यानाथजींच्या शेताची पेटती चिता हळूहळू पिचत विझूं लागलेली त्यांनीं पाहिली. अयोध्यानाथजींची झोंपडी पूर्णपणें आगीच्या भक्ष्यस्थानीं पडून स्वतःच्या राखेंत लोळण घेत असलेली त्यांना आढळली.

ते दोघे अयोध्यानाथजींचा शोध करीत ठेंचाळत, अडखळत मोठ्या कष्टानें त्या जळलेल्या झोंपडीकडे जाऊं लागले. जातांना त्यांनीं 'नानाजी' 'नानाजी' अशा हांका मारून पाहिल्या; पण त्यांच्या हांकेला ओ मिळाली नाहीं.

# तुरुंगांतील जग

हरकिसन जालियनवाला बाग हत्याकांडाच्या ऐन भरांत अमृतसरला पकडला गेला. त्याच्यावर गोपीनाथ डुबे ह्या त्याच्याबरोबरच लढाईवर गेलेल्या एका सैनिकाच्या पत्नीला—रामप्यारीला पळवून आडमार्गाला लावल्याचा आरोप होता.

घर फिरलें कीं घराचे वांसेही फिरतात म्हणतात, त्याप्रमाणें हरकिसनचा काळ उलटला होता त्यासरसें जणूं सारें जगही त्याच्याविरुद्ध उलटलें होतें. त्या खटल्यांत गोपीनाथची साक्ष त्याच्याविरुद्ध झाली, रामप्यारीही फाटलेल्या आकाशाला ठिगळ लावूं लागावें त्याप्रमाणें लौकिकांत आपल्या अब्रूचा बचाव करण्यासाठीं पोलिसांनीं उभारलेल्या त्याच्या खटल्याला पोषक असें त्याच्या विरुद्धच बोलली. इतकेंच काय पण ज्याला हरकिसननें पूर्वी कधीं काळा कीं गोरा पाहिलेंही नव्हतें अशा एका निढावलेल्या गुंडानें—भूपालसिंगनें हरकिसनचा गुन्हा आपण प्रत्यक्ष पाहिल्याची आणि हरकिसननें त्या कामीं आपली मदतही मागितल्याची धडधडीत खोटी साक्षही दिली. हरकिसनवर गुन्ह्याची शाबिती झाली व त्याला दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा आणि एक हजार रुपये दंड ठोठावण्यांत आला. दंड न दिल्यास त्याबद्दल त्यानें आणखी सहा महिन्यांची शिक्षा भोगायची होती.

राजा विक्रमाच्या साडेसातीच्या काळांत भिंतीवर चितारलेल्या निर्जीव हंसानें रत्नहार गिळला व तो हार चोरल्याचा आळ राजा विक्रमावर येऊन त्याला कठोर देहदंड भोगावा लागला, ही विक्रमाची शोककथा हरकिसननें पूर्वी अनेक वेळां शनिमहात्म्यांत वाचली होती. पण त्याला ती पटली नव्हती. तो म्हणे हें कांहींतरी कविलाघव आहे झालें. चित्र कुठें हार गिळतें ?

पण जेव्हां धडधडीत बनावट खटला त्याच्यावर भरला गेला व त्या खटल्यांतील धादांत खोटा आरोप पुराव्यानिशीं खरा ठरून शिक्षा भोग-

ण्याचें नशीबीं आलें तेव्हां त्याच्या तोंडून ओघानेंच उद्‌गार निघूं लागले, " ती विक्रमाची गोष्ट खरी असली पाहिजे. "

हरकिसनची शिक्षा आतां संपत आली होती. त्याचा दंड भरला गेला असता तर तो चार दोन दिवसांत सुटला असता. तुरुंगांत अधिक शिक्षेच्या सक्त मजुरीच्या कैद्यांना वर्षाला एक महिना माफी मिळत असते, मात्र ती त्याला मिळाली नव्हती.

पण दंड भरला जाण्याचा कांहींच संभव नव्हता. हरकिसन आपल्या मनांत ओळखून होता कीं आपणाला आणखी सहा महिने ह्या रायबरेलीच्या तुरुंगांत कुजत पडायचें आहे.

देशांत तेव्हां गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीचें रान दाही दिशा धडाडून पेटूं लागलें होतें. हजारों लोक कायदेभंग करून तुरुंगांत गेले होते; जात होते. देशांतले सारे तुरुंग या सत्याग्रही कैद्यांच्या यात्रेनें जणूं फुलून गेले होते. गांधीजींच्या चरख्याला श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्राचा मान आणि मोल प्राप्त झालें होतें. सरकारही तितक्याच तीव्रतेनें माणुसकी चट्सारी विसरून धरपकड, लाठीमार, गोळीबार अशा राक्षसी उपायांनीं चळवळ दडपून टाकण्यासाठीं आकाशपाताळ एक करीत होतें. खादीच्या व कायदेभंगाच्या चळवळीनें हिंदी जनतेच्या अंतःकरणांत कायमचें मानाचें स्थान पटकावलें होतें.

हरकिसनला वाटे या वेळीं मी जर बाहेर असतों तर एकदां नाहीं दहादां तुरुंगवास पत्करून, लाठीमार व गोळीबार खाऊन माझ्या भारतमातेच्या मंगलासाठीं तन-मन-धनानें झटलों असतों; आणि महात्माजींचा सच्चा पाईक शोभलों असतों.

पण—!

असें जरी होतें, हरकिसनला जरी तुरुंगांतील नामुष्कीचें जिणें अगदीं असह्य होत होतें तरी त्यानें उमेद सोडली नाहीं. शिक्षा भोगून सुटतांच आपण ह्या चळवळीच्या धडाडलेल्या रणकुंडांत एकदम उडी घालून आजवरच्या चुकल्या कर्तव्याची भरपाई करून देऊं ह्या आशेवर तो धीरानें तुरुंगवासाचा एकेक दिवस कंठीत होता. दैवाच्या प्रतिकूलतेमुळें

आपली दुधाची बाळभूक पिठाचें पाणी पिऊन भागविण्याचें अश्वत्थाम्याच्या नशीबीं आलें होतें तसाच हरकिसनही आपल्या भारतभूमीच्या उद्धारविषयीं त्याला वाटणारी तळमळ देशभर झंझावाताप्रमाणें वेगानें पसरणाऱ्या गांधीजींच्या चळवळीच्या बातम्या ऐकून भागवीत होता.

बोलून चालून तुरुंग तो. तशांत हरकिसन हा नैतिक गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगणारा 'क' वर्गाचा सक्त मजुरीचा कैदी. तुरुंगाच्या चार भिंतींबाहेरील जगांतील घडामोडी त्याला कशा कळणार? कैदी येत जात, ते सांगत त्यावरून काय बातमी झिरपून त्याच्या कानीं येई तेवढीच.

परंतु अलीकडे हरकिसनचे ग्रह त्याच्या तुरुंगांतील जीवनाच्या बाबतींत उच्चीचे आले होते. तुरुंगांतील पोलीस खात्यांत नवीनच नोकरीवर आलेला रघुनंदन हवालदार प्रथमच तुरुंगांतील दवाखान्यावर नेमला गेला. तेव्हांपासून हरकिसन इस्पितळांतील बरदाश्याच्या कामावर होता. तिथें त्याची आणि रघुनंदनची चांगली ओळख झाली. तो त्याला जणूं देवदूत भेटला. तो त्याला रोज बातम्या सांगे, त्याला काय लागेल सवरेल तें या कानाचें त्या कानाला न कळतां आणून देई. हरकिसनच्या घरोब्याच्या किसानाचा तो मुलगा होता. तो जणूं हरकिसनच्या खडतर तुरुंगवासांत विसाव्याचें स्थानच त्याला लाभला होता.

काल जेव्हां रघुनंदननें बोलतां बोलतां नानकना गुरुद्वारांतील भयंकर कत्तलीची वार्ता सांगितली तेव्हां मात्र हरकिसनचा धैर्यमेरु एकदम ढांसळूं लागला. आपली आई कौसल्यादेवी व आपल्या प्रिय मित्राची—मंगलसिंगची आई शामकुंवर या त्याच्या दोन अनाथ अपंग माता नानकना गुरुद्वारांत तेथील दयाळू महंताच्या आश्रयाला होत्या हें त्याला तुरुंगांत असतांनाच कर्णोपकर्णी कळलें होतें.

कत्तलीची वार्ता ऐकतांच संशयग्रस्त भीतीचा मूर्तिमंत राक्षस त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. 'माझी आई, मंगलची आई या त्या कत्तलींत सांपडल्या असतील का?' ह्या दुष्ट प्रश्नानें त्याला जणूं पेटत्या खाईत उभें केलें. रघुनंदनला त्यानें लगेच काकुळतीला येऊन विचारलें, "हवालदार! वर्तमानपत्रांत त्या कत्तलीची माहिती पुन्हा एकदां लक्षपूर्वक वाचून विचारपूस करून मला कळवाल का?"

रघुनंदननें तें कबूल केलें.

तो दिवस आणि ती रात्र केव्हां संपते आणि रघुनंदन आपणाला भेटून त्याच्याकडून ती बातमी मिळवायला केव्हां वेळ सांपडतो असा हरकिसनचा जीव टांगणीला लागला होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळपासून हरकिसनचें काम पालटलें. तो जरा आजारी असल्यामुळें डॉक्टरची मर्जी संभाळून दवाखान्यांत सोप्या कामावर राहिला होता. डॉक्टरनें त्याला वैद्यकीय सबबीवर रोज अर्धा शेर दूधही दिलें होतें. पण डॉक्टर कांहीं कारणानें बिथरला. त्यानें अचानक हरकिसनची प्रकृति बाहेर–फैलांतून सक्त कामावर जाण्याइतकी खडखडीत बरी झाल्याचा अभिप्राय दिला आणि त्याचें दूधही बंद करून त्याला इस्पितळांतून हाकललें.

पण हरकिसनचें नशीब जोरावर होतें. तो बाहेर–फैलांत गेला आणि तुरुंगाच्या जमादारानें त्या बाहेर–फैलावर त्या दिवसापासून हवालदार म्हणून रघुनंदनचीच नेमणूक केली.

बाहेर–फैलावर हरकिसन दगडफोडीच्या कामावर, गेला तरी बराच वेळपावेतों त्याला बाकीच्या कैद्यांची नजर चुकवून रघुनंदनशीं बोलायची संधीच मिळेना. ती संधी एकदांची मिळाली.

" हवालदार ! मी विचारलेली माहिती काढलीत का ? " हरकिसननें आजूबाजूला दुसरा कोणी आपलें संभाषण ऐकायला जवळ नाहीं असें पाहून रघुनंदन हवालदाराला विचारलें.

" माहिती काढली. " रघुनंदन सभोंवार नजर फेकीत उत्तरला, " सारा देश नानकनाला झालेल्या त्या शीखांच्या कत्तलीच्या बातमीनें अगदीं हादरून गेला आहे. सारीं राष्ट्रीय वर्तमानपत्रें आक्रोश करीत आहेत. यात्रेच्या निमित्तानें तेथील गुरुद्वारांत हजारों भाविक शीख जमले होते म्हणे. त्यांतले दोनशें लोक तरी गोळीबाराला बळी पडले असावेत. "

" अस्सें ?–आणि माझी आई, माझ्या मित्राची आई–गुरुद्वारांतल्या बायकांविषयीं कांहीं बातमी वर्तमानपत्रांत आली आहे का ? "

" कौसल्यादेवी, शामकुंवर यांच्याविषयीं का ? "

" होय. "

" आली आहे. त्या अकबरपूरच्या गांधी आश्रमांत सुखरूप आहेत. बऱ्याच दिवसांपूर्वी त्या दोघी तिथल्या गांधी आश्रमांत येऊन राहूं लागल्याचें मी ऐकलें होतें. "

ती वार्ता ऐकून हरकिसनचा जीव भांड्यांत पडला. त्यानें हायसा एक उसासा सोडला.

" पण का हो हवालदार! हिंदी लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊं नयेत म्हणून तुमचें सरकार जपतें ना? मग नानकानाला सरकारनें एवढी कत्तल कशी होऊं दिली ? " तो रघुनंदनला म्हणाला.

" सरकारला कुठून तरी देशभर अशांततेची आग भडकायला हवी आहे. गांधीजींची चळवळ साऱ्या देशभर फैलावली आहे, तरी देखील देशांत कुठेंही जरा देखील शांततेचा भंग होऊं नये इतकी खबरदारी गांधीजी आणि त्यांचे अनुयायी घेतात, त्यामुळें सरकारची मोठी कुचंबणा होते. शेळ्यामेंढ्यांइतक्या गरीब स्वभावाचे लोक अगदीं शांत राहून चळवळ करतात, त्यामुळें सरकारचें राज्ययंत्र तर गंजतें, बिघडतें. राज्यकारभार सरळ चालणें दिवसेंदिवस मुष्किलीचें होत चाललें आहे. सरकारला ही चळवळ दडपावीशी खूप वाटते. तिचीं अगदीं पाळेंमुळें खणून काढावीशीं वाटतात. पण रयत शांततेचा भंग करून खवळून उठत नाहीं तिथें सरकारचा नाइलाज होतो. शांततेनें चळवळ करणाऱ्या लोकांना लाठीमार, गोळीबार करून दडपायला सरकारला जड जातें. नानकनाच्या कत्तलीसारखे प्रकार परस्पर झाले तर ते सरकारला हवेच असतात. "

' शेळ्यामेंढ्यांइतके गरीब स्वभावाचे लोक ' हे रघुनंदनाचे उद्गार कांट्यांसारखे हरकिसनच्या अंतःकरणाला बोचले. पण रघुनंदन नेहमींच गांधीजींकडे आणि त्यांच्या अहिंसामय चळवळीकडे काण्या डोळ्यानें पाहतो हें त्याला माहीत होतें. आपण तुरुंगांत आहों, परावलंबी आहों हा आपला बुडत्याचा काडीचा आधार तुटूं नये इतका सारासार विचार

करून त्यानें ते शब्द मुकाट्यानें कडू कोयनेलासारखे गिळून विचारलें, " पण पवित्र धर्ममंदिरांत असा रक्तपात? शूर शीखांना हा अत्याचार सहन तरी कसा झाला ? "

" शीखांनींच हा अत्याचार केला. मग प्रश्नच कुठें उरला? ही आपसांतील यादवी त्यांना भोंवली. "

" पण तिथल्या गुरुद्वारचा महंत तर फार वजनदार व विचारी आहे म्हणतात. त्यानें आपल्या डोळ्यांदेखत गुरुद्वारांत शीखांच्या रक्ताचे पाट असे कसे वाहूं दिले? कीं शीख आजकाल त्याला देखील जुमानीत-नासे झाले आहेत ? "

" महंतानेंच तर कत्तल करविली. महंत मूर्तिमंत सैतान आहे. खुळ्या भोळ्या शीखांचे आतां तरी डोळे उघडूं देत. त्यांना म्हणावें असे तुमचे आणखी किती महंत आंतून सरकारला फितूर असतील आणि अशीं किती गुरुद्वारें या फितुरांनीं कुंटणखाने आणि खाटिकखाने बनवून सोडले असतील हें आतां तरी डोळे उघडून पाहा. "

हरकिसनला तें ऐकून धक्काच बसला. रघुनंदनचा कांहीं कांहीं बाबतींतील अतिरेकी स्वभाव त्याला माहीत होता. नानकनाचा महंत हा असलें नीच कर्म करणारा खास नाहीं, दुष्ट सरकारच्या हस्तकांनीं समाजांतून त्याचें वजन नाहींसें करण्यासाठीं हें कांहीं तरी कुटिल कारस्थान रचलें आहे, असें त्याला वाटलें.

" संतमहंतांची आपण अशी निंदा करणें बरें नाहीं हवालदार! वर्तमानपत्रें काय पाहिजे त्या खोट्या बातम्या देखील छापतात. " तो म्हणाला.

" भाई ! तूं आज दोन वर्षें तुरुंगांत आहेस. आणि पूर्वी दोन तीन वर्षें लढाईवर होतास ! आपण ज्या वाटेनें चालतों त्या वाटेवर गवता-खालीं दडून बसलेले साप आमच्यासारख्या माहितगारांनाच दिसतात. तुमचा सापावर पाय पडला तरी तो साप तुम्हांला डसेपर्यंत त्याची दाद लागायची नाहीं तुम्हांला ! मी त्या महंताला चांगला ओळखतों. तो महंत सरकारचा फितूर आहे. एरव्हीं चारशें काडतुसें आणि शंभर

रिव्हॉल्व्हर्स त्याला कुठलीं मिळालीं ? गोळीबार महंतानेंच आपल्या हस्तकांकडून मुद्दाम करविला. "

" सरकारचा फितूर म्हणून त्यानें मुद्दाम गोळीबार करविला असेल असें मी नाहीं म्हणणार— "

" तूं नाहीं तुझा देव म्हणेल. नाहीं तर मला सांग गुरुद्वारासमोर भलें मोठें होमकुंड खोदवून महंतानें कशासाठीं रे तयार ठेवलें होतें ? "

" त्याला असेल एखादा होम करायचा. "

" त्याला होम माणसांचा करायचा होता. बदमाष ! चांडाळ ! इंग्रजांच्या डोळ्यांत सलणाऱ्या चळवळ्या लढाऊ शिखांचा नरमेध करून इंग्रज प्रसन्न करायचा होता त्याला. यात्रेला जमलेल्या शीखांवर हत्यारी बदमाष यानेंच घातले. त्या बदमाषांनीं गोळ्या घालून ठार केलेल्या मुडद्यांची त्या होमकुंडांत आहुती देणारा हा महंत उरफाट्या काळजाचा राक्षस—त्यालाच जिवंत जाळायला पाहिजे होता त्या होमकुंडांत.—मी हें कांहीं तरीच सांगत नाहीं हरकिसन ! वर्तमानपत्रांत छापून आलेली हकीगत सांगतों आहें मी. "

आजूबाजूचे कैदी, हवालदार आवेशानें बोलूं लागलेला ऐकून हातांतलें काम खोळंबून पाहूं लागले. आपण तुरुंगाच्या सक्त मजुरीवर आहों हें ध्यानीं घेऊन हरकिसननें तो विषय तेवढ्यावरच मोठ्या चतुराईनें आवरता घेतला. तो स्वतःच उठून बरोबरच्या कैद्यांबरोबर जाऊन खडी फोडूं लागला.

# २

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या फैलांतील सारे कैदी दुपारपावेतों खडी फोडून झाल्यावर दोनप्रहरच्या जेवणासाठीं उठूं लागले.

हरकिसन त्यांना म्हणाला, " थांबा रे ! आधीं जेवूं नका. आज मी तुमचें तोंड गोड करणार आहें. "

सर्वजण तें ऐकून आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पाहूं लागले. कधींही आपणाशीं फारसा मिळून मिसळून न वागणारा हरकिसन आज आपण-

ऊन खेळीमेळीनें बोलूं लागलेला पाहून त्या कैद्यांना अंमळ बरें वाटलें. ते सक्त मजुरीचे कैदी खरे, त्यांनीं आजवर या तुरुंगांत दारुण यमयातनाही भोगल्या होत्या; त्यापेक्षां मरण बरें असें त्यांतल्या अनेकांना वाटे, हेंही खरें, पण गेला महिनाभर त्यांच्या नशीबीं जो हवालदार आला होता तो जणूं साक्षात् यमदूतच होता. त्याच्या हुकमतींतील ते बाहेर फैलाचे कैदी त्रासून इतके बिथरले होते कीं, तसेंच आणखी कांहीं दिवस जाते तर त्या कैद्यांपैकीं प्रेमचंद आणि गोपीचंद या दोन किसान कैद्यांनीं तर त्याला ठारही केलें असतें. त्याबद्दल मग फांशीं जावें लागलें असतें तरी त्याची त्यांना पर्वा वाटली नसती.

परंतु अकबरपूरच्या गांधीआश्रमांतील तरुण सत्याग्रही वकील चंद्रमोहन हा थोड्याशा दिवसांपूर्वीं शिक्षा होऊन त्या तुरुंगांत आला, तेव्हांपासून त्याच्या निमित्तानें त्या कैद्यांत जोराचीं राजकीय आंदोलनें निर्माण होऊं लागलीं होतीं. पण प्रेमचंद आणि गोपीचंद या रामचंद्रबाबाच्या किसान कैद्यांना तीं मान्य नव्हतीं आणि बाकीचे कैदी या आपल्यांतल्या जाणत्या किसानांकडे पाहून वागत असत. त्यामुळें चंद्रमोहनच्या सत्याग्रहाचा आणि कायदेभंगाचा त्यांच्यावर फारसा परिणाम होत नव्हता. अन्यायाचा प्रतिकार हा झालाच पाहिजे असें चंद्रमोहन आग्रहानें म्हणे. कारण तो गांधीजींचा सत्याग्रही कैदी म्हणून तुरुंगांत त्याला शक्य तितका त्रास देण्याची पोलिसांची प्रवृत्ति असे. तुरुंगांतल्या सत्याग्रही कैद्यांना छळलें म्हणजे गांधीजींच्या चळवळीचें कंबरडें आपल्याला मोडतां येईल अशा वेड्या आशेच्या भरीं पडून सरकारनें सत्याग्रही कैद्यांच्या छळांपुरतें पोलिसांना व तुरुंगावरील अधिकाऱ्यांना चिथावणीपूर्ण मुक्तद्वार ठेवलें होतें. चंद्रमोहन हा एक तेजस्वी प्रतिष्ठित तरुण वकील आहे हें माहीत असूनही तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटनें त्याला मुद्दामच दगडफोडीच्या सक्त कामाला जुंपलें होतें. कधींही कष्टाची संवय नसलेला चंद्रमोहन त्यामुळें चिडला होता. ज्याचें जळे त्याला कळे या न्यायानें तो अन्यायाचा प्रतिकार सामुदायिक रीतीनें करण्यासाठीं उत्सुक होता.

परंतु चंद्रमोहन पडला गांधीजींचा अहिंसावादी सत्याग्रही वीर! कोणताही व कसाही प्रतिकार करायचा झाला तरी तो पूर्ण अनत्याचारी

असावा, कायदेभंग केला तरी तो सविनय करावा अशी त्याची निष्ठा! त्याला जुलमी हवालदाराचें शारीरिक पारिपत्य करण्याची हिंसामय योजना मानवत नव्हती. आणि त्याच्या अहिंसक सविनय योजना त्याच्या-बरोबरच्या कैद्यांना पटत नव्हत्या. त्यामुळें त्या जुलमी हवालदाराला मात्र परस्पर संरक्षण मिळालें होतें.

आजची हरकिसनची प्रसन्न वृत्ति पाहून रघुनंदन हरकिसनपाशीं जाऊन खेळकर वृत्तीनें हंसून म्हणाला, "अरे! मग मी हवालदार असलों तरी माझें तोंड नाहीं गोड करणार तूं?"

"नाहीं कसें? तुमचें तोंड तर अगोदर गोड करायला हवें. तुम्ही गोड होतां म्हणून तर आज आमचीं तोंडें गोड होणार आहेत. बसा खालीं. आतां तुम्ही आमचे हवालदार नाहीं."

"हवालदार कसले? कैदी आहेत! आम्ही सक्त मजुरीचे कैदी तरी बरे. इतके आमच्यापेक्षां आमचे हवालदार कैदी आहेत. आम्हां पंचवीस कैद्यांना एकाच हवालदाराच्या सक्त पहाऱ्यांत काम करावें लागतें. पण हवालदाराला या पंचवीस जणांच्या सक्त पहाऱ्यांत सरकारी नोकरीची सक्त मजुरी करावी लागते." चंद्रमोहन म्हणाला.

सर्व कैदी त्याचें भाषण ऐकून कावऱ्या बावऱ्या वृत्तीनें त्याच्याकडे पाहूं लागले. इतक्या अतिरेकाच्या थट्टेनें हवालदार बिथरेल कीं काय असें भय त्यांना वाटलें.

"हं! चला उठा. आटपा तुमचें जेवण लौकर आणि कामाला लागा." रघुनंदन सभोंवार पाहात हरकिसनकडे पाहून म्हणाला, "सासूबाई आली तर मग तुमचीही धडगत नाहीं आणि माझीही धडगत नाहीं. मग ओल्याबरोबर सुकेंही जळून जायचें. काम करा नाहींतर करूं नका. तुरुंगांत मरेमरेतों काम करायला आम्ही काय सरकारच्या बापाचें चार चवल देणें लागतों? पण काम करतों असें नाटक तर बेमालूम वठवायला हवें!"

"काय मेजवानी आज देणार तूं आम्हांला?" एका 'काळी टोपी'वाल्या तरुण कैद्यानें विचारलें. काळी टोपी याचा अर्थ निर्दावलेला

गुन्हेगार. तो कैदी किसान चळवळींत दोनदां तुरुंगांत आला होता. तो कांहीं त्याचा नैतिक गुन्हा नव्हे. पण तो सरकारी नीतीप्रमाणें निर्धावलेला नैतिक गुन्हेगार ठरला होता.

"थोडा थोडा गूळ देणार आहे. आणखी काय मी देणार?" हरकिसन म्हणाला व आपल्या टमरेलांतून त्यानें टुवालाची पुरचुंडी बाहेर काढली. बचकभर गुळाचा खडा टुवालांतून बाहेर काढून त्यानें थाळींत घेतला व हातानें दाबून त्याचे तुकडे करायला सुरवात केली.

"अरे मग असें करा कीं! तुमच्या तुमच्या वाटणीच्या रोट्या थाळींत कुस्करा आणि गूळ घालून त्याचे लाडू तयार करा." रघुनंदन हरकिसनकडे वळून म्हणाला, "थांब रे जरा."

बोलतां बोलतां त्यानें आपल्या चड्डीच्या दोन खिशांतून दोन पुड्या बाहेर काढल्या.

"हें घे." रघुनंदन त्या दोन्ही पुड्या उघडून एकींतील गूळ व दुसरींतील वेलदोडे हरकिसनपुढें टेवून म्हणाला, "आणखी काय पाहिजे तुमच्या लाडूंना?"

"तूप पाहिजे." चंद्रमोहन गालांतल्या गालांत हंसत रघुनंदनकडे पाहत म्हणाला.

बाकीच्या सर्व कैद्यांना चंद्रमोहनचा तो धीटपणा पूर्वीपेक्षां फाजील धाडसाचा वाटला. एकमेकांकडे नजर वळवून नेत्रपल्लवीच्या मुक्या भाषेंत ते बोललेही कीं ऊंस गोड लागला म्हणून आपण आधाशीपणानें मुळापासून खातों आहोंत. पण रसाबरोबर माती तोंडांत पडायची येळ येईल."

प्रेमचंद मात्र भ्याला नाहीं; डगमगला नाहीं. त्याच्या मनांत अनुभवानें वसणारा चंद्रमोहनच्या दांभिकपणाबद्दलचा तिटकारा उसळून वर आला.

"तूपपोळी आमच्यासारख्या किसान कैद्यांना तुरुंगांत मिळायला थोडीच बसली आहे? गांधीजींच्या अनुयायांतील सुशिक्षित पांढरपेशा वकील, बालिष्टर, जमीनदारांना ती मिळते. चंद्रमोहनजींनीं थोडा प्रयत्न

केला तर त्यांना तूप मिळेल, पोळी मिळेल, मस्का पाव मिळेल, दूध मिळेल, सर्व कांहीं मिळेल. आम्हांला कसें मिळेल ?" प्रेमचंद गंभीर वृत्तीनें त्या कैद्यांकडे पाहत उद्‌गारला. अंधारांत नेम न धरतां वाग्बाण सोडल्यासारखा तो बोलला खरा. पण तो बाण चंद्रमोहनच्या नेमका जिव्हारीं घुसला.

"तूप पाहिजे तर हें घ्या." असें म्हणत रघुनंदननें कागदांत गुंडाळलेली तुपाची बाटली खिशांतून काढून पुढें केली.

तो असाच अधून मधून कैद्यांना कांहीं ना कांहीं खायला आणून देत असे. या सगळ्या कैद्यांसाठीं म्हणून आज त्यानेंच हरकिसनजवळ गुळाचा खडा दिला होता व सर्वांनीं खा म्हणून सांगितलें होतें. तुरुंगाच्या भिशीचा हावलदार त्याच्याचसारखा तरुण व उमद्या वृत्तीचा होता. त्याला सांगून त्यानें कैद्यांच्या त्या दिवशींच्या शिध्यांतून गूळ, तूप मिळविलें होतें. आणि वेलदोडे रात्रौ नोकरीवरून घरीं गेल्या वेळींच विकत घेऊन त्यांची पूड करून ठेवली होती.

सर्व कैद्यांना तो मेजवानीचा थाट पाहून पराकाष्ठेचा आनंद वाटला. प्रत्येकानें मग आपल्या थाळींत सुख्या सुख्या रोट्या कुस्करण्याऐवजीं एक टुवाल खालीं अंथरला आणि सर्वजण त्या टुवालावरच आपापल्या रोट्या कुस्करूं लागले.

"मीसुद्धां आतां किसानांच्या मोर्चांत जाणार आहें. म्हणजे अनायासें पकडला जाऊन कैदी होऊन तुरुंगांत येईन. म्हणजे मग मला असे लाडू तरी खायला मिळतील. एरव्हीं तरी या भिकारड्या नोकरींत पोटाला खायला काय मिळतें, माती ! आम्हां शिपायांपेक्षां तुम्ही कैदी कितीतरी सुखी." रघुनंदन त्या कैद्यांत बसून त्यांच्याबरोबर हातानें रोट्या चुरतां चुरतां म्हणाला.

"पण आम्हाला सुखांत वागवणारा हवालदार भेटला तसा तुम्हाला भेटायला हवा ना ! तो कुठचा भेटेल ! भांगेच्या बनांत एक तुळस निपजली म्हणजे सारें भांगेचें बन कांहीं तुळशीचें बन होत नाहीं." प्रेमचंद म्हणाला.

" कां नाहीं ? भांगेच्या बनाचें तुळशीचें बन कां होणार नाहीं ? महात्माजींची शिकवण तोच चमत्कार आज आपणाला दाखवते आहे. हवालदाराच्या वृत्तींतील हा पालट—त्यांच्या ठायीं जागीं झालेली ही माणुसकी पूर्वी कधीं पोलीस खात्यांत कुणाला दिसून आली होती ? " चंद्रमोहन उत्तेजित स्वरांत उद्गारला.

" गोष्ट खरी. पण ही माणुसकी आम्हां गरीब किसानांत जशी उत्पन्न होते तशी श्रीमंत जमीनदारांत मात्र उत्पन्न होत नाहीं. " प्रेमचंद चंद्र-मोहनकडे पाहून सौम्य निषेधाच्या भावनेनें उद्‌गारला.

चंद्रमोहननें हातांतील रोटी कुस्करण्याचें क्षणभर थांबून त्याच्याकडे पाहिलें.

" मी खरें सांगतों आहें हें. अनुभवानें बोलतों आहें. मी भलत्या सलत्या कोणा जमीनदाराविषयीं बोलत नाहीं; गोरखपुरांत गांधीभक्त म्हणून प्रसिद्ध असलेल्या आमच्या जमीनदारीणबाईविषयीं बोलतों आहें. "

हरकिसननें तें ऐकतांच वर मान करून प्रश्नार्थक दृष्टीनें प्रेमचंदकडे पाहिलें. एकदम त्याच्या मनांत शंका आली, " गोरखपुरांत मोठ्यांत मोठी जमीनदारीण आपली गोमतीमावशीच आहे. गांधीभक्त हा म्हणतो त्या अर्थी तीच ती असेल का ? "

अकबरपूरचा गांधी आश्रम असहकारितेच्या त्या ऐन भरांत साऱ्या अयोध्या प्रांताचें एक सौभाग्यचिन्ह म्हणून ओळखला जात होता. महात्माजींची चरख्याची चळवळ आजूबाजूच्या बऱ्याअशा खेड्यांत फैलावली होती, त्याचें सारें श्रेय त्या गांधी आश्रमाला होतें. गोरख-पूरच्या श्रीमती गोमतीदेवी ह्या तरुण विधवा जमीनदारीणबाई स्वतःच्या पदरचा पैसा पाण्यासारखा खर्च करून तो आश्रम गेल्या दोन वर्षांपासून चालवीत होत्या. कौसल्यादेवी त्यांची वडील बहीण. ती शामकुंवर व राजकुंवर, नानक यांसह गोरखपूरला आपल्या बहिणीकडे राहायला आली. तेव्हांपासून त्या आश्रमाच्या कार्याला विशेष चालना मिळाली होती खरी. किंबहुना कौसल्यादेवी चंपारण्यांतील लढ्यापासूनच्या महात्मा गांधींच्या निष्ठावंत शिष्या असल्यामुळें त्यांच्या ओढीनें गोमती-

देवी महात्माजींकडे आकर्षिल्या गेल्या होत्या. गोमतीदेवींनीं जर आपलें धन आश्रमासाठीं उदार मनानें खर्च करण्याचें पत्करलें नसतें तर सर्वस्वाला मुकून कंगाल बनलेल्या कौसल्यादेवी आणि शामकुंवर, तिची सून राजकुंवर यांना तिथें कांहींही कार्य करतां आलें नसतें.

" ऐक. तुझ्या पुरुषोत्तमदासबाबूची मैत्रीण ही जमीनदारीण. " गोपीचंद मध्येंच हरकिसनकडे पाहून म्हणाला.

ते शब्द हरकिसनच्या मनाला झोंबले. पण तो कांहीं बोलला नाहीं.

" त्या पिसाट रामचंद्रबाबाच्या तालमींतला बंडखोर किसान दिसतोस तूं. " चंद्रमोहन वर मान करून उगवत्या पुढारीपणाच्या आत्मविश्वासानें गोपीचंदकडे पाहून म्हणाला.

" रामचंद्र बाबा किसानांचे शत्रु आहेत ? कीं महात्मा गांधींचे वैरी आहेत ? ते तरी आम्हा किसानांच्या कपाळींची सैतानी जमीनदारांच्या जमीनदारींतील गुलामगिरी टळावी म्हणूनच प्रयत्न करतात ना ? आणि महात्माजींना देखील हेंच करायचें आहे. " प्रेमचंद कांहींसा रागावून म्हणाला.

तो देखील रामचंद्र बाबाच्या चळवळीनें जागा झालेला किसान होता. महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ त्याला कळत नव्हती. पण आपली जमीनदारीण गोमतीदेवी ही महात्माजींची कट्टी अनुयायी आहे आणि तिच्या जमीनदारींत आपण आपल्या निढळाच्या घामानें पिकवीत असलेल्या शेतवाडीला केवळ जमीनदारी जुलुमामुळें मुकलों आहोंत एवढें त्याला कळत होतें. तो ज्या खेड्यांत गोमतीदेवीचें कूळ म्हणून दोन पिढ्यांपासून शेती करीत होता त्या खेड्यांतील त्याच्यासारखीं सारीं कुळें जमीनदारानें वाढविलेल्या बेसुमार खंडाच्या ओझ्याखालीं व इतर अनेक निमित्तांनीं जमीनदार दंडेलीनें वसूल करीत असलेल्या करांच्या भाराखालीं अगदीं चिरडलीं गेलीं होतीं.

अशा वेळीं रामचंद्र बाबाची किसानांच्या एकजुटीची हांक त्यांना ऐकूं आली. त्यांनीं आपण इतका जबर खंड मुळींच देणार नाहीं; तसेंच खंडाखेरीज कसले करही देणार नाहीं; पाहिजे तर वाजवी खंड काय

ठरेल तो घ्या; अशी निर्वाणीची मागणी जमीनदारीणबाईपाशीं केली आणि तिथून झगड्याला सुरवात झाली. तो झगडा इतका विकोपाला गेला कीं अखेर त्या व त्याच्या आजूबाजूच्या त्या जमीनदारीमधील दहा खेड्यांतील किसान जमीनदारीणबाईच्या गोरखपूरमधील बंगल्यावर मोर्चा घेऊन गेले. जमीनदारीणबाईच्या वतीनें तिथें आलेल्या सशस्त्र पोलीस तुकडीनें त्या मोर्चावर गोळीबार करून किसानांची पांगापांग केली व जमीनदारीणबाईला त्या संकटापासून बचावलें. तेव्हांपासून गोमतीदेवीनें आपलें कायमचें वसतिस्थान गोरखपूरहून हलवून अकबरपुरांत आपल्या शेतवाडींतील बंगल्यांत नेलें.

त्या गोळीबारांत जखमी होऊन पकडल्या गेलेल्या अनेक किसानांपैकीं प्रेमचंद व गोपीचंद हे दोघे कैदी त्या पंचवीस कैद्यांच्या फैलांत होते.

" मग काय ? आम्हां किसानांच्या तोंडांत माती कालवून जमीनदारांना तेवढे बळी मातूं देण्यासाठीं गांधीजींची चळवळ आहे ? " गोपीचंदनें चिडून विचारलें.

" तुम्ही सारे त्या रामचंद्रबाबाच्या आगलाव्या शिकवणीनें भडकून गेलेले किसान आहांत. पण अशा भडकण्यानें काय मिळेल ? आगलाव्या भलत्यासलत्या पुढाऱ्याच्या नादीं लागून तुम्ही अत्याचाराची आग पेटवतां, आणि त्यांतच भाजून मरायची पाळी तुमच्यावर येते. " चंद्रमोहन सर्व कैद्यांकडे पाहत उद्गारला.

हवालदार रघुनंदन इतका वेळ अगदीं स्तब्ध होता. बाकीच्या कैद्यांबरोबर तो त्यांच्या रोट्या चुरून त्यांत गूळ तूप वेलदोडे घालून लाडू वळण्यांत गढून गेला होता. तो मध्येंच हंसण्यावारी म्हणाला, "किसान कधीं मरत नाहीं. किसान कष्ट करतो, शेत पिकवतो, स्वतः जगतो आणि इतरांना जगवतो. "

रघुनंदन जरी हें हंसत हंसत बोलत होता तरी पाण्याच्या उदरीं असलेल्या अग्नीसारखा त्या हंसऱ्या आगीचा प्रभाव तिथल्या सर्व कैद्यांना जाणवला.

" तुम्ही अगदीं रामचंद्रबाबाचे कट्टे अनुयायी किंवा 'गद्र' पक्षाचे सभासद असल्यासारखे दिसतां हवालदारसाहेब!" चंद्रमोहननें रघुनंदनला म्हटलें.

" मीही गोमतीदेवी जमीनदारीणबाईचा किसानच आहें. जमीनदारांच्या जुलुमांत होरपळून निघालेल्यांपैकीं मी एक आहें. उघड्या डोळ्यांनीं मरण येईना म्हणून वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठीं पोलीस खात्यांत नोकरीला आलों."

" जमीनदारीणबाई पुरुषोत्तमबाबूचा मुलगा दत्तक घेणार आहे—"

" नव्हे, पुरुषोत्तमबाबू जमीनदारीणबाईला आपला मुलगा दत्तक घ्यायला लावणार आहेत."

" मग त्यांत काय वाईट झालें? मुलाला एका आईऐवजीं दोन आया मिळाल्या. मग लोकांनाही नांवें ठेवायला तोंड नाहीं. आज लोक ह्या गोमतीदेवीचा कोण असें बोलत एकमेकांना डोळे घालतात. त्यांचीं तोंडें आपोआपच बंद होतील."

कैद्यांतली ती कुजबूज ऐकून हरकिसन मनांत हिंपुटी झाला. गोमतीदेवी आपली मावशी असें त्याला सांगवेना.

" तुला तरी बरदाश्याचें काम आपल्या कोठडींत करूं द्यायचें नाहीं असा हट्ट त्या बाबूनें जेल सुपरिंटेंडेंटपाशीं कां रे धरला?" प्रेमचंदनें विचारलें.

" कुणी पुरुत्तोमबाबूनें?" रघुनंदन हवालदारानें विचारलें.

" हिंसक माणसाला आसरा देणें म्हणजे देखील एक प्रकारें हिंसावृत्तीची जोपासना करणेंच होय. रामचंद्रबाबा जमीनदारांच्या धनदौलतीची आणि घरादाराची होळी करायला टपलेला आहे. समजा, माथेफिरू किसानांच्या हिंसावृत्तीला चेतवणाऱ्या रामचंद्रबाबासारख्या अत्याचारी माणासाला फितूर असलेला पोलीस भेटला तर त्याचा त्याला बंदोबस्त करायला नको?"

" पण काय हो वकीलसाहेब, तुमच्या या अहिंसेच्या पूजाअर्चेपायीं कोणा शिपायाच्या पोटावर पाय आले; त्याचीं बायकापोरें अन्नाला महाग झालीं,

तीही त्या जिवांची हिंसाच नव्हे काय ?" गोपीचंदनें प्रश्न केला.

"तेवढ्यावरच कुठें थांबलें ? बेकारीमुळें आणि उपासमारीमुळें पोटांत भडकलेली ती आग घेऊन तो शिपाई आणि त्याचीं बायका-पोरें अन्नअन्न करीत दाही दिशा वणवण हिंडूं लागलीं; आणि समजा, पोटासाठीं चोऱ्यामाऱ्या, लांड्यालबाड्या, दंगेधोपे करूं लागलीं तर त्यांतून लोकांना जो ताप होईल ती तरी हिंसाच नव्हे काय ? आणि ती तुमच्या अहिंसावाल्या हिंसेच्या पोटीं जन्माला आलेली." रघुनंदन हवालदार मध्येंच म्हणाला.

"महात्माजींचा अहिंसाधर्म म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे हवालदार ! अहिंसाधर्माची दिव्य शक्ति जर महात्माजींनीं आम्हाला दिली नसती तर खरोखरच आजच्या या सर्वतोपरी हलाखीच्या काळांत लोकांच्या असंतोषाच्या ज्वाळांनीं हिंदुस्थानची लंका पेटूं लागली असती." चंद्रमोहन सर्वांकडे पाहून म्हणाला. परंतु त्याच्या नजरेचा मुख्य रोख प्रेमचंद, गोपीचंद अशा अवखळ किसानांवर होता.

"वकीलसाहेब ! तुम्ही म्हणतां तसें हिंदुस्थानचें लंकादहन झालें असतें वानरसेनेच्या हातून भडकलेल्या अत्याचाराच्या आगीनें. पण त्या आगींत रावण आणि त्याचे बगलबच्चे जुलमी अरेराव तेवढेच जळून खाक झाले असते. आग लावून काय जाळायचें आहे आणि काय राखा-यचें आहे हें आम्हां किसानांना चांगलें कळतें. तुम्हांला तुमचे पोशिंदे रावण जगवायचे आहेत म्हणून लंकादहनाचें एवढें भय वाटतें."

हरकिसनला ती चर्चा रुचेना. त्यांत त्याचें मनच लागेना. त्याच्या मनांतील गोमतीमावशीची आदरणीय मूर्ति त्या चर्चेच्या आडव्या-तिडव्या आघातांत जागोजागीं खरचटून त्याला विद्रूप दिसूं लागली.

"आपण तुरुंगांत आहों. कैदी आहों आपण. आतां गप्पा पुरेत. घ्या आपापल्या थाळ्या. आणि जेवून मोकळे होऊं." असें म्हणून हरकिसननें मोठ्या चतुराईनें त्या अप्रिय विषयापासून सर्वांचीं मनें बाजूला खेंचलीं. सर्वजण गप्पा थांबवून थाळी टमरेल घेऊन बसले. पण चंद्रमोहन मात्र त्या पंगतींत रिकामाच येऊन बसला.

" कां ? वकीलसाहेब, आज उपास आहे कीं काय ? " हरकिसननें कैद्यांच्या थाळींत रोटीचे दोन दोन लाडू वाढतां वाढतां चंद्रमोहनची थाळी त्याच्यापुढें नसलेली पाहून विचारलें.

" नाहीं—उपास नाहीं. " असें म्हणत चंद्रमोहननें आपली थाळी पुढें घेतली व आपल्या टुवालांतील रोटी त्या थाळींत ठेवीत म्हटलें, " मला एवढी एक रोटी आणि शाकभाजी पुरे आहे. आणखी कांहीं नको. "

" आमचे लाडू नाहीं घेणार तर ? "

" नाहीं. तुम्ही घ्या कीं ! तुम्ही खाल्ले कीं मला पोंचले. मी तुरुंगांतील माझ्या रोजच्या भत्त्याखेरीज दुसरें कांहींही खात नसतों. "

" कां ? " रघुनंदननें पुढें येऊन विचारलें, " मी हवालदार चुगली करीन असें भय वाटतें का तुम्हाला ? "

" तुम्ही चुगली करणार नाहीं. पण माझ्याच मनाला तें पटत नाहीं. सत्याग्रही माणसानें तुरुंगांत देखील सत्याचें पालन केलें पाहिजे. आमचें आचरण निर्मल असलें पाहिजे. कारण लोक आमच्याकडे पाहून धडा घेत असतात. " चंद्रमोहन प्रेमचंदनें वाढायला आणलेली शाकभाजी घेण्यासाठीं थाळी पुढें करीत म्हणाला.

प्रेमचंद आणि गोपीचंद तें ऐकून एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावीत तिसऱ्या कोणाला दिसणार नाहीं इतक्या हळुवारपणानें हंसले. चंद्रमोहनच्या बराकींत त्याच्या सहवासांत राहणाऱ्या कैद्यांपैकींच ते दोघे होते. त्याच्या सगळ्या गरजा अकबरपूरहून गांधी आश्रमांतून भागविल्या जात असत हें त्यांना माहीत होतें. पण ते कांहीं बोलले नाहींत. कोणीच मग त्या विषयाकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. हरकिसननें आपल्या कोठडींतल्या दोघां कैदी मित्रांसाठीं दोन लाडू काढून बाजूला ठेवले व बाकीचे सर्वांना सारखे वाढले.

रोटीच्या लाडूंचें मिष्टान्न भोजन चालू असतांना मधूनमधून ओसरलेल्या पावसाच्या सरीमागून टिबकणाऱ्या पागोळ्यांसारखी टीका पूर्ववत् सुरूच होती.

तेवढ्यांत जमादार येतांना दुरून आढळला, तेव्हां मात्र जो तो हुशार होऊन आज्ञाधारक कैद्यासारखा वागूं लागला.

रघुनंदन हवालदारानें जमादाराला ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें कैद्यांवर खेंकसून दोन सौम्यशा शिव्या हांसडल्या व त्यांना काम लौकर सुरू करण्याचा तांतडीचा हुकूम फर्मावला.

हरकिसन त्या सायंकाळीं आपल्या सोबती कैद्यांबरोबर मनमोकळेपणानें बोलला चालला नाहीं. मनांत उसळलेल्या प्रक्षोभाच्या लोंढयांत तो कसा तरी, कुठें तरी दूर लोटला—फेकला जात होता. त्या विचाराच्या भरांत तो काम संपवून बाकीच्या कैद्यांबरोबर माघारा निघाला तेव्हां आपल्या कोठडींतल्या मित्रांसाठीं ठेवलेले लाडू रानांतच विसरला.

सूर्यास्तापूर्वी त्या दिवशींचें काम संपल्यावर पुन्हा कैदी सायंकाळचें अन्न घेण्यासाठीं थाळी टमरेल घेऊन तुरुंगाच्या कवाइती शिस्तीप्रमाणें एका रांगेंत जाऊन बसले. तोंच जेलर कचेरींतील हवालदारानें येऊन हरकिसनला जेलरसाहेबाच्या कचेरींत बोलावून नेलें.

जो तो बुचकळ्यांत पडला. याचा अर्थ काय?

## ३

उद्यां आपली सुटका होणार हें जेव्हां जेलरच्या तोंडून हरकिसनला कचेरींत जातांच कळलें तेव्हां त्याला कमालीचें आश्चर्य वाटलें.

" दंड मला माफ झाला साहेब?" त्यानें जेलरला अदबीनें विचारलें.

" तुझा दंड भरला गेला आहे. कुणा नातलगाला लिहिलें होतेंस दंड भरायला?" जेलरनें विचारलें.

" नाहीं साहेब!"

" मग सरकारनें तुझ्या घरादाराचा लिलांव करून दंड वसूल केला असेल. तुला काय करायचें आहे त्याच्याशीं? सुटलास यांत आनंद मान आणि उद्यां उठून आनंदानें आपल्या बायकामुलांत जा." असें म्हणून जेलर आपल्या कामाला दुसरीकडे निघून गेला.

आपल्या बराकींत गेल्यावर देखील आपला दंड कोणी भरला हा प्रश्न एकसारखा हरकिसनच्या मनांत डांचत होताच.

"मावशीनें दंड भरला असेल?" असा प्रश्न त्यानें आपल्या मनाशीं केला न केला, आणि पत्रांत चुकून लिहिलेली ओळ खोडून टाकावी तसा तो खोडून टाकला.

"जालियनवाला बागेच्या होमकुंडांत माझें घरदार, शेतवाडी, वडील, आजोबा सर्वस्वाची होळी झाली. आतां कोण भरणार माझा दंड? लढाईवरून माझ्याबरोबर परत आलेल्या मित्रांपैकीं कोणी माझा दंड भरला असेल?"

या प्रश्नाला त्यानें लगेच दुसऱ्या क्षणाला मानेनें नाहीं असें उत्तर देत म्हटलें, "इतक्या दिवसांत त्यापैकीं कोणी माझ्या मेल्याजित्याचीही विचारपूस केली नाहीं, ते कशाला दंड भरायला येतील? पण त्याबद्दल मी तरी त्यांना दोष कोणत्या तोंडानें देऊं? जगाच्या दृष्टीनें हा हरकिसन अनीतिमान, नीच, दगलबाज असा पापाच्या नरकांत लोळणारा किळसवाणा किडा ठरला आहे. जगाच्या न्यायानें मला नीच व्यभिचारी ठरविलें आहे. माझ्या आप्तेष्टांनीं, मित्रांनीं कां म्हणून कनवाळूपणा दाखवावा माझ्या बाबतींत? ..." असें विचारचक्र जें रोज त्याच्या मस्तकांत अष्टौप्रहर गरगर फिरत असे तें आज अधिक जोरानें फिरूं लागलें होतें.

म्हणूनच जेव्हां त्याला आपली सुटका आज होणार ही वार्ता कळली, तेव्हां अचंबा वाटला. तेव्हांपासून तो हें असें कसें झालें याचा विचार करीत होता. त्या विचाराच्या बोंचणीनें त्याला झोंप येईना. आपली अकल्पितपणें लौकर सुटका होते आहे म्हणून तो अस्वस्थ झाला होता असें नव्हे. परंतु लौकर सुटका होते आहे याचा त्याला आनंद वाटत नव्हता. उलट उद्यां आपण सुटून तुरुंगाबाहेर गेलों कीं जगाला हें काळें तोंड कसें दाखवावें, ह्या चिंतेनें त्याला अगदीं बेचैन करून सोडलें होतें. तुरुंगांत अलीकडे तो नेहमींच बेचैन असे. त्यांत आणखी आज सायंकाळीं त्याची प्रिय गोमतीमावशी व त्याचा सासरा यांच्या-

विषयींच्या अपवादकारक गोष्टी ऐकून त्या मनाच्या अस्वस्थतेला नवी पोलादी धार आली होती.

गंगाप्रसाद आणि नूरमहंमद हे त्याच्या कोठडींतील दोघे सोबती कैदी आज त्याची ती गोंधळल्यासारखी परिस्थिति पाहून विचारांत पडले होते कीं आज हा नेहमींपेक्षां उदास कां? कुणा एका स्त्रीच्या फंदीं पडून तो तुरुंगांत आला आहे हें त्यांनीं ऐकलें होतें. पण त्याबद्दल त्यांनीं त्याला कधींही दोष दिला नाहीं.

असा दोन घटका वेळ गेला. रात्रींच्या आठांचे ठोके पडले. ते दोघेही कैदी आपल्या तरटाच्या बिछान्यावर अंग टाकून ओठांतल्या ओठांत आपापल्या देवाचें नांव घेत स्वस्थ पडले.

पण हरकिसन मात्र समुद्रकांठच्या कोरड्या वाळूंत तळमळत पडलेल्या मासोळीसारखा तरटावर एकटाच विषण्ण चित्तानें बसून होता.

अखेर नूरमहंमदनें त्याला विचारलेंच, "बाबूजी! आज जेलरनें तुम्हांला ऑफिसांत बोलावलें होतें म्हणे? कशाला बोलावलें होतें?"

"उद्यां माझी सुटका होणार हें सांगण्यासाठीं." हरकिसन खालीं मान घालून आपल्या मांडीकडे पाहत उत्तरला.

"अस्सें! एकूण आम्ही तुमच्या आधीं सुटून जाणार होतों ते तुम्हीच आमच्या आधीं तुरुंगाबाहेर चाललां म्हणायचे?" गंगाप्रसाद म्हणाला. त्यावर कांहीं उत्तर न देतां हरकिसननें एक दीर्घ उसासा सोडला. तो ऐकून गंगाप्रसाद म्हणाला, "तुरुंगांतून सुटणार म्हणून माणसानें आनंद मानायचा कीं खेद मानायचा बाबूजी?"

"काल मी नाहीं तुला म्हणालों, बाबूजी आतां लौकरच सुटणार असें? दंडाची रक्कम भरली गेल्यावर सरकारला त्यांना सोडणेंच भाग आहे." नूरमहंमद गंगाप्रसादला म्हणाला.

हरकिसननें तें ऐकून चमकून त्या दोघांकडे पाहिलें. त्याला वाटलें, यांना ही बातमी कोणी सांगितली?

"रायसाहेबांचा तुमच्यावर भारी लोभ दिसतो बाबूजी? बाकी तसा थोडासा चांगुलपणा आमच्या धन्याच्या अंगीं आहे. गांधीबाबाच्या

बऱ्याच कैद्यांचे दंड भरून तो त्यांना सोडवतो. आम्ही म्हणतों आम्हाला पिळून एवढी मोठी धनदौलत सांचविली आहे त्या पापाची तेवढीच फेड झाली!"

"हरामखोर! बदमाष! गाईच्या पायांना विळखा घालून तिच्या वासराच्या तोडीं लागणारें दूध पिऊन फोंफावलेला हा साप! पैशाच्या जोरावर काय काय सोंगें आणतो आणि जगाला झुलवतो. आणि असल्या नीच सैतानांवर गांधीजींचा विश्वास! चंपारण्याच्या लढयापासून गांधीजींचा टाळकुटा बनला आहे. मारे खादी वापरतो. पण म्हणावें या खादीच्या शुभ्र अभ्ऱ्याखालीं लपविलेलें तुझें काळेकुट्ट पाषाणी अंतःकरण आम्ही किसान चांगलें ओळखतों..."

तोंच रात्रपाळीचा कैदी वॉर्डर पहाऱ्यासाठीं आला. तो हातांतील कंदिलाचा उजेड त्या कोठडीच्या गजांतून आंत पाडीत त्यांना "मुकाट्यानें झोंपी जा, गडबड करायची नाहीं." असें दरडावून सांगून निघून गेला.

मनांतल्या मनांत वॉर्डरच्या नांवानें जळफळत ते दोघेही गप्प झाले. थोड्या वेळानें त्यांना गाढ झोंप लागली.

पण हरकिसन मात्र तसाच ताटकळत्या डोळ्यांनीं जागत बसला होता. रात्रीच्या त्या प्रशांत समयीं त्याला शांतपणें आपल्या गेल्या दोन वर्षांच्या जीवितांतील भूतकालाकडे पाहतां आलें. तो देखावा पाहून त्याचें अंतःकरण शहारलें.

"काय पाहतों आहें मी हें? मी हा माझ्या आयुष्याचा वणवा भडकलेला पाहतों आहें कीं, तें प्रकाशमान झालेलें पाहतों आहें? समोर हा इतका झगझगीत प्रकाश दिसतो हा प्रकाश मला मार्गदर्शन करीत आहे कीं माझ्या अंधाऱ्या आयुष्याकडे पाहून उपहासानें खदखदां हंसतो आहे?"

तो स्वतःशींच बोलतां बोलतां क्षणभर थबकला. स्वतःच्या ठायींच्या माणुसकीविषयीं स्वतः संशय घेणें हा तरी प्रामाणिकपणा आहे कीं दुबळेपणा आहे याचा निर्णय त्याला करतां येईना. समोर दिसणाऱ्या

प्रकाशाच्या अनंत स्रोतांत तो आपलें हरपलेलें श्रेय भिरभिरत्या कातर नजरेनें शोधूं लागला.

" माणूस मी नाहीं ?—माणूस नाहीं मी ? मी माझी माणुसकी हरवून बसलों आहें कीं माणुसकीला लुबाडला गेलों आहें ? मी अपराधी आहें कीं जग मला अपराधी ठरवून माझ्या आयुष्याचा सत्यानाश करूं पाहत आहे ? " तो अंत:करणापासून कळवळून समोरच्या शून्य वातावरणांतून त्याच्याकडे दीप्तिमय नजरेनें पाहणाऱ्या त्या प्रकाशमय पूर्वस्मृतींना विचारूं लागला.

## ४

जखमेवरची खपली काढावी त्याप्रमाणें आज सकाळींच गंगाप्रसादनें बद्रीनाथ पांडे ह्या रायबरेलींतील आपल्या सावकाराविरुद्ध हरकिसनपाशीं चिडून खारट तुरट उद्‌गार काढले होते. तो हरकिसनचा सासरा आहे हें गंगाप्रसादला माहीत नव्हतें व हरकिसननेंही मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत या न्यायानें आपल्या सोबत्यांना ती ओळख दिली नव्हती.

बद्रीनाथ ' सावकारा'विरुद्ध गंगाप्रसाद ओरडला तें ऐकून हरकिसनला प्रथम नवलच वाटलें. कारण प्रभावतीशीं त्याचें लग्न झालें होतें तें एका गरीब अशा, रंगसामानाचें खुटुरुटु दुकान चालवणाऱ्या गरीबाच्या मुलीशींच झालें होतें. परंतु लढाईचा फायदा घेऊन बद्रीनाथ आपल्या जवळच्या चार–दोनशें रुपये किंमतीच्या जर्मन रंगांच्या भांडवलावर त्या रंगाच्या मातीचें सोनें करून दहा बारा हजारांचा असामी झाला होता हें हरकिसनला काय माहीत ! दोन वर्षांपूर्वी प्रयागहून चुलत्याच्या अस्थींचें गंगेंत विसर्जन करून तो अमृतसरला जातांना वाटेंत प्रभावतीला भेटण्यासाठीं रायबरेलीला येऊन गेला होता. तेव्हां त्याला सासुरवाडच्या एकंदर मंडळींकडून कांहींशी उद्धटपणाची वागणूक मिळाली, तिची पुरी संगति त्याला गंगाप्रसादचे उद्गार ऐकून लावतां आली. तेव्हांपासून त्याचें मन सासऱ्याविषयीं अधिकच नाराज झालें होतें.

सारे लोक आपापल्या परीनें आपली काळजी वाहत असतांना सास-ऱ्यानें तेवढी आपल्या मेल्याजित्याचीही चौकशी करूं नये हें शल्य त्याच्या अंतःकरणांत अधून मधून सलत असे. परंतु त्याचें अंतःकरण असल्या वेदना सोसून पचनीं पाडण्याइतकें गेंड्याच्या कातडीसारखें चिवट झालें होतें. टीका–निन्देच्या शस्त्रांचे सामान्य प्रहार त्याला आज-काल फारसे जाणवेनासे झाले होते.

पण तो एक प्रश्न–त्या कैदी मित्रांच्या संभाषणांतून त्याच्यापुढें नव्यानेंच उत्पन्न झालेला तो प्रश्न मात्र खाऊं कीं गिळूं अशा पवित्र्यांत अक्राळ विक्राळ राक्षसासारखा जबडा पसरून आव्हानपूर्वक त्याच्याकडे पाहत ताठ उभा होता.

" खरें असेल हें? माझ्या दंडाची रक्कम खरोखरच रायसाहेबांनीं भरली असेल का? नूरमहंमद म्हणाला त्याचप्रमाणें आपल्या पापांवर पांघरूण घालायचा तर त्यांचा हा डाव नसेल? ... "

त्यानें कळवळून एक उसासा सोडला. प्रभावतीच्या आयुष्याला चूड लावणारा हाच सैतान असा सबळ संशय येण्याजोग्या सदाफुली-सारख्या ताज्या फुलणाऱ्या दंथकथा तो अमृतसरला दोन वर्षांपूर्वी कैद झाल्या दिवसापासून आजपावेतों ऐकत होता. लढाईवरून मायदेशीं परत येतांच पहिल्या दिवशीं मुंबईत त्याला रामप्यारीनें या भीषण रहस्याची ओझरती कल्पना दिली होती. ती तें अगदीं सहज बोलून गेली. प्रभावतीच्या पतीशीं आपण बोलतों आहोंत हें तिला काय माहीत? पण ते तिचे तेव्हांचे बोल त्याच्या अंतःकरणांत कावेबाज मारेकऱ्यासारखे खोल दबा धरून बसले होते. एखाद्या मांजरानें पकडून आणलेल्या उंदराला मारून खाण्यापूर्वी दुष्ट-पणानें त्याला अधून मधून आपल्या तीक्ष्ण पंजांनीं खेळवीत झोडपावें तसे ते बोल त्याविषयींची एखादी खरी अथवा खोटी लोकवार्ता त्याच्या कानीं येतांच त्याच्या हृदयावर पंजे मारून त्याला अगदीं घायाळ करीत.

पण तें दुःख कांहींच नाहीं असें म्हणण्याची पाळी त्या रात्रीं नूर-महंमदचे रायसाहेब कैलासनाथाविषयींचे उद्गार ऐकून त्याच्यावर आली.

चहूं बाजूंनीं गांजलेल्या माणसाच्या मनांत एखादी भीषण शंका आली कीं ती जखमेंतील रक्तामांसावर पोसणाऱ्या किड्यासारखी तें कातर मन पोखरून खाऊन फोफावूं लागते ! नूरमहंमद जरी प्रभावतीविषयीं कांहीं बोलला नाहीं तरी त्यानें रायसाहेबांवर दुष्ट कावेबाजपणाचे व ढोंगीपणाचे जे आरोप केले त्या आरोपांत प्रभावती कुठें तरी लपून बसली आहे अशी त्याची खात्री झाली.

आईबाप, आजोबा, घरदार, शेतवाडी, नांवलौकिक, या सर्वस्वाला आपण मुकलों आहोंत असें मनांत आक्रंदून तो रोज मूक स्वरानें स्वतःशीं रडे. पण आज आपल्या सुटकेला आपला दुष्ट, ढोंगी, व्यभिचारी जमीनदार कारण आहे हें नूरमहंमदच्या तोंडून ओघानें कळल्यापासून तो पूर्वीचीं तीं सारीं दुःखें क्षणभर विसरून या नव्या भयंकर अमूर्त दुःखामुळें सारी रात्र कळवळून टाहो फोडल्यासारखा मनांतल्या मनांत स्फुंदून आक्रंदत होता.

" माझी माणुसकी आज ठार झाली; आणि तिच्या प्रेताची पायघडी करून मी आज या तुरुंगवासांतून मोकळ्या जगांत जाणार आहें. जमीनदारानें माझा दंड भरला आणि माझी सुटका झाली हें ऐकून जग म्हणेल, स्वतःच्या पत्नीच्या शीलाचा, घराण्याच्या नांवलौकिकाचा, प्राणाहूनही प्यार अशा माणुसकीचा एक हजार रुपये मोबदला घेऊन हा हरकिसन उजळमाथ्यानें जगांत वावरतो आहे !—असल्या जिण्यापेक्षां मरण आलेलें शतपटीनें पुरवलें !...तें कांहीं नाहीं. मी जेलरला सांगेन कीं मी दंड भरलेला नाहीं. माझ्यासाठीं कुणी दंड भरला असला तर तो मला मान्य नाहीं..."

तो कपाळाला हात लावून स्वतःशीं हंसला. अशाच एका सत्याग्रही तरुणानें आपणाला झालेला दंड आपणाला न विचारतां परक्या कोणी भरला म्हणून सुटका करून घेण्याचें नाकारलें असतां तुरुंगाधिकाऱ्यांनीं त्याचें कांहीं चालूं न देतां त्याला तुरुंगाबाहेर हांकललें होतें. ती आठवण त्याला झाली; आणि अगतिकतेचा अमावास्येसारखा घनदाट काळोख त्याच्या सभोंवार पसरूं लागला. त्याला कांहीं सुचेना, कांहीं दिसेना,

कांहीं सहन होईना. काळोख! काळोख! काळोख! आंत, बाहेर, खालीं, वर दाही दिशा अमावास्येचा काळोख!

रात्रभर डोक्यांत घोळणाऱ्या अशा दारुण विचारांनीं शिणवठा आल्यामुळें पहांटेच्या वेळीं त्याचा किंचित् डोळा लागला. पण जें जागेपणीं तेंच स्वप्नांत. त्या पहांटेच्या तंद्रींत देखील दिवसा, रात्रीं त्याला भेडसावणाऱ्या भीतीच्या आणि लज्जेच्या भुतावळीनें त्याची पाठ सोडली नव्हती. झोपेंतही तो दचकून स्वतःच्या मनाला विचारी, " या जगांत सत्याला थाराच नाहीं का ?..."

## ५

उजाडतें न उजाडतें इतक्यांत हरकिसनच्या बराकीवर पहारा करणाऱ्या तरुण शीख कैदी वॉर्डरनें त्याच्या खोलीचें कुलूप खडखड ओढून पाहिलें. त्या आवाजानें त्याला एकदम जाग आली.

कैदी वॉर्डर त्याच्या खोलीकडे लक्षपूर्वक पाहत पुढें निघून गेला. पण तें त्याच्या ध्यानीं आलें नाहीं. हरकिसनला त्या जागेपणीं विरंगुळा वाटावा असें 'जागिये रघुनाथकुँवर' या तुलसीदासाच्या भूपाळीचे कोमल, सुस्वर व परिचित ध्वनी त्याला ऐकूं येऊं लागले.

"हें काय ? रामचंद्रबाबांचाच हा आवाज. अखेर त्यांच्याही वांट्याला तुरुंगवास आला वाटतें ?" असें वाढत्या कुतूहलानें आपल्या मनाला विचारीत तो अगदीं सर्वांगाचे कान करून ती भूपाळी ऐकूं लागला.

हरकिसन तुरुंगाच्या ज्या बराकींत होता तिच्या समोरच्या बराकींतूनच ती भूपाळी त्याला ऐकूं आली. दोन बराकींत बारा हातांचें अंतर असेल नसेल. पण इतक्या जवळ आपणाला गुरुस्थानीं पूज्य असलेला रामचंद्रबाबा असतांनाही आपणाला त्याचें दर्शन घेतां येऊं नये ह्या परावलंबी परिस्थितीसमोर त्याला बळजबरीनें मान नमवावी लागत होती.

भूपाळीच्या सुस्वर आलापांत हरकिसन अगदीं रंगून गेला होता. तो नागसुरानें मोहित होऊन डोलणाऱ्या नागासारखा तेवढ्यापुरती सारी

खिन्नता, सारा विषाद विसरून मंत्रमुग्धासारखा डोलूं लागला होता. तुलसीदासाची ती भूपाळी त्याची अतिशय आवडती होती. तुरुंगांत देखील पुष्कळदां पहांटेच्या वेळीं तो ती भूपाळी हलक्या स्वरांत आळवीत बसे. बोलून चालून तुरुंग तो. हरकिसन त्या तुरुंगवासांत आपल्या माणुसकीला मारून जगत होता. तुरुंगांत त्याला मनमोकळेपणानें देवाचें नांव झालें तरी तालसुरांत प्रकटपणें कोण गाऊं देणार ?

तशांत त्याचें जिवाभावाचें विश्रामस्थान असा त्याचा तो आवडता गांधीजींचा अर्धपुतळाही त्याचें सांत्वन करायला त्याच्यापाशीं नव्हता. तो तुरुंगांत आला त्या वेळीं त्याची कातडी बॅग सर्व सामानासह तुरुंगाच्या नियमाप्रमाणें कैद्यांच्या सामानाच्या कोठडींत टाकून ठेवण्यांत आली होती. गांधीजींचा अर्धपुतळाही त्या सामानाबरोबर त्या कोठडींत बंदिवासांत पडला होता. पहिल्या दिवशीं त्यानें तो अर्धपुतळा जेलरपाशीं मागितला. त्याला तुरुंगवासाचा अनुभव नव्हता. तो माणसासारखा तुरुंगांत वागूं पाहत होता. पण तुरुंग हें समाजांतील माणुसकीचें थडगें उभारलेलें असतें या कटु सत्याची पहिली झळ त्याला त्या पुतळ्याच्या निमित्तानेंच लागली. पुतळा तर त्याला आपल्याबरोबर तुरुंगाच्या कोठडींत न्यायला मिळाला नाहींच, पण त्याऐवजीं त्याला जेलरचे व तुरुंगाच्या जमादाराचे शिव्याशाप व दोन दंडुके मात्र खावे लागले.

ते दिवस गांधीजींच्या सत्याग्रह चळवळीच्या पूर्वरंगाचे होते. बळी राजाचें विराट राज्य पादाक्रांत करण्याच्या हेतूनें अवघें त्रिपादभूमीचें क्षुद्र दान मागायला आलेल्या बटु वामनासारखे गांधीजी तेव्हां सरकारला आपला भयंकर शत्रू वाटूं लागले होते.

तथापि आज हरकिसन जीवन्मुक्तासारखा तुरुंगांतील तीं सारीं बंधनें विसरून समोरच्या बराकींतून ऐकूं येणाऱ्या भूपाळीच्या तालसुरावर ती भूपाळी आपल्या मनाशीं मोठ्यानें सुस्वरांत गुणगुणूं लागलाः—

**जागिये रघुनाथ कुँवर पंछी बन बोले ॥ टेक ॥**
**चंद्रकिरण शीतल भई चकई पियमिलन गई,**
**त्रिविध मंद चलत पवन पल्लव द्रुम डोले ॥ १ ॥**

प्रातभानु प्रगट भयो रजनीको तिमिर गयो
भृंग करत गुंजगान कमलन दल खोले ॥ २ ॥
ब्रम्हादिक धरत ध्यान सुरनरमुनि करत गान
जागनकी बेर भई.........

एकदम त्याला ऐकूं येणारे भूपाळीचे सुस्वर 'जागनकी बेर भई' या अर्ध्या चरणावर थांबले. त्यासरसा हरकिसन खाड्कन् तंद्रींतून जागा झाल्यासारखा डोळे उघडून कान टंवकारून भिरभिरत्या नजरेनें त्या बराकीकडे पाहूं लागला.

बाहेर अजून रात्र होती. आणि रात्र नसती तरीदेखील समोरची बराक त्याला आपल्या खोलींतून दिसली नसती. तरीदेखील त्याचें मन त्या कडी-कुलुपाचीं व कडेकोट बंदोबस्ताचीं सारीं बंधनें झुगारून देऊन वातावरणांत अकस्मात् विलीन झालेल्या त्या भूपाळीच्या आलापांचा मागोवा घेत त्या खोलीपावेतों उड्डाण करून गेलें.

त्याच्या खोलींतील त्याचे दोघे साथी कैदी उठून दरवाजापाशीं आले व त्याच्यासारखाच कानोसा घेत एकमेकांशीं कुजबुजले :

"आपले बाबा रामचंद्र गात होते वाटतें ?"

"होय. पण ते असे एकाएकीं कां थांबले न कळे."

"त्यांना या तुरुंगांत आणून ठेवलें आहे वाटतें ?..."

हरकिसननें त्या दोघांची कुजबूज ऐकली पण तिकडे लक्ष दिलें नाहीं. त्याचा जीव त्याच चिंतेंत गुरफटून गेला होता.

"बाबूजी ! आपले बाबा या तुरुंगांत आले आहेत वाटतें ? रामजीनें कृपा करून त्यांना या बराकींत आणून ठेवायची वासना जेलरला दिली असती तर किती चांगलें झालें असतें !"

हरकिसननें त्याला हातानें न बोलण्याची खूण केली. त्याचें मन, त्याचे कान समोरच्या बराकींतील रामचंद्रबाबाच्या कोठडीकडे लढाऊ वृत्तीनें ओढ घेत होते.

ते दोघेही कैदी पुन्हा माघारीं जाऊन आपल्या तरटाच्या बिछान्यावर बसले. रोजच्या सकाळच्या गणतीची वेळ झाली होती. गणतीसाठीं व्यव-

स्थितपणें उठून न बसणाऱ्या कैद्यांना शिपायाकडून शिव्याशाप व वेळीं एखाद दुसरा दंडुका किंवा लाथबुक्कीही खावी लागते ह्या इतक्या दिवसांच्या अनुभवानें ते शहाणे झाले होते.

" बाबा तुरुंगांत आले आणि आपले किसान काय हात जोडून स्वस्थ बसले आहेत ? कीं हरणाचीं काळजें त्यांच्या उरीं शिरलीं आहेत ? प्रतापगडच्या आमच्या एकजुटीच्या मर्दुमकीवर ह्या रायबरेलीच्या भागूबाई किसानांनीं बोळा फिरविला. " नूरमहंमद हरकिसनला उद्देशून म्हणाला, " बाबूजी ! आज तुम्ही रामजीच्या कृपेनें सुटून गेलांत कीं, इथल्या आमच्या किसानांना जरा हांक मारून जागे करा. त्यांना म्हणावें, तुम्ही जिवंत असतांना बाबाच्या कपाळीं तुरुंगवास येतो, याचा अर्थ काय ? "

तोंच एकदम त्यांना रामचंद्रबाबाचा ओळखीचा परवल मेघगर्जनेसारखा ऐकूं आला : ' सी ता रा म '

ते दोघेही कान टवकारून ऐकूं लागले.

" बाबाजी आपणाला हांक मारीत आहेत " असें उद्‌गारत हरकिसननें खड्या आवाजांत साथ दिली, " सी ता रा म "

' सीताराम ' अशी उत्साहानें घोषणा करीत ते दोघे कैदी उठून खोलीच्या दरवाजांत हरकिसनच्या शेजारीं येऊन उभे राहिले. खोलीचा दरवाजा बंद आहे व आपण खोलींत बंदिवान आहोंत हें पूर्ण माहीत असूनही त्यांनीं जणूं काय हिसड्यासरसे तुरुंगाचे दरवाजे फोडून बाबांच्या हांकेला धांवून जाऊं अशा आवेशानें दरवाजाला जोराचे धक्के दिले.

' सीताराम ' या गर्जनेनें हरकिसन अत्यंत अस्वस्थ झाला. त्याला बाहेर काय चाललें आहे तें दिसत नव्हतें, तरी देखील एकदम मध्येंच थांबलेले ते रामचंद्रबाबाच्या भूपाळीचे गोड आलाप, गंभीर स्वरांत त्यांनीं आपल्या नेहमींच्या परिपाठाप्रमाणें ' सीताराम ' या परवलानें दिलेलें आव्हान, व त्या आव्हानाला तितक्याच उत्साहानें तुरुंगांत बंदिवान होऊन पडलेल्या किसानांनीं ' सीताराम ' या गर्जनेनें दिलेली साथ, असा त्याच्या परिचयाच्या पवित्र किसानगंगेला महापूर आलेला पाहून त्या महापुरांत उडी घेण्यासाठीं तो कमालीचा अधीर

झाला. त्याचें अंतःकरण कोठडीबाहेर रामचंद्रबाबाकडे जाण्यासाठीं वेगानें ओढ घेऊं लागलें. त्याला आपल्या पार्थिव शरीराची आडकाठी अगदीं असह्य झाली. आपणावरच तो मनस्वी चिडला; व खोलीच्या दरवाजाचे लोखंडी गज दोन्ही हातांनीं घट्ट धरून त्राग्यानें आपले ओठ जखमी होण्याइतक्या आवेशानें चावीत त्यानें त्या गजांवर तीन चारदां जोराजोरानें कपाळ आपटलें. त्या वेदनांनीं त्याला आपला दुःखभार आगीनें आग जाळावी तसा जरा हलका झाल्यासारखा वाटला. त्यानें सहज कपाळावरून हात फिरवून पाहिला तों हाताला कांहींतरी ओलें लागल्यासारखें त्याला वाटलें. सज्जांतील दिव्याचीं मंद प्रकाशकिरणें कोठडीच्या दरवाजावर तिरपीं ओझरतीं फांकलीं होतीं. त्या प्रकाशांत त्यानें आपला हात न्याहळून पाहिला. तों त्याला हातावर रक्ताचे डाग दिसले. त्याच्या कपाळाला गजांवर आपटून झालेल्या जखमेच्या रक्ताचे ते डाग होते.

पूर्वीचा तो तरुण शीख कैदी वॉर्डर तेवढ्यांत पुन्हा तिथें आला. तो हरकिसनच्या हाताकडे आणि कपाळाकडे पाहून त्याला म्हणाला, " बाबूजी ! कसली जखम झाली तुमच्या कपाळाला ? "

हरकिसननें त्या प्रश्नाला उत्तर देण्याची टाळाटाळ करीत पुन्हा एकवार कपाळावरून हात फिरवून ते रक्ताचे ओघळ केसांना पुशीत त्या वॉर्डरकडे पाहून विचारलें, " सरदारजी ! तुम्ही इकडे कुठें ? "

" तुमच्या–आमच्यासारख्या लोकांना आजकालच्या इंग्रजी राजवटीच्या जमान्यांत तुरुंगघर अथवा फांशीघर हींच आसऱ्याचीं ठिकाणें आहेत बाबूजी ! आपले मार्ग भिन्न असले तरी ते अखेर एकाच मुक्कामाला येऊन मिळायचे. " तो तरुण शीख वॉर्डर रात्रपाळीच्या जमादाराची चाहूल ऐकून सावधान वृत्तीनें तिकडे पाहत म्हणाला, " जमादार आला बाबूजी ! वेळ मिळाला तर मी पुन्हा येईन. "

तो तरुण शीख वॉर्डर पहांटेच्या पहाऱ्याचें मिष करून हातांतील कंदिलानें एकेका कोठडीच्या गजांतून आंत प्रकाश पाडून आंतील कैद्यांवर देखरेख करीत पुढें चालला.

" हा इथें कसा ? कसल्या गुन्ह्याबद्दल याला शिक्षा झाली ? " असें स्वतःशीं विचारीत हरकिसननें गजांतून दोन्ही टोकांना दूरवर जितकी

नजर फेकतां येईल तितकी फेकून पाहिलें. तुरुंगाचे रीतिरिवाज दोन वर्षांच्या तुरुंगवासानें हरकिसनला आतां बरेच माहिती झाले होते. शिक्षा होऊन तुरुंगांत आलेल्या कैद्याला एकदम वॉचमन किंवा वॉर्डर नेमीत नाहींत हें त्याला माहीत होतें. तसेंच कमी शिक्षा झालेल्या कैद्याला वॉचमन किंवा वॉर्डर होण्याची संधीच मिळत नाहीं हेंही तो जाणून होता. कहानसिंगच्या डोक्यावर कैदी वॉर्डरची पिवळी पगडी पाहून याला बऱ्याच दिवसांपूर्वी शिक्षा झाली असली पाहिजे व तीही चांगली लांब मुदतीची असली पाहिजे एवढें त्यानें हेरलें.

पण तरी देखील त्याला हें कळेना कीं, इतके दिवस आपणाला सरदारजी तुरुंगांत मुळींच कसे नाहीं आढळले? वॉचमन म्हणून, वॉर्डर म्हणून कोणत्याच नात्यानें केव्हांच कसे नाहीं आढळले?

कहानसिंगला पाहतांच 'हा इथें कसा?' या प्रश्नासरसा तुरुंगांतील जीवनाचा हा शोक–चित्रपट त्याच्या अंतश्चक्षूंपुढें झरझर येऊन गेला. त्या चित्रपटांत त्याच्याशीं संबंध आलेले तुरुंगांतील सारे वॉचमन, वॉर्डर त्याच्याशीं गोडीनें वागणारे सज्जन कैदी व ज्याच्या त्याच्याशीं अकारण तंटाभांडण करून बखेडे माजवणारे निर्ढावलेले बदमाष कैदीही येऊन गेले. रामचंद्रबाबाच्या शिकवणीनें जागे होऊन किसान चळवळीची धुरा वाहण्यासाठीं झटणारे किसान कार्यकर्तेही येऊन गेले.

तसेंच गेल्या दीडदोन वर्षांत हिंदुस्थानांतील राजकीय आंदोलनांत त्या अयोध्या–संयुक्त प्रांताच्या टापूंत महात्माजींच्या आदेशानुसार स्वयंस्फूर्तीनें भाग घेणारे अथवा आपद्धर्म म्हणून त्या चळवळींत खेंचले गेलेले कितीतरी लहानमोठे, खरेखोटे, पांढरपेशे कार्यकर्तेही त्याला तुरुंगांत पाहायला मिळाले.

पण एवढ्या मंडळींत त्याला कहानसिंग यापूर्वी कधींच कुठें आढळला नव्हता. तो गांधींचा अनुयायी नव्हता खरा; पण पंजाबांतील 'गद्दर' पक्षाचा सदस्य तर होता! त्याच्यासारखे दहशतवादी तरुण कट, दरोडे, खून असल्या राजकीय गुन्ह्यांसाठीं तुरुंगांत आलेले त्यानें अनेक पाहिले होते. पण त्यांतही त्याला कहानसिंग कधी आढळला

नव्हता. अथवा त्याची कहाणीही त्यानें कधीं कुणाच्या तोंडून ऐकली नव्हती.

नूरमहंमद व गंगाप्रसाद हे हरकिसनच्या कोठडींतील दुसरे दोघे कैदी कहानसिंगचे आतांचे उद्गार ऐकून आपसांत विचार करीत होते,—" चार दिवसांपूर्वीं या तुरुंगांत आलेला अवखळ शीख वॉर्डर आपण ऐकत होतों तो हाच वाटतें ? "

कहानसिंग वॉर्डरनें नेहमींच्या रिवाजाप्रमाणें सर्व आबादी आबाद असल्याची सलामी जमादाराला दिली, व त्याच्या देखत त्याच्या समोरून दुसऱ्या बराकीचा रस्ता सुधारला.

" कैद्याला घेऊन पोलीसपार्टी बाहेर जाईपावेतों आज तुरुंग खोलायचा नाहीं. " जमादारानें आपल्या बरोबरच्या हवालदाराला सूचना दिली. समोरून कहानसिंग वॉर्डरला जातांना त्यानें पाहिलें. पण त्याच्याशीं कांहीं बोलला नाहीं.

" तसेंच आज सुटणाऱ्या कैद्यांना रोजच्यापेक्षां अर्धा तास उशीरां ऑफिसांत न्यायचें. प्रतापगडचे बदमाप किसान कैदी आपल्या तुरुंगांत आहेत. " जमादार हरकिसनच्या कोठडीसमोरून जातांना मुद्दाम आंत डोकावून पाहत म्हणाला.

जमादार आला तसा त्या बराकींतील कैद्यांच्या कोठड्यांवर नजर टाकून माघारा गेला.

तो जाईतों सर्व कैदी कोठड्यांतून आपापल्या जागीं अगदीं गप्प बसले होते. तो गेला अशी खात्री होतांच गंगाप्रसादनें हरकिसनला विचारलें, " जमादार गेला ? "

" गेला. " हरकिसन उत्तरला.

" प्रतापगडचे बदमाप किसान—आम्ही बदमाप किसान काय ? पण म्हणावें प्रतापगडच्या तुरुंगांतील शिपायांपासून सुपरिंटेंडेंटसाहेबापावेतों साऱ्या अधिकाऱ्यांना नाक मुठींत धरून नमतें घ्यायला ज्यांनीं भाग पाडलें तेच किसान उद्यां ह्या रायबरेलीचाही प्रतापगड करून दाखवितील. रामचंद्रबाबाची ताबडतोब जर सुटका झाली नाहीं— "

" मला रामचंद्रबाबाविषयींसुद्धां किंचित् शंका येते. " नूरमहंमद आपल्या तेथील दोघा सोबत्यांकडे पाहत म्हणाला.

" कां ? " गंगाप्रसादनें विचारलें. " रामचंद्रबाबा हिंदु म्हणून ? "

हिंदूविषयीं—महात्मा गांधींविषयीं देखील शंकेखोरपणानें वागणारा नूरमहंमद हा एक प्रकारचा कडवा मुसलमान आहे हें गंगाप्रसादला व हरकिसनलाही इतक्या दिवसांच्या परिचयानें माहीत झालें होतें.

" केवळ हिंदु म्हणून नव्हे तर तो श्रीमंतांच्या ओंजळीनें पाणी पितो म्हणून. " नूरमहंमद उत्तरला.

" कोणत्या श्रीमंताच्या ओंजळीनें पाणी पितात रामचंद्रबाबा ? हें बोलणें खऱ्या किसानाला शोभत नाहीं. प्रत्येक किसान हा प्रथम किसान आहे आणि हिंदु अथवा मुसलमान नंतर आहे. "

" होय. मी किसान आहें. प्रथम मी किसान आहें आणि नंतर मुसलमान आहें. "

" मग तूं बाबांविषयीं असें कां म्हणतोस ? कोणत्या श्रीमंतांचा पगडा बाबांवर आहे सांग तरी ? "

" जवाहरलाल नेहरू हे श्रीमंत नाहींत ? सहा महिन्यांपूर्वीचा आम्हां प्रतापगडच्या किसानांचा मोर्चा तुला आठवतो ? बाबांनीं कशाला म्हणून आम्हां किसानांना अलाहाबादला नेलें ? बाबांना वाटत असेल कीं, धनवान पुढाऱ्यांचें पाठबळ असल्याखेरीज आम्हां किसानांना तरणोपाय नाहीं.—"

" हा चुकीचा समज आहे तुझा नूरमहंमद ! बाबा धनवानांच्या मागून लाळ घोटणारे नाहींत.—"

इतका वेळ स्तब्धपणें त्या दोघांचें संभाषण ऐकणारा हरकिसन म्हणाला, " मीही तें ऐकलें आहे. पण नूरमहंमद ! बाबा नेहरूंपाशीं गेले असतील ते नेहरू धनवान पुढारी आहेत म्हणून नव्हे, तर ते महात्मा गांधींच्या सैन्यांतले एक तरुण शूर सेनापती शोभण्याजोगे आहेत म्हणून. नेहरू कुटुंबाची श्रीमंती तुम्हा आम्हाला दिसते. पण त्या श्रीमंतीवर तुळसीपत्र ठेवून कष्टाचें जीवन जगण्यासाठीं हे धनवान लोक महात्माजींच्या

हांकेसरसे धांवून येतांना स्वखुषीनें किती यातना भोगीत आहेत याची तुला कल्पना तरी आहे का ? गांधीजींच्या चळवळींत आपल्या राजवभवांत लोळणाऱ्या मुलाला तुरुंगवासाच्या कशा खडतर हाल अपेष्टा सोसाव्या लागतील याचा अनुभव जवाहरलालजींच्या नबाबी वृत्तीच्या वडिलांनीं कसा घेतला—"

"कसा घेतला तो आम्हाला माहीत आहे. मोतीलालजी परांच्या गाद्यांगिरद्यांवर नबाबी ऐषआरामांत लोळणारे धनकुबेर आपल्या राजवाड्यांत नुसत्या जमिनीवर झोंपण्याची तपश्चर्या करीत असत हेंच ना तूं सांगणार मला ?"

"बरें मग ?"

"मग काय ? असल्या हालअपेष्टांत, याहूनही खडतर अशा हाल अपेष्टांत आम्ही भिकारडे किसान जन्माला येतों. हाल अपेष्टांचे धक्के हेच पाळण्याचे झोके घेऊन लहानाचे मोठे होतों आणि हाल अपेष्टांतच कष्ट करतां करतां मरून जातों. तपश्चर्याच म्हणायची तर ही आमची उभा जन्म चाललेली तपश्चर्या बाबांसारख्यांना काय राजवाड्यांतल्या चार घटकेच्या तपश्चर्येपेक्षां हलकी वाटते ?"

"म्हणून का त्यांना नांवें ठेवायला तुझी जीभ धजते ?"

"त्यांना नांवें नाहीं ठेवीत मी; त्यांच्या धनवान्‌धार्जिण्या वृत्तीला नांवें ठेवतों आणि तो देखील ती धनवान्–धार्जिणी वृत्ती गांधीवेडानें वेडावलेली आहे म्हणून. तो गांधीबाबा हिंदूंचा पाठीराखा आहे. तो हिंदु जमीनदार सैतानांचा कैवार घेतो. आणि नेहरू तर गांधींचे अर्जुन आहेत. गांधी कृष्ण आणि ते अर्जुन. त्यांच्याकडे कशाला न्यायें नेहरूजींनीं किसानांना ओढीत ?"

गांधीजींवर नूरमहंमदनें अशा टीकेच्या ठिणग्या पाडलेल्या ऐकून हरकिसन रागानें लाल झाला. तो एकदम तुटून पडल्यासारखा कठोर आवाजांत त्याला म्हणाला, "हें तूं खोटें बोलतोस."

"काय ? गांधीजी हिंदूंचे कैवारी नाहींत ? हिंदु जमीनदारांचे पाठीराखे नाहींत ते ? आम्हा शेंकडों मुसलमान कूळकिसानांना पिळून

खाणाऱ्या रायसाहेब पालीवालसारख्या हिंदु जमीनदाराचे ते कैवारी नाहींत ? ”

“ नाहींत. गांधीजी हिंदु–मुसलमानांतली असली तेढ वाढवीत नसून ती भगीरथ प्रयत्नानें मिटवीत आहेत. ”

“ प्रत्येक गांधीवेडा हिंदु असेंच बोलतो. ” नूरमहंमद मिस्किलपणें ओठ मिटून घेत मर्मग्राही नजरेनें हरकिसनकडे पाहत म्हणाला.

“ गांधीवेडा तूं मला म्हण. पण लढाईवरून परत येतांच गांधीजींच्या प्रभावानें रंगलेला हिंदुमुसलमानांच्या एकीचा उदात्त देखावा दिल्लीला जो मी प्रथम पाहिला त्याचा माझ्या अंतःकरणावर उमटलेला ठसा जन्मोजन्मीं वज्रलेपासारखा अढळ राहील. गांधीजींनीं घोषित केलेल्या असहकारितेच्या व्रताचा संकल्प हिंदुमुसलमानांनीं पाठच्या भावांसारखा जुळ्या हातांनीं सोडला. हिंदुमुसलमान भाऊ भाऊ एकमेकांच्या हातून पाणी प्याले. मुसलमानांच्या मशिदींतून हिंदूंनीं लोकांना एकजुटीच्या बंधुभावाचा उपदेश केला आणि तो सर्वांनीं आदरपूर्वक मस्तकीं धारण केला—”

“ खरोखर साप आणि मुंगूस यांना गळ्यांत गळा घालून प्रेमानें खेळायला लावणारा हा महापुरुष धन्य आहे ! माझ्या रामजीचा हा नवा अवतार कलियुगांत अवतरला आहे. जय रामजी ! जय गांधीजी ! जय सीताराम ! ” असें उद्‌गारत गंगाप्रसादनें डोळे मिटून दोन्ही हात जोडले. तो कांहीं क्षण त्या समाधिमय स्थितींत आपल्या त्या आदरणीय दैवतांची मानसपूजा करण्यांत रंगून गेला.

“ साप आणि मुंगूस यांना गळ्यांत गळा घालून खेळायला लावणारा महापुरुष—”

“ मग—नाहीं ? गांधीजी हे असे महापुरुष नाहींत ? ” हरकिसननें नूरमहंमदला चिडून विचारलें.

“ मी कशाला नाहीं म्हणूं ? पण असे महापुरुष आपणाला अनेक भेटतात–साप आणि मुंगूस यांची सर्कस दाखवणारे ! पण तुमचें आमचें जीवन ही कांहीं सर्कस नव्हे. सर्कशींत साप मुंगूस गुण्यागोविंदानें

खेळतात, वाघ आणि बकरा एका थाळींत पाणी पितात, म्हणून काय देशांतले सारे मुंगूस–साप, सारे वाघ–बकरे आपला स्वभाव विसरून एकमेकांशीं मित्रांसारखे खेळीमेळीनें वागतात असें आपणाला म्हणतां येईल ? सर्कशींत दिसणारें जीवन हें खरें जीवन नव्हे." तो आव्हान दिल्यासारखा हरकिसनपुढें ताठ उभा राहून विचारूं लागला, "गांधीजींची शिकवण ही तरी एक सर्कसच नव्हे का ?..."

तोंच दुरून 'सीताराम' अशी ललकारी अचानक कानीं आली. ती ऐकतांच नूरमहंमदचा वाक्प्रवाह खोळंबला व हरकिसनच्या वाढत्या आतताई वृत्तीलाही बांध पडला. दोघेही कान टवकारून जिकडून ती ललकारी आली तिकडे वळून पाहूं लागले.

गंगाप्रसाद आपल्या ह्या दोघां अतिरेकी वृत्तीच्या सोबत्यांपेक्षां निराळ्या स्वभावाचा होता. त्याच्या स्वभावांत नूरमहंमदइतकी कुशाग्र तीव्रताही नव्हती अथवा सुजाणपणा वा हरकिसनसारखी आत्यंतिक भावनाप्रवणताही नव्हती. तो त्या दोघां सोबत्यांच्या वाग्युद्धांतून पडणाऱ्या ठिणग्यांच्या झगझगाटानें दिपून गेला होता.

'सीताराम' ही ललकारी ऐकतांच ते दोघेही एकमेकांविरुद्ध मांडलेला संग्रामाचा पवित्रा सोडून किंचित् बाजूला वळले हें पाहून त्याला जरा हायसें वाटलें. त्यानें हरकिसनकडे वळून विचारलें, "बाबूजी ! रामचंद्रबाबांचाच नव्हे का हा परवल ! इतक्या दुरून कसा ऐकूं आला ! ओळखला तुम्ही ?"

# ६

इतक्यांत वॉर्डर कहानसिंग पुन्हा माघारा आला. तो हरकिसनला म्हणाला, "बाबूजी ! आज तुम्ही सुटणार, होय ना ?"

"होय. पण सुटेन तेव्हां खरा. पण आज एवढी कसली गडबड माजून राहिली आहे तुरुंगांत ?"

"गडबड तुरुंगांत नाहीं बाबूजी ! तुरुंगाबाहेर गडबड आहे." कहानसिंग कोठडींतील नूरमहंमद व गंगाप्रसाद या दुसऱ्या दोन कैद्यांकडे पाहत उत्तरला.

त्या दोन कैद्यांना तें ऐकून राहवेना. ते दोघेही तसेच उठून उत्सुकतेनें पुढें आले. त्यांच्यांतील वैचारिक संघर्ष आतां बराच शांत झाला होता.

"बाहेर गडबड आहे ! कसली गडबड आहे बाहेर ?" नूरमहंमदनें विचारलें.

"रामचंद्रबाबानें ह्या अयोध्येच्या किसानलंकेला आग लावली ती आग भडकूं लागली आहे. ती भडकूं द्यायची नाहीं म्हणून सरकार आटोकाट खबरदारी घेतें आहे. त्याची ही गडबड. आजूबाजूच्या पुष्कळशा खेड्यांतले किसान या तुरुंगांत डांबून पडलेल्या पुढाऱ्यांना तुरुंगांतून सोडवून नेण्यासाठीं मोर्चा घेऊन तुरुंगावर चालून येण्याची तयारी करीत आहेत म्हणतात. ती धामधूम गांवांत उसळून राहिली आहे."

"सीताराम !" गंगाप्रसाद ती वार्ता ऐकून आनंदभरानें कोठडींतल्या कोठडींत उड्या मारीत मोठ्यानें ओरडला.

आजूबाजूच्या कांहीं किसानांकडून त्याला साथ मिळाली, "सीताराम !"

"थांबा. भाई हो ! अजून थोडा अवकाश आहे. एकदम अविचारानें असे उतावळे होऊं नका. लौकरच तीही वेळ येईल. नेम मारावा तर तो अचूक मारावा. पण मी असें ऐकतों कीं, गांधीवेड्या किसानांना असले हे अत्याचार पसंत नाहींत." त्यानें ओंठ चावीत हरकिसनकडे पाहत विचारलें, "मी म्हणतों हें बरोबर आहे ना बाबूजी ?"

हरकिसन त्यावर कांहींही बोलला नाहीं. नुसता त्याच्याकडे पाहून ओंठावर ओंठ दाबून गालांतल्या गालांत हंसला.

"अशी नुसती हंसण्यावारी शोभवून नेतां येण्याजोगी ही साधी गोष्ट नाहीं बाबूजी ! कोटमाप हिंदी किसानांच्या, अलम् गोरगरीब हिंदी रयतेच्या जगण्यामरण्याचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न तुम्ही आम्ही भारतमातेच्या सुपुत्रांनीं नीट जबाबदारी ओळखून सोडवला नाहीं तर आम्ही भारत-मातेचे फार मोठे गुन्हेगार ठरूं. मुंबईंत मी तुम्हाला बोललों होतों तेंच आज पुन्हा विचारतों. अजूनही तुमचा गांधीजींच्या शिकवणुकीवर अढळ विश्वास आहे ? गांधीजींच्या शिकवणुकींत देशाचा तरणोपाय आहे

असें तुम्हांला अजूनही वाटतें ? ज्या होमकुंडांत सारा पंजाब राक्षसी अंमलाखालीं जळून भस्मसात् झाला, सारा हिंदुस्थान देश ज्यांत होरपळून निघाला आहे, तुमच्या आणि तुमच्यासारख्या आणखी हजारों तरुणांच्या जीवनसर्वस्वाची होळी ज्यांत पेटली, त्या होमकुंडांतील आगीच्या ज्वाळा तुम्हाला अंधारांत दीपज्योतीसारखा प्रकाश देतील कीं त्यांत तुम्हांलाच जाळून तुमची तीन चिमट्या राख करून टाकतील ? हा विचार अजूनही तुमच्या डोक्याला शिवत नाहीं ना ? ”

शेवटचे शब्द उच्चारतांना त्यानें हरकिसनच्या दोघां कैदी सोबत्यांकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें.

“ किसान गांधीवेडा नाहीं. किसान दुसऱ्यांच्या कुबड्या घेऊन चालण्याइतका लुळापांगळा नाहीं.—गांधीजी थोर आहेत. किसानांचा माथा त्यांच्यासमोर नम्र आहे. गांधीजी आमचे वडीलधारे माणूस आहेत. पण किसान गांधी इकडे येण्याच्या पूर्वीपासून स्वतंत्रतेची वाट चालत आहेत. अयोध्येचा किसान गांधीवेडा नाहीं. ”

वॉर्डर कहानसिंग नूरमहंमदचे हे एक प्रकारचे निराळेच बाणेदार विचार ऐकून विस्मयचकित झाला. कांहीं क्षण तो त्याच्याकडे तीव्र जिज्ञासेनें टक लावून पाहत होता. त्या भरांत हरकिसन काय बोलला तें त्यानें मनावरच घेतलें नाहीं.

“ कुठचा तूं ? तुझें नांव काय ? ” कहानसिंगनें गजापाशीं तोंड नेऊन आंत पाहत नूरमहंमदला विचारलें.

“ गोरखपूरचा मी किसान. माझें नांव नूरमहंमद. कां ? ”

“ नूरमहंमद ! ” असें हलक्या उत्तेजित स्वरांत स्वतःशीं उद्गारत कहानसिंग नूरमहंमदला म्हणाला, “ असें काय ? मग इथल्या रघुनंदन हवालदाराला तूं ओळखीत असशीलच. तो देखील गोरखपूरचाच राहणारा आहे ना ? ”

“ होय. ” त्या तुरुंगांत रघुनंदन नांवाचे दोन हवालदार होते. त्यांतला कोणता रघुनंदन कहानसिंगच्या ध्यानीं आहे याचा पडताळा पाहण्यासाठीं नूरमहंमद म्हणाला, “ मागें एकदां एका कटाच्या खटल्यांत

वहिमी म्हणून पकडला गेला होता आणि मागाहून गद्दर पक्षाच्या कट-वाल्यांशीं त्याचा संबंध असल्याचें पोलिसांना पुराव्यानें शाबीत करतां आलें नाहीं, त्यामुळें निर्दोषी म्हणून सुटला तोच रघुनंदन ना ?"

"कटाचा खटला बिटला मला कांहीं माहीत नाहीं. लोक म्हणतात कीं त्या खटल्याशीं गद्दर पक्षाच्या लोकांचा संबंध होता. असेलही कदाचित्. पण तूं म्हणतोस तोच रघुनंदन. बरें, तुझी आतां आणखी किती सजा भोगायची बाकी राहिली आहे ?"

"तुरुंगांत अथवा तुरुंगाबाहेरचीं आणखी असलीं कांहीं नवीं लफडीं पोलिसांनीं आमच्या जमीनदाराच्या चिथावणीनें मागें लावलीं नाहींत तर मी—" तो बोटें घालून आपल्या शिल्लक राहिलेल्या शिक्षेची मोजदाद करीत म्हणाला, "आजपासून चार आठवड्यांनीं सुटेन."

"आणि तुझा दंड ?" गंगाप्रसादनें मध्येंच विचारलें.

"माझा दंड तोंवर भरील कोण तरी." नूरमहंमद म्हणाला.

"तुझा जमीनदार ?" कहानसिंग हंसत म्हणाला.

"जमीनदार मी फांसावर कधीं लटकतों किंवा निदान जन्मठेप काळ्या पाण्यावर कधीं जातों याची डोळ्यांत तेल घालून वाट पाहत बसला आहे."

"काय त्याचें नांव ?" हरकिसननें विचारलें.

"तो हिंदु नाहीं. गांधीबाबाचा भक्त नाहीं तो. आमचा हा जमीन-दार मौलवी सुलेमानखान. तो खादी वापरीत नाहीं, चरखा फिरवीत नाहीं कीं कांहीं नाहीं."

"आणि तरी देखील तुझा त्याच्यावर राग ? मुसलमानाचा मुसल-मानावर राग ? तुझ्याच न्यायानें मी तुला विचारतों आहें."

नूरमहंमदनें चिडून एकवार नुसतें हरकिसनकडे पाहिलें.

"मी सुद्धां आणखी नव्या एखाद्या चक्रांत सांपडलों नाहीं तर त्याच सुमाराला सुटेन असें वाटतें." कहानसिंग उद्गारला.

कहानसिंगला कोणत्या गुन्ह्याबद्दल कुठें व किती शिक्षा झाली; या तुरुंगांत तो केव्हां आला वगैरे माहिती त्याला विचारावी असें हर-

किसनच्या मनांत आलें. इतक्यांत दिवसपाळीचा जमादार येऊन तुरुं-गाच्या कोठड्यांचे दरवाजे खोलूं लागला.

" जमादार आला कोठड्या खोलायला. मी जातों आतां बाबूजी! नाहीं तर जमादार उगीचच कांहींतरी संशय घ्यायचा. " असे उद्गारत साशंक वृत्तीनें इकडे तिकडे पाहत कहानसिंग जमादाराची नजर आपणा-कडे वळण्यापूर्वीच तिथून माघारा परतला.

जमादारानें जवळचें टिप्पण काढून पाहत आज सुटणाऱ्या कैद्यांचीं नांवें आणि नंबर वाचून दाखवीत कहानसिंगला म्हटलें, " कैदी नंबर १९४१ हरकिसन. आणि कैदी नंबर २२५० भूपालसिंग त्या शेवटच्या कोठडींत काल आणून बंद करून ठेवला आहे तो. या दोघांना आणखी एका तासानें जेलरसाहेबांच्या ऑफिसांत नेऊन हजर करायचें. "

" अच्छा जमादारसाहेब ! " कहानसिंग जमादाराला शिस्तींत सलाम करून उत्तरला.

" नुसती मान किंचित् झुकवून तो सलाम स्वीकारल्याचें दर्शवीत जमादार हरकिसनच्या कोठडीपाशीं आला. हरकिसन कोठडीच्या दर-वाजांतच गजांना धरून उभा होता. त्याला त्यानें विचारलें, " काय रे ए, आतां पुन्हा नवें पांखरूं फूस लावून पळवून पुन्हा कधीं तुरुंगांत येणार ? स्वतःच्या बायका राखतां येत नाहींत आणि लोकांच्या बायकांच्या मागें लागतात साले बदमाष! चांगली काळ्या पाण्याची सजा ठोठावली पाहिजे एकेकाला ! "

एवढें बोलून जमादार त्या कोठडीचें कुलूप काढून बाकीच्या कोठड्या खोलण्यासाठीं पुढें चालला.

आधींच जखमी झालेला पक्षी जीव बचावण्यासाठीं झाडाच्या फांदी-वर अंग चोरून बसलेला असावा व तेवढ्यांत पारध्याचा बाण त्याच्या शरीरांत घुसावा तसे जमादाराचे ते वाग्बाण हरकिसनच्या हृदयांत अगदीं खोल जाऊन रुतून बसले.

" ठीक आहे म्हणावें ! लौकरच वेळ येईल तेव्हां पाहून घेऊं. जुलमी सरकारी अंमलावर शेणांतल्या शेणकिड्यांसारखीं पोसलेलीं हीं

भिकारडीं बांडगुळें प्रथम छाटून टाकायला हवींत–काय समजलास गंगा ? " नूरमहंमद रागानें म्हणाला.

" पण केव्हां ? " गंगाप्रसादनें विचारलें.

" लौकरच. अल्लाची मेहेरबानी झाली तर आज उद्यां देखील. " नूरमहंमद आपला बिछाना व थाळी टमरेल घेऊन रानांत बाहेरफैलावर जाण्यासाठीं कोठडी बाहेर पडतां पडतां हरकिसनचा निरोप घेत म्हणाला, " बाबूजी ! आम्ही जातों आतां आमच्या कामावर. काय कमीजास्त बोललों असलों तर माफ करा. अल्लाची मेहेरबानी झाली तर आपण भेटूं पुन्हा लौकरच. "

" कुठें भेट होईल आपली ? " हरकिसननें सर्व राग विसरून नूर-महंमदचा हात लडिवाळपणें हातीं घेत कंठीं गहिंवर दाटून आलेल्या घोगऱ्या स्वरांत विचारलें.

" अल्लाची मेहेरबानी झाली तर आज उद्यांसुद्धां आपली भेट होणार नाहीं कशावरून ? महापूर आला कीं त्यांत उडी घालायची आणि पोहून पैलतीराला जायचें. "

त्यानें बोलतां बोलतां गंगाप्रसादकडे सूचक नेत्रकटाक्ष फेंकला. गंगा-प्रसादनेंही तशाच सूचक नेत्रकटाक्षांनीं त्याला साथ दिली.

थोड्याच वेळांत ती बराक अगदीं रिकामी झाली. हरकिसन कोठडी-बाहेर येऊन वैराण वाळवंटांत वणवण भटकत असल्यासारखा पुढें काय याचा विचार करीत मंद पावलें टाकीत फिरूं लागला. आपणाबरोबर आज सुटणारा कैदी भूपालसिंग कुठें आहे हें पाहण्याची जिज्ञासा, साह-जिकच त्याच्या मनांत डोकावूं लागली. त्या जिज्ञासेमागें गंभीर रहस्यपूर्ण इतिहास होता तो त्याला आठवूं लागला.

तोच भूपालसिंग हाच असेल का असें मनाशीं म्हणत तो शेवटच्या कोठडीपाशीं जातो तोंच त्या कोठडींतून एक मध्यम वयाचा पुरभय्या माणूस कोठडीच्या दरवाजांत येऊन उभा राहिला.

" तोच हा ! " हरकिसन त्या माणसाला पाहतांच आपल्या मनाशीं म्हणाला व एक दीर्घ उसासा सोडून चक्काचूर झालेल्या अंतःकरणानें आपल्या पावलांकडे पाहत खालीं मान घालून अडखळत्या मंद गतीनें चालूं लागला.

तो लढाईवरून माघारा आला त्या दिवशीं मुंबईत गोकुळनिवासांत गिरिधरलाल बँकरच्या नांवानें आलेली एक तार रामप्यारीनें त्याच्याकडून वाचून घेतली होती. त्या तारेंत खरेदी केलेला माल घेऊन भूपालसिंग मुंबईला येत आहे असा मजकूर होता. तो राक्षस भूपालसिंग हाच, आणि आपल्या विरुद्ध खोटी साक्ष देऊन आपणाला हकनाहक तुरुंगांत लोटणारा सैतानही हाच अशी त्याची खात्री होऊन चुकली.

"जग हा केवळ असत्यानें बुजबजलेला चोरांचा बाजार आहे. सत्याला या जगांत थाराच नाहीं का? जगांतल्या प्रत्येक माणसाचे पाय ह्या भूपालसिंगासारखे पापानेंच भरले आहेत का? जग हा काय केवळ अशा दुष्ट कावळ्यांचाच दरबार आहे?" असें मनाला विचारीत तो स्वतःशीं हंसला. या दुर्जनांच्या कृष्णकारस्थानांत आपल्या जीवनसर्वस्वाचें कसें भीषण हंसें झालें याच्या एकीहून एक दारुण आठवणी त्याच्या स्मृतिपटलावर भुतासारख्या नाचूं लागल्या. रामप्यारीला फूस लावून पळवून कुमार्गाला लावल्याबद्दल त्याच्याविरुद्ध जो बेमालूम बनावट खटला उभा केला आणि त्या खटल्यांत त्याच्यावर आरोपाची शाबिती करून तुरुंगांत लोटलें त्या खटल्याचें भयंकर दृश्य भूपालसिंगला पाहतांच त्याच्या अंतश्चक्षूपुढें मूर्तिमंत उभें राहिलें.

"नाहीं! नाहीं!—रामप्यारी! तूं माझ्यावर निव्वळ खोटा आळ घेतलास. लफंग्या सैतानांच्या नादीं लागून तूं हकनाहक साता जन्मांच्या वैरिणीसारखा माझ्या गळ्याला फांस लावलास. तुला परमेश्वर कधींही क्षमा करणार नाहीं.—आणि भूपालसिंग! पापाच्या चिखलांत अष्टौप्रहर लोळणाऱ्या कंगाल कुत्र्या! तुलाही याच जन्मीं तुझ्या पापाचीं फळें भोगावीं लागतील ...." हरकिसन दांतओठ खात स्वतःशीं उद्गारला.

## ७

"नमस्ते बाबूजी! तुम्ही मला ओळखलें का?" भूपालसिंग हरकिसनकडे पाहात उद्गारला.

हरकिसन इच्छा नसतांही मानेनें होकार देत पण भूपालसिंगकडे न पाहतांच मागें वळून आपल्या कोठडीकडे चालला. भूपालसिंग त्याच्या कोठडीपुढें येऊन उभा राहत म्हणाला, "बाबूजी! तुम्हाला माझा अगदीं तिटकारा वाटावा हें साहजिक आहे. पण त्या बाबतींत माझी कर्मकथा जर तुम्ही ऐकली तर तुम्हालाहि या भूपालसिंगची कींव करावीशी वाटेल. रायसाहेब जमीनदाराच्या मसलतीनें माताप्रसाद कोतवालाच्या कारवाईमुळें अभावितपणें तुमच्या टाळक्यांत कोसळलेला काळा फत्तर मी आहें हें तर खरेंच. पण फत्तरासारखाच तेव्हां मी अगदीं निर्बुद्ध होतों. माणसांत जमा नव्हती तेव्हां माझी. जगांतील माणुसकीविरुद्ध माझा असा मारेकऱ्यासारखा उपयोग करणारा तो रायसाहेब पालीवाल आमचा जमीनदार, तो आपल्या कर्मांनीं मृत्यूच्या दाढेखालीं चेंगरला गेलेला अमृतसरचा कोतवाल बलभीमसिंग, आणि निर्ढावलेला अट्टल गुन्हेगार असून शिष्टसावासारखा साळसूदपणें अधिकाराच्या तोऱ्यांत उजळ माथ्यानें समाजांत वावरणारा तो माताप्रसाद ह्या साळसूदपणाचें कातडें पांघरलेल्या क्रूर लांडग्यांची खरी ओळख मला शारदामाईवर त्यांनीं घोरपड आणली तेव्हां झाली..."

त्याला तो पश्चात्तापाचा आवेग सहन होईना. त्याचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरून आले. जीभ तोंडांतल्या तोंडांत ठेंचाळल्यासारखी मलूल होऊन पडली.

शारदेचें नांव निघतांच हरकिसनच्या सर्वांगांतून जणूं वीज सळसळून गेली. ध्येयप्रधान माणसाला प्राणाहूनही प्रिय असलेलें परमोच्च ध्येय त्याच्या कार्यक्षमतेच्या कक्षेपलीकडे किती तरी दूर अंतराळांतल्या ध्रुव ताऱ्यासारखें दुष्प्राप्य असतें, हें जाणूनही ध्येयप्रधान माणूस त्या ध्येयप्राप्तीसाठीं जिवाचें रान करीत सद्भावनेनें कष्टत असतो व त्या कष्टाच्या वेदनांनाच सुखसंवेदना मानून त्यांत रंगून गेलेला असतो. हरकिसनची शारदेच्या बाबतींत अगदीं अशीच अवस्था होती. ती त्याला व तो तिला दोघेंही एकमेकांना प्राणापेक्षांही प्यार होतीं. दोघेंही एकमेकांच्या जीवनांत मिसळून

एकजीव होऊन जाण्यासाठीं तळमळत होतीं. पण उभ्या आयुष्यांत आपण एकमेकांच्या जीवनांत एकत्र येऊं शकणार नाहीं हें त्या दोघांनाही पूर्ण माहीत होतें. जीवनगंगा खवळून दोन गगनचुंबी डोंगरदरडींमधून खळखळ वाहते आहे आणि त्या दोन दरडींवरून हे दोन जीव एकमेकांना भेटण्यासाठीं आतुरतेनें धांवा टाकीत धांवत आहेत. दोघेही एकमेकांना पाहत आहेत, दोघेंही एकमेकांशीं बोलत आहेत पण धूसरतेचे ढग मध्येंच तरळत उभे राहून त्यांना एकमेकांचें दर्शन घेऊं देत नाहींत; आणि जीवनगंगेच्या खळखळाटांत त्यांना एकमेकांशीं बोललेलें ऐकूं येत नाहीं. –अशा विचित्र विस्मयजनक जीवनयात्रेचे ते दोघे प्रवासी होते.

भूपालसिंगनें शारदेची आठवण करून देतांच आपल्या जीवनांतील कधींही न संपणारा प्रवासच आपण करतों आहों अशा हळव्या भावनेनें तो मनांतल्या मनांत कळवळून हांक मारूं लागला, " शारदा ! तूं कुठें आहेस ? "

आणि शारदाही आपणाला तशाच कातर स्वरानें बाहते आहे असें त्याला वाटलें.

" कुठें आहे शारदा आतां ? "

" ती कुठें आहे कोण जाणे ! "

" पुन्हा जर ती त्या लांडग्यांच्या तावडींत सांपडली–अरण्याहूनही भयाण अशा ह्या विराट जगांत असल्या हिंस्र पशूंच्या गराड्यांत वैधव्यानें जायबंदी झालेला तो निराधार, अनाथ, दुबळा जीव कसा टिकाव धरणार ? "

" कसा टिकाव धरणार ? माझी शारदामाई मरेल पण अब्रू राखील. मी तुमच्यापाशीं बोलणार नव्हतों. तुमची माझी आयुष्यांत फिरून कधीं गांठ पडेल आणि तुमच्याशीं बोलायची संधी मिळेल अशी मला मुळींच आशा नव्हती. पण आतां योगायोगानें गांठ पडली आहे. तीच एक गोष्ट मी तुमच्यापासून चोरून कशाला ठेवूं बाबूजी ? "

" शारदा सध्यां अब्रूनें आणि जीवितानें सुरक्षित आहे असें तूं कशा-वरून म्हणतेस ? " हरकिसननें अधीरेपणानें विचारलें. भूपालसिंग पश्चा-

त्तापपूर्वक आपलें अंतःकरण त्याच्यापुढें अगदीं सताड उघडें करून बोलत होता. पण हरकिसनला तो सारा जामदारखाना पाहायला नको होता. त्या जामदारखान्यांतील एकच अमोल चीज त्याला पाहिजे होती.—शारदेच्या क्षेमकुशलाखेरीज दुसरें तिसरें त्याला कांहींही नको होतें. त्याला भूपालसिंगाचें तें खुल्या हृदयाचें ऐसपैस बोलणें कापूसपिंजणीसारखें कंटाळवाणें वाटूं लागलें, म्हणून त्यानें त्याला सौम्य सूचक शब्दांत हटकून मूळ पदावर आणलें.

" तेंच–तेंच मी तुम्हाला सांगत होतों. तुमच्यासाठीं शारदामाईनें ह्या उघड्या जगांत एकाकी झगडण्याकरितां उडी घेतांना बहुमोलाचे दोन शब्द माझ्यापाशीं देऊन ठेवले आहेत. ' शारदा कुठेंही, कशीही, कोणत्याही परिस्थितींत असली तरी ती जिवंत आहे ह्याचाच अर्थ ती शरीरानें आणि मनानें पवित्र आहे. ती मेली तर मग काय? आपण मेलें आणि जग बुडालें. कधीं काळीं तुला जर हरकिसनजी भेटले तर त्यांना हा माझा निरोप सांगून नमस्कार सांग.' असें तिनें मी तुरुंगांत येण्यापूर्वी भेटल्यावेळीं माझ्यापाशीं सांगितलें होतें."

हरकिसनच्या अंतःकरणांत थोड्या वेळापूर्वी धुमसूं लागलेला तिरस्काराचा अग्नि या पवित्र जलसिंचनानें विझूं लागला. संताप निवाला. अंतःकरणांतील त्याची जागा अनुकंपेनें घेतली. कांहींशा अतृप्त शांत वृत्तीनें त्यानें भूपालसिंगला म्हटलें, " उभा किती वेळ राहशील? ये, बैस इथें."

" नाहीं बाबूजी! आधीं मला तुम्ही क्षमा केली असें म्हणा. तरच तुमच्या पायांपाशीं बसायला तरी मी लायख ठरेन." भूपालसिंग जोडल्या हातांनीं पुन्हा विनवूं लागला.

" माणूस माणसाला क्षमा काय करणार भूपालसिंग? एकादशीच्या घरीं शिवरात्र पाहुणी आली तर तिची कसली संभावना होणार तिथें? तूं आणि मी दोघेही एकाच फुटक्या बोटींत बसून आयुष्याच्या प्रवासाला निघालेले प्रवासी आहों. तूं आतां सांगितलेंस त्यावरून मी म्हणतों, तुझ्या माझ्या जीवनाचे जाळून कोळसे करणारे अरेराव एकच आहेत. मी तुला क्षमा कसली करणार?..."

तो भूपालसिंगशीं बोलत असतां त्याचें मन गांधीजींविषयींच्या अनुरागपूर्ण निरुत्तर वृत्तीनें त्याला विचारीत होतें, "महात्माजीनीं तरी या रायसाहेब पालीवालसारख्या कर्मचांडाळ मस्त अरेरावांना कां म्हणून पाठीशीं घालावें? महात्माजी ह्या सापांच्या सोनेरी कांतीला भुलून फसतात आणि त्यांना कोमल फुलांच्या हारासारखे आपल्या पायापाशीं थोर मनानें थारा देतात. पण हे साप आमचें रक्त पिऊन पोसून आपल्या कावेबाज करणीनें महात्माजींना भुरळ पाडतात. कधीं येणार हें महात्माजींच्या ध्यानीं?— नूरमहंमद चिडून बोलला तें कडू असलें तरी खरें होतें तें. वज्रासारखें कठोर व तरवारीच्या धारेसारखें तिखट कटुसत्य होतें तें..."

भूपालसिंग हरकिसनच्या पायांना स्पर्श करून गहिंवरून म्हणाला, "तसें नाहीं बाबूजी! आपण एकाच फुटक्या बोटींतून प्रवासाला निघालों आहोंत खरें. या प्रवासांत श्री रामजीच्या हनुमानजीसारखी तुमच्या पायापाशीं बसून तुमची सेवा करायला तरी मला पात्र ठरवा. अगोदर मला क्षमा केली म्हणा."

"बरें, तुला क्षमा केली आहे. आतां पुरे कर हा वेडेपणा आणि बैस खालीं." असें म्हणून हरकिसननें भूपालसिंगच्या दोन्ही दंडांना धरून त्याला आपल्या शेजारीं बसवून घेतलें.

बराच वेळ पावेतों ते दोघेही एकमेकांशीं कांहीं बोलले नाहींत. हरकिसन भूपालसिंगकडे टक लावून पाहत होता. भूपालसिंगच्या नेत्रांतून अश्रू झरत होतो. जणूं काय त्याच्या अंतःकरणांतील विकल्प, दुर्वासना, दुष्कृतांचें पूर्वसंचित हें सारें अमंगल अनुतापाच्या आंचेनें वितळून अश्रूंच्या रूपानें वाहून जात होतें.

अनुतापानें कंठीं दाटून आलेला गहिंवर ओसरला, तेव्हां उरलासुरला गहिंवर एका आवंढ्यासरसा गिळीत भूपालसिंग हरकिसनकडे पाहून उद्गारला, "बाबूजी! श्री रामजीच्या पवित्र चरणांच्या स्पर्शानें पापाचरणामुळें शिला होऊन पडलेल्या अहल्येचा उद्धार झाला, तसा तुमच्या दर्शनानें आज मी उद्धरून गेलों आहें. काय हा योगायोग पाहा.— तुम्ही आणि मी आज एकाच दिवशीं सुटावे आणि तें देखील ऐन रणशिंग फुंकलें जात असतांना— "

एवढ्यांत जेलरच्या कचेरींतील शिपाई त्यांना नेण्यासाठीं आला.

"चला आतां नव्या जगांत!" असें म्हणून भूपालसिंग आपलें भाषण आवरतें घेऊन उठला. तरटघोंगडीचा बिछाना, थाळी, टमरेल हा आपला तुरुंगांतला संसार घेऊन ते दोघेही त्या शिपायाबरोबर जेलरच्या कचेरीकडे निघाले.

जातां जातां तुरुंगाबाहेरील गर्दीतून जयघोष झालेला हरकिसनला ऐकूं आला. 'महात्मा गांधी की जय!'

हरकिसनला तो जयघोष आपल्या अंतःकरणावर चैतन्यदायी सुधाकुंभ ओतल्यासारखा वाटला. त्याच्या करपलेल्या जीवनवृक्षाला नवी पालवी फुटूं लागली.

## ८

ते दोघे प्रसन्न वृत्तीनें जेलरच्या कचेरींत जाऊन पोहोंचले. तों तिथें चंद्रमोहन आपले तुरुंगांतील कैदी कपडे बदलून घरचे कपडे धारण करतांना त्यांना आढळला.

"वकीलसाहेब आज सुटणार वाटतें!" हरकिसन भूपालसिंगाच्या कानांत कुजबुजला.

बाहेर महात्मा गांधींचा जयजयकार चाललेला अधून मधून ऐकूं येत होता. वारा पिऊन वासरूं फुरारतें तसा त्या जयघोषाच्या मंगल श्रवणानें फुरारलेला चंद्रमोहन कपडे करतां करतां जेलरच्या पलीकडे बसलेल्या तुरुंगाच्या हेडक्लार्कला विचारूं लागला, "माझा दंड केव्हां भरला गेला?"

"तुझ्या सुटकेचा हुकूम आमच्या हातीं पडल्याप्रमाणें ताबडतोब तुझी सुटका करण्यांत येत आहे." जेलरनें त्याच्याहीपेक्षां ताठर स्वरांत हुकमतीच्या भाषेंत उत्तर दिलें.

हेडक्लार्क कांहींच बोलला नाहीं.

चंद्रमोहन तें उत्तर ऐकून मनांत खजील झाला. पण बाह्यात्कारी बेफिकीरपणाचें अवसान आणून उत्तरला, "ठीक आहे. बरें माझा चरखा कुठें आहे?"

" चरखा वापरणें बेकायदेशीर आहे. तुझा चरखा जप्त करण्यांत आला आहे. तो तुला मिळणार नाहीं. हा अकबरपूरचा गांधी आश्रम नव्हे. नीट ध्यानांत ठेव." असें तिटकारून उत्तर देत जेलर सुपरिंटेंडेंटचें बोलावणें आल्यावरून तिकडे निघून गेला.

" गांधी आश्रम नसला तर बनेल. लौकरच आम्ही ह्या तुरुंगाचा गांधी आश्रम बनवूं आणि तुम्हा सरकारी नोकरांना चरखा फिरवीत बसायला लावूं. " जेलर दूर गेला असें पाहून चंद्रमोहन शौर्यानें उद्गारला व आपले कपडे करूं लागला.

" हूं ! चला ! घ्या आपापले कपडे. कैदी नंबर १९४१ हरकिसन. कैदी नंबर २२५० भूपालसिंग–हे पाहा तुमचे कपडे " शिपायानें समोरच्या खोलींतून धुळीनें भरलेली व जळमटें सांचलेली एक बॅग हलकीशी लाथ मारून दूर लोटीत म्हटलें, " कैदी नंबर १९४१ ! उचल हें तुझें सामान. " तसाच तो एक लहानसें कपड्याचें गाठोडें धुळीनें बरबटलेलें लाथेनें फुटबॉलसारखें ठोकरून बाहेर लोटून म्हणाला, " कैदी नंबर २२५० ! हे तुझे कपडे घे. "

शिपायानें बॅगेवर मारलेली लाथ जणूं काय आपल्या छातींत बसली अशा कळवळ्यानें सर्वांग शहारल्यासारखें करीत हरकिसननें पुढें जाऊन ती बॅग घेतली व तिला कपाळ टेकून आदरपूर्वक वंदन केलें.

त्याला त्याच्या पंचप्राणांहूनही मोलाचा वाटणारा व आशियामायनरच्या रणांगणापासून जिवाच्या जतनेनें इथवर आणलेला महात्मा गांधींचा मातीचा अर्धपुतळा त्या बॅगेंत होता.

त्यानें बॅगेला बांधलेली दोरी सोडून व बॅगेचें गंजलेलें कुलूप निघेना म्हणून तें ओढून ताणून तोडून बॅग उघडली. तिच्यांतील गांधीजींचा अर्धपुतळा प्रथम उचलून घेऊन त्यानें आपल्या हृदयाशीं घट्ट कवटाळला व अश्रुपूर्ण अर्धोन्मीलित नेत्रांनीं त्याच्याकडे पाहत छातीलगत जोडल्या हातांनीं त्याला पुन्हा वंदन केलें. न जाणो शिपाई, जेलर अथवा जेलचा वॉर्डर कोणी पाहील आणि ह्या आगाळिकीबद्दल शिव्यांची

पुष्पांजली वाहील अथवा लाथ कमरेंत घालील या भयानें तो अगदीं चोरासारखा वागत होता.

त्याच्या सुदैवानें त्याच्याकडे कोणी पाहिलें नाहीं. त्यानें भीत भीत तो पुतळा फिरून तसाच बॅगेंत ठेवला व बॅगेंतील आपले कपडे बाहेर काढले, कपड्यांच्या घड्यांबरोबर प्रभावतीचा चुरगळलेला फोटोही बाहेर पडला. तो चुरगळलेला त्यानें पाहिला पण पूर्वीसारखा आदरानें उचलून घेतला नाहीं.

सुटणाऱ्या कैद्यांचें सर्व सामान देऊन होतांच खोलीला कुलूप लावून बाहेर निघालेल्या शिपायाचें त्या फोटोकडे सहज लक्ष गेलें. त्यानें तो उचलून घेऊन उत्सुकतेनें न्याहळून पाहिला व लगेच हरकिसनकडे पाहून म्हटले, "ए पागल ! शेषाच्या कन्येला मागणी घालण्यासाठीं जाणाऱ्या बेवकूफ सरड्याचाच भाऊ दिसतोस तूं. जमीनदाराच्या रंगमहालांतील गिरेंबाज रंगेल मैनांना मिठी मारायला डोमकावळा धांवला तर त्याच्या कपाळीं तुटकें खेटरच बसणार. केलेस फंद तेवढे पुरे. आतां पुन्हा तरी हे चाळे सोडून दे भाई ! जा. सुखानें कष्ट कर आणि धर्माची मीठ-भाकरी मिळवून खा जा."

मात्र एवढें बोलून पुढें जातां जातां तो फोटो आपल्या खिशांत जपून ठेवायला शिपाई विसरला नाहीं.

शंभर तुटकीं खेटरें त्या शिपायानें जरी मोजून मारलीं असतीं तरी जितकें वाईट वाटलें नसतें तितकें हरकिसनला त्या मर्मभेदक वाक्प्रहारांबद्दल वाईट वाटलें. दुःखाचा एक उसासा सोडीत त्यानें डोकीची पांढरी कैदी टोपी काढून खालीं फेकली व अंगांतला कैदी डगला काढला. डगला काढतांना गांधीजींच्या अर्धपुतळ्यावरची धूळ त्या डगल्याला चिकटलेली त्याला आढळली. तुरुंगाचा कपडा. तो तिकडे मळता, जळता, पेटता तरी त्याचें काय जाणार होतें ? पण पूज्य गांधीजींच्या अर्धपुतळ्यावरची पवित्र धूळ त्याला चिकटली होती. तो कपडा कुणाच्या हातीं जाईल; कुठच्या अपवित्र घाणींत पडेल; कुणाच्या लाथेखालीं तो तुडवला जाईल आणि तो महात्मा गांधींचा अपमान होईल.—या जाणिवेनें त्यानें आपल्या बॅगेंतील स्वच्छ हातरुमाल काढून त्या हातरुमालानें त्या कपड्यावरची धूळ एक

कणही खालीं सांडणार नाहीं इतक्या दक्षतेनें पुसून घेतली आणि तो हातरुमाल तसाच नीट जपून बॅगेंतील स्वच्छ कपड्यांच्या एका घडींत बहुमोल अलंकारासारखा झांकून ठेवला.

त्यानें बाहेर महात्मा गांधींच्या नांवाचा जयघोष मोठ्यानें चाललेला ऐकत असतांना आपले कपडे बदलले. बॅगेंतील स्वच्छ पांढरी खादी टोपी काढून ती डोकीला घातली. तोंच मागाहून कोणीतरी ती कसल्या तरी काठीच्या टोकानें दूर भिरकावून देत आहे असा भास त्याला झाला.

त्यानें एकदम चमकून मागें पाहिलें. तो जेलर आपल्या हातांतल्या छडीच्या टोकावर ती टोपी झेलीत दूर भिरकावून देत हरकिसनकडे पाहून म्हणाला, " पुन्हा तुरुंगांत यायची हौस आहे वाटतें ? "

" चला. झाले कपडे बदलून ? " तुरुंगाचा जमादार तिथें येऊन सुटणाऱ्या कैद्यांचे कपडे बदलून झालेले पाहून समोरून जात असलेल्या कहानसिंगला हांक मारून म्हणाला, " ए कहानसिंग! इकडे ये. ह्या तीन कैद्यांची चेहेरेपट्टी जेलर साहेबानीं तपासून पाहिली कीं त्यांना बडया साहेबा-पाशीं घेऊन ये. आणि हें बघ बाकीचे सुटणारे कैदी तिथें असतील त्यांत यांना मिसळूं द्यायचें नाहीं, ते सुटल्यावर यांना बडया साहेबापुढें आणायचें."

जमादाराच्या मनांतून एकट्या चंद्रमोहनला तो गांधी कैदी म्हणून इतर सुटणाऱ्या कैद्यांत मिसळूं द्यायचें नव्हतें. पण इतक्या नागव्या भाषेंत बोलणें त्याला बरें वाटलें नाहीं म्हणून तो तिघांही कैद्यांच्या बाबतींत तसें म्हणाला.

हरकिसन, भूपालसिंग व चंद्रमोहन असे तिघेच आतां कहानसिंगची वाट पाहत जेलरच्या ऑफिसाबाहेर वळचणीला मोकळ्या जागीं उभे होते. बाहेर पुन्हा महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार झालेला ऐकून हरकिसननेंही भक्तिभावानें दोन्ही हात जोडून त्या तिघांबाहेर कुणाला ऐकूं जाणार नाहीं इतक्या हलक्या स्वरांत त्या जयजयकाराचा पुनरुच्चार केला: " महात्मा गांधी की जय ! "

त्याचें ऐकून चंद्रमोहनही ओंठांतल्या ओंठांत तेंच शब्द पुटपुटला.

" वकीलसाहेब ! तुमची आज अचानक सुटका झाली ? " हरकिसन म्हणाला.

" होय. अचानक सुटका झाली. काय करावें या लोकांना कळत नाहीं ! सती जायला निघायचें आणि अंग भाजेल म्हणून मागें यायचें असल्या श्रद्धाहीन अप्रामाणिक सत्याग्रहींमुळेंच महात्मा गांधींना बोल लागतो. कुणी माझा दंड भरला न कळे. मला दंड भरून सुटका करून घ्यायची असती तर पहिल्याच दिवशीं नसता मी भरला ? बहुतेक आमच्या श्रीमती गोमतीदेवींनीं हा दंड भरला असावा."

थोड्या वेळापूर्वी दंडाच्या बाबतींत जेलरशीं आपली शब्दाशब्दी झाली तेव्हां हरकिसन आपल्या मागें उभा होता हें त्याला माहीत नव्हतें. हरकिसननेंही त्याला त्याची ओळख दिली नाहीं.

" हरकिसन ! तूं झांकलें माणिक आहेस कीं रे ! महात्माजींच्या ठायीं तुझी इतकी अढळ निष्ठा आहे हें मला माहीत नव्हतें. सुटल्यावर आतां कुठें जाणार तूं ? " चंद्रमोहननें हरकिसनला विचारलें.

" बाहेर गेल्यावर पाहूं कुठें जायचें तें. " हरकिसन खजील चोरट्या वृत्तीनें म्हणाला. तो मुळीं तुरुंगाबाहेर जायलाच शरमत होता.

" मग अकबरपूरला आमच्या गांधी आश्रमांत चल ना ! माझ्याबरोबरच चल. तुझ्यासारखे निष्ठावंत गांधीसैनिक मिळतील तेवढे आम्हाला पाहिजेच आहेत. आमच्या गोमतीदेवींना तुला पाहून कोहिनूर हिरा हातीं लागल्यासारखा आनंद होईल. सहाराच्या भयाण वाळवंटासारखा आपल्या बिचाऱ्या किसानांचा केवढा विराट प्रश्न आपल्या पुढें सोडवायचा पडला आहे. किसानांच्या जिवावरच आपली चळवळ यशस्वी होणार आहे. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देण्याचें वचन महात्माजींनीं दिलें आहे तें पूर्ण करण्यासाठीं, महात्माजींचे हात बळकट करण्याकरितां किसानांचें रान आपण उठविलें पाहिजे. घरोघर किसानाच्या झोंपडीझोंपडींतून चरखा–टकळी फिरली पाहिजे. घरोघर खादी विणली गेली पाहिजे. चरखा हें आपल्या नव्या अवतारांतील भगवान श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र आहे. हें सुदर्शन चक्र हातीं घेऊन आपणाला आपल्या भारतमातेला दास्यमुक्त करायचें आहे—हें पाहा श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र साधूंच्या परित्राणासाठीं आणि दुष्कृतांच्या विनाशासाठीं गरगर फिरूं

लागलें आहे, त्याचा हा आवाज ऐक ...... " बाहेर महात्मा गांधींच्या नांवाचा मेघगंभीर जयघोष चाललेला ऐकून चंद्रमोहन म्हणाला.

मात्र गांधीजींच्या जयजयकाराबरोबरच रामचंद्रबाबाच्या नांवाचा जयजयकार झाला, तो ऐकून त्याची चर्या कडू कारलें खाल्यासारखी कडू झाली.

इतक्यांत रघुनंदन हवालदार रानांत दगडफोडीच्या कामावर गेलेल्या त्याच्या फैलांतील कैद्यांपैकीं एक कैदी झाडावरून पडून जखमी झाला त्याला औषधोपचार करण्याकरितां घेऊन आंत आला. त्या जखमी कैद्याला उचलून आणणाऱ्या प्रेमचंद आणि गोपीचंद या दोघां कैद्यांना इस्पितळाकडे जायला सांगून तो हरकिसनपाशीं आला व म्हणाला, " आज बाहेर आग चांगलीच पेटली आहे. "

चंद्रमोहन व भूपालसिंग कान टवकारून ऐकूं लागले.

" खेडोपाडींच्या हजारों किसानांचा मोर्चा नदीच्या ऐल तीरावर जमला आहे. प्रतापगडप्रमाणेंच इथेंही हे किसान आज तुरुंगावर हल्ला करून रामचंद्रबाबाला सोडवून नेणार असा रंग दिसतो. "

" तुरुंगाबाहेर एवढी दंगल माजून राहिली आहे ती तीच का ? " चंद्रमोहननें उत्सुकतेनें मध्येंच विचारलें.

" नाहीं तर काय ? मधमाशांचे पोळ उठल्यासारखे खवळलेले किसान लहान लहान टोळ्या करून शहरांत घुसत आहेत. जिल्हा मॅजिस्ट्रेट लष्कर घेऊन किसानांचा मोर्चा वेढून उभा आहे.—"

" मग आतां धडगत नाहीं. खवळलेले लोक पोलिसांना कांहीं आवरायचे नाहींत. ते दंगाधोपा करतील, काय वाटेल तें करतील आणि शहरांत घुसूं पाहतील. मग लाठीमार होईल, गोळीबार होईल, आणि बिचाऱ्या खुळ्या भोळ्या किसानांच्या रक्तानें नदीचें पाणी लाल होईल. हा किसानांच्या रक्ताचा अभिषेक रामचंद्रबाबाला म्हणावें तुझ्या मस्तकावर होतो आहे. या हत्येचें पाप तुझ्या माथीं आहे. " चंद्रमोहन हरकिसनचा हात आपल्या हातीं घेऊन म्हणाला.

कुरुक्षेत्रावर कौरवांशीं धर्मयुद्ध करण्याकरितां उभा राहिलेल्या अर्जुनासारखा हरकिसन व्यामोहांत गुरफटून उभा होता. गांधीजीही

त्याचेच आणि रामचंद्रबाबाही त्याचाच. त्याचें अंतःकरण गांधीजींवरील अढळ श्रद्धेनें भारून गेलेलें असलें तरी आपल्या हृदयसिंहासनावर तो गांधीजींच्या प्रतिमेशेजारीं रामचंद्र बाबाचीही प्रतिमा मांडून दोघांचीही भक्तिभावानें पूजा करीत होता. किसान खवळला यांत रामचंद्रबाबाची कांहीं चूक नाहीं असें त्याला वाटत होतें. पण चंद्रमोहन म्हणाला त्याप्रमाणें रामचंद्रबाबाचा गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाशीं मूलतः विरोध आहे या गोष्टीची आज त्याला प्रथमच जाणीव होत होती.

रघुनंदनला गांधीजींच्या अहिंसेविषयीं आपुलकी कधींच वाटत नव्हती. तो इतक्या तत्परतेनें ती वार्ता सांगायला आला तो चंद्रमोहनसाठीं नव्हे, तर हरकिसनसाठीं. चंद्रमोहनचें बोलणें ऐकलें न ऐकलेसें करून तो हरकिसनला म्हणाला, "शहरांतले बरेच कॉंग्रेस पुढारी किसानांना समजुतीच्या दोन गोष्टी सांगून शांत करण्याची शिकस्तीनें खटपट करून दमले. कुळचाभर पाण्यानें पेटलेलें खांडववन थोडेंच विझवतां येतें? आपलें किसान ऐकणार नाहींत, परिस्थिति आपल्याला आटोक्यांत ठेवतां येणार नाहीं हें पाहून पुढाऱ्यांनीं पं. जवाहरलाल नेहरूंना कालच तार करून बोलविलें होतें."

"मग जवाहरलाल नेहरू आले नाहींत?" चंद्रमोहननें विचारलें.

"आले कीं! सकाळींच आले. पण जिल्हा मॅजिस्ट्रेटनें त्यांना शहरांत यायला बंदी केली आहे म्हणे. पूल अडवून लष्कर उभें आहे. जवाहरलाल पुलाच्या पलीकडे अडकून पडले आहेत."

"जवाहरलाल नेहरूंना बंदी? सूर्याला उगवूं द्यायचें नाहीं म्हणून बंदी करायला हा शहाणा जिल्हा मॅजिस्ट्रेट निघाला. पण सूर्याजवळ जातांच तूं आणि तुझें लष्कर, तुझी सारी सत्ता, सारा दिमाख, सारा दरारा त्या सूर्याच्या आगींत जळून खाक होईल माहीत, नाहीं!"

तोंच बाहेर अंतराळ भेदून जाणारी जनतेची जयजय वाणी घुमूं लागली:

पंडित जवाहरलाल नेहरू की जय!

महात्मा गांधी की जय!

रामचंद्रबाबा की जय!

हरकिसन, चंद्रमोहन, भूपालसिंग, रघुनंदन हवालदार व त्यांच्या आजूबाजूला जाणारे येणारे कैदी व शिपाई जागच्या जागीं मूकस्तंभासारखे उभे राहून कान टवकारून ऐकूं लागले.

तेवढ्यांत पुन्हा पूर्वीप्रमाणेंच घनगंभीर जयघोष ऐकूं आला :

देशभक्त चंद्रमोहन बाबू की जय !

गोमतीदेवी की जय !

स्वर्गातून कुणी अप्सरा अमृतानें भरलेला घडा आपल्या अंतःकरणांत ओतीत आहे असा गोड आभास चंद्रमोहनला झाला. त्यानें हंसतमुख चर्या करून आपल्या सोबत्यांकडे पाहिलें. त्यांच्याही मुखांवर समाधान पसरलेलें त्याला दिसलें.

चंद्रमोहन आज सुटणार हें माहीत असल्यामुळें त्यांचें स्वागत करण्या-साठीं तिथें जमलेल्या अकबरपूरच्या गांधी आश्रमांतील स्वयंसेवकांनीं केलेला तो जयजयकार होता.

तोंच जेलर सुपरिंटेंडेंटच्या ऑफिसांतून कावऱ्याबावऱ्या वृत्तीनें चंद्र-मोहनपाशीं येऊन म्हणाला, " वकीलसाहेब ! बाहेर खवळून ओरडणाऱ्या लोकांना तुम्ही शांत करूं शकाल का ? कबूल कराल तर ताबडतोब तुमची सुटका करायला आम्ही तयार आहों. पाहा जबाबदारी घेत असाल तर. "

चंद्रमोहननें प्रश्नार्थक विजयी मुद्रेनें भुवया चढवीत जेलरकडे नुसतें पाहिलें.

" बाहेरचा जमाव असाच खवळून माथेफिरूसारखा दंगा करूं लागला तर आम्हांला नाइलाजानें हत्यारबंद पोलीस बंदोबस्तासाठीं बोल-वावे लागतील. मग लाठीमार झाला, गोळीबार झाला आणि तुमच्या लोकांचें रक्त सांडलें तर त्याला आम्ही जबाबदार नाहीं. " जेलर गंभीर चर्या करून म्हणाला.

" पण लाठीमार आणि गोळीबार कां म्हणून ? लोकांचा असा काय गुन्हा आहे पोलिसांनीं लाठीमार आणि गोळीबार करायला ? " चंद्रमोहननें दराऱ्याच्या स्वरांत विचारलें. थोड्या वेळापूर्वी आपणाशीं अरे तुरेच्या

उद्दाम भाषेंत बोलणारा जेलर आतां आपली पायरी स्मरून 'वकीलसाहेब' म्हणूं लागला असें पाहून आपण एक मोठें माणूस आहों, पुढारी आहों असा आत्मविश्वास न पेरतां उगवणाऱ्या रानगवतासारखा त्याच्या अंगीं स्फुरूं लागला. तो पुढें म्हणाला, "जेलरबाबू! मी महात्मा गांधींचा सच्चा अनुयायी आहें. अहिंसा हें माझें व्रत आहे. हिंसेला कारण होईल अशी कोणतीही गोष्ट महात्मा गांधींचा सत्याग्रही वेळीं आपल्या प्राणाचें मोल देऊनही टाळायची पराकाष्टा करील. जिथें तुमच्या सैतानी सरकारचा लाठीमार, गोळीबार देखील प्रक्षुब्ध जनतेला आवरूं शकत नाहीं तिथें आम्ही सत्याग्रही महात्माजींच्या नुसत्या पवित्र नामोच्चारानें जनतेला शांत करूं शकतों हें तुम्हांला उशीरां का होईना, पण कळलें म्हणायचें!"

"चला, आम्ही तुम्हाला सोडून देतों." जेलर जवळच्या एका कैद्याला हांक मारून म्हणाला, "चल ये रे इकडे. वकीलबाबूंचें सामान दरवाजापावेतों घेऊन चल."

चेहेरेपट्टीचा तुरुंगांतील विधि चंद्रमोहनपुरता सोईसाठीं जेलरनें रद्द केला. कारण आतां चंद्रमोहन साधा गांधीकैदी नव्हता. खवळलेल्या जनतेला आवरण्यासाठीं बाहेर जाणारा तो पुढारी होता.

चंद्रमोहनही पुढें वाढून ठेवलेल्या पुढारीपणाच्या कर्तव्याच्या घाईंत हरकिसनला आपणाबरोबर अकबरपूरला नेण्याचें विसरला. जेलरबरोबर जातां जातां त्यानें एकवार त्याच्याकडे पाहून म्हटलें, "नमस्ते."

"नमस्ते." हरकिसन उद्गारला. समोरून जाणाऱ्या जेलरकचेरीच्या हवालदाराला पाहून त्यानें हांक मारून विचारलें, "हवालदार! आतां आमची सुटका केव्हां होणार?"

"बैस तिथें मुकाट्यानें." असें दरडावून सांगत हवालदार निघून गेला.

हरकिसन आणि भूपालसिंग खट्टू मनानें उभे होते. तुरुंगाबाहेरची खळबळ वाढत होती. जयजयकार एकसारखे घोषित होत होते. हरकिसनचें मन बाहेर जाण्यासाठीं अगदीं अधीर झालें होतें. बाहेर काय अनर्थ होत असेल आणि काय नाहीं ह्या चिंतेनें तो अगदीं बेचैन झाला

होता. त्या प्रत्यक्ष संकटापेक्षां त्या संकटाची त्याच्या मनींमानसीं उमटलेली छायाच त्याला अधिक भेडसवीत होती.

इतक्यांत तुरुंगांतील धोक्याची घंटा घणघण वाजूं लागली. हें आणखी कोणतें नवें संकट कोसळलें असें भूपालसिंगपाशीं उद्गारत तो कावऱ्या बावऱ्या नजरेनें सभोंवार पाहूं लागला. तों तुरुंगांतील हवालदार, जमादार, सुभेदार या साऱ्या पोलिसांची धांवपळ सुरू झालेली त्याला दिसली.

"कोण पळाला वाटतें." भूपालसिंग हरकिसनला म्हणाला व कावऱ्या बावऱ्या नजरेनें इकडे तिकडे पाहूं लागला.

इतक्यांत जेलर कचेरीवरच्या हवालदारानें त्या आवारांत झाडलोटीचें वगैरे काम करणाऱ्या सर्व कैद्यांना जेलर कचेरीसमोर एकत्र जमण्याचा हुकूम फर्मावला. कैदी वॉर्डरांची कैद्यांना एकत्र हांकलून आणण्यासाठीं धांवपळ सुरू झाली.

ते एकत्र आलेले कैदी भयभीत चित्तानें असें एकाएकीं काय झालें याची आपसांत विचारपूस करूं लागले.

एकजण म्हणाला, "रामचंद्रबाबा तर पळाला नाहीं ?"

"नाहीं." दुसरा म्हणाला, "त्याला तर फांशी गेटावरच्या कोठडींत सक्त पाहाऱ्यांत पहांटेपासून बंद करून ठेवलें आहे."

तोंच बाहेर फैलावर गेलेले कैदी गुराख्यांनीं गुरें गोठणीवर हांकलून आणावीं तसे पोलीस शिपायांनीं तुरुंगांत हांकलून आणले. आणि त्या सर्वांना जेलर कचेरीसमोरच इतर कैद्यांपाशीं उभें करण्यांत आलें.

तुरुंगांत जिकडे तिकडे कैद्यांना कोंडण्यासाठीं पोलीस शिपायांची धांवपळ सुरूच होती. बाहेर फैलावरून आलेल्या कैद्यांपैकीं एकजणाला हरकिसननें विचारलें, "काय झालें ? कोणी कैदी पळाला ?"

"होय. आमच्या फैलांतले नूरमहंमद आणि गंगाप्रसाद हे दोघे कैदी पसार झाले."

"सांपडले नाहींत ?" भूपालसिंगनें पुढें सरून विचारलें.

" सांपडतात ! ते कसले आतां सांपडतात ? समुद्राच्या पाण्यांत सांडलेला पाण्याचा थेंब कधीं सांपडतो ? किसान–गंगेला केवढा महापूर आला आहे. नदीकांठीं हजारों किसान तुरुंगावर चालून येण्यासाठीं आले आहेत. हे दोघे त्या गंगेंत जाऊन मिळाले असतील. ते आतां कसले सांपडतात ?..."

तेवढ्यांत चार हवालदार धांवपळ करीत किल्लयांचे जुडगे सांवरीत तिथें आले व त्या कैद्यांना बराकींत कोंडण्यासाठीं मेंढरासारखे हांकीत घेऊन गेले.

हरकिसन आणि भूपालसिंग यांना देखील इतर कैद्यांप्रमाणेंच एका हवालदारानें त्यांच्या बराकींतील कोठडींत नेऊन कोंडलें.

सर्व कैदी कोंडले गेल्यावर भराभर कोठड्यांना कुलुपें ठोकण्यांत आलीं.

एकाएकीं हा काय अनर्थ झाला असा जो तो आपल्या मनाशीं अथवा शेजारी कैद्याशीं सभय चित्तानें कुजबुजूं लागला.

कैद्यांचीं गणती एकवार झाली, पुन्हा झाली. अखेर तुरुंग पुन्हा खोलला गेला. हरकिसन व भूपालसिंग या सुटणाऱ्या कैद्यांना जेलरच्या कचेरींत नेण्यासाठीं आलेला वॉर्डर कहानसिंग हरकिसनच्या कोठडीचें कुलूप काढतां काढतां हळूंच हरकिसनकडे पाहात म्हणाला, " खरे बहाद्दर बेटे आहेत. कसे पण हवालदाराच्या हातावर तुरी देऊन निसटले ! "

" कोण ? " हरकिसननें विचारलें.

" तुझे तुरुंगांतले साथीदार. " बराकींतले बाकीचे सारे कैदी त्या त्या कैदी वॉर्डरच्या देखरेखीखालीं बाहेरकामावर जाईतों तो तसाच कोठडीच्या कुलुपाची चाळवाचाळव करीत रेंगाळत होता. कुलुपाला ही किल्ली लाव, ती किल्ली लाव असा बहाणा करून भलतीच किल्ली लावून कुलूप उघडीत असल्यासारखें दाखवीत होता.

" किल्ली नाहीं सांपडत ? " हरकिसननें कोठडीच्या गजापाशीं येऊन विचारलें.

" सांपडेल. लौकरच किल्ली सांपडेल आणि तुरुंगाचे दरवाजे सताड उघडे होऊन सारे कैदी बाहेर पडतील. " कहानसिंग सभोंवार एकवार

नजर टाकून कोणाचें आपल्याकडे लक्ष नाहीं अशी खात्री करून घेत म्हणाला, "आजच वेळ आली होती पण, टळली. बाकी टळली म्हणजे तरी काय आजचें मरण उद्यांवर गेलें आमच्या सरकारचें इतकेंच."

त्यानें कुलूप काढलें व हरकिसन आणि भूपालसिंग यांना बाहेर निघायला सांगितलें.

"जवाहरलाल नेहरूंनीं जर जरा कणखरपणा दाखविला असता तर ह्या रायबेरलीपुरतें तरी इंग्रजी राज्य आजच खतम् झालें असतें." तो तुरुंगाच्या कचेरीकडे जातां जातां म्हणाला, "मी ऐकलें आणि मला अगदीं संताप आला त्यांचा. गांधीबाबाची शेळीदेखील यापेक्षां कडवी असेल. तिला अडवणाराला ती चिडून शिंगें रोखून मारायला जाईल. आणि आमचे जवाहरलाल जिल्हा मॅजिस्ट्रेटपुढें मुकाट्यानें नमतात."

"भडकत्या आगींत तेल ओतल्यासारखें झालें नसतें नेहरू तिथें गेल्यानें? आधींच आपल्या पुढाऱ्यांना सोडवण्यासाठीं जिवावर उदार होऊन लढायला उभा राहिलेला खवळलेला किसान नेहरूंना पाहून वाढत्या धीरानें अधिकच खवळला असता. तो मग कुणालाच आवरला नसता. त्यानें गांधीजींच्या अहिंसेला कलंक लावला असता. नेहरू गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी आहेत. तें कधीं असें आगींत तेल ओतणार नाहींत." हरकिसन म्हणाला.

"म्हणूनच नेहरू आम्हांला पुढारी नको आहेत. आम्हांला गांधींच्या शेळ्या म्हणवून घेऊन जगायचें नाहीं; शूर सिंहाचे छावे म्हणवून घेऊन जगायचें आहे."

"पण हिंसा करून? आपल्या भारत–मातेच्या ललाटीं कुंकुम तिलक लावायचा तो काय आम्हीं आमच्या रक्ताचा लावायचा?"

"कुंकुमतिलक रक्ताचाच लावायचा. पण तो आमच्या रक्ताचा नव्हे तर आमच्या शत्रूच्या रक्ताचा. आमचें रक्त पिऊन जे धष्टपुष्ट झाले आणि अधिकाधिक रक्त पिऊन धष्टपुष्ट होत आहेत, ज्यांनीं सहस्र कीचक–जरासंधांच्या उन्मत्तपणानें माझ्या भारतमातेचें वस्त्रहरण केलें आणि तिच्या कपाळींचा कुंकुमतिलक पुसला, त्यांच्या रक्ताचा कुंकुमतिलक मी माझ्या भारतमातेच्या ललाटीं लावीन—"

समोरून जमादाराला येतांना पाहून कहानसिंग एकदम बोलायचा थांबला.

"सुटणारे कैदी ना रे हे?" जमादारानें विचारलें.

"होय जमादारसाहेब." कहानसिंग जमादाराला सलाम करीत उत्तरला.

"चला माझ्याबरोबर." असें म्हणून जमादार त्या दोघांना घेऊन गेला.

कहानसिंगचे मोघम उद्‌गार ऐकून हरकिसनच्या मस्तकांत विचार-चक्रें वेगानें फिरूं लागलीं होतीं. जमादारानें त्या दोघांना तुरुंगाच्या दरवाजाबाहेर सोडून दरवाजा लावून घेतला. तरी देखील हरकिसनच्या डोक्यांतील त्या विचारचक्रांची गती मंदावली नाहीं. ती उलट दस-पटीनें वाढली.

"आपण आतां कुठें जायचें?" भूपालसिंगनें हरकिसनला विचारलें, "गोरखपूरला जाऊंया का?"

"नाहीं. अगोदर गंगेंत स्नान करायला जायचें आहे. किसानगंगेला महापूर आला आहे. त्या महापुरांत स्नान करून पावन व्हायचें आहे."

हरकिसन बोलतां बोलतां समोरून पोलीस येतांना पाहून थबकला.

"पोलीस आमच्याकडे कां नजर रोखून पाहत आहेत?" असें तो आपल्या मनाला विचारूं लागला. पण त्याला त्या विचारांत फार वेळ गुरफटून राहावें लागलें नाहीं. ते दोन पक्षी तुरुंगाच्या पिंजऱ्याबाहेर सुटले न सुटले तोंच त्यांतला एक—हरकिसनचा जोडीदार भूपालसिंग—त्या आलेल्या फासेपारध्यानें फेंकलेल्या जाळ्यांत अडकला गेला. भूपालसिंग स्त्रियांचा व्यापार करणाऱ्या टोळीचा साथीदार म्हणून ज्या गुन्ह्यापायीं शिक्षा होऊन तुरुंगांत आला होता त्या गुन्ह्यांतील एका शिलकी जळमटांत पो. स. इ. माताप्रसादनें त्याला गुंतवून टाकलें होतें.

"नमस्ते बाबूजी! शारदामाई भेटली तर तिला माझा नमस्कार सांगा." भूपालसिंग पोलीसांबरोबर जातां जातां गहिंवरून उद्‌गारला. त्यानें दोन्ही हात जोडून नमस्कार करण्याचा प्रयत्न केला. पण ते बेड्यांनीं जखडले असल्यानुळें त्याला नमस्कार नीट करतां आला नाहीं.

# जागा झालेला किसान

रायबरेलीच्या तुरुंगाबाहेर भूपालसिंग पकडला गेल्यावर हरकिसन एकटाच कांहीं वेळ तुरुंगापुढील पटांगणाच्या आवारांत एखाद्या भ्रमिष्टा-सारखा रस्ता तुडवीत भटकत होता. सुमारें पाव घटकाभर तो असा भटकला. तों समोरून एक मोटार भरधांव जात होती ती त्याच्या शेजारीं एकदम थांबली. त्या मोटारींतून कुणीएक तरुण सुंदर स्त्री आपणाकडेच येते आहे याचें त्याला भानही नव्हतें.

"बाबूजी!" अशी त्या सुंदर स्त्रीची गहिंवरलेली हांक ऐकतांच हरकिसननें वळून तिच्याकडे पाहिलें. त्या क्षणीं त्याच्या नेत्रांसमोर भर दिवसा जणूं नक्षत्रें चमकूं लागलीं.

"रामप्यारी!" तो खालीं मान घालून आपल्या मनाशीं म्हणाला. त्या जाणिवेसरशीं विस्मयकारक पूर्वस्मृतींचीं ब्रह्मांडें धडधड पेटणाऱ्या व ज्याला आदि नाहीं, अंत नाहीं, अशा वैराण अरण्यासारखीं त्याला त्याची नजर जिथवर पोंचेल त्याच्याही पलीकडे पसरलेलीं दिसूं लागलीं.

"बाबूजी! चला ना माझ्याबरोबर माझ्या बंगल्यावर. चला." रामप्यारी गहिंवरलेल्या कंठानें उद्गारली.

रायबरेलींतील नागरिकांच्या दृष्टीनें रामप्यारी ही आतां एक धनवान व उच्छृंखल वृत्तीची वेश्या होती.

परंतु वेश्येला देखील अंतःकरण असतें असें रामप्यारीच्या नेत्रांवाटे घळघळ वाहणाऱ्या गंगा–यमुनांनीं त्याला सांगितलें.

रस्त्याच्या कडेला कांहीं अंतरावरून एक पोलीस आपणाकडे शोधक नजरेनें पाहत आहे हें ध्यानीं न घेतांच तो एखाद्या मंत्रमुग्धासारखा रामप्यारीबरोबर तिच्या मोटारींत जाऊन बसला.

मोटार भर वेगानें निघून गेली.

त्या पोलिसाची नजर अंतर्वेधी क्ष किरणासारखा त्या मोटारीचा जणूं पाठलाग करीत होती.

"बाबूजी ! आपली मुंबईला गोकुळनिवासांत गांठ पडली होती तेव्हांपासून मी फारच पालटलेली दिसत असेन तुम्हांला !" रामप्यारीनें आपल्या प्रासादतुल्य बंगल्यांतील शृंगारलेल्या बैठकखान्यांत हरकिसनला नेऊन एका कोचावर बसविलें आणि शेजारींच एका मखमलीनें मढवलेल्या आरामशीर खुर्चीवर बसत विचारलें.

"सारें जगच पालटलें आहे !" हरकिसन त्या बैठकखान्यांतील विविध छायाचित्रांच्या सजावटीवरून नजर फिरवीत उद्गारला.

तोंच रामप्यारीच्या नोकरानें येऊन वर्दी दिली, "कोतवालसाहेबांकडून निरोप घेऊन शिपाई आला आहे."

"जा. त्याला सांग मी आल्यें म्हणून." रामप्यारी त्या नोकराला परत लावून हरकिसनला म्हणाली, "बाबूजी ! मी जरा कोतवालसाहेबांचा काय निरोप आहे ऐकून येत्यें."

आज सकाळीं तुरुंगांतून सुटल्या वेळींच तुरुंगाबाहेर झालेल्या निदर्शनाची हकीगत ऐकून सध्यां माताप्रसाद हा तिथें पो. स. इ. ऊर्फ कोतवाल म्हणून बदलून आला असल्याचें हरकिसनला कळलें होतें. तरीही त्यानें आपली शंका फेडून घेण्यासाठीं रामप्यारीला विचारलें, "कोतवाल कोण ? माताप्रसाद ?"

"माताप्रसाद !" असें जड स्वरांत उपरोधानें सांगून ती बाहेर गेली.

हरकिसन आतां एकटाच त्या बैठकखान्यांत बसला होता. बैठकखान्यांतील भिंतीवर महात्मा गांधी, नेहरू पिता–पुत्र, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, स्वामी श्रद्धानंद वगैरे थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तसबिरी लावलेल्या होत्या. त्यांतच रायसाहेब कैलासनाथ पालीवाल, पुरुषोत्तमदासबाबू, चरख्यावर सूत काढीत असलेली गोमतीदेवी, तसेंच राजा रविवर्म्यांचीं विश्वामित्र–मेनकेसारखीं कांहीं सुंदर चित्रें व कांहीं सुंदर नटनटींचीं छायाचित्रेंही सरमिसळ लावलेलीं होतीं. महात्मा गांधींची तसबीर रायसाहेब कैलासनाथ पालीवालांच्या शेजारीं लावलेली होती व

तिच्यापलीकडे गोमतीदेवीची तसबीर होती. महात्माजींच्या तसबिरीची ती विचित्र योजना पाहून हरकिसन विस्मयचकित झाला. महात्माजीं-विषयीं रामप्यारीच्या मनांत फारसा आदर नाहीं, उलट तिटकाराच आहे ही कल्पना दोन वर्षांपूर्वी मुंबईंत तिची भेट झाल्या वेळीं तिनें आपल्या खोलींत टेबलावर महात्माजींचा तो अर्धपुतळा पाहून दर्शविलेल्या अप्रसन्नतेच्या आठवणीसरशी त्याच्या मनांत आली.

त्या कल्पनेसरसा तो त्या तसबिरीकडे पाहत आपल्याशीं म्हणाला, " महात्माजी रायसाहेब पालीवालांसारख्या व्यभिचारी नष्ट जमीनदारांना जवळचे आहेत असा समज करून घेऊनच रामप्यारीनें महात्माजींवरचा हा राग व्यक्त केला असेल का ? "

तेवढ्यांत रामप्यारी वर आली. हरकिसन त्या तसबिरीकडे लक्षपूर्वक काय पाहत आहे हें तिच्या चाणाक्ष बुद्धीला तेव्हांच आकलन करतां आलें.

ती हरकिसनला म्हणाली, " देवदानवांनीं समुद्रमंथन केलें तेव्हां सारा समुद्र कसा खवळला असेल आणि त्यांतून लक्ष्मी, कौस्तुभ, पारि-जातक, अमृत, अशा दिव्य उपकारी रत्नांबरोबर हलाहलासारखें दिव्य त्रिभुवनदाही रत्नही कसें निघालें असेल याची साक्ष माझ्या या बंगल्याची सजावट पाहून तुम्हांला पटत असेल, नाहीं बाबूजी ? "

हरकिसन आत्मचिंतनांत गुंग होऊन गेल्यासारखा स्तब्ध होता.

" मला तुम्ही नरकांतल्या किड्यापेक्षांही नीच अशी स्त्री समजत असाल, नाहीं बाबूजी ? "

हरकिसननें अंग शहारल्यासारखें करून जखमी सावजाच्या गूढ कातर दृष्टीनें तिच्याकडे पाहिलें.

" तुम्ही तसें म्हटलें तर तें मुळींच चूक होणार नाहीं. तुमच्या हाड-वैऱ्यालाही तुमचें समर्थनच करावें लागेल. आणि मी तर तुमची हाड-वैरीण नाहीं. मी तुमची वैरीणही नाहीं, मैत्रीणही नाहीं. योगायोगानें घटकाभर आपली गांठ पडली आणि तुम्ही माझ्या मैत्रिणीच्या निमित्तानें भलेपणाच्या प्रथम परिचयानें आपणाकडे वेधून घेतलें. पण बाबूजी!—" अंतःकरणांतून उफाळून येणाऱ्या हुंदक्यांचा आवेग मोठ्या कष्टानें कसा-

असा गिळीतें ती पुढें म्हणाली, "रस्त्यानें सहज जातां जातां सुंदर सोनेरी नागीण दिसली आणि तिच्या वाटेला न जातां आपण मनांत तिचें नुसतें कौतुक करीत असतांना ती आपल्या पायांना डंसली असें जर तुम्ही म्हणालां, तर तसें नाहीं असें म्हणायला ह्या रामप्यारीला तोंड नाहीं."

थोडा वेळपावेतों तीं दोघें स्तब्धपणें अश्रूंनीं भारावलेल्या नजरेनीं एकमेकांकडे पाहत होतीं. कोणालाच कांहीं बोलायला सुचत नव्हतें.

रामप्यारी आपले अश्रू पुशीत बैठकखान्यांतील त्या तसबिरींच्या मालिकेकडे मर्मभेदी नजरेनें पाहत होती. विस्तवानें तापूं लागलेल्या भांड्यावरचे पाण्याचे थेंब विस्तवाच्या आंचेनें विरून वाफेच्या रूपांत दिसेनासे व्हावे तसा तिच्या हृदयांत चेतूं लागलेल्या संतापाच्या आंचेनें नेत्रांतील अश्रू दिसेनासे होऊं लागले.

"मला तुम्ही केवळ निंद्य पतिता समजूं नका बाबूजी ! माझ्या या जीवनांत खोल अर्थ भरलेला आहे. तुमची भारतमातेच्या उद्धाराची तळमळ आम्हां वेश्यांनाही कळते. तितकी तळमळ या रामप्यारीच्या अंतःकरणांत नसली तरी देखील तिनें तुमच्या गांधीजींचेंच हें फार मोठें देशकार्यच चालविलें आहे. माझा नवरा गांधीजींच्या हांकेसरसा लढाईवर गेला आणि इंग्रजांना जय मिळवून देण्यासाठीं जिवावर उदार होऊन लढला. ह्या त्याच्या पुण्याईची मी वांटेकरीण नाहीं का ? सभ्य जीवनांतून उठून मी नाइलाजानें जुलूम-जबरदस्तीनें कां होईना पण हा वेश्येचा मार्ग पत्करला यांत माझा केवढा मोठा त्याग आहे ! ही किती अलोट देशप्रीति आहे ! याची तुम्हांला कल्पना आहे ?..."

ती पारध्यानें जाळींतून हुसकल्यामुळें चवताळलेल्या वाघिणीसारखी ताडकन् उठून त्या तसबिरांच्या रांगेपाशीं गेली आणि त्या तसबिरांकडे बोट दाखवून म्हणाली, "हे सारे एकाहून एक थोर पुरुष माझ्या देश-प्रीतीचे साक्षीदार आहेत. स्त्री ही राष्ट्राची माता म्हणतां ना तुम्ही ? मी भारतमाता आहें. या भारतमातेसारख्या कैक भारतमातांच्या उभ्या जीवनाचा मूर्तिमंत चित्रपट हा जगासमोर मी मुद्दाम मांडला आहे...

हे गांधीजी! मंदोदरीला रावणाच्या जामदारखान्यांत रावणानें ठार केलेल्या निरपराधी जीवांचे हाडांचे सांपळे, रक्तानें भरलेले हांडे आणि नररुंडांच्या राशी पाहायला मिळाल्या. तसें माझ्या जीवनाचें हें नवें दालन माझ्या नवऱ्याला लढाईवर पाठवून गांधीजींनींच मला खुलें करून दिलें. त्या दालनांतून चुकत, माकत, ठेंचाळत, सुखदुःखाच्या उन–पावसाचा मारा सहन करीत हा केवढा पल्ला मी गांठला पाहा!..."

हरकिसन आपलें बोलणें ऐकून दचकून सर्वांग शहारल्यासारखें करूं लागला; तें पाहून ती पेटत्या निखाऱ्यावर सांचणाऱ्या राखेसारखी किंचित् सौम्य स्वरांत म्हणाली, "असें अंगावर शहारे उठण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं बाबूजी! गांधीजींचे भक्त आहां तुम्ही. ही नवविधा भक्ति आणि त्या भक्तीनें पदरांत पडणारें फळ पाहतांना असें अंग शहारून कसें चालेल?" ती त्या तसबिरांच्या रांगेंतील रायसाहेब कैलासनाथ पालीवाल व पुरुषोत्तमदासबाबू यांच्या तसबिरांकडे बोट दाखवून म्हणाली, "हे आपल्या रामाच्या अयोध्येंतील थोर जमीनदार. चंपारण्यांतील लढ्यापासून गांधीजींच्या भजनीं लागलेले धनवान देशभक्त. यांच्यासारख्यांची सेवा मला घडली याचें श्रेय गांधीजींना नाहीं का? माझा नवरा लढाईवर गेला नसता तर ह्या अशा थोर पुरुषांच्या सेवेची पुण्याई मला लाभली असती का? हे दुसरे देशभक्त पुरुषोत्तमदासबाबू–ह्या गोमतीदेवी अकबरपूरच्या गांधी आश्रमाच्या माता. पुरुषोत्तमदासबाबूंची ही मैत्रीण. आज खादीच्या चळवळीचा देशभर प्रसार करण्यासाठीं त्या कशा तन–मन–धनानें झटत आहेत. गांधी आश्रमासाठीं आज हजारांनीं, नव्हे लाखांनीं पैसा खर्च होतो आहे असें ऐकल्यें. हा पैसा पुरविणारे आणि माणसेंही पुरणारे रायसाहेब पालीवाल, पुरुषोत्तमदासबाबू, गोमतीदेवी हीं तरी गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीला आलेलीं फळेंच नाहींत का? आमचेही आश्रयदाते तेच. आम्हां वेश्यांचे तेच देव. अशा ह्या महान् देशभक्त धनकुबेरांपासूनच मी माझें हें सारें वैभव संपादन केलें आहे बाबूजी! ह्या संपत्तीला अपवित्र तुम्ही कशी म्हणाल? चिखलांतच कमळें उगवतात ना? मग कमळाची शोभा पाहतांना चिखलाची शिसारी

मानणें हा कृतघ्नपणा नाहीं का? तुम्हाला हा सारा अमंगळ चिखल माझ्या जीवनांत सांचलेला दिसला म्हणून असे भांबावून जाऊं नका. कमळें चिखलांतच फुलतात. तुमच्या गांधीजींना म्हणावें, स्वातंत्र्यदेवतेच्या पूजेसाठीं हीं जीं कमळें..." ती रायसाहेब कैलासनाथ, पुरुषोत्तमबाबू, गोमतीदेवी यांच्या तसबिरांकडे बोट दाखवून म्हणाली, "हीं जीं कमळें तुम्ही वेंचून घेतलीं आहेत, अशा कमळांना फुलविणारा, कस्तुरीलाही मातीमोलाची ठरविणारा चिखल—तुम्हाला मिळालेल्या या धनकुबेरांच्या पाठबळाचें उगमस्थान—ह्या रामप्यारीच्या आजच्या या वैभवशाली जीवनांत आहे..."

रणांगणावर हातघाईच्या लढाईत मुंडकें तुटलेला वीर तसाच वीरश्रीच्या आवेशांत हातांतील तरवारीनें शत्रूच्या माना सपासप कापीत जातां जातां खालीं कोसळावा तशी रामप्यारी एकदम अंगचें सर्व अवसान खचल्यासारखी मटकन् खालीं बसली. ती दोन्ही हातांनीं आपलें तोंड झांकून घेऊन हुंदके देऊं लागली.

हरकिसन पुरा भांबावून जाऊन किंकर्तव्यमूढ होऊन भकास दृष्टीनें उघड्या खिडकींतून समोर दिसणाऱ्या आकाशाकडे पाहत होता.

हुंदक्यांचा पूर ओसरतांच रामप्यारी दोन्ही हातांनीं आपले विस्कटलेले केस मागें सारीत उठली व हरकिसनशेजारच्या कोचावर जाऊन बसली. आग आतां विझली होती. पेटत्या निखाऱ्यांची राख झाली होती. ती राख बोलूं लागली, "तुम्हाला या रामप्यारीपायीं हकनाहक छळ सोसावा लागला, तुरुंगवास भोगावा लागला, अन्नूला मुकावें लागलें, हें उघड दिसतें आहे. पण या अपराधाबद्दल मला जबाबदार धरायचा जगाला कांहींसुद्धां अधिकार नाहीं बाबूजी! विषारी फळ हें विषवेलीचें लेकरूं असतें. तें फळ चाखणारा वेळीं मरतोही. पण तो कांहीं त्या फळाचा दोष नव्हे. त्या दोषाचा जाब तुम्हीं त्या विषवेलीला विचारा. महायुद्धांत गोपीनाथ जर लढाईवर गेले नसते तर माझ्या आयुष्याची अशी परवड लागली असती का?" ती उदास मनःस्थितींत दुःखाचे, विस्मयाचे-अयशस्वी जीवनाच्या दारुण अतिरेकाचे उसासे सोडीत एकाएकीं स्तब्ध झाली.

कांहीं क्षणांची उसंत खाऊन ती पुन्हा बोलूं लागली, " मला दुसरें तिसरें कांहीं बोलायला सुचत नाहीं बाबूजी! पेटत्या आगीला आपला दाहकपणा बोलून दाखवतां येत नाहीं आणि बोलून दाखवावाही लागत नाहीं. त्या आगीचे चटके आपोआपच तिची दाहकता पटवून देतात..."

हरकिसनला आपण धडाडत्या वडवानलांत सांपडलों आहों असें वाटूं लागलें. तो भ्रमिष्टासारखा आपली बॅग मांडीवर घेऊन उघडूं लागला. रामप्यारी त्याच्याकडे जिज्ञासेनें पाहूं लागली. त्यानें बॅग उघडून महात्माजींचा अर्धपुतळा बाहेर काढला व जवळच्या टेबलावर ठेवून त्याला मन:पूर्वक नमस्कार केला.

रामप्यारीला महात्माजींचा तो अर्धपुतळा पाहून मुंबईंत हरकिसनची तो लढाईवरून माघारा आला त्या पहिल्याच दिवशीं गोकुळनिवासांतील त्याच्या खोलींत झालेली भेट आणि संभाषण आठवलें. तिरस्कारानें तिच्या भालप्रदेशाला आंठया पडल्या.

" बेहेन! तुम्ही काय आणि मी काय, भारतमातेच्या कोट्यावधि संतानांपैकीं दोन दुबळीं संतानें आहोंत. तुमच्या माझ्या सभोंवार पेटलेली आग ही साऱ्या देशाला लागलेली आग आहे. ही आग विझवून देशाला सुखी करायला एकटे महात्माजीच समर्थ आहेत—"

" महात्माजी समर्थ आहेत! ज्यांनीं आग लावली तेच ती विझवायला समर्थ आहेत! ज्यांना त्या आगींतून वांचायचें असेल त्यांनीं त्यांना शरण जावें, नाहीं तर त्या आगींत जळून खाक होऊन जावें असेंच ना तुमचें म्हणणें बाबूजी? मी एक क्षुद्र गरीब स्त्री आहें. देशाचा प्रश्न मला कळत नाहीं. माझ्यापुरतें मला कळतें. ह्या आगीच्या धुराच्या लोटांत मला पलीकडचें कांहीं दिसत नाहीं. माझ्या आयुष्याचे निखारे धगधगतांना तेवढे दिसतात. असल्या आगलाव्यासमोर नमणारी ही रामप्यारी नाहीं." असें संतापानें उद्‌गारत ती तिटकारा आल्यासारखी तिकडे पाठ फिरवून बसली.

हरकिसनला तिची वर्तणूक असह्य झाली. तिचा तो राजप्रासादतुल्य बंगला, तें वैभव, तें ऐषआरामी जीवन—लाजिरवाण्या वेश्याव्यवसायांतच

या सर्व वैभवाचा उगम आहे हें पाहूनही त्याला तिची जितकी घृणा आली नाहीं तितकी महात्माजींविषयींची तिची अनुदार वृत्ति पाहून आली. तिचें वैभव हा मूर्तिमंत नरकवास आहे असें त्याला वाटूं लागलें.

घाईघाईनें महात्माजींचा अर्धपुतळा अभिवादनपूर्वक आपल्या बॅगेंत आवरून घेऊन तो बॅग उचलून बाहेरच्या वाटेला लागला.

आपणाकडून असह्य मनस्तापाच्या भरांत ह्या देवमाणसाची निष्कारण अवहेलना झाली ह्या जाणिवेचा मरणघाव सोशीत रामप्यारी तशीच उठली आणि 'बाबूजी ! बाबूजी !' अशा हांका मारीत त्याला परत आणण्यासाठीं त्याच्या मागोमाग चालली.

पण तो परत आला नाहीं. अढळपद प्राप्त करून घेण्याच्या निर्धारानें त्रिभुवन तुडवीत निर्भयपणें पुढें–पुढें–अनंताचा अंत शोधीत पुढें जाणाऱ्या ध्रुवासारखा तो त्या बंगल्याच्या आवारांतून बाहेर पडला. तेव्हां त्याला किंचित् हायसें वाटलें.

# २

"वाट चुकून कुठें भलतीकडेच भरकटत गेलों होतों मी या नरकाच्या गर्तेत !" असा एक उसासा सोडीत हरकिसननें नदीचा मार्ग धरला. त्याच्या मनांतली खळबळ आतां नुसत्या धुमसणाऱ्या चंचल स्वरूपाचें कवच फोडून अचूक वेध करणाऱ्या तीक्ष्ण बाणासारखी नदीवरील किसानांचा मोर्चा शोधीत निर्भयपणें मार्गक्रमण करूं लागली होती.

तो नदीतीरावर जाऊन पोहोंचला तों तें रक्तानें रंगलेलें रणांगण पाहून त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला. किसानांची गर्दी आतां पांगली होती. लष्करानें केलेल्या गोळीबारांत बळी पडलेल्यांचीं प्रेतें लष्करी शिपायांनीं लोकांच्या हातीं लागूं द्यायचीं नाहींत म्हणून दूर रानांत अज्ञातस्थळीं नेऊन गाडून टाकलीं होतीं. जखमी झालेल्या किसानांचीही त्यांनीं दाद घेतली नव्हती. पण किसानांनींच त्यांना उचलून नेऊन त्यांच्या शुश्रुषेची व्यवस्था केली होती.

त्या ठिकाणीं आतां किसानांचें रक्त सांडून त्याचीं थारोळीं बनलेलीं सूर्यप्रकाशांत चमकत होतीं.

जिल्हा मॅजिस्ट्रेटनें पं. जवाहरलाल नेहरूंना आपणाबरोबर तिथून कांहीं अंतरावर असलेल्या रायसाहेब कैलासनाथ पालीवाल यांच्या बंगल्यांत नेलें तें मुद्दामच दूरच्या आडवळणाच्या वाटेनें नेलें. आपण लष्कराकडून करविलेली किसानांची कत्तल त्यानें त्यांच्या दृष्टिपथांत येऊंच दिली नाहीं. तो इतका धूर्त कीं त्यानें जवाहरलालना तिथून दूर नेण्यासाठीं रायसाहेबां-कडून त्यांना परस्पर आमंत्रण द्यायला लावलें. तो आपल्या बंगल्यावर पं. नेहरूंना बोलावता असता तर कदाचित् नेहरूंनीं त्याला साफ नकार दिला असता. इतका पं. नेहरूंचा स्वभाव सडेतोड व तापट आहे हें त्या धूर्त कावेबाज साहेबाला माहीत होतें.

पं. नेहरूनीं रायसाहेबांचें आमंत्रण आनंदानें स्वीकारलें याचें कारण रायसाहेबांना नेहरू महात्मा गांधींचे अनुयायी म्हणून ओळखीत होते. चंपारण्याच्या लढ्यापासून महात्माजींच्या सांवलीप्रमाणें जीवन आपण जगत आहों असें भासवणारे रायसाहेब आजकाल संयुक्त प्रांतांतील एक नामवंत गांधीभक्त म्हणून शोभत होते. किसानांच्या आततायीपणामुळें महात्मा-जींची चळवळ भलत्याच आडवाटेनें भडकूं लागली आहे, तिला आड-वाटेची वाटेवर आणण्यासाठीं काय करावें याचा तांतडीनें विचार करण्यासाठीं रायबरेलींतील सारे प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्ते पं. नेहरूंशीं विचारविनिमय करण्याच्या निमित्तानें रायसाहेबांनीं आपल्या बंगल्यांत बोलाविले होते.

हरकिसनला कुणीं सांगितलें कीं रायसाहेबांच्या बंगल्यासभोंवार कांहीं किसान आपलीं गाऱ्हाणीं नेहरूंच्या कानावर घालण्यासाठीं तिष्ठत उभे आहेत. तेव्हां त्यांच्याकडून आपणाला आजच्या अरिष्टाची कांहीं माहिती मिळेल या आशेनें तो भीत भीत जपून पावलें टाकीत तिकडे गेला. त्याला येतांना पाहून एक किसान पालीवालच्या बंगल्याकडून त्याच्याकडे जाऊं लागला. बाकीच्या तिथल्या सर्व किसानांची नजर तिकडे वळली. चहूं बाजूंनीं पेटलेल्या रानांत सांपडल्यासारखी त्या सर्व किसानांची अवस्था

झाली होती. कुणीतरी आपल्या मदतीला धांवून येईल या आशेनें ते दाही दिशांना भिरभिरत्या नजरेनें पाहत होते.

पोलिसांना तें पाहून संशय आला. पुन्हा किसान रानांत जखमी झालेला वाघ शिकाऱ्यावर उलटतो तसे आपणावर उलटत तर नाहींत ना ? ते रायसाहेबांच्या बंगल्यावर नवा मोर्चा आणून आग पाखडण्याच्या तयारींत तर नाहींत ना ? या भीतीनें पोलीस आपल्या संगिनी लावलेल्या बंदुका सरसावून त्या किसानांना दामदाटीनें हांकलूं लागले. जिल्हा मॅजिस्ट्रेट बंगल्यांत आहे तोंवर तरी बंगल्याजवळ ही नवी कटकट निर्माण होतां नये या हेतूनें पोलीस डोळ्यांत तेल घालून जपत होते.

बिचारे किसान पोलिसांचा तो पवित्रा पाहून भीतीनें तिथून जीव घेऊन पळत सुटले. हरकिसनच्या ओळखीच्या त्यांतल्या एकानें हरकिसनचा हात धरून त्याला आपणाबरोबर ओढून नेत हळूच म्हटलें, " चल बाबा ! इथें थांबशील तर फुकट मरशील. तुझ्या आईला दोन मुलांतला एक तरी लाभूं दे. "

ओळखीच्या किसानाचे ते उद्गार ऐकून हरकिसनचें हृदय बाण घुसल्यासारखें कष्टी झालें. त्यानें त्या माणसाला विचारलें, " काय म्हणतोस तूं ? "

" अगोदर या गिधाडांच्या तावडींतून सुटून दूर जाऊन बसूं. मग सारें सांगतों. " तो माणूस पळतां पळतां म्हणाला.

बंगल्यापासून दोन फर्लांगांच्या अंतरावर रस्त्याला लागूनच एकत्र असलेल्या वृक्षांच्या सांवलींत ते सारे किसान जाऊन बसले. त्यांनीं एकवार सभोंवार लांबवर नजर फेकून पाहिलें व पोलिसांच्या गिधाडी नजरेच्या टापूपलीकडे आपण आलों आहों असें पाहून समाधानाचा एक उसासा सोडला.

" काय म्हणालास तूं मघाशीं ? " हरकिसननें त्या माणसाला विचारलें. त्या माणसाच्या थोड्या वेळापूर्वीच्या मोघम अमंगलसूचक उद्गारांनीं त्याला अगदीं अस्वस्थ करून सोडलें होतें. त्यानें विचारलें, " रामसिंग आजच्या दंगलींत होता का ? "

" होय, होता. तो तर आमचा म्होरक्या. त्याच्या धीरावर तर आम्ही मोर्चा उभारला. पण ऐन वेळीं आमच्या पुढाऱ्यांनीं आमचा उत्साहभंग केला. तिथें नाइलाज झाला.—"

तोंच बाजूच्या झुडुपामागून कपाळ फुटून रक्तबंबाळ झालें आहे आणि सर्वांग रक्तानें माखलें आहे असा नूरमहंमद सावधपणें पावलें टाकीत पुढें येऊन म्हणाला, " हरकिसन ! ही रडायची वेळ नाहीं; लढायची वेळ आहे. किसानांनीं कधीं रडतां कामा नये. आपली लढाई आतां कुठें रंगाला येऊं लागली आहे. आपणाला आपल्या शत्रूशीं लढायचें आहे. लढतां लढतां मरण आलें तरी मरतां मरतां शत्रूला मारायचें आहे. लढतां लढतां आम्ही मेलों तर आमचे बाप, भाऊ लढतील, आमचीं बायकामुलें लढतील. पण आमच्या रामचंद्रबाबानें पुकारलेला हा जमीनदारांविरुद्ध आम्हां किसानांचा लढा जमीनदारांच्या जुलूमशाहीचा नायनाट केल्याशिवाय थांबायचा नाहीं. "

" लढा थांबायचा नाहीं; लढा थांबवायचाही नाहीं. खरें आहे तुझें म्हणणें नूरमहंमद ! मला पटतें. " हरकिसन नूरमहंमदकडे पाहून म्हणाला.

" तुला पटतें ? " नूरमहंमदनें कपाळावरच्या जखमेंतून गालावरून ओंठावर आलेला रक्ताचा ओघळ पुशीत हंसत विचारलें, " खरोखरच तुला पटतें ? कीं तूं ह्या रक्ताला भितोस ? "

" खरोखरच पटतें. लढाईवरून आलेला सैनिक आहें मी नूरमहंमद ! जिवावर उदार होऊन लढणारा शूर सैनिक असें माझें नांव थ्रेसच्या रण-भूमीवर रक्तानें लिहिलेलें आहे. रक्ताला मी भीत नाहीं. "

" पण तेव्हां तुझ्या गांधीजींची चळवळ सुरू नव्हती. तेव्हां लढाई सुरू होती. "

" आजही लढाई सुरू आहे. तेव्हां आम्ही लढलों ते गांधीजींच्या आज्ञेनुसार लढलों; आज लढत आहों तेही त्यांच्या आज्ञेनुसारच लढत आहोंत. "

" तेव्हां गांधीजी तुला मला रणभूमीवर शत्रूच्या माना चिरायला सांगत होते. हिंसा तेव्हां गांधीजींना वावडी नव्हती. पण ती आज वावडीआहे. "

" हिंसा गांधीजींना तेव्हांही मान्य नव्हती आणि आजही मान्य नाहीं. आम्ही असच्या रणभूमीवर देखील लढलों ती हिंसा केली नाहीं,–तर हिंसेशीं लढलों. शत्रूला मारणें म्हणजे हिंसेला मारणें होय. "

" आणि आजकाल तेव्हांचे शत्रू आपले मित्र झाले आहेत. "

हरकिसनला त्यावर कांहीं उत्तर द्यायला सुचेना. तात्त्विक वादाचें गहन अरण्य त्याच्या ओळखीचें नव्हतें. गांधीजींवर त्याची निस्सीम श्रद्धा मात्र होती. अरण्यांत चरण्यासाठीं आपल्या पिलांना घेऊन गेलेल्या मादीनें पिलांना एकाद्या हिरवळीच्या तुकड्यावर चरायला सोडून स्वतः खोल रानांत दूर दूर कुठेंतरी निघून जावें, अशा वेळीं तीं पिलें जशीं अनोळखी अरण्यांत वाट न सांपल्यामुळें व आई जवळ नसल्यामुळें भांबावून इकडे तिकडे पाहूं लागतात तसा हरकिसन आजकाल भांबावून गेला होता.

त्यानें तो मुद्दा टाळून नूरमहंमदला म्हटलें, " आपला गंगाप्रसाद कुठें आहे ? "

" कुठें आहे कोण जाणे ! गोळीबारांत मरून रानांत गाडला गेला असेल, नाहींतर जखमी होऊन कुठेंतरी तळमळत पडला असेल. लढाई आहे ही. मेल्यागेल्याची विचारपूस करीत बसायला आपल्याला वेळ कुठें आहे ! " असें म्हणून नूरमहंमद उन्हाची तिरीप झोंबूं लागल्यामुळें घेरी येते कीं काय या भीतीनें खालीं बसला.

तोंच झाडावर चढून टेहेळणी करीत बसलेला एक किसान इषाऱ्या-दाखल सर्वांना उद्देशून म्हणाला, " अरे, नेहरूजी निघाले वाटतें– "

तो किसान झाडावरून झरझर खालीं उतरूं लागला.

नूरमहंमद चटकन् उठून उभा राहून पालीवालच्या बंगल्याकडे नजर फेकीत म्हणाला, " कशाला गेले होते नेहरू त्या लांडग्याच्या गुहेंत ? गिधाडांच्या पंगतीला बसून फराळपाणी करायला ? " तो हरकिसनकडे पाहत म्हणाला, " सकाळीं तूं आणि गंगाप्रसाद माझ्यावर चिडलां होतां, मी नेहरूंविषयीं खारट तुरट बोललों म्हणून. तेच हे नेहरू. किसानांचें कोटकल्याण करायला येतात आणि किसानाला पिळून

खाणाऱ्या जमीनदाराच्या बंगल्यांत बसून राजशाही विसांवा घेतात. नदीच्या पैलतीराला लष्करी सैतानांनीं केलेल्या गोळीबारांत आणि लाठीमारांत किसान जखमी होऊन पडत होते, मरत होते; आणि ऐलतीरावर हे आमचे पुढारी किसानांना शांत राहायला शिकवीत होते!—तें कांहीं नव्हे हरकिसन! असले श्रीमंत राजवैभवी लोक किसानांच्या कांहीं उपयोगाचे नाहींत. किसानच किसानांचा पुढारी. आमचा रामचंद्रबाबाच आमचा पुढारी. सीताराम."

नेहरूंची मोटार तेवढ्यांत जवळ आलेली पाहून नूरमहंमद एकदम पुढें गेला आणि रस्त्याच्या मध्य भागीं दोन्ही हात पसरून उभा राहिला.

मोटार थांबली. नूरमहंमदच्या मागें हरकिसन व इतर सारे किसान धांवत येऊन उभे राहिले. आजूबाजूच्या झुडुपांमागें प्राणभयानें लपलेले किसानही धांवून आले. सर्वांनीं उत्साहानें जयजयकार केला, "पं. जवाहरलाल नेहरू की जय!" नूरमहंमद मात्र स्तब्ध होता. तो दोन्ही हात जोडून मोटारीसमोर उभा होता.

नेहरूनीं मोटारींतून उतरून सर्व किसानांना नमस्कार केला.

"पंडितजी! तुम्ही आमचे पुढारी. तुम्ही आम्हांला लाठीमारांत आणि गोळीबारांत मरायला सोडून रायसाहेबाच्या बंगल्यांत विसांव्याला गेलांत याचा आम्ही किसान तुम्हाला आपुलकीनें जाब विचारतों आहोंत. रायसाहेब आम्हा किसानांना परोपरीनें पिळणारा राक्षस जमीनदार आहे. बिचाऱ्या गरीब किसान शेळ्यामेंढ्यांना मारून खाणारा हा दुष्ट लांडगा आहे हें गांधीजींना एक कळलें नाहीं तरी तुम्हाला देखील कळलें नाहीं? त्याच्या बागेंतल्या फुलांचा हा हार जो तुमच्या गळ्यांत पडला आहे तो हार नाहीं.—पंडितजी! तुम्ही आमचे कैवारी. तुम्हांला कळलें पाहिजे कीं असल्या जमीनदारांनीं तुमच्या गळ्यांत घातलेला हार हा तुमच्यासाठीं आणि तुमच्या किसानांसाठीं कावेबाजपणानें तयार केलेला गळफांस आहे..."

नेहरूंची चर्या नूरमहंमदचें गाऱ्हाणें ऐकून गंभीर झाली. बाकीचे सारे किसान नूरमहंमदच्या पाठीशीं उभे होते. हरकिसनही त्यांतच पण किंचित् बाजूला उभा होता. आपल्या किसान भाईनीं लढा दिला,

रक्त दिलें, आणि आपण कांहींही न देतां नुसते बघ्यासारखे इथें उभे आहोंत, या जाणिवेनें तो मनांतल्या मनांत ओशाळा झाला. इतकी आपल्या देशाची दैना दैना करून सोडणाऱ्या इंग्रजांना जगवण्यासाठीं मात्र आपण रणभूमीवर रक्त सांडलें या कर्तव्यपालनाचा त्याला वाटणारा अभिमान आतां झपाट्यानें ओसरूं लागला होता. गांधीजींना इंग्रजांनीं फसविलें अशी त्याची आतां खात्री होऊं लागली होती.

आपणा किसानांच्या यातना पाहून पं. नेहरूंचें अंतःकरण अत्यंत खिन्न झालें आहे, त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले आहेत, हें दृश्य पाहून तिथें जमलेल्या किसानांना नवा धीर आला; नवा हुरुप वाटूं लागला. त्यांतला एकेक जण धिटाईनें पुढें होऊन आपल्या तोकड्या भाषेंत आपल्या मनींमानसीं डांचणारें दुःख नेहरूंना निवेदन करूं लागला.

" पंडितजी ! आम्हां किसानांचे हाल कुत्राही खात नाहीं, अशी आमची दैना आहे. आम्ही शेतांत सदा काळ बारा मास मरेमरेतों राबावें, हाडांच्या काड्या आणि रक्ताची पावळी करून शेतांत सोनें पिकवावें, आणि रायसाहेब जमीनदाराच्या लोकांनीं येऊन तें सोनें लांबवावें. कष्ट आम्ही करावे; आणि त्या कष्टाबद्दल जमीनदारानें माती आमच्या तोंडीं घालावी ... "

" आम्ही लढा देतों तो काय सुखासुखीं देतों ? मरायची आम्हांला काय हौस आहे ? पण हें पोट–पंडितजी ! ह्या वीतभर पोटांत भडकलेली भुकेची आग आम्हांला सहन होत नाहीं. जगण्यापेक्षां मरणें बरें असें वाटूं लागतें. मग जिवावर उदार होऊन आम्ही अशा पेटत्या खाईत उडी घेतों. यांत आमचा काय दोष पंडितजी ? सकाळीं तुम्ही आम्हांला सभेंत भाषण करून शांत राहायचा उपदेश केला. पण आमच्या जमीन-दाराच्या जुलुमापायीं पोटांत पेटलेली भुकेची आग भडकली असतांना शांत कसें राहायचें पंडितजी ? "

" अयोध्या प्रांताचा सारा किसान–गांधीजींना म्हणावें पंडितजी ! ह्या जमीनदारांच्या सैतानी जुलुमाखालीं भरडला जातो आहे. गांधीजींच्या चळवळीला पाठिंबा देणारे हे जमीनदार हरणाचें कातडें पांघरलेले लांडगे आहेत... "

" रायसाहेब पालीवाल हा इथल्या सगळ्या जमीनदारांपैकीं दुष्टांतला दुष्ट सैतान. याच्या जमीनदारींतले आम्ही कमनशिबी किसान. आमचा कुणाचा जीव सुरक्षित नाहीं, कुणाचें घरदार संसार सुरक्षित नाहीं, कुणाची बायको सुरक्षित नाहीं. आणि गांधीजी अशा जमीनदारांना देश-भक्त मानून आमच्या माना त्यांच्या हातीं देतात. हीं आमचीं गाऱ्हाणीं पंडितजी ! तुम्ही दूर केलीं नाहींत तर दुसरा कोण दूर करणार ?..."

किसानांचीं तीं गाऱ्हाणीं ऐकून तरुण पं. नेहरूंची राजबिंडी गोरीपान चर्या संतापानें लालबुंद झाली. जणूं काय त्रिभुवनाचा विनाशकर्ता श्रीशंकर त्यांच्या ठायीं संचरून तीव्र संतापाच्या भरांत आपला तृतीय नेत्र उघडून त्रिभुवन जाळायला निघाला होता.

नूरमहंमद इतका वेळ स्तब्ध बाजूला उभा होता तो पुढें येऊन पुन्हा हात जोडून म्हणाला, "सरकार आणि जमीनदार सारे चोर, दरोडेखोर, हरामखोर आहेत. तुम्हांला त्यांनीं कट करून भुरळ घातली पंडितजी ! लष्करी लांडग्यांना गोळ्या झाडून किसानांची शिकार मारून खायला मोकळें रान मिळावें म्हणून तुमचा हा आदरसत्कार, हे हारतुरे...ही सारी लबाडीची धूळफेंक आहे. या धूळफेंकीला गांधीजींसारखेच तुम्हीही फसणार का पंडितजी ?—"

तो बोलतां बोलतां एकदम थबकून रायसाहेबांच्या बंगल्याच्या दिशेकडे पाहूं लागला. एक मोटार तिकडून भरधांव धुरळा उडवीत येत होती.

## ३

" कुणाची ही मोटार ? पोलिसांची काय ? " एका चौकस किसानानें तिकडे नजर जितकी दूरवर फेकतां येईल तितकी फेकीत विचारलें.

" होय. " नूरमहंमद ओठ दाबीत उद्गारला व हताशपणें एक उसासा सोडीत तिकडे पाहूं लागला.

ती मोटार पोलिसांचीच होती. सर्व किसानांनीं ती ओळखली आणि एकेक जण भयभीत चित्तानें तिथून वाट सांपडेल तिकडे पळूं लागला.

"पळूं नका. भिऊं नका. शूरासारखे उभे राहा. पोलिसांना खुनशीपणानें गोळीबार करायची संधि देऊं नका." पं. नेहरू सर्व किसानांना धीर देऊं लागले.

सकाळपासून लाठीमारांत आणि गोळीबाराच्या आगींत पोळून निघालेल्या त्या किसानांना नेहरूंचा मोठा आधार वाटला. ते पळायचे थांबून जागच्या जागीं थबकले.

पोलिसांची मोटार अगदीं जवळ येऊन उभी राहिली. तिच्यांतून पो. स. इ. माताप्रसाद व आणखी चार पोलीस बाहेर आले.

"नमस्ते पंडितजी!" माताप्रसाद संतापानें लाल झालेल्या नेहरूं-पुढें जाऊन म्हणाला, "आम्ही आपल्या किसानांची धरपकड करायला आलेलों नाहीं. सकाळींच कांहीं कैदी फरारी झाले आहेत. त्यांचा सुगावा लागल्यामुळें इथवर यावें लागलें." तो नूरमहंमदकडे बोट दाखवून आपल्या शिपायांना म्हणाला, "हाच तो कैदी नूरमहंमद. याला पकडा."

नूरमहंमदनें मोठ्या आशेनें केविलवाण्या नजरेनें पं. नेहरूंकडे पाहिलें. नेहरूंनीं त्याच्याकडे पाहिलें.

"थांबा. त्याला पकडाल तर खबरदार.—हा फरारी झालेला कैदीच आहे असें तुम्हांला कोणी सांगितलें?" पं. नेहरूंनीं करड्या स्वरांत माता-प्रसादला विचारलें. त्याबरोबर नूरमहंमदला पकडायला पुढें सरसावलेले पोलीस दोन पावलें मागें सरले.

नूरमहंमद वाढत्या आशेनें त्यांच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागला.

"पंडितजी! तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटसाहेबांकडून आमच्याकडे फरारी झालेल्या कैद्यांविरुद्ध नांवनिशीवार तक्रार नोंदली गेली आहे.

"पण हा किसान त्या फरारी झालेल्या कैद्यांपैकींच आहे, याला तुमच्यापाशीं काय पुरावा आहे?" माताप्रसादचें बोलून संपण्यापूर्वीच नेहरूंनीं उतावळेपणानें निग्रही आवाजांत विचारलें.

"हा रायसाहेबांच्या शेतवाडीवरचा किसान आहे पंडितजी! राय-साहेबांच्या नोकरानें त्याला पाहून ओळखलें आणि रायसाहेबांनीं पोलीस-

ठाण्यावर वर्दी दिली." माताप्रसाद नूरमहंमदकडे वळून दरडावणीच्या भाषेंत विचारूं लागला, "काय रे ए नूरमहंमद! नूरमहंमदच तुझें नांव ना?"

बोलतां बोलतां मातप्रसादनें मागें वळून आपल्या मोटारींत बसलेल्या माणसाकडे पाहत विचारलें, "पीतांबर! नूरमहंमदच याचें नांव ना?"

एक मध्यम वयाचा गलेलठ्ठ लाठियाल मोटारींतून बाहेर आला व मातप्रसादला अदबीनें सलाम करून उत्तरला, "होय कोतवालसाहेब!"

नूरमहंमद पीतांबरकडे पाहत आवेशानें दांत ओठ खाऊं लागला. "होय. माझें नांव नूरमहंमद. पालीवालच्या जमीनदारी दाढेखालीं चिरडला गेलेला किसान मी नूरमहंमद!"

"तूं रायसाहेबांच्या बागेंत माळीकामावर होतास?"

"होय. फत्तराचें काळीज असलेल्या रायसाहेबाच्या बंगल्यासभोंवारची फुलबाग मीच माझ्या रक्तानें शिंपडून फुलवली आहे." तो नेहरूंकडे वळून म्हणाला, "पंडितजी! तुमच्या कंठांत रुळणाऱ्या या फुलांच्या हारांतील फुलें माझ्या कष्टाचीं आहेत. त्यांतल्या प्रत्येक फुलाचा वास घेऊन पाहा. ह्या किसानाच्या रक्ताचा वास तुम्हांला येईल.—"

तोंच मातप्रसादनें शिपायांना डोळ्यानें खूण केली. त्यासरशीं दोघां शिपायांनीं गिधाडी झडप घालून नूरमहंमदचीं दोघांनीं दोन मनगटें पकडलीं.

"माफ करा पंडितजी!" असें म्हणून मातप्रसाद नूरमहंमदला पकडून नेणाऱ्या शिपायांमागोमाग आपल्या मोटारींत जाऊन बसला.

सभोंवार पांगलेले सर्व किसान हळहळत बापुडवाण्या चर्येनें पं. नेहरूंकडे पाहूं लागले.

त्या धीर पुरुषानें खिशांतून हातरुमाल काढून आपले अश्रू पुशीत डाव्या हातानें गळ्यांतला हार तोडून रस्त्यावरील धुरळ्यांत भिरकावून दिला.

हरकिसन इतका वेळ बाजूला स्तब्ध उभा होता. हा सर्व अनुचित प्रकार पाहून त्याला या बाहेरच्या जगापेक्षां तुरुंगवासच बरा होता असें वाटूं लागलें होतें. शूर नूरमहंमदवर ओढवलेला तो प्रसंग पाहून त्याचें

माथें आंतून आग लागल्यासारखें भणाणलें. संतापानें थरथर कांपत तो पुढें गेला, आणि तो फुलांचा हार लाथांखालीं तुडवीत त्याचा चेंदामेंदा करीत जयजयकार केला, " पंडित नेहरू झिंदाबाद ! "

सभोंवार पांगलेल्या भयभीत किसानांना ती घोषणा ऐकून स्फुरण चढलें. त्यांनींही तारस्वरांत जयजयकार केला, " पंडित नेहरू झिंदाबाद ! "

तोंच एका किसानानें त्वेषानें पुढें जाऊन तो धुळींत लोळत असलेला फुलांचा हार पुन्हा पायांखालीं तुडवीत घोषणा केली, " कैलासनाथ मुर्दाबाद ! "

आणि मग जो उठला तो किसान आवेशानें तो हार तुडवीत गर्जूं लागला " कैलासनाथ मुर्दाबाद ! "

त्या निर्जीव हारांत त्या संत्रस्त किसानांना जणूंकाय मूर्तिमंत कैलासनाथ पालीवाल दिसत होता. तो बरा हातीं सांपडला अशा भावनेनें जो तो त्या हारावर निष्ठुरपणें सूड उगवून घेत होता.

नेहरूंना तो बेशिस्तीचा बेतालपणा सहन झाला नाहीं. वडीलधाऱ्या माणसानें आपल्या आपडत्या अवखळ लेंकरावर प्रेमानें संतापावें तसें ते त्या किसानांवर संतापून ओरडले, " हा वेडेपणा एकदम बंद करा. "

सर्व किसान एकदम चपापल्यासारखे जागच्याजागीं स्तब्ध उभे राहिले.

" भाई हो ! " पं. नेहरू एकदम शांत होऊन सौम्य शब्दांत बोलूं लागले. सुई पडली तर तिचा आवाज ऐकूं यावा इतक्या शांतपणानें सारे किसान कान टवकारून आपल्या त्या तरुण नेत्याचा प्रत्येक शब्द ऐकत होते, व सोन्याच्या मोलानें आपल्या हृदयसंपुटांत जपून ठेवीत होते.

पं. नेहरूंनीं पुरी पाव घटकादेखील त्या किसानांना उपदेश केला नसेल. परंतु सरकारच्या लष्करी यमदूतांना निर्दय लाठीमारानें आणि गोळीमारानें देखील जे किसान मनानें व शरीरानेंही नमवतां आले नाहींत त्यांचा माथा इतक्या थोड्या अवकाशांत पं. नेहरूंपुढें भक्तिभावानें नम्र झाला. ते सर्वजण मग पं. नेहरू आणि गांधीजी यांच्या नांवाचा जयजयकार करीत लाठीमाराचें आणि गोळीबाराचें प्यालेलें हलाहल पचवीत पं. नेहरूंना निरोप देऊन घरोघर निघून गेले.

नेहरू रस्त्यावर ज्या ठिकाणीं उभे राहून बोलत होते तेथील त्यांची चिमुटभर चरणधूळ आपल्या ललाटीं माखून हरकिसन पुन्हा एकटाच रस्ता चालूं लागला. पण आतां तो मर्दासारखा मान वर करून चालत होता. श्रीरामाच्या पवित्र चरणस्पर्शानें शीलेची अहिल्या झाली—पापी अहिल्या उद्धारून गेली— तसा त्या महान् उदयोन्मुख नेत्याच्या चरणधुळीनें आपलाही उद्धार झाला आहे ह्या श्रद्धापूर्वक आत्मविश्वासानें त्याला आनंदीआनंद झाला होता. सकाळपासून गांधीजींच्या अर्धपुतळ्याला आपण अधमानें स्पर्श कसा करावा या कातरतेनें विव्हळणारें त्याचें मन आतां शांत झालें होतें. गांधीजींच्या पवित्र नांवाचा उच्चार करण्याची व त्यांच्या अर्धपुतळ्याला भक्तिभावानें वंदन करण्याची पात्रता आतां आपल्या अंगीं खास आहे अशा आत्मविश्वासानें त्यानें बॅग उघडली. तिच्यांतील गांधीजींच्या मूर्तीला सादर प्रणाम केला आणि पुन्हा गांधीजींच्या नांवाचा जयजयकार करीत तो वाट चालूं लागला.

गंगायमुनांप्रमाणें पावन झालेल्या त्याच्या अंतःकरणांत आतां त्याला त्याच्या विशाल जीवनाचें स्वच्छ प्रतिबिंब उमटलेलें दिसूं लागलें. आपला पाठचा भाऊ रामसिंग किसानांच्या मोर्चांत आपल्या रक्ताचा बळी देऊन कुठें गेला असेल याची त्याला पुन्हा आठवण झाली. खवळलेल्या किसानांना अहिंसापूर्वक पूर्ण शांततेनें वागा असें समजावून सांगतां सांगतां त्याचें रक्त सांडलें, यावरून गांधीजींच्या ठायीं त्याची किती निस्सीम भक्ति आहे याची हरकिसनला योग्य कल्पना आली, व अशा देशभक्ताचा वडील बंधू होण्याचें भाग्य आपणाला लाभलें यांत त्याला कृतकृत्यता वाटली.

आपले किसान जखमी रामसिंगला कोणत्या दवाखान्यांत घेऊन गेले याचा त्यानें शोध केला तेव्हां रामसिंग सरकारी इस्पितळांत रुग्णशय्येवर पडून असल्याचें त्याला समजलें.

तो त्याच पावलीं इस्पितळाकडे निघाला.

## विस्तव जाळणारें पाणी

सकाळींच चंद्रमोहन अकबरपूरहून त्याला आणण्यासाठीं गेलेल्या मोटारींतून तुरुंगांतून सुटल्याबरोबर आला तो एक प्रकारें रायबरेलीच्या आगींतून चालतच आला.

तुरुंगाबाहेर खवळलेल्या किसानांचा जमाव जमला होता. त्या जमावाला पोलिसांनीं लाठीमार करून पिटाळून लावलें. तें चंद्रमोहननें तुरुंगाच्या दारांतच पाहिलें. ते किसान तीव्र निषेधाच्या आगीचे पलिते घेऊन तिथून जे निघाले ते नदीकांठीं जमलेल्या हजारों किसानांच्या गनिमी मोर्चाला जाऊन मिळाले. आधींच भडकलेले ते किसान, त्यांत आणखी तुरुंगासमोर लाठीमार झालेला कळतांच ते जास्तच भडकले होते. तुरुंग फोडून झालें तरी रामचंद्रबाबाला सोडवून आणायचेंच अशा प्राणपणाच्या निर्धारानें ते किसान शेंकडोंच्या टोळ्यांनीं मोहिमेवर निघाले होते. लष्करानें त्यांना गराडा देऊन नदीवरील पुलाच्या पैलतीराला आंवरून धरलें होतें. जिल्हा मॅजिस्ट्रेट आणखी आणीबाणीची वेळ आल्यास गोळीबाराचा हुकूम देण्यासाठीं तिथें तयार होता. परिस्थिति अतीशय बिकट होती. रक्तपाताखेरीज हा किसानांच्या क्षोभाचा वणवा मुळींच विझवतां येणें शक्य नाहीं हें सरकार ओळखून होतें. एकदां अहिंसेचा निर्बंध मोडला गेला कीं अत्याचार किसान करूं लागतील व मग निष्ठुरपणें दडपशाही करून गांधीजींची असहकारितेची चळवळ नेस्तनाबूद करतां येईल, या कुटिल विचारानेंच धूर्त सरकारी अधिकाऱ्यांचीं पावलें पडत होतीं. सरकारला तरी हिंसेची जितकी बेबंदशाही चळवळींत माजेल तितकी हवीच होती.

कॉंग्रेसचे पुढारी किसानांकडून कोणत्याही प्रकारचा अत्याचार होऊं नये म्हणून परोपरीनें झटत होते. शिक्षा होऊन तुरुंगांत गेलेल्या कैद्यांना दांडगाईनें तुरुंग फोडून सोडवून आणणें हें त्या सत्य–अहिंसेच्या

कैवारी कॉंग्रेस पुढाऱ्यांना मान्य नव्हतें. गांधीजींच्या सत्य–अहिंसेचा तो उघड उघड निषेध होता.

पण अयोध्येचा किसान शांतपणें हा अहिंसेचा उपदेश ऐकून घेऊन आचरणांत आणायच्या मनःस्थितींत नव्हता. रामचंद्रबाबाच्या पावलावर पाऊल टाकून हिरीरीनें आपणावरील जमीनदारी व सरकारी अत्याचाराचा प्राणपणानें निषेध करण्यासाठीं धडाडीनें रणांगणांत उतरलेला तो किसान, आणि त्याच्या वंदनीय पुढाऱ्याला सरकार तुरुंगांत डांबून ठेवतें ! कसें सहन व्हावें हें त्या किसानाला ? रामचंद्रबाबा कांहीं केवळ गांधीजींच्या सत्य–अहिंसेचा निष्ठावंत अतिरेकी अनुयायी नव्हता. टकळी–चरख्यावर कांतलेल्या सुतानें आपण आपला स्वर्ग गांठूं शकणार नाहीं असें त्याचें ठाम मत होतें.

अशा किसान पुढाऱ्याला कॉंग्रेसचे पुढारी तरी आपल्या चळवळींतील लोकनेता कसा मानणार ? आणि रामचंद्रबाबाच्या शिकवणीनें जागा झालेला किसान तरी रामचंद्रबाबाकडे काण्या डोळ्यानें पाहणाऱ्या पुढाऱ्यांना कसा जुमानणार ?

अशी रायबरेलींतील परिस्थिति सर्वतोपरी चिघळली होती. तिथें आपला पल्ला येणार नाहीं हें ओळखून स्थानिक कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं पं. जवाहरलाल नेहरूंना तार करून बोलाविलें होतें.

चंद्रमोहनला सकाळीं तुरुंगांतून सुटतांच नेहरू रायबरेलींत आल्याचेंही कळलें होतें. एकदां त्याला वाटलें, आपण तिकडे जावें व किसानांना योग्य मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करावा. परंतु अकबरपूरहून मोटार घेऊन आलेल्या गांधी आश्रमांतील स्वयंसेवकांनीं रामनगरला पेटूं घातलेल्या दंग्याच्या रणकुंडाची वार्ता त्यांना दिली व गोमतीदेवीचाही तांतडीनें येण्याचा निरोप सांगितला, त्यामुळें तो रायबरेलीच्या किसानांना संकटांत सोडून तसाच अकबरपूरला निघाला. रामसिंग मात्र इतर स्वयंसेवकांसारखा चंद्रमोहनबरोबर अकबरपूरला जाण्याला तयार होईना.

चंद्रमोहनला तें जरा चमत्कारिक वाटलें. त्याच्या तोंडून ओघानेंच शब्द निघून गेले, "इथल्या किसानांना वांचविण्यासाठीं आपण थांबा–

यचें आणि तिकडे रामनगरच्या किसानांना काय एकमेकांचे गळे कापूं द्यायचे ? आपल्या घराला आग लागली असतांना तें तसेंच जळत टाकून शेजाऱ्याचें पेटतें घर विझवायला धांवायचें ?"

"हें शेजाऱ्याचें घर आणि तें मात्र आपलें घर. ते किसान आपले कां ? ते आपल्या जमीनदारींतले म्हणून ? आणि हे इथले शेजारचे किसान ? परदुःख शीतळ.—जा, तुम्ही त्या आपल्या किसानांचें रक्षण करा. या शेजाऱ्यांना सहाय्य करायला तुमच्या सर्वांच्या वतीनें मी जातों. गोमतीमावशींना सांगा, मी सायंकाळपावेतों अकबरपूरला येईन." असें सांगून रामसिंगनें त्या मंडळीला अकबरपूरच्या वाटेला लावलें व आपण तिथेंच राहिला.

तुरुंगावर चालून येऊं पाहणारा किसानांचा मोर्चा हें केवळ एकच कारण रामसिंगला तिथें गुंतवून ठेवणारें नव्हतें.

हरकिसन आज सुटणार हें थोड्या वेळापूर्वी रानांत बाहेर फैलावर गेलेले कैदी आपसांत बोलत जातांना त्यानें ऐकलें होतें. सहा वर्षांपूर्वी हरकिसन लष्करांत भरती होऊन लढाईवर निघून गेला, तेव्हांपासून आजपावेतों त्या भावाभावांची गांठभेट नव्हती. ती भेट आज होणार असें कळतांच रामसिंगला तिथून हरकिसनाला घेतल्याखेरीज जाववेना. पण हरकिसन कांहीं वेळेवर सुटला नाहीं; आणि तुरुंगापुढें जमलेल्या किसानांवर झालेला लाठीमार रामसिंगला सहन होईना. तो भावनेच्या आवेगासरसा त्या खवळलेल्या किसानगंगेशीं एकरूप होऊन त्या भरांत हरकिसनला क्षणभर विसरला आणि नदीकांठीं खवळलेल्या किसानांच्या महासागराला जाऊन मिळाला.

चंद्रमोहन तरी हरकिसनला मुद्दाम मागें टाकून निघून गेला असें नव्हे. कालच त्याला हरकिसनची ओळख झाली होती; पण ती तोंडा-पुरती.—मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत या न्यायानें हरकिसन कधींही आपली खरी ओळख कुणाला आजकाल देऊं इच्छीत नसे.

जी वृत्ति हरकिसनची, तीच गोमतीदेवी, कौसल्यादेवी, शामकुंवर, व रामसिंग यांचीही. आश्रमांत हरकिसनविषयींची चर्चाच ही मंडळी होऊं देत नसे. रामसिंगही आपल्या वडील भावाच्या वांट्याला आलेला नामुष्कीचा तुरुंगवास इतर कुणापाशीं बोलून दाखवीत नसे. भाऊभाऊ ते खरे; भावाभावांचें एकमेकांवरील प्रेमही राम–लक्ष्मणांच्या तोडीचें होतें. पण कांहीं झालें तरी आयुष्याला कलंक तो कलंकच हें रामसिंग आपल्या मनाशीं नाकबूल करूं शकत नसे.

त्यांतूनही कर्णोपकर्णीं ऐकूं आलेल्या वार्तांवरून कोणी माहितगारानें हरकिसनचें नांव घेऊन त्याच्यावर रामप्यारीच्या बाबतींत खारटतुरट टीका केलीच तर रामसिंग आपल्या वडील भावाची बाजू घेऊन म्हणे, "म्हणून काय झालें? सोन्याची मोहोर चिखलांत रुतली म्हणून कांहीं त्या सोन्याची माती होत नाहीं. आज ना उद्यां त्या मोहोरेला चिकटलेला चिखल आपोआप धुतला पुसला जाईल आणि फिरून सोनें सोन्यासारखेंच चकाकूं लागेल."

चंद्रमोहन तुरुंगांतून सुटतांच ताबडतोब आश्रमांत आला तेव्हां सर्वांनाच एक प्रकारें धीर आला. पण रामसिंग दंग्याचा वणवा विझवण्यासाठीं मागें राहिला व त्याला टाकून चंद्रमोहन आला हें गोमतीदेवी, कौसल्यादेवी, शामकुंवर, राजकुंवर व आश्रमांतील इतर मंडळी यांना कसेंसेंच वाटलें.

तशांत दुपारपावेतों रायबरेलीच्या हत्याकांडाची भीषण वार्ता झंझावाताबरोबर वाहत येणाऱ्या आगीच्या ठिणग्यांसारखी आश्रमांत येऊन थडकली तेव्हां तर सर्व मंडळीच्या तोंडचें पाणीच पळालें. रामसिंगचा जिवाची पर्वा न करतां चळवळीच्या आगीशीं खेळण्याचा स्वभाव सर्वांना माहीत होता. गोमतीदेवीचा दोन्ही भाच्यांत तो अधिक आवडता–अगदीं पोटच्या मुलासारखा आवडता भाचा होता. दंग्याची वार्ता कानीं येतांच ती स्वतःच रामसिंगच्या समाचारासाठीं मोटार घेऊन रायबरेलीला निघण्याच्या तयारींत होती. तेवढ्यांत रामनगरहून शारदेची चिठी घेऊन तेथील आश्रमांतील स्वयंसेवक आला.

"रामनगरची परिस्थिति फारच चिघळत चालली आहे. आजूबाजूच्या खेड्यांतले किसान गुंड रामनगरवर हल्ला करण्याच्या तयारीनें जमा होत आहेत. अशा वेळीं माझा एकटीचा इथें निभाव लागायचा नाहीं. तरी तुम्ही ताबडतोब या." हा त्या चिठींतील मजकूर वाचून गोमतीदेवीला भावी संकटांचें ब्रम्हांड आठवलें.

"कसें करूं ?" तिनें कौसल्यादेवीचें मत विचारलें.

"विचारायचें काय त्यांत ? ताबडतोब या पावलीं मोटारींत बसा आणि रामनगरला जा. एकटी शारदा तिथें कोणत्या प्रसंगाला म्हणून तोंड देईल ?..." कौसल्यादेवी उद्गारली. शारदेचें लावण्य, तारुण्य, आणि वैधव्य एकदम तिला आठवलें व त्या निमित्तानें रायसाहेब पालीवालही आठवले. रायसाहेबांविषयीं तिचें मत चांगलें नव्हतें. मात्र ती गोमतीदेवीच्या तोंडावर रायसाहेबांविरुद्ध कांहीं बोलायला कचरे. गोमतीदेवी धाकटी बहीण झाली, तरी सालिना चाळीस हजार रुपये उत्पन्नाची जमीनदारीण. तिला नाहीं म्हटला तरी श्रीमंतीचा अभिमान असणारच. तशांत म्हाताऱ्या नवऱ्याला तिसरेपणावर दिलेली मुलगी. लग्नानंतर अवघ्या दोन वर्षांत विधवा होऊन एवढ्या अफाट संपत्तीची धनीण झालेली. तिच्या ठायीं त्या ऐन यौवनभरांत मादक स्वातंत्र्यलालसा उफाळूं लागलेली वडील बहिणीला आवडली नाहीं तरी ती तें बोलून कोणत्या तोंडानें दाखवील ? आज गरजू ती होती. वडीलपणाचें नातें विसरून धाकट्या बहिणीच्या ताटाखालचें मांजर होऊन राहणें तिला प्राप्त होतें.

कौसल्यादेवीनें सांगितलें तें गोमतीदेवीलाही पटलें. तिनें संकोचानें जें कांहीं सांगितलें नाहीं तेंही तारतम्यानें तिला ओळखतां आलें. ती तशीच चंद्रमोहनला बरोबर घेऊन रामनगरला निघून गेली. पण जाते वेळींच ती रामसिंगला आणण्यासाठीं प्रथम मोटार रवाना करायला चुकली नाहीं.

# २

रायबरेलीहून रामसिंगला घेऊन मोटार माघारी केव्हां येते इकडे गोमती-देवीच्या गांधी आश्रमांतील सर्वांचे डोळे लागून राहिले होते.

अमावास्येच्या निबिड अंधारासारखें एखादें अक्राळविक्राळ संकट आ वासून समोर उभें राहिलें कीं मुखानें गांधीजींचा नामोच्चार व हातांत टकळी अशी कौसल्यादेवीची उपासना सुरू होई. त्याप्रमाणें आजही ती टकळीवर सूत काढीत मनोमन गांधीजींच्या नांवाचा जप करीत रामसिंगच्या वाटेकडे चातकाप्रमाणें डोळे लावून बसली होती. दुरून एखादी बैलगाडी गेली तरी मोटार आल्याचा भास तिला होई आणि आशेनें ती त्या दिशेला पाहूं लागे. माझा रामसिंग आला कीं त्याला मी माझ्या प्रेमाच्या नजरेनें न्हाऊं घालीन, घांसभर अन्न त्याला जेवूं घालीन आणि नंतर मी जेवीन, अशा निश्चयानें ती आज दुपारीं जेवली देखील नव्हती.

पण सायंकाळचा चारांचा सुमार झाला तरी मोटार जेव्हां येईना तेव्हां तिचा धीर सुटत चालला. येऊं नयेत त्या अमंगळ शंका तिच्या मनांत येऊं लागल्या. ती बाहेर जाऊन स्वयंसेवकांना विचारूं लागली, " अजून मोटार कशी आली नाहीं ? "

इतक्यांत दुरून मोटारीचा आवाज येऊं लागला. रस्त्यावरील धुळीच्या लोटांत मोटार जशी दिसावी तितकी स्पष्ट दिसत नव्हती, तरी तिच्या भोंग्याच्या आवाजावरून सर्वांची खात्री झाली कीं आपलीच ही मोटार. मोटारीचा आवाज ऐकून आजारी शामकुंवरही आपल्या सुनेच्या —राजकुंवरच्या खांद्यावर हात टाकून त्या आधारानें बाहेर आली. तिच्या दुसऱ्या हाताला लहानग्या नानकनें आपल्या चिमुकल्या हाताचा आधार दिला होता.

" मोटार आली वाटतें ? " असें विचारीत शामकुंवर मावळत्या सूर्यप्रकाशाचा ताण तिच्या अशक्तपणामुळें अधू झालेल्या डोळ्यांना सहन होईना म्हणून, उजवा हात डोळ्यांवर धरून तो ताण निवारीत अस्वस्थ चित्तानें दूरवर पाहूं लागली.

" आज कोण कोण येणार आहेत मोटारींतून ? " नानकनें लडिवाळपणें आजीचा अशक्त हात कुरवाळीत राजकुंवरकडे पाहून विचारलें, " पिताजी देखील येणार आहेत का ग आज ? "

नानकचा प्रश्न ऐकून शामकुंवर कांहीं न बोलतां अगतिक दृष्टीनें कौसल्यादेवी व राजकुंवर यांच्याकडे टकटक पाहूं लागली.

तिघींनींही अश्रू दाटल्या कातर दृष्टीनें एकमेकींकडे पाहिलें. नानककडेही पाहिलें. कोणी कांहीं बोलेना.

इतक्यांत मोटार आश्रमाच्या आवारांत येऊन पोहोंचली. सर्व मंडळीनें महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार केला.

नानकही मुखांतलें अर्धें वाक्य तसेंच सोडून आनंदानें टाळ्या पिटीत, नाचत मोठयानें ललकारला, " महात्मा गांधी की जय ! "

कौसल्यादेवी आपल्या देशभक्त पुत्राचा यथोचित सन्मान करण्यासाठीं स्वतः कांतलेल्या सुताचा हार घेऊन वात्सल्यपूर्ण भावनेनें पुढें जाऊन पाहते तों—आंधळी मागते एक डोळा आणि देव देतो दोन !—मोटारींतून प्रथम गांधीजींचा अर्धपुतळा हातीं घेऊन हरकिसन व त्याच्या मागोमाग रामसिंग असे दोघेही राम–लक्ष्मण समोर आलेले पाहून त्या माऊलीचें म्लान मुख नवचैतन्याच्या संचारानें हंसूं लागलें.

हरकिसननें आपल्या हातांतील गांधीजींचा अर्धपुतळा रामसिंगच्या हातीं दिला, आणि "आई ! आई ! " असा मातृवत्सलतापूर्ण टाहो फोडीत आईच्या चरणांवर मस्तक नम्र केलें. पुत्राच्या मायेच्या अश्रूंचा मातेच्या चरणांवर अभिषेक झाला आणि मातेच्या वात्सल्यपूर्ण अश्रूंच्या अभिषेकानें पुत्राला मंगल मार्जनस्नान घडलें.

कौसल्यादेवीनें आपल्या हातांतील सुताचा हार रामसिंगचा सर्वश्रेष्ठ गौरव करण्याच्या सद्भावनेनें त्याच्या हातांतील गांधीजींच्या पुतळयाला अर्पण केला व तो पुतळा आपल्या हातीं घेऊन त्याच्यापुढें आपलें मस्तक नमविलें.

" हरकिसन ! " तिनें गहिंवरलेल्या कंठानें हरकिसनकडे पाहत हांक मारीत दर्शनासाठीं गांधीजींची मूर्ती त्याच्यापुढें केली.

हरकिसननें भक्तिभावपूर्वक त्या मूर्तीला प्रणाम केला व ती मूर्ती आपल्या हातीं घेऊन तो तिथल्या सर्व मंडळींना तिचें दर्शन घडवीत निघाला.

" माझी रामलक्ष्मणांची जोडी !" असें गहिंवरून उद्गारत कौसल्या-देवीनें रामसिंगला हृदयाशीं कळटाळून म्हटलें, " रामसिंग ! भाऊ भाऊ असावे तर असे रामलक्ष्मणासारखे असावे......" बोलतां बोलतां तिनें आपल्या लेकरांना आपलीच दृष्ट होईल कीं काय या नसत्या भीतीनें आपल्या मस्तकाच्या दोन्ही बाजूंना कानांपाशीं दोन्ही हातांचीं बोटें टेकून कटकट मोडलीं. तिच्यानें पुढें बोलवेना, इतका तिच्या कंठीं गहिंवर दाटून आला.

आईचा हात धरून चालणारा नानक हा सारा प्रकार पाहून आनंदानें गांगरून गेला होता. आपल्या सभोंवार आज कांहीं तरी निराळेंच आनंदीआनंदाचें जग निर्माण झालें आहे असें त्याला वाटलें.

# ३

गांधीजींच्या पुतळ्याच्या दर्शनाचा व हरकिसनच्या भेटीचा तो सोहळा सुरू असतांना रामसिंग प्रसन्न तृप्त वृत्तीनें पण अलिप्तासारखा त्या मंडळींत हंसत खेळत चालत बोलत होता. त्याच्या सत्कारासाठीं इतका वेळ वाट पाहत असलेली मंडळी जरी त्या नव्या अकल्पित आनंदाच्या भरांत त्याला बाजूला ठेवून गांधीदर्शनांतच रंगून गेली होती, तरी हा आपलाच गौरव आहे असें त्याला मनापासून वाटत होतें. त्या आनंदाच्या भरांत तो सकाळीं रायबरेलीला किसान मोर्चात असतांना झालेल्या जखमांच्या वेदनाही पार विसरून गेला होता. त्या सत्कारसोहळ्याचा पहिला बहर ओसरतो न ओसरतो तोंच रामनगरहून गोमतीदेवीचा रामसिंगला निरोप घेऊन स्वयंसेवक आला. तिकडील कटकटीची या स्वयं-सेवकानें आतां आणलेली बातमी ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

" रायसाहेबांच्या खेड्यांतले किसान रामनगरांत येऊन दंगा माजवतात ! मला नाहीं हें खरें वाटत. उजव्या हातानें डावा हात तोडण्याइतके रायसाहेब अविचारी नाहींत. त्यांतून गोमतीदेवीच्या बाबतींत तर—"

रामसिंगला ' पुरे करा ' असें हातानें खुणावीत राजकुंवर आजूबाजूला कोणी वडील माणूस नाहीं असें पाहत म्हणाली, " वित्त आणि कलत्र

यांचा मोह माणसाला माणुसकीचा विसर पाडीत नाहीं का ? मला तरी हीं लक्षणें एकंदरींत बऱ्याचीं दिसत नाहींत."

"मला देखील पटतें तुमचें बोलणें. असल्या जमीनदारांचीं काळींकुट्ट अंतःकरणें खादीच्या अभ्रयाखालीं झाकलीं म्हणजे कांहीं तीं शुभ्र होत नाहींत. असे दाखले पाहिले म्हणजे वाटतें कीं, खादीच्या पोटीं दंभ जन्माला येतो. माणुसकी जन्माला नाहीं येत." हरकिसन समोरच्या प्रार्थनामंदिरांत कौसल्यादेवी चौरंगावर पुष्पहारांनीं शृंगारून महात्माजींचा तो पुतळा बसवीत होती तिकडे दृष्टिक्षेप करून म्हणाला, "महात्माजींना फसवीत आहेत हे लोक सारे. सत्य–अहिंसेच्या शिकवणीनें आपला हृदयपालट झाला आहे असा खोटाच आभास निर्माण करून महात्माजींच्या देशोद्धाराच्या थोर कार्याचा विचका करून सोडीत आहेत."

"तुमच्या नव्या मताचा वारा हरकिसनला लागूं देऊं नका. आमच्यावर एवढी तरी कृपा करा." असें राजकुंवरला औपरोधिक भाषेंत सांगून रामसिंग रामनगरच्या वाटेला लागला. जातांना त्यानें पुन्हा एकवार महात्माजींच्या पुतळ्याचें दर्शन घेतलें व कौसल्यादेवीलाही नमस्कार करून सांगितलें, "आई! मी रामनरगला जातों. मला आशीर्वाद दे."

कौसल्यादेवी कधीं आपल्या मुलाला लोकसेवेच्या कार्यांत आड येत नसे. रामनगरचा आजचा प्रसंग आणीबाणीचा आहे हें तिला माहीत होतें. किसानच किसानांवर उलटले, उजवा हातच डावा हात तोडायला निघाला, तिथें सामोपचाराची कांहीं मात्रा चालणार नाहीं असें तिलाही वाटत होतें.

रामसिंग रायबरेलीच्या आगींतून निभावून आला तोंच या फोफाट्यांत उडी घ्यायला जातो आहे या जाणिवेनें आंतल्या आंत तिच्या काळजाचें पाणी होत होतें. तरी देखील तिनें तें सर्व दुःख आंतल्या आंत गिळलें आणि रामसिंगला आशीर्वाद देत महात्माजींच्या पुतळ्याच्या पायावरचें एक फूल उचलून त्याच्या हातीं दिलें.

दोन्ही हातांच्या ओंजळींत तें फूल घेऊन शिरोधार्य करीत रामसिंग बाहेर निघाला.

तो रामनगरच्या वाटेला लागला. तो बराच दूर जाईतों हरकिसन विषण्ण वृत्तीनें त्याच्याकडे एकसारखा पाहत होता. त्याचें एक मन त्याला सांगत होतें, "तूं रामनगरला जात नाहींस? चुकतो आहेस." तोंच दुसरें मन त्याला विचारीत होतें, "कशाला जातोस तिकडे? गोमतीमावशीचें कलंकमय जीवन तुला असें उजळून थोडेंच उजळ करतां येणार आहे? रायसाहेब पालीवाल महात्माजींचे शिष्य असतील. महात्माजी महापुरुष आहेत. ते समुद्रमंथनांतून हलाहल निर्माणही करूं शकतील आणि पिऊन पचवूंही शकतील. पण म्हणून काय तो हलाहलाचा पेला तूं आपल्या ओठीं लावणार?"

एक उसासा सोडीत त्यानें मनांतील तो विचारांचा गोंधळ बळेंच मागें लोटला आणि जवळच उभ्या असलेल्या राजकुंवरकडे पाहत लहानग्या नानकला हांक मारली, "नानक! ओळख आहे का? ओळखतोस तूं मला?"

राजकुंवर नानकचें फुललेल्या गुलाबासारखें बाळमुख आपल्या गोऱ्या-पान नाजूक हातानें कुरवाळीत म्हणाली, "किसनकाका ते आपले! ओळखलें नाहींस त्यांना?" ती हरकिसनकडे पाहत हंसतमुखानें म्हणाली, "तुम्ही लढाईवर गेलां—तेव्हां हा पुरा चार वर्षांचा देखील नव्हता."

"हरकिसानकाका.—आणि तोच का हा गांधीजींचा पुतळा? पिताजींनीं केलेला?" नानकनें प्रार्थनामंदिरांतील त्या पुतळ्याकडे लडिवाळपणें बोट दाखवीत विचारलें.

"होय बाळ! तोच हा पुतळा." जवळच बसलेल्या शामकुंवरनें त्या पुतळ्याच्या निमित्तानें मंगलसिंगची आठवण झाल्यामुळें दुःखाचा उसाचा सोडीत म्हटलें.

"सिंगजी सांगतात कीं—" पुढें कांहीं आठवेना म्हणून नानक आपले चिमुकले हात डोकीच्या केसांवरून फिरवीत राजकुंवरकडे पाहून म्हणाला, "तूं सांग ना! मला नाहीं आठवत."

"तारासिंगजी—" ती नानकचें मुख कुरवाळीत म्हणाली, "तुला आठवत नाहीं सिंगजी काय सांगत होते तें? नीट आठवण कर कीं!"

" सिंगजी सांगत होते आणि रामसिंगकाकाजी त्यांच्यावर खूप रागावले होते नाहीं का? गांधीजींना कोण कांहीं बोललें कीं रामसिंग-काकाजी खूप खूप चिडतात, नाहीं का? आतां ते आले म्हणजे सिंगजी-सारखें मीही त्यांना म्हणणार आहें, काय तुमचे गांधीजी! काय त्यांचा चरखा!—आणि 'चरखा चला चलाके लेंगे स्वराज्य लेंगे—' हें गाणें गाऊन त्यांना चिडवणार आहें."

" तारासिंगचें मन अलीकडे इतकें पालटलें आहे वाटतें? तो लढाई-वरून माझ्याबरोबर परत आला तेव्हां मुंबईतच त्याचा एकंदर रागरंग पालटूं लागल्याचीं चिन्हें मला दिसत होतीं." हरकिसन राजकुंवरकडे पाहून म्हणाला.

" परिवर्तन हें जिवंतपणाचें लक्षण नाहीं का हरकिसनजी? जगांत तीन प्रकारचीं माणसें असतात. कांहीं ठेंच लागण्यापूर्वींच शहाणपणानें वागण्याइतकीं सावध असतात; कांहीं ठेंच लागून महागाईत कां होईना पण शहाणपणा विकत घेतात; आणि कांहीं जन्मभर ठेचा खाऊनही शहाणपणाला पारखींच राहतात."

नानकला वडील माणसें काय बोलत बसलीं आहेत हें कळत नव्हतें. मन मात्र आईसभोंवार घोटाळत होतें. प्रार्थनामंदिरांत कौसल्यादेवी व शामकुंवर ह्या गांधीजींच्या प्रतिमेची पूजा बांधून त्या मूर्तीसमोर चरख्या-वर सूत काढीत बसल्या होत्या. तिकडे जाऊन नानक कौसल्यादेवीकडे वळून म्हणाला, " कसली ग पूजा बांधली आहेस तूं आजी?"

" आपल्या गांधीजींची." शामकुंवर नानकला आपल्याजवळ घेऊन म्हणाली.

राजकुंवरचें तिकडे लक्ष गेलें. दोघीही आपल्या सुनेचें तत्त्वज्ञान-परिपूर्ण संभाषण श्रद्धेनें पुराणश्रवणासारख्या ऐकत. राजकुंवर कधीं त्या वडीलधाऱ्या माणसांशीं त्यांच्या अशिक्षितपणामुळें मर्यादित झालेल्या वैचारिक पातळीची उंची विसरून त्यांच्याशीं असें अवघड कांहीं बोलत नसे. तरी देखील दोन वर्षें कॉलेजांत जाऊन इंग्रजी शिकलेली आपली सून आपणाहून किती तरी सुजाण व शाहणी आहे असें त्या दोघींनाही प्रामाणिकपणें वाटे.

राजकुंवरनें त्या दोघींकडे मागें वळून पाहिलें. तेव्हां तिला मात्र त्या लक्ष-पूर्वक तिच्याकडे पाहत आहेत असें पाहून वाटलें, कीं आपण त्यांच्या मनाला दुखवणारें कांहीं इथें बोलणें बरें नव्हे. बोलायचें तर तिला बरेंच होतें आणि तें हरकिसनशींच बोलायचें होतें. वडील माणसांच्या मानमर्यादा राखून केव्हां बोलायला मिळतें याची ती आज संध्याकाळीं हरकिसन तिथें आल्यापासून वाट पाहत होती.

तिनें त्या दोघी आज्या नानकचें कोडकौतुकाचें बोलणें ऐकण्यांत रंगून गेल्या आहेत असें पाहून आश्रमाच्या बागेकडे वळून पाहिलें.

" आपण तिकडे जाऊन बोलूं. इथें यांच्या प्रार्थनेंत अडथळा नको " असें हरकिसनला सुचवून ती बागेकडे वळण्यापूर्वीच हरकिसननें तिला विचारलें, " मग मला तुम्ही कोणत्या प्रकारच्या माणसांत घालतां ? "

" या, इकडे बागेंत या म्हणजे सांगत्यें." असें म्हणून राजकुंवर बागेंत जाऊं लागली. हरकिसनही तिच्या मागोमाग चालला.

# ४

बागेंतील फुलझाडांच्या मागें बसण्याची एकांताची जागा होती. त्या जागेकडे वळतां वळतां हरकिसनला राजकुंवर म्हणाली, " हं ! काय विचारीत होतां आत्तां मला तुम्ही ? "

" नाहीं म्हटलें, तुम्ही तुमच्या तीन प्रकारच्या माणसांपैकीं कोणत्या प्रकारांत मला घालतां ? " हरकिसननें हंसत हंसत विचारलें.

ती खालीं बसली, तोही खालीं बसला.

" ज्याला त्याला स्वतःची जागा स्वतःलाच चांगली ओळखतां येते, नाहीं का ? " ती किंचित् जीभ चावीत स्मितहास्यपूर्वक पण मिटल्या ओठांचा संयम दाखवीत म्हणाली, " मी हा लहान तोंडीं मोठा घास घेत्यें असें नाहीं ना तुम्हाला वाटत ? "

" लहान तोंडीं मोठा घास ? असें कसें म्हणेन मी ? मंगलसिंगला मी तुमच्याविषयीं काय बोलत असें हें आठवतें ना ? ' ही तुझी मास्तरीण

आणि तूं हिचा विद्यार्थी. तूं यांच्यापासून अक्कल शीक ' असें मी जें त्याला म्हणें, ती नुसती थट्टा नव्हती राजकुंवर! वयानें मी तुमच्यापेक्षां मोटा असेन. पण वयाबरोबर अक्कलही वाढते असा माझा गैरसमज मुळींच नाहीं. "

" बायकांनादेखील अक्कल असते असें मानणाऱ्यांपैकीं तुम्ही आहां तर?" राजकुंवरनें मंगलसिंगच्या आठवणीसरसें टचकन् डोळ्यांना आलेलें पाणी पदरानें पुसून चर्येवर हास्याची रांगोळी गिरवीत विचारलें.

हरकिसन सभोंवारच्या सुंदर सुवासिक फुलझाडांच्या प्रमाणबद्ध कलात्मक ताटव्यांकडे पाहत प्रसन्न रममाण वृत्तीनें उद्गारला, " किती सुंदर आहे ही बाग! फुलांच्या सुवासाचा कसा घमघमाट सुटला आहे. "

" ही बाग इथल्या किसानांनीं कष्ट करून नांगरून शिंपून जोपासली आहे. किसानांच्या कष्टांतून फुललेल्या फुलांचा, त्यांच्या कष्टांचा सुवास आहे हा. नुसता गोमतीदेवी, कैलासनाथ पालीवाल अशा गांधीनिष्ठ धनंतर जमीनदारांनीं मातींत पैसा पेरला आणि त्याला अंकुर फुटून त्यांचीं फुलझाडें झालीं, अशा फुलबागा नाहींत उठत..."

ती बोलतां बोलतां थबकून आपल्या बोलण्याचा हरकिसनच्या मनावर काय परिणाम होतो हें निरखून पाहू लागली.

" श्रीमंतांचा पैसा आणि गरिबांचे कष्ट यांच्या सुंदर मिलाफांतूनच ही फुलबाग फुललेली आहे. गांधीजींच्या शिकवणुकीला जर योग्य जमीन आणि योग्य खतपाणी मिळालें तर त्या शिकवणुकीची अशी फुलबाग बहरते. " हरकिसन उद्गारला.

" आणि मग तुमच्या रामचंद्रबाबाची चळवळ काय म्हणते? ते किसानांचे खरे कैवारी नाहींत असें का तुम्हाला आतां म्हणायचें आहे?" राजकुंवरनें विचारलें.

हरकिसन त्या प्रश्नावर निरुत्तर होऊन राजकुंवरच्या तोंडाकडे पाहूं लागला. त्याला काय उत्तर द्यावें हेंच सुचेना. आजवर गांधीजी आणि रामचंद्रबाबा यांच्या तुलनेचा विचारही त्याच्या मनाला कधीं शिवला नव्हता. तुरुंगांत गेल्या दोन वर्षांत बाहेर अयोध्येचा किसान रामचंद्रबाबाच्या

झांकेनें जागा झालेला त्याला दिसत होता. महात्मा गांधींची असहकारितेची चळवळही पंजाबांत जालियनवाला बाग कत्तलीच्या निमित्तानें झालेल्या मर्माघातानंतर पुन्हा दसपटीनें–शतपटीनें जोराला लागलेली त्याला दिसत होती. वारंवार शेंकडोंनीं, हजारोंनीं सत्याग्रही स्वयंसेवक तुरुंगांत डांबले जात, त्यांच्या तोंडून कर्णोपकर्णी चळवळीचीं यशोगीतें त्याला ऐकूं येत. आज सकाळींच तुरुंगांतून सुटल्याबरोबर रायबरेलीला त्यानें जें रणकंदन पाहिलें त्यांत आपला किसान किती धडाडीनें जागा होऊन संघटित होत आहे हें त्याला प्रत्यक्ष दिसलें होतें. तो लढाईवर जाण्यापूर्वी ज्या जागीं अकबरपुरांत मावशीचीं गुरें चारण्याची ओसाड जमीन होती, त्या जागीं जातां भव्य आश्रम उभारला जाऊन त्याच अकबरपूरला त्या आश्रमामुळें पवित्र तीर्थक्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालेलें पाहत होता. अशी देशांतील चळवळ महापुरानें महासागरासारख्या विशाल स्वरूपांत वर्षाकालीं वाहणाऱ्या गंगायमुनांसारखी देशभर फोफावत होती आणि सारा देश समृद्ध जलमय करून टाकीत होती, हेंही तो पाहत होता.

"बोला ना? मी विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर द्या ना! बोलत कां नाहीं?" राजकुंवरनें कांहीं क्षण थांबून विचारलें.

"रामचंद्रबाबा आणि गांधीजी ह्या दोन आमच्या पवित्रसलिला गंगा–यमुना आहेत. ह्या गंगा–यमुनांचा संगम होईल आणि त्या संगमतीर्थावर भारतमातेचीं तेहतीस कोटी संतानें अभ्यंगस्नान करून पावन होतील तेव्हांच भारतमातेचें दास्य टळेल." हरकिसन डोळे मिटून रामचंद्रबाबा व गांधीजी यांच्या प्रतिमा अंतःकरणांत भावनेनें उभ्या करून त्यांना हात जोडून उद्‌गारला.

"शब्द जितके गोंडस तितके फसवे असतात हरकिसनजी! कविकल्पनांत ह्या गंगा–यमुनांचा संगम कवि पाहिजे तेव्हां, पाहिजे तसा घडवून आणील; आणि तुमच्याआमच्यासारखे भाविक त्या संगमाच्या मृगजळांत—" हरकिसन प्रश्नार्थानें भुंवया वक्र करीत आपणाकडे पाहत आहे हें ध्यानीं घेऊन राजकुंवर म्हणाली, "होय. मृगजळांतच

मी म्हणत्यें हरकिसनजी ! तुम्ही म्हणतां तो गंगा–यमुनांचा संगम ह्या वास्तव जगांत आजवर कधीं झाला नाहीं आणि पुढें कधीं होणार नाहीं. त्या संगमावर अभ्यंगस्नान करण्याची इच्छा करणाऱ्याला मृगजळामागेंच धावावें लागेल आणि शेवटीं फसवणूक झाल्यावर पस्तावावें लागेल. कुणी फसवूक झाल्यावर पस्तावले आणि—" एवढें बोलून ती एकदम थांबली आणि हरकिसनकडे पाहून हंसली.

" कुणी कुणी वाटा पडताळून घेतल्या ? "

" कां ? बाकीच्या साऱ्यांनीं घेतल्या. लढाईवरचे तुमचे मित्र जे हा लोक सोडून गेले त्यांच्याखेरीज बाकीचे तुमचे या प्रवासांतील सोबती तुमच्याबरोबर कुणीही उरलेले नाहींत.—असे आश्चर्यानें माझ्याकडे पाहूं नका. मी खेरंच सांगत्यें; कुणीही उरलेले नाहींत. तारासिंग, मीर कासीम, याकूब, शेख रहमान या तुमच्या मित्रांनीं तुमच्या त्या मृगजळांतल्या गंगा–यमुनांच्या संगमावर स्नान करायचें सोडून दिलें आहे. कुणी रामचंद्रबाबांच्या किसान चळवळीला वाहून घेऊन किसानांच्या उद्धारासाटीं झटत आहेत; कुणी सशस्त्र बंडाच्या उठावाखेरीज आपल्या देशाला तरणोपाय नाहीं हें ओळखून त्या ध्येयानें क्रांतिकारक बनले आहेत. कुणी तुरुंगांत आहेत; कुणी अज्ञातवासांत आहेत. पण तुमच्या मृगजळांतील संगमतीर्थाचा यात्रेकरू मात्र तुमच्या मित्रांपैकीं शारदेखेरीज आतां कुणीही उरला नाहीं..." ती डाव्या हाताची करंगळी आपल्या केसांतून फिरवीत पूर्वस्मृतीचें पर्यालोचन करून म्हणाली, " नाहीं म्हणायला आणखीही एक अपवाद आहे. पण आपण त्याचें नांवच सोडून देऊं."

हरकिसननें भुवया चढवून ' तो कोण ' अशा अर्थानें राजकुंवरकडे पाहिलें.

" प्रेताला शृंगारून ज्या फुलानें आपली कोमलता पाषाणापेक्षांही कठीण आहे असें दाखवून दिलें, त्याचें नांव तरी आठवून काय करायचें आहे ? इतका दुर्मिळ सज्जन माणूस इतका दुर्मीळ दुर्जन झालेला गोपीनाथ हा पहिलाच मी तरी पाहिला. "

गोपीनाथचें नांव कानीं पडतांच हरकिसन एकदम राजकुंवरकडे पाठ करून समोरच्या फुलझाडांच्या ताटव्यांकडे गेला. फुलामुलांची सृष्टि हा

त्याच्या हळव्या जिवाचा सर्वांत मोठा विरंगुळा होता. फुलांमुलांचा गोड सहवास लाभला तर त्यासाठीं तो मृत्यूचें बोलावणें आलें तरी त्यालाही थोडावेळ थांबायला सांगण्याइतका फुलामुलांचा नादी तो होता. त्या सुंदर सुवासिक फुलांच्या सृष्टींत शरीरानें आणि मनानें संचार करूं लागतांच तो एका क्षणांत आपला मनस्ताप विसरूं लागला. राजकुंवरलाही तो विसरला. जणूं काय एकेका फुलझाडाशीं गुजगोष्टी बोलत मंद पावलें टाकीत फिरूं लागला. फिरतां फिरतां त्याला हेलिओट्रोप या त्याच्या आवडत्या फुलांचा सुगंध जाणवला. त्यासरसा त्या सुगंधाच्या अनुरोधानें तो उजवीकडे वळून तें फुलझाड शोधूं लागला. दहा पांच पावलें तो पुढें जाऊन पाहतो तों सुंदर वेलबुट्टीदार हिरवळीच्या कोंडाळ्यांत लावलेलीं तीं फुलझाडें बहरानें फुललेलीं त्याला आढळलीं. त्यांतला एक तुरा तोडून घेण्यासाठीं पुढें जातां जातां त्यानें त्या वेलबुट्टीदार हिरवळीकडे नजर टाकली.

त्या हिरवळीच्या वेलबुट्टींत कौशल्यानें कोरलेलीं अक्षरें त्याला आढळलीं : ह र कि स न .

आपली इतक्या कळकळीनें आठवण करणारें हें आपल्या जिव्हाळ्याचें माणूस कोण असावें असें मनांत भावीत त्यानें त्या फुलझाडांच्या ताटव्याच्या पलीकडे सहज नजर फेंकली, तों तिथेंही हिरवळींत कांहीं कोरून लिहिल्याचा भास त्याला झाला.

कुतूहलपूर्वक त्यानें पुढें जाऊन तें काय लिहिलें आहे तें वाचलें: प्र भा व ती .

त्या कोरलेल्या सुंदर अक्षरांतील एकदोन अक्षरें जनावरांच्या अगर माणसांच्या पायाखालीं ती हिरवळ मुळांतच तुडवली गेल्यामुळें ओरखडल्यासारखीं त्याला दिसलीं.

## ५

हरकिसनचें सर्वांग थरारलें. आपणाला हेलिओट्रोपचा सुवास अतीशय आवडतो हें ध्यानीं घेऊन आपल्या गैरहजेरींत आपल्या आवडीनिवडीची इतकी जोपासना करणारें माणूस या जगांत प्रभावतीखेरीज दुसरें कोणी-

सुद्धां नाहीं असें तो मानीत होता. प्रभावतीनेंच आपल्या उत्कट प्रीतीचे हें नितांतरम्य प्रतीक या ठिकाणीं रुजविलें असेल का ?—तो आपल्या मनाला विचारूं लागला. 'प्र भा व ती' या शब्दांतील अक्षरें जागोजागीं चुरडलेलीं पाहून त्याच्या अंतश्चक्षूंपुढें रायसाहेब पालीवालांच्या हस्तें जीवनाचा चुराडा झालेली खिन्न प्रभावती उभी राहिली. त्यासरसा एक दीर्घ उसासा सोडून तो खालीं आपल्या पावलांकडे पाहूं लागला.

" किती सुंदर आहे नाहीं तो ताटवा ? आमची शारदादेवी तशी फार रसिक आणि प्रेमळ आहे. " राजकुंवर हरकिसनचें मन त्या फुलझाडांच्या ताटव्यांत रंगून गेलेलें पाहून उद्गारली.

" शारदेनें लावला हा ताटवा ? " हरकिसननें आतुर नजरेनें तिकडे पाहत विचारलें.

" तर ! ती जमीन खणण्यापासून तों फुलझाडांना बहर येईपावेतों एकसारखी फुलझाडांची निगा करते बागेंत येऊन. अशी ती स्वतःच्या जिवापलीसडे या ताटव्याला जपते ! "

हरकिसननें वासासाठीं तोडलेला फुलांचा तुरा वास घेण्याकरितां नाकाकडे नेला. पण वास घ्यायला त्याचें मन धजेना. त्या फुलांच्या प्रत्येक सुवासलहरींत शारदेचें पवित्र प्रेमळ अंतःकरण एकरूप झालेलें त्याला जाणवत होतें. देवाच्या पूजेसाठीं तोडलेल्या फुलांचा वास घेतांना मन कचरावें तसें त्यानें भक्तिभावपूर्वक दुरूनच हातांतील त्या फुलांच्या तुऱ्याकडे एकवार नुसतें पाहिलें आणि देवदर्शनानें भक्ताला आनंद होतो तसा आनंद मानला.

तोंच त्या फुलझाडाच्या ताटव्यापलीकडून एक साप सरपटत येतांना राजकुंवरनें पाहिला. त्याबरोबर ती दचकून ओरडली, " बाबूजी ! मागें सरा. साप ! साप !— "

" कुठें आहे साप ? " असें विचारीत हरकिसननें दचकून मागें वळून पाहिलें तों पो. स. इ. माताप्रसाद दोन पोलिस शिपायांना बरोबर घेऊन येतांना त्याला दिसला. त्याला पाहून हरकिसन सापाला पार

विसरून गेला. साप आपल्या वाटेनें फुलांच्या ताटव्यांतून निघून गेला. तिकडे लक्षही न देतां हरकिसननें माताप्रसादकडे पाहत स्वतःशीं विचारलें, "कुणाच्या मानेसभोंवार मृत्यूचा गळफांस आवळण्यासाठीं आला आहे हा यमदूत? पुन्हा याचा माझ्यावर तर डोळा नाहीं ना?"

त्याची ती अमंगल शंका खरी ठरली. माताप्रसाद रामप्यारीवरील खुनी हल्ल्याच्या गुन्ह्याचा तपास करीत हरकिसन हाच वहिमी गुन्हेगार समजून त्याला पकडण्यासाठीं आला होता.

रामप्यारीवरील खुनी हल्ल्याची बातमी हरकिसन त्या क्षणीं प्रथमच ऐकत होता. तो आश्चर्यानें बुचकळ्यांत पडला, "सकाळीं तर ती मला भेटली! आणि एवढयांत हा प्रकार?..."

आणि या गुन्ह्याशीं माताप्रसादनें आपल्या नशिबाची सांगड घातल्या-बद्दल विकट हास्य करीत तो आईचा व आश्रमांतील इतर मंडळींचा निरोप घेण्यासाठीं माताप्रसादबरोबर आश्रमाकडे गेला.

थोड्या वेळापूर्वी आनंदानें गजबजून गेलेला तो आश्रम आतां प्रेत-कळेनें झांकळून गेला होता. कौसल्यादेवी व शामकुंवर दोघीही प्रार्थना-मंदिरांत उच्चस्थानीं पुष्पहारांनीं शृंगारून मांडलेल्या महात्माजींच्या अर्ध-पुतळ्यासमोर बसून अगतिकतेनें अश्रू ढाळीत होत्या. लहानगा नानक घारीच्या झडपेला भिऊन प्राणभयानें उघड्या आकाशाखालीं लपूं पाहणाऱ्या पक्षिणीच्या पिलाप्रमाणें कावराबावरा होऊन जवळच उभा होता. तो राजकुंवर बागेतून माघारी आलेली पाहून वासरूं गाईकडे धांवत जातें तसा धांवत जाऊन तिला बिलगला.

माताप्रसाद हा तर हरकिसनचा बाळपणापासूनचा सोबती व गांवकरी. पण तो हरकिसनला पकडायला आला याचें कौसल्यादेवी, शामकुंवर अथवा राजकुंवर यांना मुळींच नवल वाटलें नाहीं. माताप्रसादच्या जीवनाला व वृत्तीला लागलेलें पाशवी वळण आतां सर्वांच्या परिचयाचें झालें होतें. परंतु त्याच्या बरोबरच्या दोन पोलिसांपैकीं एक पोलीस मात्र त्यांना ओळखतां आला व त्या ओळखीसरसा त्यांच्या अंतःकरणाला जोराचा धक्का बसला.

गोपीनाथ हा हरकिसनचा मित्र. लढाईवर दोघेही बरोबर गेलेले. आपल्या साऱ्या सैनिक मित्रमंडळींत गोपीनाथसारखा भला देवमाणूस दुसरा नाहीं असें हरकिसन रणांगणावरून घरीं पाठविलेल्या खुशालीच्या पत्रांत वारंवार लिही. एरव्हीं देखील बाळपणापासूनच गोपीनाथ हा अत्यंत सालस व सदाचारी म्हणून ओळखला जात होता. इतर मंडळींची गोष्ट राहोच, प्रभावतीसारख्या रामप्यारीच्या मैत्रिणी माहेरपणासाठीं अथवा कसल्या अन्य कार्यांच्या निमित्तानें एकत्र आल्या कीं रामप्यारीचा तिच्या महान् भाग्याबद्दल सात्त्विक हेवा करून तिला म्हणत, "तूं सातां जन्मीं निष्ठेनें गौरीहर पुजलास म्हणून तुला असला देवासारखा पति मिळाला."

तोच गोपीनाथ आज पोलीस म्हणून हरकिसनला पकडायला आलेला पाहून त्या मंडळीला विस्मय कां नाहीं वाटणार ?

हरकिसन व गोपीनाथ या दोघांची दृष्टादृष्ट झाली तेव्हां गोपीनाथ क्रूर पोलिसी वृत्तीलाही कठोर वाटणाऱ्या क्रूर भावनेनें जणूं काय सावज पकडायला टपलेल्या दुष्ट लांडग्यासारखा आपणाकडे पाहत आहे असें हरकिसनला वाटलें. पण ती कांहीं बोलण्याची वेळ नव्हती. निमूटपणें भोगाला येईल तें भोगण्याची वेळ होती.

हरकिसननें आईला व महात्माजींच्या अर्धपुतळ्याला नमस्कार करून सर्व मंडळीचा निरोप घेतला. निरोप घेतांना हरकिसनच्या आणि निरोप देतांना आईच्या डोळ्यांना पाणी आलें. इतर मंडळींनाही अतिशय दुःख वाटलें. खुनाचा प्रयत्न केल्याचा भयंकर आरोप!—वेळीं फांशी टळली तरी जन्मठेप अथवा तशीच लांब मुदतीची शिक्षा कांहीं केल्या टळत नाहीं हें त्या मंडळीला कुणी सांगायला नको होतें.

"आई ! —" गांधीजींच्या अर्धपुतळ्यासमोर जोडल्या हातांनीं अश्रू ढाळीत उभ्या असलेल्या हरकिसनच्या तोंडून पुढें शब्द उमटेना. दुःखाचा महापूर मोठ्या कष्टानें आवरीत तो कौसल्यादेवीला म्हणाला, "आई ! गांधीजींच्या पायांवरचा निर्माल्य मला प्रसाद दे."

कौसल्यादेवीनें डाव्या हातानें आपले दुःखाश्रू पुशीत त्या पुतळ्याच्या पायावरचें एक फूल काढून हरकिसनच्या हातीं दिलें.

थरथरणाऱ्या हातांनीं तें फूल घेऊन त्या पुतळ्याला व पुन्हा एकवार आईला नमस्कार करून हरकिसन पो. स. इ. माताप्रसादबरोबर पोलीस पहाऱ्यांत आश्रमाबाहेर पडला.

# ६

त्या चार दिवसांपासून रायबरेलींत ज्याच्या त्याच्या तोंडीं तोच एक विषय—रामप्यारी.

पहिल्या दिवशीं तर रामप्यारीचा भयंकर खून झाल्याची वार्ताच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. आणि खरोखर तशी परिस्थिति होतीही. पो. स. इ. माताप्रसाद रामप्यारीशीं ठरलेल्या पूर्वसंकेतानुसार त्या दिवशीं सकाळीं हरकिसन रामप्यारीच्या बंगल्याबाहेर गेल्यावर तिला भेटायला जातो तों ती मानेवर, गालांवर, गळ्यांवर व छातीवर तीक्ष्ण शस्त्राच्या भयंकर जखमा होऊन रक्तबंबाळ स्थितींत बिछान्यावर अस्ताव्यस्त बेशुद्ध पडलेली आढळली. माताप्रसादनेंच तिला प्रथम योग्य औषधोपचार करून पाहण्यासाठीं ताबडतोब सरकारी दवाखान्यांत नेऊन पोचविलें. अॅम्बुलन्स कारमधून इस्पितळांत जाऊन पोचेपावेतों तरी ती जिवंत राहते किंवा नाहीं याची सर्वांनाच शंका होती.

ही वस्तुस्थिति जमेला धरून वर्तमानपत्रांत रामप्यारीचा खून झाल्याची वार्ता प्रसिद्ध होणें स्वाभाविकच होतें.

पण एक दिवस गेला, दुसरा दिवस गेला, तिसरा दिवस गेला, तरी रामप्यारी अजून धुगधुग जिवंत होती. ती अजून पूर्ण बेशुद्धावस्थेंत जरी होती तरी आतां ती जगण्याची आशा आहे असें डॉक्टर बोलूं लागले होते. उपचारांची कांहीं वाण नव्हती. स्वतः रामप्यारी रायबरेलींतील नुसतीच धनवंत वेश्या नव्हती, तर ती रायसाहेब कैलासनाथ पालीवालसारख्याच्या आश्रयाला व प्रशंसेला पात्र ठरलेली महशूर वेश्या होती. तिला इस्पितळांत आणल्या घटकेपासून दिवसा रात्रीं अष्टौप्रहर तिच्या समाचारासाठीं मोटारींवर मोटारींची ये जा इस्पितळांत सुरू होती. जमीनदार, सावकार व मोठमोठे सरकारी अधिकारी एकसारखे तिची चौकशी करून जात

आणि स्थानिक कॉंग्रेसचे पुढारी देशभक्तही अधून मधून आस्थापूर्वक चौकशी करायला चुकत नसत.

कारण ती रायसाहेब पालीवालसारख्या श्रीमान् गांधीभक्त कॉंग्रेसनिष्ठ पुढाऱ्याची प्रेयसी होती.

इतकी आम प्रतिष्ठित जनतेची सहानुभूती रामप्यारीची चरणसेवा करण्यासाठीं ऋद्धिसिद्धीसारखी तिष्ठत समोर उभी असल्यावर इस्पितळाच्या डॉक्टरनीही अत्यंत दक्षतापूर्वक तिच्या प्रकृतीची काळजी घेऊन तिला मृत्यूच्या दाढेंतून ओढून बाहेर काढलें तर त्यांत नवल नाहीं.

आतां ती शुद्धीवर केव्हां येते हीच उत्कंठामिश्रित चिंता सर्वांना लागून राहिली होती. मृत्यूला तिनें मागें परतविलें असें डॉक्टर निर्विवादपणें बोलूं लागल्यापासून तर ती शुद्धीवर केव्हां येते आणि आपल्या मुखानें आपल्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचें सत्यस्वरूप केव्हां प्रकाशांत आणत्ये इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले होते.

जनतेला ती बाब केवळ दांडग्या कुतूहलाची होती.

रायसाहेब पालीवाल, रायबरेलींतील शेट सावकार व बडे सरकारी अधिकारी यांना त्या तरुण, सुंदर व प्रसन्न वृत्तीच्या वेश्येविषयीं वाटणाऱ्या कुतूहलांत सहानुभूतीबरोबर आपुलकीही होती.

पो. स. इ. माताप्रसाद हा देखील त्याच वर्गांतील सरकारी अधिकारी खरा. पण तो इतर सर्वांपेक्षां अधिक उत्कंठेनें रामप्यारी शुद्धीवर येण्याची वाट पाहत होता. त्यानें आरंभिलेल्या त्या फौजदारी खटल्याची उभारणी रामप्यारीच्या जबाबावर अडून बसली होती. हातीं लागलेल्या व त्या अनुषंगानें तयार केलेल्या पुराव्यावरून रामप्यारीवर खुनी हल्ला करणारा गुन्हेगार हरकिसन हाच होय अशी जरी माताप्रसादची आनुषंगिक साक्षीपुराव्यानें खात्री झाली होती, तरी तो पुरावा किती झाला तरी आनुषंगिक. रामप्यारी त्या प्राणघातक हल्ल्यांत बळीच पडली असती तर गोष्ट निराळी होती. मग खटल्याचें काम एक प्रकारें सोपें झालें असतें. पण ती ज्या अर्थी जिवंत होती त्या अर्थी माताप्रसादही तिच्या जबाबाखेरीज अवांतर हातीं लागलेल्या साक्षीपुराव्याचें मोल ठरविण्याच्या बाबतींत साशंक होता.

इस्पितळांत रामप्यारीच्या संरक्षणासाठीं व देखरेखीसाठीं रात्रंदिवस चोवीस तास एक पोलीस हवालदार तिच्या खाटेपाशीं उभा असे. माताप्रसाद रोज त्या हवालदारापाशीं रामप्यारीच्या प्रकृतीची चौकशी करी.

चौथ्या दिवशीं रामप्यारी किंचित् शुद्धीवर आली. पण तिला बोलतां कांहीं येईना. ती बोलण्याचा आटोकाट प्रयत्न करी, पण गळ्यावर आणि गालांवर झालेल्या जखमांमुळें तिच्या तोंडावाटे शब्दच उमटेना.

अखेर आठव्या दिवशीं ती झोपेंत कांहीं तरी अडखळत बोलूं लागल्याचें त्या दिवशीं इस्पितळांतील पहाऱ्यावर असलेल्या गोपीनाथ हवालदारानें येऊन सांगितलें.

लगेच माताप्रसाद मॅजिस्ट्रेटला बरोबर घेऊन रामप्यारीचा जबाब घेण्यासाठीं इस्पितळांत गेला. डॉक्टरनीही आतां बोलण्याइतकी ताकत तिच्या अंगीं आली आहे असें सांगितलें.

"तुम्हाला आतां बरें वाटतें?" मॅजिस्ट्रेटनें रामप्यारीला विचारलें.

"होय." क्षीण ओढत्या स्वरांत रामप्यारी उत्तरली.

"तुमच्यावर हल्ला कुणी केला हें तुम्हाला माहीत आहे?" मॅजिस्ट्रेटनें दुसरा प्रश्न केला.

रामप्यारी कांहीं उत्तर न देतां तिनें जवळ उभे असलेल्या डॉक्टर, माताप्रसाद, हवालदार गोपीनाथ व दुसरा एक हवालदार यांच्याकडे अश्रुपूर्ण निर्जीव नजरेनें पाहूं लागली.

"तुमच्यासमोर तुमच्यावर हल्ला करणारा माणूस येऊन उभा राहिला तर तुम्ही त्याला ओळखाल?" मॅजिस्ट्रेटनें पुन्हा प्रश्न केला.

त्या प्रश्नालाही कांहीं उत्तर न देतां तिनें ओल्या नजरेनें बाजूला उभ्या असलेल्या मंडळींकडे पाहिलें. गोपीनाथच्या नजरेला नजर भिडतांच ती एकदम सर्वांग शहारून दचकली आणि भीतिग्रस्त कांपऱ्या स्वरांत उद्गारली, "नाहीं! नाहीं!"

"आरोपी इथें आणला आहे?" मॅजिस्ट्रेटनें माताप्रसादला हळूच रामप्यारीची नजर चुकवून विचारलें.

" होय. आणला आहे." माताप्रसादनें तिथें उभ्या असलेल्या पोलीस हवालदारांना हुकूम केला, " आरोपीला आणून हजर करा."

थोड्याच वेळांत त्या पोलिसांनीं बाहेर पोलिस पहाऱ्यांत उभा असलेल्या हरकिसनला आणून रामप्यारीच्या खाटेपाशीं उभें केलें.

" रामप्यारी ! " मातप्रसादनें ग्लानी आल्यामुळें बाजूला उशीवर मान टाकून शांत पडलेल्या रामप्यारीला हांक मारून हरकिसनकडे बोट दाखवीत विचारलें, " या हरकिसनला तुम्ही ओळखतां ? "

रामप्यारीनें गालांवरून ओठापर्यंत वाहत आलेल्या अश्रूंचे ओघळ कोरड्या जिभेच्या टोकानें पुशीत ओंठानें ओठ दाबण्याचा प्रयत्न करीत माताप्रसादकडे नुसतें पाहिलें.

" या हरकिसननेंच तुमच्यावर हल्ला केला ना ? " माताप्रसादनें मॅजिस्ट्रेटकडे पाहत प्रश्न केला.

त्या क्षणीं रामप्यारी गुहेंतून जखमी वाघीण हुसकून काढावी तशी अंगीं होता नव्हता तेवढा आवेश एकवटून किंचाळली, " नाहीं ! ... नाहीं ! ... "

आणि ती त्या आवेशासरशी बेशुद्ध झाली.

" आतां थांबा जरा. त्यांच्या प्रकृतीला अधिक बोलणें मानवणार नाहीं. " असें सांगून डॉक्टर तिची नाडी पाहत शुश्रुषेच्या उद्योगाला लागले.

●

हरकिसनला पोलीस ठाण्यावर कच्च्या तुरुंगांत पोचविणारे ते दोन हवालदार आपसांत बोलत चालले होते. त्या दोघांपैकीं गोपीनाथ हा रामप्यारीचा पूर्वीचा पति आहे हें त्या दुसऱ्या हवालदाराला काय माहीत ? आणि गोपीनाथही आपली ओळख न देतां होय नाहीं करीत ती वेळ शोभवून नेत होता.

" हा गडी मोठा नशीबवान दिसतो. खून करून सवरून पुन्हा त्या बाईच्या जबाबावर सुटणार. " एक हवालदार म्हणाला.

" होय. " गोपीनाथ गंभीरपणें उत्तरला. हरकिसननें आपणांवरील ती टीका ऐकून निरपराधी वृत्तीनें गोपीनाथकडे वळून पाहिलें. पण दोन शब्द आपणाशीं बोलण्याइतकी देखील गोपीनाथची प्रसन्न वृत्ति न आढळल्यामुळें त्याला आपली कैद्याची पायरी ओळखून तो निंदेचा मुका मार सहन करीत गप्प बसावें लागलें.

" बाकी ही तरी जगाची एक मौजच आहे नाहीं ? कुठें ती एखाद्या राजाची राणी शोभणारी नायकीण आणि कुठें हा भुकेकंगाल फाटका उडाणटप्पू. हा तिला ठार करायला उठलेला आणि ती आपली याला वांचवूं पाहते. प्रेम ही मोटी अजब चीज आहे खरी. कुणाचें प्रेम केव्हां कुणावर बसेल याचा कांहीं नेम नाहीं. "

गोपीनाथनें हंसूं आल्यासारखे ओठ दाबीत किलकिल्या नजरेनें नुसतें त्या हवालदाराकडे पाहिलें.

इतक्यांत समोरून लोक रात्रौ तुरुंग फोडून कैदी पळाल्याबद्दलच्या गोष्टी बोलत येत होते, त्या ऐकण्याच्या नादांत नायकिणीच्या विषयाचा धागा हवालदारानें तिथेंच गुंडाळता घेतला.

" काल कोण कोण पळाले रात्रीं तुरुंगांतून ? पळालेले कुणी सांपडले का ? " हवालदारानें चालण्याची गती अगदीं मंदावीत त्या बोलत जाणाऱ्या माणसाला विचारलें.

" सांपडतात ! सरकारचा बाप आला पाहिजे त्यांना पकडायला. रामचंद्रबाबासारखा हनुमानाचा अवतार अशा कैक तुरुंगांच्या भिंतींवरून उड्डाण करून लंकेपार होणारा बहाद्दर, तो यांना थोडाच सांपडतो ? " तो माणूस म्हणाला.

" ऐकलें कीं, तुरुंगांतले शिपाई आणि कैदी वॉर्डर देखील रामचंद्रबाबाला सामील होते. " गोपीनाथ प्रथमच उद्गारला.

" होते तर ! अहो, अशा चोरांच्या हातीं जामदारखान्यांच्या किल्ल्या सांपडतात म्हणून जामदारखाने बिनबोभाट लुटतां येतात. बाकी हा रामचंद्रबाबा पाताळयंत्री खरा. "

“कोण कोण पळाले आणखी रामचंद्रबाबाबरोबर?” हवालदारानें विचारलें.

“चार कैदी पळाले म्हणतात. रामचंद्रबाबा आणि कहानसिंग नांवाचा एक पंजाबी कैदी या दोघांचीं नांवें तेवढीं कळलीं. बाकीच्यांचीं कळलीं नाहींत. रघुनंदन नांवाचा एक पोलीस हवालदार मात्र काल रात्रीपासून बेपत्ता आहे.”

हरकिसनच्या मनांत त्या हवालदाराचे ते बोल ऐकून तुरुंगांत कहानसिंगची सुटण्याच्या रात्रीं झालेली भेट आठवली. त्याच्याच मदतीनें रामचंद्रबाबा तुरुंग फोडून पसार झाला असला पाहिजे असें त्याला नक्की वाटलें आणि आयुष्यांत आज प्रथमच त्याच्या धाडसाचें कौतुकही वाटलें. पण तो कैदी होता. पोलिसांना भिऊन तो कांहींच बोलत नव्हता. मुकाटपणें सारें ऐकत होता.

आज आज दिवस तापलेल्या तव्यावर उभा केल्यासारखी त्याची अवस्था होती. आपण कोणत्याही प्रकारें अपराधी नसलों तरीही रामप्यारीच्या बाबतींत दोन वर्षांपूर्वी पहिला खोटा आळ आपणावर आला व आपण अब्रूला भुकून तुरुंगांत येऊन बसलों; तसेंच या वेळींही होईल अशी त्याला खात्री वाटत होती. त्या मनस्तापामुळें जीवन त्याला असह्य झालें होतें. रामप्यारीचा खून करण्याचा प्रयत्न कोणी केला हें माहितही नसतांना त्या खुनाचे गुन्हेगार आपण ठरून हकनाहक फांशीं जाणार असें त्याला पहिल्या दिवशीं वाटलें. रामप्यारी त्या हल्ल्यानंतर अजूनही जिवंत आहे त्या अर्थी आपल्या कपाळींची फांशीची शिक्षा टळली असा त्याचा अंदाज होता. पण फांशीं नाहीं तर जन्मठेप, निदान दहा पांच वर्षांचा तुरुंगवास तर खरा! ते जे काय खडतर भोग भोगायचें आपल्या नशिबीं असेल तें एकदाचें लौकर भोगाला यावें म्हणून तो उतावळा झाला होता. आज इस्पितळाकडे जातांना तर त्यानें त्रागेखोरपणानें मनाचा निर्धारही केला होता कीं आपण मुकाटपणें गुन्हा कबूल करावा आणि मिळेल ती शिक्षा भोगावी. शिक्षा ही होणारच. मग विनाकारण दिवसगत लावून ह्या मानेवरच्या टांगल्या तरवारीकडे भीतीनें किती दिवस पाहत बसायचें!

पण इस्पितळांत रामप्यारीचा एकंदर रागरंग पाहून त्याला ह्या अंधाऱ्या जगांत न्यायाचा व आशेचा अंधुकसा किरण दिसूं लागला होता. त्या आनंदाच्या भरांत त्यानें गुन्हा कबूल करण्याचा आपला विचार आवरता घेतला होता.

रामचंद्रबाबा तुरुंग फोडून पळाला ह्या कानीं आलेल्या नव्या सुवार्तेचा आपल्या आनंदाला उजाळा देत हरकिसन पोलिस ठाण्यांतील आपल्या कैदी–कोठडीपाशीं आला. तों तिथें त्याच्या नशिबानें त्याला नवा आनंद आणून ठेवला होता.

पोलिसांनीं चौकशीसाटीं बाहेरगांवाहून हिंडवून आणलेला भूपालसिंग कैदी त्याच कोठडींत त्याच्या सोबतीला बंद केलेला त्याला आढळला.

हरकिसन भूपालसिंगला पाहतांच त्याच्याशीं कांहीं बोलणार हें त्याच्या चर्येवरून ओळखून भूपालसिंगनें त्याला नेत्रपल्लवीच्या मुक्या भाषेंत 'कांहीं बोलायचें नाहीं. पोलीस जवळ उभे आहेत' असें सुचविलें. त्यामुळें हरकिसन कांहीं बोलला नाहीं. पोलिसानें कोठडीचें कुलूप काढून दार उघडलें व हरकिसनला आंत कोंडून पुन्हां दरवाजा बंद करून तो निघून गेला.

"फार दुष्ट माणूस आहे हा पोलीस! तूं त्याला ओळखलेंस?" भूपालसिंगनें गोपीनाथ हवालदार दूर जाऊन दृष्टीआड झाल्यावर हरकिसनला विचारलें.

"ओळखलें कीं! कां?" हरकिसननें गोपीनाथविषयींची पुरी ओळख भूपालसिंगला न देण्याच्या खबरदारीनें विचारलें.

"इतका भयंकर माणूस मी जन्मांत कधीं पाहिला नव्हता. पुष्कळ भयंकर माणसें मला आजवर भेटलीं, पण हा माणूस नव्हेच मुळीं; राक्षस आहे. बरें; आज रामप्यारी जबाबांत काय म्हणाली? एक पोलीस मघाशीं सांगत होता कीं तुला गुन्हेगार म्हणून ओळखून काढण्यासाटीं इस्पितळांत रामप्यारीसमोर नेलें आहे. –त्याचें काय झालें?"

आपल्या मनांत अंकुरलेलें आपल्या सुटकेच्या आशेचें रोप वाढीला लागतें कीं करपून मरून जातें याची स्वतःलाच कांहीं खात्री वाटत

नसल्यामुळें हरकिसननें मोघम शब्दांत उत्तर दिलें, " आज रामप्यारीचा जबाब झालाच नाहीं. बोलतां बोलतां ती बेशुद्ध झाली. आतां पुन्हां केव्हां तरी जबाब घेतील. बरें, तुझी काय हालहवाल ? मी इथें पोलिसा-पाशीं तुझी चौकशी केली तेव्हां तुला गुन्ह्याचा तपास करायच्या कामांत अकबरपूर–रामनगरकडे नेलें आहे असें कळलें. "

" होय. दरवेशासारखे पोलीस मला—त्यांच्या हातीं लागलेल्यां या अस्वलाला चार गांव हिंडवून घेऊन आले कीं ! "

" कोणता आणखी नवीन गुन्ह्याचा फांस तुझ्या मानेसभोवार पडला आहे ? "

" बोलायच्या नाहींत त्या गोष्टी. असे किती फांस माझ्या गळ्याला लागतील ते थोडे. जाऊं दे तें. खेरें, तुला रामनगरच्या दंग्याची हकीगत कळली ? "

" नाहीं. कांहीं तरी भानगड तिकडे उपस्थित झाली आहे एवढें मी अकबरपूरला गेलों तेव्हां कळलें. पुढें काय झालें तें कळलें नाहीं. कारण लगेच मी चतुर्भुज होऊन इथें या सासुरवाडीला येऊन बसलों कीं ! तिथें किसानाकिसानांत कटकटी जोरांत सुरू झाल्या आहेत. त्या मिटवण्यासाठीं गोमतीमावशी त्याच दिवशीं सकाळीं अकबरपूरला गेली. आपणाबरोबर सुटलेला तो वकील चंद्रमोहन आणि माझा धाकटा भाऊ रामसिंग हे देखील तांतडीनें तिकडेच गेले होते. कां ? काय झालें त्या भानगडीचें पुढें ? "

" भानगडीचें काय घेऊन बसलास ? चांगला भडका उडाला कीं ! कशावरून किसानाकिसानांत तेढ उत्पन्न झाली न कळे. वेडे कुठचे ! उजवा हात डाव्या हातावर तुटून पडावा तसे रायसाहेबांचे किसान गोमतीदेवींच्या रामनगरावर तुटून पडले. त्यांनीं आश्रम तर लुटलाच; आणि आश्रमाच्या आजूबाजूचीं किसानांचीं घरें त्यांनीं दाणागोटा, चिरगूटपांघरूण, गुरांढोरांसह लुटून नेलीं. "

" कां पण ? "

" कां म्हणजे ? ते किसान जमीनदारीणबाईचा कैवार घेऊन आश्र-माचा बचाव करायला आले म्हणून ! आणि ही सारी लुटालूट,

जाळपोळ महात्मा गांधींच्या जयजयकारांत झाली. पोलीस चौकींतून मी उघड्या डोळ्यांनीं हा सारा प्रकार पाहत होतों."

"पण या थराला गोष्टी यायला काय कारण झालें?"

"कारण—पोलीस ठाण्यांत पोलीस लोक आपसांत टिंगलखोरीनें बोलत होते म्हणून मला तरी माहीत.—रायसाहेब पालीवालांचें आणि गोमतीदेवी जमीनदारीण बाईचें वांकडें विकोपाला जातां जातां या थराला गोष्टी आल्या. तुझ्या रायसाहेबाला तूं चांगला ओळखतोसच."

हरकिसननें तें ऐकून एक दीर्घ उसासा सोडला.

"शारदाही जर रायसाहेबांच्या त्या गुंड किसानांनीं आरंभलेल्या अत्याचारापुढें नमली असती, मुळुमुळू रडत बसली असती, तर ते हैवान तिला पळवून न्यायला कमी करते नसते. तिनें आपल्या बाजूच्या किसानांना धीर दिला आणि ठोशाला ठोसा लगावून त्या दंगेखोरांची खोड मोडायला लावली, म्हणून ती स्वतः बचावली आणि गोमतीदेवीचा आश्रमही मोडतोड होऊन तरी बचावला. बाकी गोमतीदेवींचे किसान मात्र रायसाहेबांच्या गुंड किसासांना खासे शेराला सव्वाशेर भेटले खरे. त्यांनीं त्या किसानांचीं हाडें तर चांगलींच घुसळलीं. आणि शिवाय त्यांच्या घरादाराची आणि रायसाहेबांच्या कोठीचीही लुटून, जाळून, पोळून खूप नासधूस केली. शारदेच्या आंगावर चालून आलेल्या दोघां गुंडांना तर ह्या किसानांनीं इतके मेरमरेतों मारलें कीं ते कदाचित मेले नाहींत तरी जन्माचे लुळेपांगळे तरी खास झाले असतील."

"आणि इतका प्रकार होईतों कुणी त्याला आळा घालूं शकले नाहींत?"

"कोण आळा घालूं शकणार? कुंपणच शेत खाऊं लागल्यावर कोण शेताची राखण करणार? त्याला उपाय एकच—शारदेनें केला तो."

"ठोशाला ठोसा?"

"होय. ठोशाला ठोसा. तुमच्या गांधींबाबाची शिकवण हें असें विस्तव जाळणारें पाणी आहे. रायसाहेबांची अहिंसा या विस्तव जाळणाऱ्या पाण्यासारखी आहे. तेही गांधीभक्त, आणि गोमतीदेवी, शारदा

याही गांधीभक्त. रायसाहेबांनीं ज्या मापावें दिलें त्या मापानें घेतलें. मला नाहीं वाटत त्यांत कांहीं चुकलेंस ! शारदा एरव्हीं नसती इतकी चिडली. पण रायसाहेबानें अंधारांत तिच्या वर्मी घाव घातलेला तिला कळल्यावर—"

" कोणता वर्मी घाव रायसाहेबांनीं घातला आणखी ? "

" रामप्यारीच्या खुनाच्या लफड्यांत तुला गुंतवायच्या कामीं रायसाहेब पोलिसाचे पडद्यामागचे साथीदार आहेत. "

" खरें हें ? "

" अगदीं खरें. रामसिंग तुझा भाऊ ना ? कुणी डाव्या गालांत थोबाडींत मारली तर ती खाऊन उजवा गाल पुढें करण्याइतका गांधी-बाबाचा भक्त तो, अहिंसा पाळणारा. पण तो देखील कमालीचा चिडून आवेशाच्या भरांत रायसाहेबाच्या गुंडांवर तुटून पडला यावरून पाहा. पोलिसठाण्यांत पोलीस आपसांत बोलत होते म्हणून मला माहीत. "

" बाहेर स्वर उंचावून महात्मा गांधींचा जयजयकार करणारे त्यांचे हे जमीनदार, शेटसावकार सारे असेच आहेत का रे ? रायसाहेब पाहवा तर तो तसाच. तो तुरुंगांत जाऊन बसलेला पुरुषोत्तमदासबाबूही तसाच. जो तो आपल्या मतलबाला जागत दबा धरून बसलेला... "

" आणि गोमतीदेवी तरी याला अपवाद आहे म्हणतोस ? हाताचीं पांच बोटें लहान मोठीं झालीं तरी तीं एका हाताचींच. गोमतीदेवी तरी आपल्या किसानांना काय कमी पिळते ? सांगतों काय !— ही गांधीबाबाची सत्य अहिंसा म्हणजे विस्तव जाळणारें पाणी आहे. विस्तव विझवणारें पाणी नव्हे, विस्तव जाळणारें पाणी आहे. या पाण्यांत आगीला जाळणारी आग आहे. आपले सारे जमीनदार राक्षस आहेत. पण त्या राक्षसांनाही खवळलेल्या किसानांच्या संतापाच्या आगींत आपला तरणोपाय नाहींसा दिसूं लागला म्हणून बनले गांधीबाबाच्या सत्य–अहिंसेचे भाट, आणि गर्जूं लागले महात्मा गांधी की जय !—चोर ! लबाड ! मोठे पाताळयंत्री ! हिंसेला जाळणारी आग गांधीबाबाच्या अंगीं आहे हें त्यांनीं बरोबर ओळखलें आणि पाहा आतां कसे त्या पाण्यानें विस्तव जाळीत सुटले आहेत..."

इतक्यांत गोपीनाथ हवालदारानें येऊन त्या कोठडीचें कुलूप काढलें आणि भूपालसिंगला म्हटलें, " चल बाहेर. "

" कां ? " बाहेर निघतां निघतां भूपालसिंगनें विचारलें.

" मुकाट्यानें बाहेर चल. जास्त बोलशील तर दांत पाडीन." अशी भूपालसिंगवर आपल्या कड्यां हुकुमतीची आग पाखडीत गोपीनाथनें गोठ्यांतलें मेलेलें वांसरूं तंगडीला धरून बाहेर ओढावें तसें भूपालसिंगाच्या दंडाला धरून खसकन् बाहेर खेचलें आणि तुच्छतेनें हरकिसनकडे पाहत कोठडीचा दरवाजा लावून घेतला.

हरकिसन आतां एकटाच त्या कोठडींत होता. भूपालसिंगला बाहेर नेण्यांत आलें हें त्याला बरेंच वाटलें. रामनगरच्या दंगलीची वार्ता भूपालसिंगच्या तोंडून ऐकल्यापासून त्याचें मन कमालीचें अस्थिर झालें होतें. शारदा आणि रामसिंग यांनीं अविचाराच्या भरांत हिंसेच्या मार्गानें पाऊल टाकलें ही त्यांची चूक झालीसें त्याला वाटलें.

" पण "—तो आपल्या मनाशीं बोलूं लागला, " अशा प्रसंगांत मी सांपडलों असतों तर मी देखील अशीच चूक केली असती.–भूपालसिंग म्हणतो तसें गांधीवाद हें विस्तव जाळणारें पाणी आहे का?... "

अशा विचारचक्रांत हरकिसन गटंगळ्या खात आपल्या खोलींत एकटाच बसला होता. बाहेर सूर्य अस्ताला गेला. पण त्याला त्याचें भान नव्हतें. त्याला दिवसरात्र सारेंच आयुष्य घनदाट अंधारानें मुसमुसल्यासारखें भासत होतें.

इतक्यांत हवालदार गोपीनाथ त्याच्या कोठडीपाशीं आला. कोठडी उघडीत तो हरकिसनला म्हणाला, " हं चल. आवर तुझें सामान. पड कोठडीबाहेर. " एवढें बोलून गोपीनाथ दरवाजाकडे किंचित् पाठ फिरवून उभा राहिला.

" कां? माझी सुटका झाली? " हरकिसननें आश्चर्यचकित वृत्तीनें विचारलें.

" होय. तुझी सुटका झाली. तुझ्या रामप्यारीनें तुझी सुटका केली. " गोपीनाथ मागें वळून न पाहतां उद्गारला.

"गोपीनाथ!" हरकिसननें हांक मारून म्हटलें, "जरा इकडे पाहा."

"काय?" गोपीनाथनें मागें वळून पाहत विचारलें.

"अजून तुझा माझ्याविषयींचा गैरसमज कायम आहे? रामप्यारी माझी पाटची बहीण आहे आणि मी तिचा पाठीराखा भाऊ आहें हें मी कोणत्या शब्दांत सांगितलें म्हणजे तुला खरें वाटेल रे ?"

"जगांत सारेंच खरें आणि सारेंच खोटें आहे. मला त्याच्याशीं काय करायचें आहे ?" गोपीनाथ अलिप्त वृत्तीनें उत्तरला.

"पण तुझ्या ह्या एका काळच्या जिवाभावाच्या मित्राला त्याचा कांहीं देखील अपराध नसतांना तूं असा छळणार? असाच डोकींत राख घातल्या-सारखा सारा जन्म वागणार तूं ?"

"होय. आणि सारा जन्म असाच डोकींत राख घालीत जगणार. जें जें कांहीं बरें वाईट समोर येईल तें जाळून त्याची राख करणार आणि ती राख अशीच डोकींत घालून जगणार. प्रयागच्या कुंभमेळ्यांत सर्वांगाला राखाडी फांसलेले आणि डोकींत राख घातलेले दिगंबर बैरागी पाहिले नाहींस तूं? तसाच मी ह्या जगाच्या कुंभमेळ्यांतला एक बैरागी आहें. आयुष्यांत हातीं लागेल तें जाळून त्याची राख अंगाला फांसून दिगंबर वृत्तीनें वैराण जीवनांत वणवण हिंडणें हेंच आतां माझें साध्य आणि साधन. एवढ्यासाठींच तर मी ही पोलीस खात्यांत नोकरी पत्करली आणि असा नरकांतला किडा बनलों. आतां तरी पटली तुला मरून नव्यानें जन्माला आलेल्या ह्या गोपीनाथाची ओळख? तुझा मित्र गोपीनाथ मागेंच मेला. त्याचें हें भूत तुझ्याशीं बोलतें आहे. त्या गोपीनाथवर जगानें जे अन्याय केले त्या अन्या-याचा बदला घेत हें त्याचें भूत सूडाच्या भावनेनें खवळून जगांत संचार करूं लागलें आहे. काय ठेवलें आहे तुम्ही माणसांनीं माझें वाटोळें करायचें शिल्लक? पण आतां दिवस माझे आहेत. जगानें माझें वाटोळें करायचें तेवढें केलें. पण जगाच्या दुर्दैवानें त्यांतूनही मी जिवंत राहिलों आहें. —कशासाठीं माहीत आहे? जगावर सूड घेण्यासाठीं. सारा जन्म देवा-धर्माला भिऊन पापभीरुपणानें आयुष्य कंठणाऱ्या ह्या गोपीनाथची बायको देखील तुम्ही त्याच्यामागें घरांत टिकूं

दिली नाहीं. जा. तुझ्या महात्मा गांधींना सांग, कीं तुमच्या आज्ञेप्रमाणें गोपीनाथ लढाईवर गेला, आणि त्याच्यामागें ह्या लोकांनीं त्याच्या संसाराची अशी वाताहत केली. महात्माजींना म्हणावें तुमच्यासारख्या थोर महात्म्याला ह्या बिर्ढावलेल्या गुन्हेगारांचें पारिपत्य करतां येणार नाहीं म्हणून तो अधिकार ह्या गोपीनाथनें आपल्यापुरता आपल्या हातीं घेतला आहे. समाजांतील प्रतिष्ठितांच्या चैनीसाठींच माझ्या रामप्यारीचा बळी पडला. सुंदर तरुण स्त्रियांचा एवढा गडगंज व्यापार देशभर चालला आहे तो ह्या प्रतिष्ठितांच्या जिवावर व त्यांच्याच करमणुकीसाठीं चालला आहे. म्हणूनच हा गोपीनाथ आतां त्या बाजारपेठेंतील एक व्यापारी बनला आहे. ह्या गोपीनाथच्या संसाराची चिता पेटली तशा घरोघर संसारांच्या चिता पेटवाव्या, यांतच आतां मला खरा आनंद आहे. बरें आणि वाईट हा भेदाभेद आतां या गोपीनाथपाशीं उरला नाहीं. भडकलेला वणवा, काय जाळ आणि काय न जाळूं याचा कधीं विचार करीत नाहीं..."

बोलतां बोलतां तो मध्येंच थांबला आणि दोन्ही हातांत तोंड घट्ट झांकून घेऊन कोठडीच्या गजावर डोकें टेकून उभा राहिला.

हरकिसन वडवानलांतील ठिणग्यांसारख्या त्याच्या त्या उद्गारांनीं अगदीं दिपून—अगदीं भेदरून गेला. पाण्याच्या पोटीं विस्तव कसा असतो, हें आज त्याला त्याच्या धर्मशील, पापभीरू, सात्विकवृत्ति मित्राच्या ह्या भीषण परिवर्तनावरून आढळून आलें.

"चल बाहेर पड. लाग आपल्या वाटेला." कोठडीचा दरवाजा लोटून उघडीत गोपीनाथ म्हणाला. अंतःकरणाला भारभूत होऊन बसलेलें रामप्यारीवरील हल्ल्याचें सत्य एकदांचें कुणापाशीं तरी बोलून टाकावें असें त्याला त्यावेळीं क्षणभर वाटलें. पण तें धाडस त्याच्यानें करवलें नाहीं. इतके दिवस डाकिणीसारखी त्याला क्रूर वाटणारी रामप्यारी त्या दिवशीं सायंकाळीं तिनें पुन्हा दिलेल्या कबुली जबाबावरून त्याला भंगलेली शापभ्रष्ट देवता अशी वाटूं लागली होती. आपण तिला ठार मारण्याच्या निष्ठुर हेतूनें तिच्यावर हल्ला केला असें असतांना तिनें स्वतांच उद्वेगाच्या भरांत हा आत्महत्येचा प्रयत्न केल्याचें कबूल करून आपणाला वांचविलें.

ह्या एकाच गोष्टीवरून त्याचा तिच्यावरचा सारा राग लयाला गेला होता. उलट रामनामाला भिऊन भुतें दूर दूर राहतात म्हणतात तसा तो भिऊन आतां रामप्यारीच्या पवित्र स्मृतीपासून आंग चोरून दूर दूर राहूं पाहत होता. त्या रहस्याचा त्यानें हरकिसनपाशीं उच्चारही केला नाहीं. उलट तें सत्य आपण ह्या असत्य जगापुढें कधींही उजेडांत आणायचें नाहीं अशा निर्धारानें त्यानें हरकिसनला कोटडीबाहेर काढलें व कोठडीचा दरवाजा लावून घेतला.

" जा. कोतवालसाहेबांपाशीं जाऊन त्यांना सांग आणि आपल्या वाटेला लाग. सरकारनें तुझ्यावर खटला भरायचा नाहीं असें टरवलें आहे.

रात्र पडण्याच्या सुमाराला हरकिसन एकदांचा पोलिस टाण्यावरून दोषमुक्त होऊन बाहेर पडला. बराच वेळ त्यानें त्या आपल्या परिचयाच्या शहरांतील रस्त्यांतून भटकण्यांत घालविला. त्याची सासुरवाड तिथें होती. पण तिला तो पूर्वीच पारखा झाला होता. ओळखीचे इष्टमित्र शहरांत अनेक होते. पण आपण आपलें काळें तोंड घेऊन ओळखीच्या घरीं कसें जावें अशा शरमिंदेपणानें तो कुठेंच गेला नाहीं. त्या एकांताच्या भ्रमणांत भूपालसिंगच्या तोंडून ऐकलेल्या एकीहून एक भीषण वार्तांच्या आठवणी त्याचें काळीज कुरतडीत होत्या. शारदा व रामसिंग यांच्या-विषयीं त्याला हळहळ लागून राहिली होती.

इतक्यांत एक मोटार समोरून आली व रस्त्यांतच हरकिसनपाशीं थांबली.

" बाबूजी ! सुटलांत तुम्ही ? चला. बसा मोटारींत. " मोटार ड्रायव्हर खालीं उतरून मोटारीचा मागचा दरवाजा उघडून देत हरकिसनला म्हणाला, " शिवचरण बाबूंना पोंचवायला आलों होतों. "

" शिवचरणबाबू कशाला आले होते अकबरपूरला ? "

" पकडल्या गेलेल्या किसानांचें कॉंग्रेस कमेटीतर्फे अभिनंदन करण्यासाठीं संध्याकाळीं नागरिकांची मोठी सभा झाली. त्या सभेचे अध्यक्ष म्हणून आले होते शिवचरणबाबू. कॉंग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी ना ते ! रायसाहेबांनीं मुद्दाम चिट्ठी पाठवून अभिनंदनाची सभा घ्यायला कॉंग्रेस पुढाऱ्यांना सुचविलें होतें. "

कां न कळे पण शिवचरणबाबू हेही एक जमीनदार व रायसाहेबांचे मित्र आहेत हें सत्य हरकिसनला तेव्हां आठवलें.

त्यानें डोकावून पाहत मोटार ड्रायव्हरला विचारलें, " मोटारींत आणखी कोण आहे ? "

" कोणी नाहीं. रिकामी आहे मोटार. " असें सांगत मोटार ड्रायव्हर मोटारींत आपल्या जागीं जाऊन बसला.

" मग मीही पुढेंच बसतों कीं ! जाऊं बोलत बोलत. " असें म्हणत हरकिसन मोटारींत ड्रायव्हरशेजारच्या जागीं जाऊन बसला.

" मला आत्तांच कळलें, तुमची सुटका झाली असें कोणीसें बोललें. म्हणून मी हा पोलीस टाण्यावर चौकशी करायलाच चाललों होतों. बरें झालें, लौकर मोकळे झालां तें. कौसल्याआई रोज रडत बसतात तुमची आठवण काढून. आणि त्यांत आज तर काय— "

" कां ? जीभ कां चावलीस ? आज काय झालें सांग ना ! " हरकिसननें विचारलें.

मोटार ड्रायव्हर त्यावर कांहीं बोलेना.

" रामनगरची भानगड मिटली का ? काय झालें पुढें त्या दंगलीचें ? पोलिसांनीं येऊन कुणाला पकडलें बिकडलें तर नाहीं ना ? "

" रामनगरची भानगड !—ही खऱ्याची दुनिया नाहीं म्हणतात, तें मला आज मात्र अगदीं सोळा आणे पटलें बाबूजी ! गांधीजींच्या नांवावर हे त्यांचे भगत लोक चोरांना सोडून संन्याशांना सुळीं कसें देतात हें आज मला कळून आलें. "

" कां ? काय झालें ? "

" पं. नेहरू इतके गांधीवेडे असतील असें नव्हतें मला वाटलें. "

" कां ? काय केलें पं. नेहरूंनीं ? "

" आपल्याच लोकांना दाखवून देऊन पोलिसांच्या हातीं पकडून दिलें. आणखी काय करायचें बाकी राहिलें ? "

" पं. नेहरुनीं लोकांना पकडून दिलें ? आणि आपल्या समक्ष ? "

" होय.—आपल्या समक्ष नाहीं;– पंडितजी काल व्याख्यान देऊन गुन्हेगारांना उजेडांत उभे करून गेले, आणि तेव्हांपासून तें जळतें कोलीत हातीं घेऊन पोलीस खेडोपाडीं घरोघर आगी लावीत सुटले आहेत. दोन दिवसांत त्यांनीं शंभर तरी लोक पकडले असतील. जा खेड्यांत, धर माणूस, पकड कीं घाल तुरुंगांत; मरेमरेतों मारपीट करून छळ त्याला. धर चरखा जाळ. असा नुसता कहर उडवून दिला आहे पोलिसांनीं अकबरपुरांत आणि आजूबाजूच्या गांवांत कालपासून. "

" पण पंडितजी असें काय बोलले तरी काय ? "

" सांगतों काय ! चोराला सोडून संन्याशाला सुळीं देणारे पंडितजी ! त्यांना कळायला पाहिजे होतें कीं अकबरपूरची दंगल रायसाहेब पालीवालनीं आपल्या पदरच्या गुंड किसानांना चिथावणी देऊन मुद्दाम माजविली. किसान जर खेड्यावर चालून आले आणि खेड्यांतल्या आमच्या किसानांचीं घरें जाळून लुटूं लागले तर आमच्या लोकांनीं काय हात जोडून स्वस्थ बसायचें ? आश्रमाशेजारचें चरखामंदीरही त्यांनीं मोडून टाकलें. चरखे जाळून टाकले.— "

" महात्माजींचे किसान नव्हते ते. महात्माजी गुंडांचे गुरु नाहींत. "

" महात्माजी नसतील. पण तुमचे हे रायसाहेब पालीवाल ह्या साऱ्या अनर्थांच्या मुळाशीं आहेत. ते तर महात्माजींना आपला गुरु समजतात ना ? "

" रायसाहेबांनीं किसानांना सांगून लुटालूट करायला लावली ? "

" होय. होय. रायसाहेबांनीं लावली. गोमतीदेवी आतांशा गांधीजींच्याविरुद्ध वागूं लागल्या आहेत, त्या देशांत खून, मारामाऱ्या करणाऱ्या गुंडांना आसरा देतात आणि दंगे माजवतात, अशी किसानांत गोमतीदेवींची बदनामी त्यांनींच चालविली आहे. किसान काय !—महात्मा गांधींची आज्ञा म्हणून रायसाहेबांनीं गोमतीदेवीचें रामनगर लुटायला त्यांना सांगितलें; त्यांनीं महात्मा गांधींच्या जयजयकारांत लुटलें. "

"–आणि चंद्रमोहन तेव्हां काय करीत होते ? "

" ते महात्माजींची आठवण करून कोरडे शांतिपाठ म्हणत बसले होते ! "

"मला नाहीं हें खरें वाटत रायसाहेब इतकी माणुसकी सोडून वागतीलसें. माणसाच्या खोडसाळपणालाही कांहीं मर्यादा आहे."

"त्या मर्यादा आम्ही गरिबांनीं पाळायच्या असतात बाबूजी! रायसाहेबांसारख्या राजेलोकांनीं नव्हे. सभेंत माझ्या एकदां मनांत आलें होतें, पं. नेहरूनीं सांगितलें तेव्हां उभे राहून विचारावेंसें. नीट खऱ्याखोट्याची विचारपूस न करतां पंडितजींनीं सभेंत किसानांवरच आग पाखडली. आणि महात्मा गांधींचें नांव घेत दंगल करणाऱ्या किसानांना पुढें येऊन गुन्हा कबूल करायला सांगितलें. भोळे बिचारे वीस एक किसान उठून उभे राहिले. पोलीस अधिकारी तिथें उभे होतेच. त्यांना काय मग आयती शिकार सांपडली! नेहरूंची पाठ फिरते न फिरते तोंच त्यांची मोटार गांवांतून निघून जातां क्षणीं रातोरात पोलिसांनीं धरपकडीचा धुमाकूळ घालून रामनगरचें रावणनगर बनवून सोडलें."

ती वार्ता ऐकून त्या वेळच्या परिस्थितीचें भेसूर कल्पनाचित्र हरकिसनच्या अंतश्चक्षूंपुढें उभें राहिलें. रायसाहेबांच्या कुटिल नीतीला बळी पडलेल्या किसानांविषयीं तर त्याला अत्यंत दुःख झालेंच. पण त्यापेक्षांही रामसिंग व शारदा यांच्याविषयीं त्याला अधिक काळजी वाटूं लागली.

तो त्या दोघांविषयीं विचारणार तोंच मोटार ड्रायव्हर आपण होऊनच पुढ बोलूं लागला, "मला खुळ्या भोळया किसानांचें कांहीं वाटलें नाहीं. पण रामसिंगजी एवढे शिकले सवरलेले, आमच्यांतले जाणते. नेहरूंनीं गुन्हेगारांना हात वर करायला सांगितला आणि त्यांनीही हात वर केला. मग पोलीस त्यांना पकडायला सोडतात?"

"रामसिंगला पकडलें?"

"पकडलें तर! शारदादेवी देखील आज, उद्यां इतक्यांत पकडल्या जाणार खास. कदाचित् आज त्या रामनगरला जाऊन सभा घेणार होत्या, त्या सभेंत पकडल्याही गेल्या असतील. रामनगरला जातांनाच त्या म्हणत होत्या कीं, माझे किसान जर गुन्हेगार, रामसिंगजी गुन्हेगार, तर मी देखील तोच गुन्हा केला आहे. मलाही गुन्हा कबूल करून तुरुंगांत गेलेंच पाहिजे."

हरकिसननें तें ऐकून दुःखानें एक दीर्घ उसासा सोडला.

" पण बाबूजी ! आम्हांला अजून कळत नाहीं—हिंसा झाली असें पं. नेहरू म्हणाले आणि त्यांनीं आमच्या किसानांना गुन्हा कबूल करायला लावून तुरुंगांत डांबून टाकलें. पण ही हिंसा कशी हो ? रायसाहेबांचे किसान आमचें रामनगर जाळीत सुटले तरी आम्ही किसानांनीं त्यांचा प्रतिकार करायचा नाहीं ? फुकट जळून मरायचें त्या आगींत ? रायसाहेबांच्या गुंडांनीं शारदादेवींना पळवून न्यायचा डाव रचला होता. हें पाहतांच रामसिंगजींनीं चिडून त्या गुंडांवर हल्ला केला हा देखील त्यांचा गुन्हाच का? ही कसली सत्य अहिंसा ? गांधीजींची अहिंसा जर माणसाला अशी नेभळट, लाचार, जिवंत मढीं बनवून सोडणारी असेल तर त्या अहिंसेला कोपरापासून नमस्कार.—होय. मी म्हणतों, रामसिंगजी रागाच्या भरांत शारदादेवीवर टपलेल्या त्या गुंडांवर तुटून पडले. त्यांचें पाहून बाकीचे किसानही तुटून पडले. त्यांनीं त्या गुंडांना बडवलें– मी म्हणतों, एक त्यांतला मेलाही.—"

" एक मेला ? " हें विचारतांना हरकिसनचें सर्वांग शहारून आलें. रामसिंगवर जर या खुनाचा आरोप आला तर–त्या पुढच्या भीषण परिणामाची कल्पनाही त्याला करवेना.

" होय. एक मेला आणि दुसराही बहुतेक मरणार. त्या दोघांना फारच वर्मी घाव बसले आहेत. पण मी म्हणतों, असले गुंड आमच्या हातून मरेमरेतों पिटले गेले, ठार झाले, म्हणून तो गुन्हा कसा ? नेहरूंनीं सभेत आम्हां साऱ्या लोकांना हिंसा करून गांधीजींच्या थोर नांवाला डाग लावल्याबद्दल कडक शब्दांत दोष दिला. पण मला सांगा बाबूजी ! आमच्या बायकाबहिणींच्या अब्रूवर उठणाऱ्या गुंडांचा प्रतिकार देखील आम्ही करायचा नाहीं तर काय गुंडांना आमच्या बायकाबहिणींची अब्रू घेऊं द्यायची ? ... "

त्या मोटार ड्रायव्हरला पुढें बोलवेना, इतका संतापानें त्याच्या कंठीं गहिंवर दाटून आला.

हरकिसनलाही मोटार ड्रायव्हरच्या त्या विचाराशीं समरस होऊन तो प्रश्न सोडवणें आतां भाग पडूं लागलें होतें. दशमुखी रावणासारखा तो

प्रश्न त्याला दहा तोंडांनीं दरडावून विचारीत होता, "हीच तुझी अहिंसा ? निरपराधी नागरिकांचें वित्त–कलत्र–जीवित हिंसकांच्या हिंसा-वृत्तीमुळें धोक्यांत आलें तरी मनाला जागें होऊं न देणारी ही तुझी अहिंसा म्हणजे हिंसेला जन्म देणारी, हिंसेची जोपासना करणारी आत्यंतिक हिंसेची जननी नव्हे का ?... भूपालसिंग म्हणाला त्यांत बरेंच तथ्य आहे. गांधीजींची अहिंसा हें विस्तव जाळणारें पाणी आहे..."

●

अकबरपूर जसजसें जवळ येऊं लागलें तसतसें हरकिसनला उदासवाणें वाटूं लागलें. जें जें त्याला दिसावें तें तें उदासवाणें. जें जें मनांत यावें तें तें उदासवाणें. जें जें कानीं पडावें तें तें उदासवाणें! वास्तविक ती पहांटेची वेळ होती. पहांटेचा उत्तेजक गार वारा जागें होणाऱ्या जगासाठीं नवचैतन्यानें नटून वाहूं लागला होता. आणखी थोड्या वेळानें उजाडणार होतें. दिशा फांकत होत्या. पण हरकिसनच्या अंतःकरणांत औदासिन्य फैंसाळून राहिलें होतें. त्याला त्या मंगल प्रभातसमयींचा उत्साह मुळीच जाणवेना. पहांट त्याच्या कल्पनेंतून अगदीं दूर होती. पहांटेपूर्वीचा काळोख मात्र अमावास्येच्या काळेकुट्टपणानें त्याच्या जीवनांत–त्याच्या जगांत–त्याच्या त्रिभुवनांत मुसमुसून राहिला होता.

मोटार आश्रमाच्या आवारांत जाऊन थांबली. आश्रमांतून शाम-कुंवर प्रार्थनेनंतर नेहमींप्रमाणें एकतारीवर गात असलेल्या 'जोगी! मत जा! मत जा! मत जा!' या मीराबाईच्या भैरवीचे भावपूर्ण स्वर त्याला ऐकूं आले. पण नेहमीं त्याला आनंदी करणारी ती भैरवी आज त्याला अधिकाधिक दुःखी करूं लागली. त्याला वाटलें, जणूं आपली भारतमाता आपल्या कोटमाप संतानांच्या छलनेमुळें दुःखी होऊन त्या दुःखाचा विरंगुळा करण्यासाठीं आपल्या दैवताला–त्या जोग्याला–आपल्या दास्यविमोचनासाठीं असहकारितेच्या चळवळीचें यज्ञकुंड प्रज्वलित करणाऱ्या महात्मा गांधींना टाहो फोडून हांक मारीत आहे. "हे योगिराज! जाऊं नकोस! जाऊं नकोस! जाऊं नकोस! मी पायां पडत्यें. मी ही अगुरु चंदन अशा सुगंधी द्रव्यांनीं माझी चिता रचली आहे; तिला तूं आपल्या हातानें अग्नि दे. जळून

जळून त्या चितेचें भस्म होत आहे त्याचें तूं आपल्या आंगाला लेपन करून सार्थक कर. तुझ्या जीवनज्योतींत माझी जीवनज्योत एकरूप होऊन जाऊं दे. योगिराज ! मी तुझ्या पायां पडल्यें. जाऊं नकोस! जाऊं नकोस ! जाऊं नकोस ! "

भारतमातेच्या सुपुत्राला शोभेशा कळवळ्यानें मनोमन भारतमातेला हांक मारीत हरकिसन मोटारींतून उतरला तो थेट आश्रमाच्या पायऱ्या चढून गेला. पहांटेच्या वेळीं आश्रमाचा दरवाजा आंतून बंद केलेला होता. त्यानें दरवाजावर धक्का देऊन हांक मारली, " आई ! "

राजकुंवरनें येऊन दरवाजा उघडला.

" आई कुठें आहे ? " हरकिसननें विचारलें. दुःखातिरेकानें त्याचा स्वर घोगरा झाला होता. त्याला नीट बोलतांही येत नव्हतें.

" कौसल्यादेवी आजारी आहेत. रात्रभर तळमळत होत्या. डोळ्याला डोळा कसा तो लागला नाहीं.— "

" मला माझ्या आईला भेटायचें आहे. कुठें आहे ती ? " असें विचारीत हरकिसन 'आई ! आई !' अशा हांका मारीत त्याच पावलीं सरळ आंत गेला. समोर एक पडदा टांगलेला होता. त्या पडद्या आडून आपल्या हांकेला आईची क्षीण 'ओ' मिळालेली ऐकतांक्षणीं तो पडदा बाजूला सारून आंत गेला व बिछान्यावर पडलेल्या कौसल्यादेवीला मिठी मारून तिच्या छातीवर मस्तक टेकीत उद्गारला, " आई! मी आलों."

" तूं आलास ? " असें अडखळत उद्गारून कौसल्यादेवीनें आपल्या कांपऱ्या अशक्त हातानें त्याचें मस्तक कुरवाळलें.

" आई ! ऊठ आतां. मी आलों. ऊठ ना ? " असें उद्गारत त्यानें तिला हात देऊन उठविलें. तिच्या उशालगत लहानशा चौरंगावर महात्मा गांधींचा अर्धपुतळा पुष्पहारांनीं मंडित करून मांडलेला होता. तो आपल्या आंगाचा धक्का लागून पडेल या भीतीनें ती उजवा हात छातीसरसा जखडून घेऊन अवघडून उठून बसली.

हरकिसननें तो चौरंग डाव्या हातानें कोपऱ्यांत लोटीत कौसल्यादेवीला म्हटलें, "आई! आतां तूं लौकर बरी हो. मी आतां तुला सोडून जाणार नाहीं हं!"

"नको जाऊंस बाबा! आतां कुठें जाऊं नकोस. फार हाल भोगलेस! गांधीजींची कृपा म्हणून तूं मला भेटलास. तुझ्यासाठींच माझा जीव गुंतून राहिला होता रे!" असें उद्गारत तिनें कोपऱ्यांतील चौरंगावरील गांधीजींच्या पुतळ्याला दोन्ही हात जोडून भावपूर्वक नमस्कार केला.

तोंच उजाडलें.

'कादंबरीमय आंग्लशाही'ची

पुढील कादंबरी

भारतमातेची हांक

# कादंबरीमय शिवशाही

लेखक :

## विठ्ठल वामन हडप

●

छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मापासून तों छत्रपति शाहू महाराजांच्या राजवटीपावेतोंचा काळ हा 'शिवशाही'चा काळ होय. या काळांतील मराठ्यांचा इतिहास या 'कादंबरीमय शिवशाही' मालेंतून कादंबरीकार हडप हे सुमारें पांच सहा कादंबऱ्यांतून गुंफीत आहेत. 'शिवशाही'चा उदय, उत्कर्ष व अपकर्ष कसा व कां झाला, याचें लेखकानें या मालेंतील कादंबऱ्यांच्या द्वारां केलेलें विवेचन आजवर उपलब्ध असलेल्या शिवकालीन इतिहासापेक्षां व इतिहासकथांपेक्षां अधिक विश्वसनीय, सखोल व वास्तववादी आहे. महाराष्ट्राच्या समाजेतिहासांतील उलथापालथींचें जीवनार्थ कलहविषयक व्यापक, सामाजिक, सत्य व उज्ज्वल स्वरूप वाचकांना या कादंबऱ्यांत विशद झालेलें दिसेल. शहाजीराजे विजापूरच्या बादशहाचे तांबेदार झाले तेथवरच्या शिवाजी महाराजांच्या बाळपणांतील ऐतिहासिक घटनांवर आधारलेली या मालेंतील पहिली कादंबरी **शिवशाहीची पहांट** ही प्रसिद्ध झाली असून मालेची दुसरी कादंबरी

## शिवशाहीचा अरुणोदय

ही लौकरच प्रसिद्ध होईल. मालेंतून यापुढें साधारणतः दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें कादंबऱ्या प्रसिद्ध होतील व मालेंचें प्रकाशनकार्य पुढील दोन वर्षांत निश्चित पूर्ण होईल. मालेचे कायमचे ग्राहक होणारांना मालेच्या कादंबऱ्या सवलतीनें देण्याची योजना आहे.

माहितीपत्रक मागवा.

आदर्श वाङ्मय प्रकाशन

खासबाग : कोल्हापूर.